महाराष्ट्र मंडळ शिकागो

सुवर्ण महोत्सवी वर्ष

सन १९६९-२०१९

शके १८९१-१९४१

सुवर्णस्मृती

अवघे अर्धशे वयमान, शिकागो महामंडळ श्रीमान

मराठी मनांचा सन्मान, सप्तसागरापार भगव्याचा अभिमान

Helping generations *achieve their goals.*

Since Ameriprise Financial was founded back in 1894, we have been committed to putting clients first. Helping generations plan for the expected and unexpected.

As an Ameriprise financial advisor, I remain true to our vision of always putting clients' needs first. Discover how you can benefit from the strength of a global leader and the heart of a one-to-one relationship.

Narayan Athanikar
MS, CIMA®, CRPC®
Financial Advisor
Vice President

630.762.6538
3 N 2nd St, Ste 200
St. Charles, IL 60174
narayan.athanikar@ampf.com
ameripriseadvisors.com/narayan.athanikar
CA Insurance #0F60740

Ameriprise Financial | Be Brilliant®

Ameriprise Financial Services, Inc. Member FINRA and SIPC.
© 2018 Ameriprise Financial, Inc. All rights reserved. (11/18)

सुवर्णस्मृती

स्मरणिका

सन १९६९-२०१९
शके १८९१-१९४१

अवघे अर्धशे वयमान, शिकागो महामंडळ श्रीमान मराठी मनांचा सन्मान, सप्तसागरापार मगव्याचा अभिमान

ASHYANA CATERING
Live Action Stations
Finest Presentation
Cook On Site
Impeccable Service
Elaborate Equipment
@ Top Chicago Hotels
ASHYANA
BANQUETS & CATERING

क्र.	लेख	लेखक / लेखिका	पान क्र.
१	संपादकीय	उल्का नगरकर	१
२	संयोजकांचे मनोगत	रवी जोशी	३
३	महाराष्ट्र मंडळ शिकागोची पंचविशी	जया हुपरीकर	५
४	बीज अंकुरे अंकुरे (वर्ष १९७०-१९७४)	प्रसन्न जोगळेकर	७
५	आनंदगंधर्व	रश्मी चाफेकर	११
६	सदाबहार व्यक्तिमत्व (वर्ष १९७५-१९८०)	मिलिंद वेलणकर	१३
७	कट्टा (वर्ष १९७५-१९८०)	अभिजित रायरीकर	१६
८	आयुष्यावर बोलू काही!...	कल्पना नेकलीकर	१९
९	बृहन्मंगल प्रभातीचे सूर्य (वर्ष १९८१-१९८५)	चेतन रेगे	२४
१०	एका प्रशांतची गोष्ट	प्रसन्न जोगळेकर	३०
११	महाराष्ट्र मंडळ शिकागोचा १९८६-१९९०चा प्रवास	वर्षा विसाळ	३३
१२	मौज - डॉ. सलील कुलकर्णी मुलाखत	अर्चना भिडे	३६
१३	मी, महाराष्ट्र मंडळ शिकागो (वर्ष १९९१-१९९५)	रश्मी चाफेकर	३८
१४	महाराष्ट्र मंडळ शिकागोची पन्नाशी	नितीन जोशी	४१
१५	कणेकरी शुभेच्छा	प्रसन्न जोगळेकर	४३
१६	पत्रास कारण की... (वर्ष १९९६-२०००)	उल्का नगरकर	४८
१७	दिलीप प्रभावळकरांशी हितगुज	वर्षा विसाळ	५१
१८	मंडळाच्या वर्ष २००१-२००५ या कालखंडातील अध्यक्षांशी संवाद	विनता कुलकर्णी	५३
१९	मुलाखतकार संझगिरी	रेखा देवधर	५७
२०	मंडळाची गरुडभरारी (वर्ष २००६-२०१०)	कल्पना नेकलीकर	५९
२१	विजय उवाच	वर्षा विसाळ	६३
२२	वाटचाल (वर्ष २०११-२०१५)	अर्चना भिडे	६५
२३	शुद्ध बीजापोटी। फळे रसाळ गोमटी।। सौ. वंदना गुप्ते मुलाखत	चेतन रेगे	६९
२४	सिंहावलोकन (वर्ष २०१६-२०१९)	रत्नांगी मालपेकर	७२
२५	शिकागो मराठी शाळा	विद्या जोशी	७५
२६	शिकागोची नाट्यपरंपरा	अभिजित रायरीकर	७७
२७	पोवाडा- गाथा: महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या अर्धशतकपूर्तीची!	विनता कुलकर्णी	८१
२८	सुवर्ण महोत्सव कार्यकर्ते		८२
२९	आजीव सदस्य		९४
३०	सुवर्ण महोत्सव आनंदमेळावा - कार्यक्रम पत्रिका		९५

सुवर्णस्मृतीकार

संपादक: उल्का नगरकर
मुखपृष्ठ: शलाका पालकर-रेगे
मांडणी, शीर्षक लेखन व अक्षर जुळणी: शलाका पालकर-रेगे, आशिष नगरकर आणि चेतन रेगे
मध्यपृष्ठ: राधा गोडांबे
सजावट: शलाका पालकर-रेगे
मुद्रित शोधन: विनता कुलकर्णी, चेतन रेगे
मुद्रक: मायक्रोप्रिंट

वेळापत्रक व्यवस्थापन: प्रसन्न जोगळेकर
कार्यवाह: वर्षा विसाळ, शलाका पालकर-रेगे
जाहिरात संकलन: विद्‌या जोशी, अमोल पाटील आणि उल्का नगरकर
स्कॅनिंग: कल्पना नेकलीकर
छायाचित्रण: अर्चना भिडे, अनिरुद्ध भिडे
नाटुकली लेखन: रश्मी चाफेकर
स्वयंसेवक नामावली: रत्नांगी मालपेकर

सुवर्णस्मृती नामकरण: विनता कुलकर्णी
घोषवाक्य: चेतन रेगे
बोधचिन्ह: रुणाली पाटील

सल्लागार: नितीन जोशी
सुवर्ण महोत्सव समिती संयोजक: रवी जोशी
प्रकाशक: महाराष्ट्र मंडळ शिकागो - सुवर्ण महोत्सव समिती (२०१९)

शलाका पालकर-रेगे

राधा गोडांबे

आशिष नगरकर

रुणाली पाटील

अनिरुद्ध भिडे

सप्रेम नमस्कार!

"सुवर्णस्मृती" या 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'च्या स्मरणिकेचे संपादक-पद स्वीकारले तेव्हा एक नवीन व अत्यंत आव्हानात्मक काम करायला मिळणार याचा आनंद झाला. त्याचबरोबर, गेल्या ५० वर्षांचा लेखा-जोखा मांडायचा, नव्याने मंडळात सहभागी झालेल्या स्वयंसेवकांच्या कष्टांचेही यथोचित स्वागत करायचे, मंडळात अनेक दशके कार्यरत असलेल्या मंडळींचे अनुभव त्यांच्याच शब्दांतून अनुभवायचे, मंडळाला भेट देणाऱ्या अनेक नामवंतांचे मंडळासोबतचे किस्से ऐकायचे आणि हे सगळं स्मरणिकेच्या टीमच्या सहाय्याने व्यवस्थित शब्दबद्ध करून सर्वच मराठीजनांच्या समक्ष आकर्षक रीतीने सादर करायचे - अशी अनेक आव्हाने नजर रोखून माझ्याकडे पाहत होती.

समाजहिताची परंपरा सांभाळून आणि जुन्या-नव्या मंडळ सभासदांच्या अभिरुचीचे भान ठेवून लेखकांची, तसेच विषयांची निवड 'सुवर्णस्मृती'साठी केली आहे. आज मंडळाचे समृद्ध असे स्वरूप आपण पाहतो आहोत हे सर्व असंख्य कार्यकर्त्यांच्या श्रमांतून निर्माण झालेले आहे, हे तर सूर्यप्रकाशासम स्पष्ट आहे. सुवर्णस्मृतीची आखणी करताना आम्हीं गेल्या ५० वर्षातील - प्रत्येक वर्षाचे 'अध्यक्ष' हे तत्कालीन कार्यकारिणीचे प्रतिनिधी या नात्याने, त्यांच्या मुलाखती घ्यायच्या ठरवल्या. १९६९ पासून २०१९ पर्यंत, प्रत्येक ५ वर्षांचे विभाग करून त्यासाठी काही सदस्य 'लेखक' म्हणून निवडले आणि या लेखकांचे त्या सर्व अध्यक्षांसोबत मुलाखतींचे आयोजन केले. त्याकरिता योग्य ती संपर्क, साधने, साहित्य पुरवण्याचा प्रयास केला. महाराष्ट्रातून इकडे येऊन मंडळाच्या कार्यक्रमांना यशस्वी करण्यात अनेक नामवंत कलाकारांचा सिंहाचा वाटा आहे. या मान्यवरांनी मंडळाचे उपक्रम हे नेहमीच जवळून पाहिले आहेत, अनुभवले आहेत त्यांच्या अनुभवांतून मंडळाची वाटचाल पाहणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यामुळे, आम्ही त्यांच्या उपलब्धतेनुसार निवडक कलाकारांच्या मुलाखती घेतल्या. स्मरणिकेचे नामकरण करण्याकरता स्पर्धेचे आयोजन केले होते. तसेच वाचकांच्या गुप्त मतदान पध्दतीद्वारे त्यावर शिक्कामोर्तबदेखील केले आणि आपल्या स्मरणिकेचे "सुवर्णस्मृती" असे बारसेदेखील केले!

मंडळाचा रौप्य महोत्सव १९९४ साली झाला होता. त्यानंतरचा कालखंड शब्दांकित करण्यासाठी पहिली २५ वर्षे व पुढची २५ वर्षे असा मागोवा घेण्याचे योजले. उत्तर अमेरिकेतील सर्व महाराष्ट्र मंडळामध्ये शिकागोचे मंडळ हे त्याच्या 'गौरवशाली नाट्य परंपरेमुळे' ओळखले जाते हे तर जगजाहीरच आहे. त्याचाही उहापोह या स्मरणिकेमध्ये केला आहे. शिकागो मराठी शाळेच्या बीजाने गेल्या ५ वर्षात डेरेदार वृक्षाचे रूप धारण केले आहे. त्याचीही माहिती यात समाविष्ट केली आहे. 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'च्या अर्धशतकी वाटचालीचा गौरवशाली इतिहास विस्तृतपणे मांडणारी, अभिमानाने सांगणारी जणू काही एखादी "बखर", अशी संकल्पना प्रस्तुत सुवर्णस्मृतीचे 'मुखपृष्ठ' व 'सजावट' करताना आम्हीं प्रभावीरीत्या अवलंबली आहे. 'सुवर्णस्मृती'ची निर्मिती करताना दर आठवड्याला नियमित सभा घेऊन योजनांची आखणी केली, नियोजन व कार्याची अंमलबजावणी ही स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे स्वीकारली आणि योग्य वेळेत पूर्णत्वाला नेली. 'सुवर्णस्मृती'ची मांडणी व सजावट नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने केली आहे. मंडळाच्या संकेतस्थळावर हा विशेषांक सर्वांकरिता वाचनासाठी कायमस्वरूपी उपलब्ध राहणार आहे.

मंडळाची कार्यकारिणी, सुवर्ण महोत्सव कार्यकारिणी, 'सुवर्णस्मृती' टीमचे सदस्य आणि हांक मारताच धावून येणारे, मंडळामुळेच जोडले गेलेले अनेक सुहृद या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे. तसेच प्रत्येकवेळी खंबीरपणे मागे उभा राहणारा जोडीदार आशिष, कन्या सावनी व सलोनी यांनीही 'सुवर्णस्मृती'च्या कार्यात मदत केली. स्मरणिकेच्या वाचक वर्गाला एकच विनंती आहे, की ही स्मरणिका वाचनीय होण्यासाठी कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले आहेत. काही उणीवा राहिल्या असल्या तरी आमची ही सेवा गोड मानून घ्यावी.

स्मरणिकेसाठी असंख्य आश्रयदाते आणि देणगीदार लाभले, त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार! 'महाराष्ट्र मंडळ शिकागो' सुवर्णमहोत्सवाचे संयोजक श्री. रवी जोशी यांनी मला ही संधी दिल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.
श्रीगजाननाच्या कृपेने कार्य सिध्दीस नेण्याची उमेद मिळाली. 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'ची अशीच उत्तरोत्तर भरभराट होवो,
ही ईश्वर चरणीं प्रार्थना! धन्यवाद!

उल्का नगरकर

"सुवर्णस्मृती" संपादिका

सुवर्ण महोत्सव २०१९

महाराष्ट्र मंडळ शिकागो

THE MEADOWS CLUB
Transcend your expectations
An enriching era of
Landmark events and
Lasting relationships
WEDDINGS | BANQUETS
FASHION SHOWS | CORPORATE EVENTS
SOCIAL EVENTS | FUND-RAISERS
THE MEADOWS CLUB
2950 W GOLF RD, ROLLING MEADOWS, IL 60008
PHONE: (847) 650-5494
FAX: 847-650-8683
EMAIL: INFO@THEMEADOWSCLUB.COM
WEB: WWW.THEMEADOWSCLUB.COM

संयोजकांचे मनोगत

नदी सागरा मिळता, पुन्हा येईना बाहेर, अशी शहाण्यांची म्हण, नाही नदीला माहेर
काय सांगू रे बाप्पानो तुम्ही आंधळ्याचे चेले, नदी माहेराशी जाते म्हणूनची जग चाले
सारे जीवन नदीचे, घेतो पोटात सागर, तरी तिला आठवतो, जन्म दिलेला डोंगर
डोंगराच्या मायेसाठी, रुप वाफेचे घेऊन, नदी तरंगत जाते, पंख वाऱ्याचे लावून
पुन्हा होऊन लेकरु, नदी वाजवते वाळा, पान्हा फुटतो डोंगरा, आणि येतो पावसाळा.

गदिमांची ही कविता हे नदीचं आत्मवृत्त असलं तरी, आपल्यासारख्या मातृभूमी सोडून इथे दूर परदेशात राहत असलेल्या भारतीयांसाठी यातील नदीचं हे रूपक अगदी चपखल ठरतंय. मराठी माणूस जगाच्या पाठीवर कुठेही गेला तरी आपल्या मातीशी असलेलं आपलं नातं अगदी जपून ठेवतो. यात आपल्या बांधवांना एकत्र आणणे हा मूळ उद्देश असतोच तसेच आपल्या पुढच्या पिढीलाही आपल्या संस्कृतीची ओळख व्हावी ही कळकळ त्या मागे असते. हाच विचार मनात बाळगून काही मराठी बांधवांनी १९६९ साली शिकागो येथे उत्तर अमेरिकेतील पहिले महाराष्ट्र मंडळ स्थापन केले. त्या काळी मुळातच मोजकीच भारतीय कुटुंबे अमेरिकेत राहावयास आली होती आणि त्यात मराठी तर हाताच्या बोटावर मोजण्याइतके, पण तरीही केवळ १० कुटुंबांनी दिवाळीतील स्नेहसम्मेलनात एकत्र येऊन या मंडळाचे रोपटे लावले आणि आज त्याचा वटवृक्ष झाला आहे.

शिकागो मराठी मंडळाने १९७० साली आपला पहिलावहिला गुढी पाडव्याचा कार्यक्रम साजरा केला. शिकागो मंडळ हे नाट्यप्रेमी मंडळ म्हणून ओळखले जाते. अर्थात त्याचे श्रेय हे इथे राहणाऱ्या नाट्यवेड्या मंडळींना जाते. त्यांनी १९७०-७१ सालापासून, स्थानिक कलाकारांना घेऊन नाटक सादर करण्याची परंपरा सुरु केली ती आजतागायत चालू आहे. आपण सादर केलेली नाटके आणि एकांकिका दुसऱ्या मंडळांनासुध्दा बघता याव्यात ह्या उद्देशाने १९७६ सालापासून आपण आपल्या नाटकांचे प्रयोग वेगवेगळ्या महाराष्ट्र मंडळामध्ये करू लागलो. केवळ शिकागो पुरते मर्यादित न राहता पुढे जाऊन सन १९८१ साली मंडळाने "बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका" या संस्थेची स्थापना केली आणि १९८४ साली या संस्थेचे पहिले अधिवेशनही शिकागोमध्येच भरवले.

कुठलेही मंडळ आणि कार्यक्रम यशस्वी होण्यामागे कार्यकर्त्यांचे निरपेक्ष भावनेने केलेले अथक परिश्रम हे अत्यंत महत्वाचे असतात. किंबहुना याशिवाय मंडळाचा एकही कार्यक्रम होणे शक्य नाही. आपल्या सुवर्णमहोत्सवासाठी १०० हून अधिक कार्यकर्त्यांनी अहोरात्र मेहनत करून हा आनंदमेळावा यशस्वी करून दाखवला, या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

आपल्यासारख्या रसिक प्रेक्षकांनी या आनंदमेळाव्याला भरभरून दिलेला प्रतिसाद म्हणजे आपण आपली संस्कृती आणि परंपरा जपत पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे हे कार्य, जे महाराष्ट्र मंडळाच्या माध्यमातून गेले ५० वर्षे निरंतर चालवले आहे, त्या चळवळीला केलेला मानाचा मुजरा.

धन्यवाद!

कळावे लोभ असावा,

आपला नम्र,

रवी जोशी

संयोजक, सुवर्णमहोत्सवी आनंदमेळावा

महाराष्ट्र मंडळ शिकागो

6%
INTEREST
CLUB
INVEST WITH CHICAGO'S #1 REAL ESTATE TEAM
AM560
THE ANSWER
WBBM
NEWSRADIO
105.9FM
WLS
890 AM
CHICAGO'S TALK STATION
WGN RADIO 720
FLIP LIKE MAD
ChicagoFlipping.com
6% PER ANNUM PAID EVERY MONTH
100K MINIMUM INVESTMENT FOR 2 YEARS
CASH, IRA, ROTH IRA
www.6percentinterestclub.com

महाराष्ट्र मंडळ शिकागोची पंचविशी

मला वाटलेही नव्हते, की आमचे मंडळ पन्नास वर्षे टिकेल; पण ते आमच्या बरोबर संपेल याची खात्री होती, पण आता पुढची पिढी नव्या दमाने त्यात मग्न झाल्याने मंडळाचे नूतनीकरण झाले आहे व एक नवा उत्साह त्यात वाहत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

'महाराष्ट्र मंडळ, शिकागो'ची स्थापना १९७० साली झाली. 'भारत इन्व्हेस्टमेंट क्लब'च्या दहा सभासदांनी ही सुरुवात केली. ही दहा कुटुंबे दरमहा भेटतच होती. शिकागो वेदांत सोसायटी हे पूर्वाश्रमीचे त्यावेळचे प्रमुख स्वामी भाष्यानंद मराठी असल्याने त्यांचा या उपक्रमाला संपूर्ण पाठिंबा लाभला होता. त्यामुळे सुरुवातीचे कार्यक्रम त्या जागेतच होत असत. मंडळाचे पहिले अध्यक्ष म्हणून श्री दत्तात्रेय मणेरीकर यांची निवड झाली. त्यांची दहाजणांची कार्यकारिणी, त्यात दोन उपाध्यक्ष - एक महिला, एक कार्यवाह, एक कोषाध्यक्ष, आणि पाच मदतनीस सभासद. त्याच वर्षी मंडळाचे मुखपत्र म्हणून 'रचना' हे हस्तलिखित जयश्री हुपरीकर यांनी सुरू केले. त्याच्या प्रति श्री. मणेरीकर झेरॉक्स मशीन वापरून करून आणत. मग कार्यवाह ते सर्व सभासदांना पाठवीत. वर्षाचे पाच कार्यक्रम करावे असे ठरविण्यात आले. गुढीपाडवा, गणपती, दिवाळी, संक्रांत आणि उन्हाळी सहल, शिवाय दरवर्षी नाटक. ती जबाबदारी श्री. शंकर हुपरीकरांनी आवडीने स्वीकारली. १९७१ पासून नंतर ३२ नाटके त्यांनी रंगभूमीवर आणली, तीसुध्दा मंडळातील हौशी कलाकारांना हाताशी धरून! मंडळाच्या कार्यक्रमांना किती उपस्थिती राहील, याची कधीच कल्पना नसे. त्यामुळे जेवणाचा अंदाज नेहमी चुकत असे. मात्र सगळे जिन्नस घरी बनवायचे असल्याने आमची सर्वांचीच कार्यक्षमता वाढली. हा मंडळाचा आम्हाला झाला एक फायदा! नाहीतर इतक्या मोठ्या प्रमाणावर काही करण्याची आमच्यावर कधी वेळ आली नसती. ४०० लाडू, ७०० करंज्या, दहा किलो साखरभात... अशी काही मासलेवजा उदाहरणे.

मंडळाचा प्रत्येक कार्यक्रम एखादे घरचे कार्य असल्यासारखा वाटायचं, तेव्हा! पहिली दहा वर्षे तर सगळे जुळवण्यातच गेली. तोपर्यंत मंडळ वाढत होतं. तरी तिकिटाची किंमत $३ वरून $५ वर नेली, की लोक तक्रार करीत. त्यामुळे चांगले कलाकार परवडत नसत. उदा. पुलं! नाही म्हणायला, एकदा मोठ्या धीराने भारतरत्न भीमसेनजींचा कार्यक्रम करून दाखवला खरा! भारतातील कलाकार आपणहून येत. त्यांना स्पॉन्सर वगैरे करण्याइतके मंडळाचे आर्थिक बळ नव्हते.

१९८० साली मंडळाच्या तीन सभासदांनी- विष्णू वैद्य, शरद गोडबोले आणि जयश्री हुपरीकर यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाची (BMM)ची स्थापना केली. त्याबरोबरच बृहन्महाराष्ट्र वृत्त हे उत्तर अमेरिकेतील पहिले मराठी हस्तलिखित बातमीपत्र सुरू केले.
तोपर्यंत उत्तर अमेरिकेत बरीच मराठी मंडळे झाली होती. त्यांना शिकागोच्या मंडळाची बरीच मदत होऊ शकली. उत्तर अमेरिकेतील सर्व मराठी मंडळाची एकछत्री संस्था (umbrella organization) असे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे स्वरूप ठरविण्यात आले. त्यानंतर १९८४ साली बृहन्महाराष्ट्र मंडळाचे पहिले अधिवेशन शिकागोत भरवण्यात आले. ते एक अभिनव अधिवेशन ठरले नि आजवर ते चालू आहे. त्याचा कार्यक्रम पहिल्या अधिवेशनाच्याच धर्तीवर असतो, पण सगळा पसारा मात्र वाढत चाललाय. ते बदलत्या काळानुसार साहजिकच आहे.

बघता बघता शिकागोच्या मंडळाला २५ वर्षे झाली सुध्दा! तोपर्यंत मंडळाची उपस्थिती गणेशोत्सवाला चारशे व इतर कार्यक्रमांना हवेच्या प्रमाणे दोनशेच्या घरात जात होती. शिकागोत त्यावेळी साताठशे तरी मराठी लोक होते, पण मंडळात इतकेच यायचे. मंडळाचं कार्यकारी मंडळ जोराने चंदेरी सोहळ्याची तयारी करीत होते. मुख्य म्हणजे, मंडळ अस्तित्वात येण्याआधीपासून शिकागोच्या मराठीसमुदायासाठी कार्यरत असलेले व आजवर कधीच निवडून कार्यकारिणीवर न गेलेले श्री. शरद गोडबोले यांना त्यावर्षी निवडणूक लढवून अध्यक्षस्थानी निवडून देण्यात आले. पण त्यांच्या बाजूने सर्व कार्यकारिणी निवडून न आल्याने त्यांना दुसऱ्या लोकांनी त्रास दिल्याने, त्यांना त्यावर्षी जे कार्यक्रम करायचे होते ते करता आले नाही. मुख्य म्हणजे, शंकर हुपरीकरांचे नाटक रद्द करावे लागले व बाहेरून कार्यक्रम आणावा लागला. पण लोकांना कार्यक्रम आवडला.

असे हे मंडळ २५ वर्षांची वाटचाल करून पुढे जात होतं. जे आमची एक भावनिक गरज म्हणून आम्ही आमच्यासाठी निर्माण केले होते, ते सगळ्यांची एक गरज ठरले, नि आज पन्नास वर्षांची घोडदौड करून नव्या सीमेवर उभे आहे. त्याचे पुढच्या पिढीच्या हातात देताना आम्हा सगळ्यांनाच एक प्रकारे अभिमानाने भरून येत आहे.

शब्दांकन: जयश्री हुपरीकर

सुवर्ण-जयंतीनिमित्त शिकागोच्या महाराष्ट्र मंडळाचे हार्दिक अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालीसाठी अनंत शुभेच्छा

- संजय, विद्या, निराली, सलौनी नाहर

बालोद्यान
भाव भाषा भारती

chair yoga
Yoga for EveryBody

Share Happenings • Act • Know • Talk • Inspire

ICON SHAKTI
Indian Community's Outreach Network

VYANJAN
Vidya's Yummy And Natural, Joyful And Nutritious

Vidya's Yogasthal
VYAYAM
for Abworks, Yogasan, Aerobics and Meditation

www.balodyan.com , www.chairyoga.org , www.vyanjan.us, www.vinyas.us , www.vyayam.com
https://www.facebook.com/groups/ICON.SHAKTI/
1165, Alden Lane, Buffalo Grove, IL, 60089, U.S.A. , 847-537-4710, vidya@vyayam.com

बीज-अंकुरे-अंकुरे (वर्ष १९७०-१९७४)

मंडळाच्या सुरुवातीच्या काळात अध्यक्षपद भूषविलेल्या कै. मणेरीकर यांच्या पत्नी सुनंदाताई, श्री. नारायण प्रचंड, श्री. अण्णा करमरकर आणि श्री. हुपरीकर यांच्याशी केलेली बातचीत. अध्यक्षांची कारकीर्द खालीलप्रमाणे -

१९७०-७१ - कै. दत्तात्रय मणेरीकर

१९७२ - श्री. नारायण प्रचंड

१९७३ - श्री. वासुदेव करमरकर

१९७४ - श्री. शंकरराव हुपरीकर

नमस्कार! शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या अगदी सुरुवातीच्या काळात मंडळाचे अध्यक्षपद तुम्ही भूषवले आहे. त्याबद्दल सर्वप्रथम तुमचे अभिनंदन आणि आभारही! तुमच्या खांद्यावर उभे राहात पुढच्या पिढीने मंडळाला पुढे नेण्याचे काम केले.

प्रश्न - तुमच्या कार्यकालावधीत मंडळाचे स्वरूप कसे होते? साधारण किती मराठी कुटुंबे शिकागो परिसरात होती? कार्यकारिणी किती मोठी होती? काही नावे सांगू शकाल का?

श्री. प्रचंड - मी १९६१ साली UIUC (युनिव्हर्सिटी ऑफ इलिनॉय, अर्बाना शँपेन) येथे विद्यार्थी म्हणून आलो. १९६२ साली शिकागोत स्थिरावलो. युनिव्हर्सिटी ऑफ शिकागोच्या इंटरनॅशनल हॉलमध्ये आम्ही भारतीय जमत असू. १९६३च्या २६ जानेवारीच्या सेलिब्रेशनला आम्ही २२ भारतीय होतो. त्यात शरद आणि रमेश हे गोडबोले बंधू, अरुण टेंबे, मी (नारायण प्रचंड), सौ व श्री मुळे, मुंडले आणि काका भाटवडेकर असे मराठी होतो. १९६३च्या अखेरीस अनिताताई गोडबोले (कै. शरद गोडबोलेंच्या पत्नी) आमच्यात सामील झाल्या. She was "First lady" of our group! १९६६ साली माझे लग्न झाले आणि गंमत म्हणजे मी आणि माझी पत्नी शीला डॉ. श्री व सौ. हुपरीकरांना व्हिसाच्या मेडिकल चेकअप वेळेस भेटलो. १९६९-७० च्या सुमारास महाराष्ट्र मंडळ बनवावे असा विचार दृढ झाला. अनेक सभा होऊन "संविधान" लिहिले गेले आणि श्री. अरुण टेंबे आणि मौरीन पॅटरसन यांच्या स्वाक्षरींनी मंडळ रजिस्टर झाले.

सुनंदाताई मणेरीकर - मणेरीकर ६५ ला आले आणि मी ६७ ला. त्यावेळेस पार्क फॉरेस्टमध्ये पहिला दिवाळीचा कार्यक्रम आम्ही केला. फक्त मराठीच नाही तर अमराठी मित्र-मैत्रिणींनाही बोलावले होते. सुमन नाडकर्णी यांचे गायन झाले. त्यावेळेस महाराष्ट्र मंडळ बनवावे या विचाराचे बीज रोवले गेले. त्या कार्यक्रमाचे फोटो सोबत जोडत आहे. पुढे गोडबोले, प्रचंड, करमरकर, जोशी, मणेरीकर, हुपरीकर यांनी पुढाकार घेतला. त्यावेळेस महाराष्ट्र मंडळ 'संस्था' म्हणून स्थापन करण्यासाठी दोन अमेरिकन सिटीझनच्या स्वाक्षऱ्यांची गरज होती. मला आठवतं त्याप्रमाणे श्री. अरुण टेंबे आणि शिकागो युनिव्हर्सिटीतील डॉ. मॉरीन पॅटरसन यांच्या स्वाक्षऱ्यांनी मंडळ रजिस्टर झाले. एक आठवण सांगायची म्हणजे मंडळ स्थापन झाल्याची बातमी त्यावेळच्या 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये आली होती. कार्यकारिणी मोठी नव्हती पण कार्यकारिणीत किंवा उपाध्यक्ष वगैरे स्त्रिया असाव्यात हे कटाक्षाने पाहिले जात असे.

अण्णा करमरकर - मी १९७० साली प्रथम आलो ते शिकागोला. त्या वेळी जेमतेम ५० कुटुंबे होती. डॉ. शेखर जोशी यांचेकडे आलो; ते माझ्या पत्नीचे मावस भाऊ. त्यावेळी मंडळी गणपती, दिवाळी आपल्या आपल्या लहान गुप्रमधे करत असत. मी १९७२ साली मंडळात कार्यकारिणीत काम करू लागलो. १९७३ साली अध्यक्ष झालो; बिनविरोध निवडणूक म्हणा किंवा कुणी तयार होत नसे म्हणा. त्यावेळी डॉ. जोशी, डॉ. हुपरीकर, नारायण प्रचंड, कै. शरद गोडबोले, डॉ. लागवणकर, डॉ. आनंद गद्रे, सुधीर आंबेकर ही मंडळी कार्यकारिणीत होती. आमच्या पूर्वी कै. मणेरीकर होते. कार्यकारिणी ५-६ जणांची असे. महत्वाची गोष्ट म्हणजे भांडणे होत नसत. सर्व एकमताने निर्णय घेत असत आणि कामेही करत असत. ज्या हॉलमध्ये कार्यक्रम होत असे त्यात खुर्च्या मांडणे, नंतर ओल्या मॉपने हॉल स्वच्छ करणे अशी सर्व कामे आपणहून आनंदाने करत असू. भगिनी वर्ग जेवणाची जबाबदारी घेवून पदार्थ स्वत:

बनवून आणत असत; स्वखर्चाने! मी संघाचा स्वयंसेवक असल्याने सर्वांना बरोबर घेवून काम करणे माहीत होते. सर्वजण पडेल ते काम आनंदाने करत असत. त्या वेळी कार्यकारिणीत सर्वांनी आजीव सभासद व्हावे म्हणून मी सांगितले. माझ्याकडे आजही तो पास आहे.

श्री. हुपरीकर - मी ७४ साली अध्यक्ष झालो. साधारणपणे १२-१४ जण कमिटीत असत. आता नावे काही आठवत नाहीत, पण लोक आपणहून सहभागी व्हायचे.

प्रश्न - तुमच्या कालावधीत मंडळ तसे नवेच होते. तुम्ही कुठली उद्दिष्टे समोर ठेवली होती? ती साध्य करताना काही अडचणी आल्या का? बाकी शहरातील महाराष्ट्र मंडळांशी काही संपर्क होता का?

श्री. प्रचंड - मंडळ नवीनच होते. सर्वजण उत्साहाने एकत्र कामे करीत. ७० च्या दशकात महाराष्ट्रात दुष्काळ पडला असता आपल्या मंडळाने $११०० चा निधी गोळा करून महाराष्ट्राच्या तत्कालिन मुख्यमंत्र्यांकडे पाठविलेला स्मरत आहे.

सुनंदाताई - मंडळ मोठे नव्हते पण माणसे एकमेकांना खूप जवळ होती. सर्व मराठी भाषिकांनी एकत्र यावे हे उद्दिष्ट होते.

अण्णा करमरकर - सर्वांनी सर्व कार्यक्रमाला यावे, मजा करावी, एकमेकांचा सहवास वाढवावा, नवीन कुणी आले तर मदत करावी, त्याच्या ओळखी करून द्याव्या. (आता तसे नाही; लोक एकमेकांना टाळतात, कारण खूप लोक झालेत), मुलांना मराठी यावे म्हणून शक्यतोवर घरी मराठी बोलावे. मराठी शाळा वगैरे कल्पना नव्हती व इतकी मुलेपण नव्हती. इतर शहरातील मंडळांशी संपर्क नव्हता. इतर शहरांमधे मंडळेपण नव्हती.

श्री. हुपरीकर - आमच्यावेळी RSVP किंवा इमेलची सोय नव्हती. आम्ही सर्वांना फोन करायचो आणि सर्व जण आवर्जून सहकुटुंब यायचे. We treated Maharashtra Mandal as our family and our baby! बाकी शहरांत महाराष्ट्र मंडळं अजून बनलेली नव्हती. मला आठवतंय, आम्ही डेट्रॉईटला नाटक घेऊन गेलो असता तिथल्या मंडळींना महाराष्ट्र मंडळ स्थापन करायची कल्पना दिली, आणि मग त्यांनी महाराष्ट्र मंडळ स्थापन केले.

प्रश्न - त्यावेळच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे स्वरूप कसे होते? शिकागोच्या बाहेरून, भारतामधून कार्यक्रम यायचे का? काही आठवणी?

श्री. प्रचंड - मराठी संस्कृतीप्रमाणे आम्ही संक्रांत, गुढीपाडवा, गणपती आणि दिवाळी हे उत्सव साजरे करत असू. १९७२ साली मी गणेश मूर्ती बनविली होती. आम्ही विवेकानंदांच्या वेदांत सोसायटीमध्ये उत्सव साजरा केला आणि लेक मिशिगनमध्ये विसर्जन केले होते.

सुनंदाताई - डॉ. विद्वांस म्हणून एकजण होते, ते पूजा सांगत. बफेलो ग्रोव्हचे वेंगुर्लेकर हॉल रिझर्वेशन करीत. आमची पिकनिक एकदा 'Starved Rock'ला झाल्याचे स्मरतेय. आमचेच एक मित्र अशोक शेंड्ये हार्मोनियम वाजवीत. त्यांच्या पत्नी हेमा सुंदर गात. मला सी. रामचंद्र, अरुण दाते, यशवंत देव यांचे कार्यक्रम आठवतात. शेखर जोशींच्या आई लीलाताई जोशी ज्या आकाशवाणीवर गात असत त्या इथल्या मुलांना हार्मोनिअम, गाणी, मराठी शिकवीत असत.

अण्णा करमरकर - १९७१- १९७२ साली मी प्रथम मंडळाच्या त्या वर्षीच्या पहिल्या कार्यक्रमाला गेलो. कै. सुधीर फडके यांचा तो कार्यक्रम होता. कार्यक्रम बहुधा शाळेत किंवा विद्यापीठातल्या हॉलमध्ये झाला. बाबूजी पेटी घेवून प्लॅटफॉर्मवर उभे राहून गात होते. प्रेक्षक वर व बाबूजी खाली अशा पध्दतीने प्रेक्षक बाकांवर (step by step) बसले होते. कार्यक्रमाचे १-२ डॉलर्स तिकीट असावे. त्या वेळी शिकागोत फारच थोडे लोक होते, त्यात कलाकार असणे कठिण. पण शिकागोकरांना कार्यक्रम करता आले. बाहेरून कलाकारांना बोलावणे हे परवडणार नव्हते व शक्य पण नव्हते. पण डॉ. शंकरराव हुपरीकर यांनी मात्र ती उणीव भरून काढली. त्यांना नाटकात काम करावयाचा भारतातला अनुभव व अंगी मुळात हौस. त्यांनी पहिले तीन अंकी (प्रेमा तुझा रंग कसा) हे नाटक बसवले. त्या नाटकात आम्ही काही हौशी लोक होतो. मी व माझी पत्नी दोघांनीही काम केले होते. त्या नाटकाची हकिगत अशी, की ते नाटक नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटीच्या डाउन टाउनच्या हॉलमध्ये सादर केले. हॉलचे भाडे २०० डॉलर्स, प्रेक्षक जेमतेम १०० पेक्षा कमी, प्रवेशमूल्य २ डॉलर्स, त्यामुळे कलाकारांना पण तिकीट घ्यावे लागले. आमचेच नाटक आम्ही पैसे देऊन पाहीले. नंतर काही वर्षे Air Indiaतील हौशी कलावंत आले कारण त्यांना फुकटात किंवा १०% तिकिटात येतां येत होते. त्यांची राहण्याची सोय आम्ही निरनिराळ्या लोकांच्या घरी करत असू. त्यांच्या रहाण्यातले बरेवाईट अनुभव आले; तेव्हा कुणी पाहुण्यांना घरी ठेवायला तयार नव्हते.

डॉ. शंकररावांनी मात्र अनेक वर्षे नाटके बसवून नाटकांची उणीव भासू दिली नाही. खूप छान छान नाटके सादर केलीत. Classical music (शास्त्रीय संगीताचा) कार्यक्रम पहिला झाला तो प्रभा अत्रे यांचा; पण साथीदार चांगले मिळाले नाहीत. नंतर हळूहळू नावाजलेले कलाकार त्यांचे साथीदार बरोबर आणू लागले. त्यात प्रामुख्याने कै. सुधीर फडके, पं. भीमसेन जोशी, पं. जितेन्द्र अभिषेकी व आणखी इतरपण येऊन गेलेत.

श्री. हुपरीकर - दरवर्षी साधारणपणे संक्रांत, गुढीपाडवा, पिकनिक, गणपती, दिवाळी आणि एक स्थानिक कलाकारांचे नाटक हे कार्यक्रम होत. १९७४ साली साधारण $३ तिकीट होते. सर्वजण अगदी आवर्जून कार्यक्रमांना यायचे. मराठी कलाकार अमेरिकेला यायला सुरुवात झाली होती पण त्यांची स्पॉन्सरशिप महाराष्ट्र मंडळाला परवडणारी नव्हती. कलाकार आले तर मात्र महाराष्ट्र मंडळ आवर्जून त्यांचे कार्यक्रम करीत असे आणि मराठी कलाकारदेखील उत्साहाने कार्यक्रम सादर करत असत. मला रामदास कामत, अत्र्यांचा एकपात्री करणारे सदानंद जोशी यांचे कार्यक्रम आठवतात.

प्रश्न - तो काळ आणि आताचा बदलेला हा काळ, या दरम्यान मंडळाचे स्वरूप, आवाका खूप बदलत गेला आहे. काय वाटतं? चांगले बदल? वाईट बदल?

श्री. प्रचंड - पन्नास वर्षांपूर्वी सुरू केलेली संस्था त्याच उत्साहाने नवीन पिढी चालवते आहे याचे खूप कौतुक वाटते. मराठी शाळा, मराठी सांस्कृतिक कार्यक्रम पाहून खूप बरे वाटते. मंडळाच्या कार्यकारिणीत तरुण नवीन पिढी यायला हवी.

सुनंदाताई - महाराष्ट्र मंडळाची प्रगती पाहून कौतुक खूप वाटतं. अभिमान वाटतो. महाराष्ट्र मंडळाची वास्तू व्हावी हे खूप वाटते.

अण्णा करमरकर - तो काळ आणि आत्ताचा बदल खूपच वेगळा आहे. आमचा काळ खूपच आठवणींचा आहे, खेळीमेळीचे संबंध, भांडणे नाहीत असा तो काळ होता. मी १९७९ साली शिकागो सोडून कॅलिफोर्नियाला आलो, नंतर २० वर्षे ॲरिझोनात होतो, त्यामुळे बदल काय झाले माहीत नाही, मात्र शिकोगोबद्दल खूप ओढ आहे, ते वेगळेच प्रेम आहे. आम्ही बरेच वर्षे Glen Ellen मधे Route 53 जवळ रहात होतो. माझ्या मुलांचे शिक्षण शिकागोत झाल्याने त्यांना पण शिकागोची ओढ आहे. आमच्या वेळची जुनी मंडळी अधून मधून भेटली की आनंद मिळतो. आता सुध्दा शिकागोला यावेसे वाटते पण वयोमानानुसार शक्य नाही. मी आणि माझी पत्नी आता प्रवास करू शकत नाही.

श्री. हुपरीकर - प्रत्येक जनरेशन आपापल्या परीने छानच काम करतात. सगळेजण उत्साहाने काम करताय, ही परंपरा चालू ठेवताय याचा खूप आनंद होतो.

दत्तात्रय मणेरीकर
१९७०-७१ अध्यक्ष



नारायण प्रचंड
१९७२ अध्यक्ष



विकास करमरकर
१९७३ अध्यक्ष



शंकर हुपरीकर
१९७४ अध्यक्ष

प्रश्न - शिकागो महाराष्ट्र मंडळाला ५० वर्षे पूर्ण होताहेत. त्यानिमित्त शिकागोकरांना तुमच्या शुभेच्छा वाचायला नक्कीच आवडतील. काय सांगावेसे वाटते?

श्री. प्रचंड - महाराष्ट्र मंडळाची वास्तू व्हावी ही इच्छा आहे. माझ्या सर्व शिकागोकरांना खूप शुभेच्छा!

सुनंदाताई - असेच एकमेकांना सांभाळून छान काम करत राहा. हीरकमहोत्सवाची वाट बघत आहोत. आपल्यातून भावी पिढीतून 'यु एस कॉंग्रेस'ला जाणारे निर्माण व्हावेत ही शुभेच्छा!

अण्णा करमरकर - शिकागोला मंडळाच्या ५० व्या वाढदिवसाला यावेसे वाटते. शिकागो आमचे अमेरिकेतले माहेर वाटते. आमच्या उभयतांच्या शिकागो मंडळाला अनेक शुभेच्छा, नवीन पिढीने सर्वांना बरोबर घेवून, आनंदाने मंडळ चालवावं, गुण्यागोविंदाने रहावे आणि यापुढील पिढीलाही मार्गदर्शक व्हावे. शिकागोकरांना प्रेमळ नमस्कार! जुन्या शिकागोकरांची आठवण ठेवा, प्रेम द्या प्रेम घ्या.

श्री. हुपरीकर - मी आधी सांगितल्याप्रमाणे we really treated Maharashtra Mandal as our Baby! असंच प्रेम तुम्ही आणि पुढल्या पिढ्यांनीही मंडळावर करा.

मुलाखत व शब्दांकन: प्रसन्न जोगळेकर

[तळटीप - जुन्या दिवसांविषयी मुलाखत असल्यामुळे जितकी नावे जुन्या अध्यक्षांना आठवली ती सर्व नावे लेखात समाविष्ट केली आहेत. तरीदेखील काही नावे राहिली असतील तर क्षमस्व!]

Tel : 331-701-7105
www.DeccanSpiceChicago.com
/Deccanspicechicago
info@dschicago.com
Deccan Spice
Hyderabadi Indian Cuisine
192 W.Gartner Road,#124,Naperville,IL 60540
$9.99
Limit 2 kids per One Paying adult
Kids Eat Free
Every Tuesday
6 pm - 10 pm
All you can eat
Chat
Tiffins
Wednesday's
Buy 1 Get 1
Free Biryani



Aroma
FINE INDIAN CUISINE
• Full Line of Indo-Pak Grocery
• Daily Lunch Buffet
• Available for Catering
• North and South Indian Dishes
270 Hawthorn Village Commons
Vernon Hills, Illinois 60061
Main: (847) 247-0898
Grocery: (847) 247-0895
www.AromaVH.com

अतिशय लहान वयात 'आनंदगंधर्व' ही मिळालेली पदवी, बालगंधर्व चित्रपटासाठी मिळालेला सर्वोत्कृष्ट गायकाचा पुरस्कार, सॉफ्टवेअर इंजिनीअर अशा सर्व पैलूंनी नटलेलं हे व्यक्तिमत्व म्हणजेच आनंद भाटे! महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित करण्यात येत असलेल्या स्मरणिकेच्या निमित्ताने मला त्यांच्याशी बोलायची संधी मिळाली.

आनंदना संगीताचं बाळकडू घरातूनच मिळालं. त्यांचे पणजोबा भाटेबुवा बालगंधर्वांचे समकालीन, शास्त्रीय संगीत, ठुमरी ह्याकरता ओळखले जाणारे आणि संगीत नट! दोन्ही बहिणी उत्तम गाणाऱ्या! तर अशा ह्या संगीतमय वातावरणात ते लहानाचे मोठे होत होते. बहिणींसाठी आणलेली पेटी, बुलबुलतरंग ह्यावर गाणी वाजवण्यापासून त्यांच्या संगीताची सुरवात झाली. आणि जेव्हा वडिलांना जाणवलं, की ह्याला स्वरज्ञान आहे आणि गाताही येतं, तेव्हा वयाच्या सहाव्या/सातव्या वर्षी श्रीयुत चंद्रशेखर देशपांडे, नंतर एक/दोन वर्षांनी पंडित यशवंतबुवा मराठे आणि मग भारतरत्न पंडित भीमसेनजी जोशी ह्यांच्याकडे त्यांनी संगीताचं रीतसर शिक्षण घेतलं. भीमसेनजींविषयी सांगताना ते म्हणतात, की भीमसेनजी जेव्हढे उत्तम गायक होते तेव्हढेच, उत्तम गुरू होते. स्वरसिध्दी लाभलेलं, त्यांचं गाणं ऐकताना काहीतरी अलौकिक ऐकायला मिळाल्याचा अनुभव देणारं हे व्यक्तिमत्व आनंदना गुरू म्हणून लाभलं. त्यांच्या खूप आठवणी आनंदनी गाठीशी बांधल्या आहेत. त्यातलीच एक आठवण त्यांनी शिकागोतील रसिकांना सांगितली. एका मैफिलीत स्टेजवर जाण्याआधी भीमसेनजी आणि त्यांच्याबरोबरचे कलाकार ग्रीनरूममध्ये गेले. तिथे तंबोरे लावले गेले आणि भीमसेनजींनी दरबारी रागाची नुसती सुरावट गायली. त्याक्षणी ग्रीनरूम मधली मंडळी इतकी मंत्रमुग्ध झाली, की आधीचे सर्व कार्यक्रम त्यांच्या मनातून पुसले गेले आणि मनात राहिला तो फक्त एका अफाट कलाकाराचा दैवी 'दरबारी'! आणि हाच तो स्वरसिध्दीचा अनुभव!

आनंदचे शिकागोमध्ये आत्तापर्यंत बरेच कार्यक्रम झाले. पण लहानगा आनंद वयाच्या १३व्या वर्षी प्रथम अमेरिकेत आला, ते १९८४ साली शिकागो येथे झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या पहिल्यावहिल्या अधिवेशनामधे गाण्यासाठी. लहान वय, वेगळा देश, दोन देशांमध्ये त्याकाळी असलेली तफावत, कार्यक्रम कसा होईल, प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया कशा असतील, ह्या सगळ्याची उत्सुकता घेऊन आनंद आईवडील आणि बहिणीसह शिकागोमधे पोचले. त्या कार्यक्रमात 'तो आला, तो गायला आणि त्यानी जिंकलं'. त्यामुळे कार्यक्रमानंतर भारतात मिळणाऱ्या प्रतिक्रियांप्रमाणेच अमेरिकेत मिळणाऱ्या प्रतिक्रिया आणि दर्दी रसिकांनी दिलेली उत्तम दाद ह्याचा त्यांना छान अनुभव आला. त्या आठवणी त्यांनी आजही जपून ठेवल्या आहेत. ह्या अधिवेशनामधे त्यांचा कार्यक्रम व्हावा म्हणून शिकागोच्या जयश्रीताई हुपरीकर ह्यांनी खूप कष्ट घेतले हेही ते आवर्जून सांगतात. बृहन्महाराष्ट्रमंडळाच्या ह्या पहिल्या अधिवेशनानंतर आनंद भाटे पुन्हा एकदा २०११ साली बृहन्महाराष्ट्रमंडळाच्या अधिवेशनात गायले आणि तेदेखील शिकागोमध्येच! किती हा छान योगायोग!

आनंद म्हणतात, की शिकागोतील रसिकांनी संगीताची आवड छान जोपासली आहे. हे रसिक सगळ्या प्रकारचं संगीत छान ऐकतात. महाराष्ट्र मंडळ शिकागोचं आयोजन हे नेहमीच प्रोफेशनल असतं. इथे कलाकारांना महत्व दिलं जातं. इथले होस्टस कलाकारांची उत्तम सोय करतात.

आनंद हे स्वतः सॉफ्टवेअर इंजिनिअर आहेत. त्यांच्या मतानुसार आधुनिक टेक्नॉलॉजी आणि इंटरनेटच्या माध्यमामुळे परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांना संगीत शिकण्याची सोय उपलब्ध झाली आहे. पण 'It cannot replace your guru'. प्रत्येक शिष्याने भारतात गेल्यावर गुरूसमोर बसून गाणं हे अत्यंत महत्वाचं असल्याचं ते सांगतात. गुरूकडून गाणं शिकताना रियाज हा पण तितकाच प्राधान्य असलेला घटक आहे. रियाज कोणी किती, कसा करावा हे त्या त्या व्यक्तीवर अवलंबून आहे. रियाजाविषयी बोलताना त्यांचे गुरू भीमसेनजी जोशी त्यांना सांगायचे 'रियाज म्हणजे आपल्याला जे येत नाही त्याची प्रॅक्टिस! आपल्याला जे येतं त्याचं सादरीकरण म्हणजे मैफिल!' शास्त्रीय संगीताकडे ओढल्या जाणाऱ्या नवीन पिढीसाठी हा गुरुमंत्रच आहे.

आपलं शास्त्रीय संगीत म्हणजे 'जुनं ते सोनं'. आनंद म्हणतात, की आपली शास्त्रीय संगीताची परंपरा ही 'Evergreen' आहे. आपले राग पूर्वापार चालत आले आहेत. आपल्या नाट्यसंगीतालाही १००-१५० वर्षांची परंपरा आहे. त्यांच्या दृष्टीनं शास्त्रीय संगीताच्या नवीन पिढीला असणाऱ्या आणि त्याच्या वाढणाऱ्या ओढीचं श्रेय गेल्या काही वर्षात आलेल्या 'बालगंधर्व', 'कट्यार काळजात घुसली' अशा चित्रपटांना जातं. ह्या चित्रपटांनी जुनं संगीत नवीन पिढीपर्यंत पोचवलं. हे नवीन वाटणार जुनं संगीत ऐकत असताना, संगीताचं शिक्षण

घेणाऱ्यांनी स्वतःच्या घराण्याचे basics तर शिकायलाच हवेत पण इतर घराण्यांचं संगीत ऐकणं हेहि तितकंच महत्वाचं. हा आनंदना त्यांच्या गुरूंनी दिलेला कानमंत्र आणि तो ते नेहमीच लक्षात ठेवतात. आनंद जुन्या काळातल्या सर्व कलाकारांची गाणी आवडीने ऐकतात पण बालगंधर्व आणि त्यांचे गुरू पंडित भीमसेनजी जोशी ही त्यांची दोन दैवतं!

जुन्या काळातल्या संगीताबरोबरच नवीन काळातलं संगीत, त्यातले होणारे प्रयोग हे तर आपण नेहमीच अनुभवत असतो. आनंद आणि त्यांचे कलाकार मित्र अशा प्रकारचे सादरीकरण करत असतात. त्यांना ह्या कलाकारांबरोबरच synchronization खूप भावतं. भविष्यात कधीतरी आपल्याला आनंद भाटे आणि पाश्चात्य कलाकार असा संगम असलेला नवीन प्रयोग बघायला मिळण्याची शक्यता आहे.

'महाराष्ट्र मंडळ शिकागो'च्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त शुभेच्छा देताना आनंद भाटे म्हणतात, 'तुमचं मंडळ असंच खूप वर्षं चालत राहो! आत्तापर्यंत मंडळांनी जसे अनेक नवे उपक्रम सुरू केले आहेत, तसेच पुढेही करावेत. त्यासाठी माझ्या शुभेच्छा!'

मुलाखत व शब्दांकन: रश्मी चाफेकर

महाराष्ट्र मंडळ शिकागोची अशीच

वर्षानुवर्षे प्रगती होत राहो ही सदिच्छा !

Vaibhav, Jyoti and Rajas Shringarpure

सदाबहार व्यक्तिमत्व (वर्ष १९७५-१९८०)

डॉक्टर चंद्रशेखर जोशी ('महाराष्ट्र मंडळ शिकागो'चे अध्यक्ष- सन १९७५) आणि
सौ मोहिनीताई जोशी ('महाराष्ट्र मंडळ शिकागो'चे अध्यक्ष- सन १९७९)

शिकागोच्या महाराष्ट्र मंडळाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या पन्नास वर्षाच्या वाटचालीची केवळ साक्षीदारच नव्हे तर मंडळात सक्रियपणे सहभागी असणारी जी काही मान्यवर मंडळी आहेत, त्यामधे डॉ. चंद्रशेखर व सौ. मोहिनीताई जोशी या अत्यंत प्रसन्न व्यक्तिमत्वाच्या दाम्पत्याचा आवर्जून उल्लेख करायला हवा. शेखरकाका १९७५ साली महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष होते आणि मोहिनीताई १९७९ मध्ये (महाराष्ट्र मंडळाच्या पहिल्या स्त्री अध्यक्षा). गेल्या पन्नास वर्षातल्या महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षांच्या यादीमधे डॉक्टरमंडळी फारशी दिसत नाहीत. पूर्णवेळ वैद्यकीय व्यवसाय सांभाळून अध्यक्षपदाचं काम करणं ही तारेवरची कसरत कशी निभावली, हा प्रश्न मी शेखरकाकांना विचारला. दुसरं असं, की पती आणि पत्नी दोघेही 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'चे अध्यक्ष झाल्याची उदाहरणेदेखील फारशी नाहीत. मंडळाच्या अध्यक्षाचं संपूर्ण कुटुंब हे अपरिहार्यपणे मंडळाच्या कामात इतर गोष्टी बाजूला ठेऊन वर्षभर गुंतून जातं. असं असताना अध्यक्षपदाची जबाबदारी आपल्या कुटुंबावर पुन्हा घेताना मनात काय विचार होता हा दुसरा प्रश्न मी मोहिनीताईंना विचारला. दोन्ही प्रश्नांचं उत्तर दोघांकडून एकच मिळालं, ते असं की "अगदी सुरवातीपासूनच मंडळाचं पुष्कळ काम करत असल्यामुळे अध्यक्षपदाबरोबर आलेल्या अधिक जबाबदारीचं दडपण अजिबात आलं नाही. हे एकट्याचं काम नाही. त्या काळात मंडळ छोटं होतं आणि मंडळातल्या सर्वांचे एकमेकांशी कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध असावे अशी मैत्री होती. अशा खेळीमेळीच्या वातावरणात काम करताना कार्यकारिणीतल्या मित्रांची मिळालेली सशक्त साथ आणि हाती घेतलेलं काम पूर्ण करायचंच ही जिद्द याच्या आधारावर आनंदाचे अनेक क्षण देणारं अध्यक्षपदाचं वर्ष कसं गेलं ते कळलंदेखील नाही. जाताना एक आठवणींचा ठेवा मात्र ठेवून गेलं."

संपूर्ण जोशी कुटुंब हे संगीतात रमणारं. त्यामुळे सांगण्यासारख्या आठवणींबद्दल विचारता संगीतविषयक आठवणींचा खजिना समोर आला. मोहिनीताईंच्या सासूबाई (शेखरकाकांच्या आई) लीलाताई मुंबई नभोवाणीवरच्या शास्त्रीय संगीताच्या कलाकार असल्यामुळे भारतातून येणाऱ्या योगिनी जोगळेकरांसारख्या कलाकारांना लीलाताईंच्या मुलाकडे हक्काने राहावंसं वाटणं अगदी साहजिक होतं. मालिनी राजूरकर, परवीन सुलताना, सतारवादक उस्मान खान, व्हायोलिन वादक पी राजम, वीणा सहस्रबुध्दे, प्रभाकर कारेकर, सत्यशील देशपांडे, संजीव अभ्यंकर आणि अमेरिकेतले गोपाळ मराठे, श्री टिळक, विवेक खाडिलकर अशा अनेक कलाकारांचं आदरातिथ्य शेखरकाका आणि मोहिनीताईंनी आनंदानं केलं. शेखरकाकांच्या भाषेत सांगायचं तर "आमचा गृहस्थाश्रम आहे. आलेल्या अतिथी अभ्यागतांसाठी आमच्या घराचं दार नेहमी उघडंच होतं".

संगीताचं औपचारिक शिक्षण नसतानाही शेखरकाकांनी एकलव्याच्या भावनेने केवळ अंगभूत अनुवांशिक गुणांच्या आधारावर तबला व हार्मोनियम आणि मोहिनीताईंनी तानपुरा वादनाची कला आत्मसात केली. सत्तरीच्या दशकामध्ये मंडळाच्या आश्रयदात्यांची संख्या आणि मंडळाची ऐपत कमी असल्यामुळे भारतातून येणारे कलाकार आपल्याबरोबर वादक आणू शकत नव्हते (मंडळाची वार्षिक फी ३ डॉलर्स होती!) आणि स्थानिक कलाकारांना साथसंगत करावी लागे. साथ करत असताना पट्टीच्या अनेक गायकांकडून वाहवा मिळवणाऱ्या शेखरकाकांवर अचानक हॉस्पिटलचा कॉल आल्यावर मैफिल अर्ध्यावर सोडून जायचा प्रसंग एकदा आला खरा, पण अरविंद देवभक्तांसारख्या पट्टीच्या तबलावादकाने आयत्या वेळी उरलेल्या मैफिलीत साथ देऊन वेळ निभावून नेली. ज्योत्स्ना भोळे, आशा खाडिलकर, विद्याधर व्यास, प्रभाकर कारेकर, शरद साठे अशा अनेक कलाकारांना मंडळाच्या आणि इतरही कार्यक्रमात शेखरकाकांनी संगीतसाथ दिली. अशाच एका महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमात शेखरकाकांना संगीताचं शास्त्रोक्त शिक्षण नाही हे कळल्यावर संगीतकार यशवंत देव आणि गायिका उत्तरा केळकर थोडेसे हिरमुसले झाले खरे, पण पहिल्याच गाण्यानंतर शेखरकाकांची तयारी पाहून त्यांनीच भरपूर दाददेखील दिली. कीर्ती शिलेदारांची अजून एक मैफिल शेखरकाकांच्या स्मरणात आहे. पेटीवर शेखरकाका होते पण कोणीही तबलजी उपलब्ध नव्हता! अशा वेळी केवळ टाळांच्या ठेक्यावर तबल्याची अनुपस्थिती अजिबात जाणवू न देता कीर्ती शिलेदारांनी नाट्यसंगीत आणि अभंगांची बहारदार मैफिल सादर केली!

मोहिनीताई अध्यक्ष असताना गायिका गंगुबाई हंगल आणि हार्मोनियमवादक आप्पा जळगावकर यांचा कार्यक्रम झाला. पुढे परत एकदा पं वसंतराव देशपांडे आणि पं आनंद बदामीकर (तबलावादक) यांच्याबरोबर आप्पा जळगावकर कार्यक्रमाच्या निमित्ताने राहायला आले. आप्पा जळगावकर वसंतरावांना नकला करायला सांगत. वसंतरावांनी भजी तळण्याची फर्माईश केली आणि भज्यांची पिल्लं टाकून देऊ नका असंही सांगितलं. तेलकट पदार्थ गायकमंडळींना चालत नसतील म्हणून तोपर्यंत भज्यांचा बेत झालेला नव्हता.

आणि भज्यांची पिल्लं म्हणजे काय? भजी तळताना तेलात भज्यांबरोबर पिठाचे छोटेमोठे कणही पडतात. पानात भजी वाढताना ही भज्यांची पिल्लं काही वाढली जात नाहीत, पण वसंतरावांना तीच प्रिय होती! मैफिलीत वसंतरावांना तानपुऱ्यावर साथ देताना गायकाच्या मागे बसून गाणं नीटपणे ऐकता येत नाही अशी छोटीशी तक्रार मोहिनीताईंनी केल्यावर "मीच गाताना तानपुरा वाजवतो, तुम्ही पुढे बसून ऐका" असं सांगणारे वसंतराव वीस - पंचवीस मिनीटांनंतर "तानपुरा वाजवून दमलो बुवा आता, तुम्हीच तानपुरा वाजवा" असं सांगते झाले!

चंद्रशेखर जोशी
१९७५ अध्यक्ष

अरुण लोंढे
१९७७ अध्यक्ष

मोहिनी जोशी
१९७९ अध्यक्ष

महाराष्ट्र मंडळाचा दुसरा जिव्हाळ्याचा विषय म्हणजे सुग्रास भोजन. मोहिनीताई सांगतात, की मंडळाची स्त्री उपाध्यक्ष ही "food committee" होती. त्यावेळी कोणीही केटरर्स उपलब्ध नसल्यामुळे मेनू ठरल्यावर वीसेक कुटुंबाना स्वैपाक करण्याची विनंती केली जात असे. सर्वांकडून येणाऱ्या स्वैपाकाच्या चवीमध्ये एकसामानात आणण्यासाठी पदार्थाची पाककृती (recipe) देखील दिली जात असे. आजच्यासारखी RSVPची सोय नसल्यामुळे किती लोकं येणार याची कल्पना नसे. त्यामुळे स्वैपाक किती करायचा हे अंदाजानेच ठरवावे लागत असे. कधी काही कमी-अधिक झाल्यास येणारी मंडळीही "महाराष्ट्र मंडळाचं कार्य हे आपल्या घरचं कार्य आहे" या भावनेने विशेष तक्रार करत नसत.

स्वतःच्या अध्यक्षपदाची कालमर्यादा संपल्यानंतरही शेखरकाका आणि मोहिनीताई सौभद्र, संशयकल्लोळ मधले नाट्यप्रवेश, शेपटीवाल्या प्राण्यांची सभा/वेद निपजले जिथे महान, लेझीम, नृत्य, इयर ऑफ इंडिया सेलेब्रेशन, चल रे भोपळ्या हे संगीतनाट्य असे मुलांचे अनेक कार्यक्रम, येणाऱ्या कलाकारांचं आदरातिथ्य आणि साथसंगत, अशा अनेक प्रकल्पांमधून महाराष्ट्र मंडळात कार्यरत होते. लीलाताईंनी सुरू केलेली विनामूल्य संगीत शिक्षणाची परंपराही शेखरकाका आणि मोहिनीताईंच्या अत्यंत यशस्वी Ragabasics youtube channel आणि blog च्या स्वरूपात सुरू आहे. कालमानपरत्वे नव्या लोकांना संधी देण्यासाठी मंडळातली आपली दृश्यमानता (visibility) कमी करण्याचा विवेकही शेखरकाका आणि मोहिनीताई या दोघांमध्ये आहे. एवढी वर्ष मंडळासाठी काम करूनही महाराष्ट्र मंडळाबद्दल त्यांच्या मनांत लेशमात्र कटुता नाही. फक्त कृतज्ञता मात्र आहे. महाराष्ट्र मंडळासाठी कोणत्या भावनेने काम करावं हे शेखरकाका आणि मोहिनीताईंकडून नक्कीच शिकण्यासारखं आहे.

श्री अरुण लोंढे ('महाराष्ट्र मंडळ शिकागो'चे अध्यक्ष सन १९७७)

सत्तरीच्या दशकामध्ये महाराष्ट्र मंडळाच्या सुरवातीच्या काळात अनेक व्यक्ती कार्यरत होत्या. ही सर्व मंडळी कधी अध्यक्षाची, कधी उपाध्यक्षाची तर कधी सामान्य कार्यकर्त्याची टोपी घालून सारख्याच उत्साहाने मंडळासाठी काम करताना दिसत. त्या सुरवातीच्या नव्या उमेदीच्या काळात कैलासवासी विष्णू वैद्य यांच्या नंतर श्री अरुण लोंढे १९७७मधे 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'चे अध्यक्ष झाले. अध्यक्षपदाच्या त्यांच्या वर्षभरात नेहमीचे कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरे झालेच पण काही गोष्टींचा उल्लेख विशेष म्हणून करायला हवा. त्यामध्ये सगळ्यात लक्षात राहिलेला कार्यक्रम म्हणजे "लेकुरे उदंड झाली" हा भारतातून आलेला नाट्यप्रयोग. दुसऱ्या दिवशी याच नाटकाचा प्रयोग डेट्रॉईट ला होता. शिकागोचा प्रयोग संपल्यावर तातडीने कलाकारांना घाईघाईत अर्ध्या अंतरावर कालामाझू पर्यंत नेऊन सोडताना मंडळाच्या कार्यकर्त्यांनी दाखवलेली चपळाई कौतुकास्पद होती. कालामाझू पासून डेट्रॉईट महाराष्ट्र मंडळाचे कार्यकर्ते कलाकारांना पुढे घेऊन गेले. एखाद्या हायस्कुलच्या मोठ्या सभागृहात महाराष्ट्र मंडळाच्या नाटकाचे प्रयोग होताना आपण नेहमी पाहतो. हायस्कुलच्या सभागृहात नाटक सादर करण्याची कल्पना श्री अरुण लोंढे यांनी मंडळाच्या इतिहासात सर्वप्रथम प्रत्यक्षात आणली. स्मरणात राहिलेला अजून एक कार्यक्रम होता हृदयनाथ मंगेशकरांचा. त्यापूर्वी शिकागोमध्ये त्यांचा कार्यक्रम बहुधा झालेला नसावा. श्री अरुण आणि सौ वीणा लोंढे शिकागोच्या नाट्यपरंपरेमध्येही कलाकार म्हणून सहभागी होते. शिकागो सोडून कॅलिफोर्नियाला गेल्यावर तिथेही ते महाराष्ट्र मंडळ, नाटक आणि बृहन्महाराष्ट्र मंडळ यामध्ये सक्रीयपणे कार्यरत होते.

मुलाखत व शब्दांकन: मिलिंद मधुकर वेलणकर

BIG SUCHIR DESI HUT RESTAURANT

2437 W 75th Street, Woodridge, IL - 60517

www.bigsuchirrestaurant.com • Email : BigSuchir@gmail.com

DELICIOUS INDIAN CUISINE AT AN AFFORDABLE PRICE

WE CATER FOR ALL TYPES OF EVENTS

- WEDDINGS
- BABY SHOWERS
- CORPORATE PARTIES
- IN HOME PARTIES
- OUTDOOR PARTIES, (DOSA, CHAAT ETC.)
- NO MINIMUM ORDER

MENU OPTIONS

- GUJARATI
- KATHIAWADI
- SOUTH INDIAN
- INDO FUSION (CHINESE, MEXICAN)
- NORTH INDIAN
- NO MINIMUM ORDER

VENUE OPTIONS AVAILABLE

FOR MORE INFORMATION
CONTACT : NIRANJAN NATHWANI
630-985-5552 OR 630-730-8254

कट्टा (वर्ष १९७५-१९८०)

डॉ हुपरीकर, करमरकर, गोडबोले, प्रचंड, मणेरीकर व इतरांनी लावलेल्या शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या रोपट्याचे आता छान झाड वाढले होते. झाडाभोवती मंडळाने छानसा कट्टा बनवला होता आणि तिथे संध्याकाळी काही मंडळी नियमितपणे भेटायचे. या वर्षी कोणते कार्यक्रम करायचे, कार्यक्रमाच्या वेळी जेवणाचा मेनू काय ठरवायचा, कोणते नाटक बसवायचे, मराठी शाळेचा काय कार्यक्रम आहे - असे अनेक विषय कट्ट्यावर रंगायचे. आज अचानक मला कट्ट्यावर यायला मिळाले व श्री मोराणकर, श्री वैद्य आणि श्री चेंबूरकर यांच्याबरोबर गप्पा मारण्याचा योग आला.

मी: नमस्कार मंडळी!

मोराणकर: नमस्कार! आज इकडे कुठे वाट चुकलात?

मी: अहो वाट चुकलो नाही, तुम्हाला मुद्दाम भेटायचे ठरवून इकडे आलो आणि योगायोगाने तुम्ही तिघेही इथे आहात, हा म्हणजे दुग्धशर्करा योगच म्हणायचा...

वैद्य: घ्या! इथे साखर कमी करा असा हिचा सल्ला ऐकून घरून येतोय आणि तुम्ही साखरेची गोष्ट काढली! त्यात मोराणकर म्हणत होते या वर्षी पाडव्याला श्रीखंड पुरीचा बेत ठरवायचा. श्रीखंड बनवायची जबाबदारी चेंबूरकर आणि हुपरीकरांवर टाकायची.. तीनशे लोकं येतील अशी अपेक्षा असल्यामुळे मोठा घाट घालायला लागेल असे दिसते! आता आम्ही साखरेवर नियंत्रण कसे ठेवायचे?

मी: अहो साखरेचं खाणार त्याला देव देणार! तुमची पण खरंच कमाल आहे. प्रत्येक कार्यक्रमाचा स्वयंपाक तुम्हीच सगळे मिळून बनवता?

चेंबूरकर: हो तर, ही गेल्या अनेक वर्षांची आमची प्रथाच आहे! म्हणजे बघा, इथे एवढ्या मोठ्या प्रमाणात मराठी जेवण बनवून देणारे कोणी नाही. आणि आमचे मंडळ कंबर कसून तयार - मग कोणाची वाट कशाला बघायची? अहो, मी १९८० साली अध्यक्ष असताना गणपतीला ५०० हून अधिक लोक आले होते. शिवाय त्या वर्षीचा 'तरुण तुर्क म्हातारे अर्क' नाटकाचा प्रयोग देखील गाजला.. सगळ्यांची व्यवस्थित सरबराई करताना आमचा कुठलाही कार्यक्रम आजवर कधी कुठे कमी पडला नाहीये!

मी: हो तेही खरेच! पण दरवर्षी कोण काय करणार, हे तुम्ही कसे ठरवता?

वैद्य: त्याचं काय आहे - जो कोणी अध्यक्ष असेल त्याने सर्व कमिटीबरोबर कार्यक्रमाची रूपरेषा ठरवायची आणि इतरांनी ती पार पाडायची हा मुळी आमचा नियमच आहे. म्हणजे बघा - मी १९७६ साली अध्यक्ष होतो आणि कमिटीमध्ये लोंढे, मोराणकर आणि इतर मंडळी होते. त्यावेळी साताठशे मराठी माणसे शिकागो परिसरात असतील - पण आम्ही १०-१२ कुटुंबे मिळून मंडळ चालवायचो. सर्व मराठी लोकांना एकत्र आणणे हे मुख्य उद्दिष्ट. सणवार साजरे करायचे, आणि दरवर्षी एक नाटक बसवायचं हा हुपरीकरांचा नियम. ७६ साली आम्ही 'कथा कुणाची व्यथा कुणा' नाटक बसवले होते. त्याशिवाय संत केशवदास यांचे भगवत गीतेवर सुंदर प्रवचन झाले - ते सगळ्यांना खूप आवडले होते.

मोराणकर: अगदी बरोबर! मी १९७८ साली अध्यक्षपदाची धुरा सांभाळली तेव्हा देखील आनंद गर्दे आणि अनुपमा धारकर उपाध्यक्ष आणि अशोक लेले खजिनदार होते. आमच्या कमिटीने अमेरिकेतल्या इतर शहरातील महाराष्ट्र मंडळांच्या समन्वयाने भारतातून कलाकारांना शिकागोला आणून मराठी मंडळींना खूष करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. त्या वर्षी हुपरीकरांचे 'मोहिनी' नाटक मस्त झाले होतेच, पण ते वर्ष संगीतप्रेमींसाठी पर्वणी होते - एक तर पं. जितेंद्र अभिषेकींचा कार्यक्रम गाजला आणि माझ्या आठवणीतली सगळ्यात मोठी मैफिल म्हणजे आम्ही पं. भीमसेन जोशींचा गाण्याचा कार्यक्रम केला. त्यात नाना मुळे साथीला होते. काय रंगला होता म्हणून सांगू तो कार्यक्रम!

मी: वा मस्तच! अशा कार्यक्रमात सहभाग म्हणजे रसिकांची चैनच - त्यासोबत उत्तम जेवणाची मेजवानी म्हणजे जणू पुरणपोळीवर साजूक तुपाची धार!

वैद्य: अहो इथे साखर कमी करण्याबद्दल मघाशी बोललो ते तुमच्या पालथ्या घड्यावर पाणी का? पण काही म्हणा, मराठी मातीपासून हजारो मैल दूर आल्यावर आपल्या पदार्थांची गोडी आपसूकच कैक पटीने वाढते, नाही का? शिवाय हे घरी सगळ्यांनी मिळून बनवल्याने आमच्या मुलांनाही पिझ्झा आणि पास्ता पेक्षा रुचकर अन्नाची गोडी आपोआपच निर्माण होते आणि आपल्या परंपरा कळतात.

मी: अगदी खरंय! ह्या मुलांना आपल्या संस्कृतीचे बाळकडू देणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने तुम्ही आणखी जे कार्य केले त्याचीही थोडी माहिती देऊ शकाल का?

मोराणकर: आम्ही मुलांसाठी मराठी शाळा चालवतो - जया हुपरीकर मुलांना मराठी शिकवतात आणि करंदीकर श्लोक म्हणवून घेतात. नाहीतर इथे राहून मुलांना आपल्या भाषेबद्दल प्रेम कसे निर्माण होणार?

विष्णू वैद्य
१९७६ अध्यक्ष

सुधाकर मोराणकर
१९७८ अध्यक्ष



प्रमोद चेंबूरकर
१९८० अध्यक्ष

वैद्य: आणि हे सगळे नुसते आपल्या शिकागोच्या मंडळापुरते मर्यादित न ठेवता अमेरिकेतील इतर मंडळांपर्यंत पोचवण्यासाठी मी, शरद गोडबोले आणि जया हुपरीकर, आम्ही तिघांनी मिळून १९८१ साली 'बृहन्महाराष्ट्र मंडळ' स्थापन केले - त्यायोगे असे उपक्रम सर्व शहरांमध्ये चालू करता येतील व पुढच्या पिढीला आपला सांस्कृतिक वारसा टिकवता येईल.

चेंबूरकर: आपल्या सांस्कृतिक वारश्याबद्दल बोलतोय तर हेही नमूद करावे लागेल की मी स्वप्रयत्नांनी आणि महाराष्ट्र मंडळाच्या सहयोगाने लेमॉण्टमध्ये मंदिर बांधण्याच्या उपक्रमात मदत केली आहे. त्यांना जागा मिळवून द्यायला, शिवाय तिथे नुसत्या मराठी लोकांसाठीच नाही तर सगळ्या हिंदू समाजसाठी उपयोगी अशी वास्तू उभारण्यात आमचे योगदान आहे.

मी: तुमच्या अध्यक्षीय कार्यकिर्दीत काही आठवणीत राहतील असे प्रसंग अथवा काही खमंग किस्से?

वैद्य: (हसून) हां! आता कसे गोडावरून खमंगावर आलात? तुम्हाला सांगतो - आम्ही १०-१२ कुटुंबे मिळून मंडळाची कामे बघायचो. आलटून पालटून वेगवेगळी पदे सांभाळली आहेत, आणि संगनमताने कमिटी ठरायची. पण १९७६ साली शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या इतिहासातली पहिली निवडणूक झाली - मी आणि मोराणकर उभे होतो आणि मी निवडून आलो! मात्र त्यानंतर लगेच आम्ही सगळे खेळीमेळीनेच एकत्र कामाला लागलो.

मोराणकर: माझ्या आठवणीतील प्रसंग म्हणजे आता कोणालाही खरे वाटणार नाही पण आम्ही त्या काळी रचनाचा अंक हातानी लिहून काढायचो! जया हुपरीकर या प्रतिभावंत लेखिका, त्यातून त्यांचे हस्ताक्षर सुंदर असल्यामुळे बहुतांशी लिखाण त्याच करायच्या. पण इतरांचेही थोडेफार योगदान असायचेच. आणि बरं का, त्यावेळी आम्ही मंडळासाठी नवीन म्युझिक सिस्टिम घेतली - जरी प्रत्यक्षात ती वापरेपर्यंत थोडा आणखी काळ गेला ती वेगळी गोष्ट.

चेंबूरकर: मला मात्र एक गमतीशीर गोष्ट आठवतीये - मी अध्यक्ष असताना 'तरुण तुर्क म्हातारे अर्क' नाटकात भूमिका करायची म्हणून मिशी वाढवली होती - आणि अनेक महिने घरी बायको आणि पोरांचा तो चेष्टेचा विषय झाला होता!

मी: अहो मिसरूड नसलेल्यांना मिशीची ऐट काय कळणार! पण तुमची नाटकातली भूमिका मात्र झकास झाली होती असे सगळेच सांगतात. असो. आजचा पोरगा काही वर्षांनी आपल्या मिशीला पीळ मारत मंडळासाठी तुमच्यासारख्याच तडफेने काम करत असेल. त्या पुढच्या पिढीला काही सांगावेसे वाटते का?

तिघेही एकाच सुरात: आम्ही मंडळाची सुवर्ण पहाट अनुभवली आहे - आता तुम्ही नवीन लोकं मंडळाला असेच वृद्धिंगत करा आणि मंडळाची सुवर्ण जयंती धूमधडाक्यात साजरी करा!

टीप: प्रत्यक्ष मुलाखत - श्री सुधाकर मोराणकर, श्रीमती प्रभा वैद्य (दिवंगत श्री विष्णू वैद्य यांच्या पत्नी), आणि श्री योगेन चेंबूरकर व श्री दीपेन चेंबूरकर (दिवंगत श्री प्रमोद चेंबूरकर यांचे सुपुत्र). हा कट्टा काल्पनिक असला तरी नमूद केलेल्या व्यक्तींचे कार्य आणि शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या प्रगतीतील त्यांचे भरघोस योगदान वास्तविक आहे.

मुलाखत व शब्दांकन: अभिजित रायरीकर

KALPAK
CATERERS
Serving Delicious Moments!

"Best compliments and wishes from,

Nritya Natya Academy"

(A kathak dance and drama institute, Gandharva affiliation)

312.224.7861, nnkacademy@gmail.com

Director: Madhura Sane

A place where Dance and Expression meets Love, Passion and Dedication. A Not for Profit organization.

आयुष्यावर बोलू काही...

जरा चुकीचे जरा बरोबर बोलू काही चला दोस्तहो 'आयुष्यावर बोलू काही!'... २००३ पासून ह्या ओळींनी तमाम मराठी रसिकवर्गाला कवितेच्या प्रेमात पडायला लावणाऱ्या संदीप आणि सलील ह्या जोडगोळीतीले संदीप ह्याच्या सोबत त्याच्या कवितेच्या प्रवासाबद्दल मारलेल्या मनमोकळ्या गप्पा

१. 'आयुष्यावर बोलू काही'चा प्रवास कसा सुरू झाला.?

'आयुष्यावर बोलू काही'चा प्रवास हा अत्यंत सहज आणि कुठल्याही गोष्टी न ठरवता झाला होता. याचा श्रीगणेशा हा घरातूनच झाला. सगळ्यात आधी कविता वाचली, ती माझ्या घरातल्यांसमोर. मी १५/१६ वर्षांचा होतो तेव्हापासून कविता वाचायला सुरुवात केली. कधी घरगुती कार्यक्रमातून छोट्या, छोट्या स्पर्धांमधून कधी कवीसंमेलनातून मी कविता सादर करायचो. कविता सादरी करणाचे कॅलिडोस्कोपसह कार्यक्रम केले आणि त्यानंतर आयुष्यवर बोलू काही हा कार्यक्रम सुरु झाला. मला कल्पना नव्हती की १५ वर्ष हा कार्यक्रम असा सुरू राहील. ह्याची कॅसेट आधी बाजारात आली होती. त्यात माझ्या कविता होत्या, माझं संगीत होतं आणि त्या सलील कुलकर्णीने गायल्या होत्या. आम्ही दोघांनी काम केलेली ही पहिली कॅसेट. त्याच्या ओपनिंग साठी पहिला कार्यक्रम केला होता आणि त्यानंतर काही महिन्यातच, जो सध्या 'आयुष्यावर बोलू काही' तुम्ही बघताय किंवा ऐकताय त्याचा पहिला प्रयोग केला होता तो ६ ऑगस्ट २००३ रोजी. ह्यात सलील आणि माझ्या संगीतामधली गाणी, माझ्या कविता असं रसिकांसाठी सादर केलं होतं.

पहिला प्रयोग हाऊसफुल झाला म्हणून त्याच्या जोडीला दुसरा प्रयोग केला, असं करत करत तिसरा, चौथा आणि मग नाटकाचे जसे दौरे होतात तसे 'आयुष्यावर बोलू काही' चे दौरे सुरू झाले. महाराष्ट्रातील जवळ-जवळ सगळी शहरं, तालुके, गाव पायाखालून घातली आहेत. भारताच्या बाहेर अमेरिका, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, केनिया, दुबई, लंडन इकडे कार्यक्रम सादर केले आहेत. नुकताच युरोप आणि दुबईचा दौरा करून परत आलोय. 'आयुष्यावर बोलू काही' हे शीर्षक असलं तरी १००-१०० वेळा प्रयोग पाहिलेले सुध्दा कंटाळत नाहीत कारण प्रत्येक प्रयोग वेगळा असतोच. प्रत्येक प्रयोगात वेगवेगळ्या कवितेची भर पडत जाते. काही ठराविक गाणी ही ऐकवावीच लागतात. उदारणार्थ, 'मोर्चा नेला नाही', 'नसतेस घरी तू जेव्हा', 'दमलेल्या बाबांची कहाणी तुला', 'सरी वर सरी', 'आताशा असे हे'. साधारणपणे ३ ते ४ तासांचा कार्यक्रम असतो पण सहा तासाचे कार्यक्रम सुध्दा केलेले आहेत तरीही लोकांच्या फर्माईशी राहून जातात. जोपर्यंत नवीन काही सुचतंय आणि नवीन काही सादर केलं जातंय तोपर्यंत 'आयुष्यावर बोलू काही' लोकांसाठी सादर करत राहू.

२. कविता म्हटली, की काय डोळ्यासमोर येतं?

माझ्या मते कविता हा जगण्याचा अर्थ असतो, जगण्याचं प्रतिबिंब असतं. तुम्ही जसे जगत जाल तसे तुमच्या अनुभवानुसार, बदलत्या संवेदनानुसार कवितेचा पोत, अभिव्यक्ती बदलत राहाते आणि ते अगदी नैसर्गिकच आहे. सध्या कवितेचा जमाना बदलला आहे असा क्षणभर विचार येतो मनात, पण नाही; कविता फेसबुकवरची असू दे, ट्विटरवरची किंवा स्टेजवरून सादर केली जाणारी असू दे, कविता ही कविताच असते. कविता ही कुठल्याही माध्यमासाठी लिहिली जात नाही, ती स्वतःसाठी लिहिली जाते. तुम्हाला जे वाटतंय, जे सांगायचं आहे त्यासाठी कविता लिहिली जाते. कविता तयार होताना स्वतःच रूप कसं असावं हे तीच ठरवते. कवी काही ठरवत नाही कवितेचं रूप कसं असावं, ती मुक्तछंदात असावी का नसावी, चालीत बांधावी का बांधू नये, हे सगळं कवीच्या हातात नसतं, हे सगळं कविताच ठरवत असते. त्यामुळेच वेगवेगळ्या धाटणीच्या कविता माझ्याकडून लिहिल्या गेल्या आहेत. काही मुक्तछंदातल्या आहेत, काही चालीसाठीच्या आहेत तर काही प्रसंगाच्या आहेत, कवितेचा विषय सुध्दा कधी फिलॉसॉफिकल असतो, कधी व्यक्तिगत, कधी सामाजिक तर कधी व्यावहारिक. कविता ही कालची असू दे, आजची असू दे किंवा उद्याची येणारी असू दे, त्याचा गाभा हा तोच राहणार आहे, कवी फक्त बदलत जातील.

३. तुझ्या कवितेसाठी तुझं कोणतं प्रेरणास्थान आहे का? कोणत्या प्रकारचं वाचन तुला ह्या कवितेसाठी करायला आवडतं?

माणसाचं जगणं ही माझ्या कवितेसाठीची खरी प्रेरणा आहे. कोणताही एक लेखक, एक कवी असं सांगणं शक्यच नाही. मला खूप लेखक आणि कवी आवडतात, प्रत्येकाची जातकुळी वेगळी असते. मराठी साहित्य खूप सकस आहे. आणि मला सगळ्याच प्रकारचं वाचायला आवडतं. अगदी किशोर मासिकापासून सर्व काही, मग ते विनोदी असू दे, सामाजिक, रहस्य कथा, गूढ कथा किंवा कादंबरी असू दे. वानगीदाखल कवींची नावं घ्यायची झाली तर आरती प्रभू, ग्रेस, बोरकर, विंदा करंदीकर आहेत, भट आहेत. सगळी नावं घेणं शक्यच नाही. लेखकांमध्ये म्हणायचं झालं तर श्री. ना. पेंडसे आहेत, गो. नी. दांडेकर आहेत, मोकाशी पासून ते अगदी नारायण

धारपांपर्यंत. धारपांनी सुध्दा मराठीत खूप वेगवेगळे प्रयोग केलेले आहेत आणि फार वेगळ्या काळात केले आहेत. हेमंत जोगळेकर हे माझे फार आवडते कवी. शाम मनोहर सुध्दा मला खूप आवडतात. नेमाड्यांचं वाचन करायला मला खूप आवडतं. हे वाचन करताना भाषेची मशागत होत असते. भाषेचा जो काही शब्दकोश आहे तो वाढत जातो आणि तुम्हाला समृध्द करत जातो.

४. कवितेमधून कोणते प्रयोग केले आहेस का कधी?

कवितेचा उद्देश हा वेगळा असतो. निदान माझ्यासाठी तरी तो वेगळा आहे. माझ्या कविता जास्त मानवी प्रवृत्तीबद्दल बोलतात, त्यात सामाजिक प्रश्नांचा उल्लेख आहे, पण जगतांना अगदी साहजिक आहेत. पण सामाजिक प्रश्न आहे म्हणून मुद्दामून त्यावर कविता करून जनजागृती करू हा काही कवितेचा उद्देश होऊ शकत नाही. सामाजिक जाणिवेतून अचानक कविता सुचू शकते त्यात प्रश्नांचा उल्लेख असतो, पण प्रश्न दिसला, भासला म्हणून त्यावर ठरवून कविता असं सहसा होत नाही. सामाजिक प्रश्नांसाठी ठरवून कविता कधी केल्या नाहीत. ‘दमलेल्या बाबांची कहाणी तुला’ ही व्यक्तिगत अनुभवातून साकारलेली कविता आहे, जी नंतर सामाजिक झाली. कविता ही आधी सुचावी लागते मग तुम्हाला कळतं, की कशावर कविता झाली आहे. नव-नवीन प्रयोग होतात पण आपसूक होतात मुद्दाम ठरवून कवितेत प्रयोग होत नाहीत.

जेव्हा तुम्ही एका पातळीपर्यंत लिहायला सुरवात करता किंवा लिहायच्या एका पातळीपर्यंत तुम्ही पोचता त्यावेळी ठराविक चाकोरीच्या बाहेर पडायची प्रत्येक कलाकाराची धडपड असते आणि त्यातूनच चाकोरी मोडली जाते आणि काही नवनवीन प्रयोग जन्माला येतात. माझ्या कवितेच्या पुस्तकात अशी चाकोरी मी मोडली आहे. पण कविता सादरीकरणात मात्र वैविध्य नक्कीच आणता येतं. मी, मधुरा वेलणकर आणि विभावरी देशपांडेंनी मिळून “कधीतरी वेड्यागत” असा एक कार्यक्रम सादर केला होता. कवितेचा नाट्यानुवाद होता तो! नाटकाप्रमाणेच त्यात प्रकाशयोजना, संगीत, नेपथ्य आणि साउंड सगळं होत. जसं नाटक हळू-हळू पुढे सरकतं तशी कवितेमधून कवितेचा प्रवास हा अलगदपणे उलगडत जातो. त्यात आम्ही कविता INACT करायचो, पण हे बसून सादर केलेल्या कवितेत नाही करता येत! सादरीकरणात हे जमतं, कविता सुचण्यात हे जमत नाही.

५. एखादी घटना घडली किंवा मनाला भिडली तर त्यावर कधी कविता करावीशी वाटली आहे का? पूर्वी कधी केली आहेस का?

काही डोळ्यसमोर आलंय म्हणून कविता सुचते का, असं मला बरेच लोक विचारतात, पण दिसलंय म्हणून उतरवलंय असं माझ्याबाबतीत फार क्वचित होतं. पण कागदावर उतरवलं नाही म्हणून ते मी विसरून गेलो असंही होत नाही. काही पाहिलं किंवा दिसलं, तेव्हा कवीचा आणि कवितेचा मूड असेलच असं नाही. हे सगळे प्रसंग तुमच्या स्वप्नांच्या दुनियेत तरंगत असतात आणि मग कुठल्यातरी रूपाने ते कवितेत उतरतात किंवा व्यक्त होतात.

एखाद्या जुन्या आठवणीने जसे डोळे ओले होतात किंवा टचकन ह्रदयात कालवा-कालव होते तसे हे शब्द कवितेमधून सुचले की ओझरतात. त्यामुळे कवितेचा विषय कधी, कसा आणि का सुचेल हे सांगता येत नाही. प्रसंगानुरूप कविता लिहिली जाते पण जाईलच असे नाही, त्याचे काही नियम असतात. जशी ‘सायकल’ ही कविता, ज्यात मी मुलीला सायकल शिकवतोय असे काही प्रसंग आहेत. आज २०१९ मध्ये माझी मुलगी इयत्ता१२वी मध्ये आहे म्हणजे १८ वर्षांची, पण मी तिला सायकल शिकवली तेव्हा ती ८ ते १० वर्षांची असेल, पण तेव्हा मला ही ‘सायकल’ कविता सुचली नाही, पण ते मनात होतं आणि दहा वर्षांनी कागदावर उतरलं.

६. फेसबुक किंवा ट्विटरचा वापर हा कविता लोकांपर्यंत पोचवण्यासाठी करावा असा विचार येतो का मनात?

माझं स्वतःच फेसबुक पेज आहे आणि ऑनलाईन चॅनेल सुध्दा. माझी टीम आहे जे हे हॅन्डल करतात. ही दोन्ही अतिशय प्रभावी माध्यम आहेत लोकांपर्यंत पोचण्यासाठी. पण त्याच्या आहारी जाऊ नये. सतत लिहायचं आणि पोस्ट करत राहायचं असं होऊ नये. कलाकाराने स्वतःला वेळ द्यावा. कविता लिहिणं हे जास्त महत्वाचं आहे आणि त्यासाठी जे करावं लागत ते करणं सुध्दा महत्वाचं आहे. कवितेमधले शब्द जर मनाला भिडणारे असतील तर ती लोकांपर्यत सहज पोचते, अगदी ही माध्यम नसली तरी, आणि ते मी करतोय. पण आजकाल १५ वर्षांची शाळेत जाणारी मुलं सुध्दा स्मार्टफोन वापरतात आणि पर्यायाने ही माध्यमे. त्यांच्यापर्यंत कविता पोचवायला ह्या माध्यमांचा उपयोग चांगला होतो. आपल्या मराठीत एक शब्द आहे “तारतम्य”, ते आपण ठेवले पाहिजे. माध्यमातून लोकांसमोर जायला किती वेळ लागतोय किंवा आपला किती वेळ जातोय आणि कवितेसाठी आपण किती वेळ देतोय हा समतोल सांभाळायचा मी प्रयत्न करत असतो. त्यानुसार जेवढं जमेल तेवढं आणि तसं फेसबुकवर किंवा ट्विटरच्या माध्यमातून मी लोकांपर्यंत पोचवत असतो पण त्याचं प्रमाण मात्र मी ठरवलेलं असतं, त्या संबंधी माझे काही आडाखे आहेत आणि त्यावर मी ठाम आहे.

७. तुला, “कधी कविता शिकवतोस का?” असं विचारलं गेलंय का?

नाही, असं कधी विचारलं गेलं नाही. कविता शिकवणं तसं अवघड आहे. बाकी सगळ्या गोष्टींचे क्लास असतात पण कविता

शिकवण्याच्या क्लास नसतो, त्याची शिकवणी ठेवता येत नाही. कवी हा जन्माला यावा लागतो जसा गायक जन्माला यावा लागतो. कुठलाही कलाकार हा कलेचं बीज घेवूनच जन्माला आलेला असतो आणि मग त्याला पैलू पाडले जातात. याच प्रकारे कविता लिहिणं ही प्रेरणा तुम्हाला जन्मजात असावी लागते. जसा कुठल्याही गोष्टीचा रियाज असतो तसा कवितेचा सुध्दा रियाज असतो, अभ्यास असतो. अभ्यासाने कवितेत खूप फरक पडतो. भाषेत भर पडते, कविता मग हळू-हळू ती भाषा बोलू लागते, भावना त्या भाषेत व्यक्त होऊ शकते. वाचून आपल्याच चुका आपल्याला लक्षात येतात. ही कवितेची साधना आहे. उचलली पेन्सिल आणि लिहिले शब्द असं म्हणून कविता होत नाही. प्रत्येक कवीने वृत्त-छंदाचा अभ्यास हा केलाच पाहिजे व अगदी जाणीवपूर्वक. एकदा अभ्यास झाला, की मग स्वतःची कविता लिहायची शैली कशी ते ठरवावं, पण हा अभ्यास हा तुमचा तुम्हालाच करावा लागतो, आणि प्रत्येकाने करावा असं अपेक्षित असतं. क्लासमध्ये ह्या गोष्टी शिकवता येत नाहीत. ती वाट तुमची असते आणि तुम्हालाच चालायची असते, कुठे थांबायची, कुठे सोडायची हे स्वतः त्या वाटेवर चालल्याशिवाय कसं कळेल? स्वतःची पध्दत स्वतःच ठरवावी, लोक सांगतात त्याप्रमाणे ती बदलू नये. स्वतःची कविता स्वतःला समजायला हवी, इतका अभ्यास असावा. ती क्वचित बिघडू शकते, क्वचित चांगली होऊ शकते, त्यात रिस्क आहे, जी प्रत्येक कवीने स्वतःची स्वतः घ्यायला हवी. कवीने आपली पध्दत विकसित करून त्या प्रकाशात स्वतःच्या कवितेची वाटचाल करावी.

८. प्रेक्षकांना कधी 'आयुष्यावर बोलू काही'मध्ये सामावून घेतलं आहेस का?

'आयुष्यावर बोलू काही' मध्ये कविता कोणाला वाचायची असेल तर मी किंवा सलील त्या व्यक्तीची कविता वाचत नाही. आम्ही ती त्यालाच वाचायला देतो. अर्थात हे प्रत्येक कार्यक्रमात होत नाही. "इर्शाद" म्हणून एक कार्यक्रम करतो, मी आणि वैभव जोशी मिळून. दोन वर्षांपूर्वी अमेरिकेत 'इर्शाद'चे १६ प्रयोग झाले आणि त्यातला एक शिकागोमध्ये सादर झाला होता. त्यात एक मोकळा माईक असतो, वेळेचं बंधन पाळून आम्ही उपस्थितांना सांगतो, की तुम्ही तुमची कविता येऊन सादर करा. ह्या प्रवासात सुध्दा काही मित्र-मंडळी आम्हाला भेटलेली आहेत. छान वाटतं सकस कविता ऐकायला मिळाली तर, पण दुर्दैवाने हे प्रमाण जास्त नाहीये. कविता लिहिण्यात उत्साहाचा भाग जास्त असतो. लिहून झाली ना मग प्रतिसाद कसा मिळेल ह्याकडे कल जास्त असतो. ह्या सगळ्याला बाजूला सारून कवितेसाठी कविता लिहिणारी मंडळी खूप कमी आढळली. आणि ही प्रत्येक काळातली गोष्ट आहे आजकालची नाही. पिंडधर्माचे कवी जेव्हा भेटतात तेव्हा खूप आनंद होतो.

९. तुझ्या लक्षात राहिलेला एखादा कार्यक्रम.

२००३ ते २०१९ मधले सगळेच कार्यक्रम लक्षात आहेत. २००३चा पहिला कार्यक्रम असो किंवा ५०० वा प्रयोग, जो टीव्ही वर लाइव्ह दाखवला गेला होता, एक वेगळाच अनुभव होता तो. तर कार्यक्रम अनेक झाले आहेत, छोट्या-छोट्या गावांमधून पण कार्यक्रम सादर केले आहेत आणि तुम्हाला आश्यर्य वाटेल पण ह्या छोट्या गावांमध्ये सुध्दा कवितेची एवढी उत्तम जाण असते, की कठीण वाटणाऱ्या कविता सुध्दा ह्या अशा प्रेक्षकांसमोर सादर केल्या आहेत आणि त्याला उत्तम दाद मिळाली आहे. कुणीतरी समोर येऊन सुंदर शब्दात मांडलेलं वाचायला आणून देतं, आकस्मितपणे एकदम काहीतरी समोर येतं आणि वाटतं, अरे हे आपल्याच मनातलं आहे, भाषा कदाचित थोडी वेगळी असते पण आशय तोच. १५०० प्रयोगांची यात्रा आहे ही. पुणे, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, नांदेड अशी मोठी शहरं आहेत आणि त्याच्या आजूबाजूची खेडी. कवितेची मैफिल ही प्रत्येक शहरात आणि गावात रंगलेली आहे आणि ह्याला परदेश सुध्दा अपवाद नाही. फक्त अंतर लांब म्हणून वेगळा देश, पण कवितेची सकस जाण तिकडेही दिसून आली आणि मराठी रसिकत्वासाठी ही खूप अभिमानाची गोष्ट आहे.

१०. आमचं शिकागो कशासाठी लक्षात राहिले आहे?

मी पहिल्यांदा दहा-बारा वर्षांपूर्वी शिकागोला आलो होतो, 'आयुष्यावर बोलू काही'च्या अमेरिकेचा दौऱ्याच्या निमित्ताने. शिकागो लक्षात राहील ते तिथल्या थंडीमुळे, आपलेपणामुळे आणि उत्तम नियोजनामुळे. आम्ही नितीन जोशींकडे उतरलो होतो. एकदम घरच्या सारखं वातावरण. वाटलंच नाही पुण्यात नाही म्हणून. कार्यक्रम मार्चमध्ये होता. थंडी असते, थंडी असते असं म्हणत होते सगळे, म्हटलं असेल पुण्यासारखी. बाहेर स्वच्छ सकाळचं कोवळं ऊन पडलं होतं म्हणून म्हटलं चला जरा अंग शेकूया. मी एवढं बोललो आणि नितीन जोशी हसले, मनात म्हणाले असावेत, की बाहेर जाऊन तर बघ जरा काय होतंय ते. पहिलं पाऊल ठेवलं आणि वा किती छान वाटलं, पण थोडयाच वेळात छान रूपांतर कुडकुडण्यात होऊ लागलं. अंगावर ऊन तर येत होतं पण ऊब नव्हती त्यात. ऊन आहे पण थंडी सुध्दा वाजतेय, असा काहीसा सुखद अनुभव होता तो. छोट्याछोट्या गोष्टी असतात, पण लक्षात राहतात. दुसऱ्या भेटीत लेक मिशिगनला जायचा योग आला होता. पुण्यात राहायची सवय असल्याने थंडीची सवय असते, पण एवढ्या थंडीची नाही. लेकवरचा तो वारा त्यामुळे पूर्णवेळ कानटोपी, मफलर, स्वेटर, हातमोजे असून सुध्दा कुडकुडायला झालं होतं. हातात छत्री होती पण ती सुध्दा नीट उभी राहात नव्हती. हा खूपच वेगळा अनुभव होता.

११.शिकागो मराठी मंडळाला ह्या वर्षी ५० वर्षे पूर्ण होतील, इकडच्या रसिकांसाठी शिकागोविषयी तुझ्या मनातली साठवण काय ?

मला जर कविता सुचली तर मी नक्कीच करून पाठवीन, पण शुभेच्छा मात्र भरपूर पाठवतोय. मी ह्या मंडळासाठी कार्यक्रम सादर केला आहे. चांगला कार्यक्रम सादर करण्यासाठी उत्तम नियोजन करावं लागतं आणि ह्यात शिकागो मंडळाचं नाव कायम वरती असतं. म्हणजे माझ्याच मनात येतं असं नाही, तर मी जेव्हा माझ्या इतर कलाकार मित्रांसोबत बोलतो, तेव्हा ते सुध्दा खूप कौतुकाने शिकागो मंडळाबद्दल बोलतात. अत्यंत प्रगल्भ जाणीव असलेला रसिक वर्ग, रसिकांना आपण काहीतरी छान देतोय आणि रसिक तेवढयाच उत्साहाने ते ऐकत आहेत हे कोणत्याही कलाकारासाठी जन्मभर जपावा असा अनुभव असतो. मी जेव्हा मागे वळून बघतो तेव्हा ह्या अनुभवासमोर येणाऱ्या नावांमध्ये शिकागो हे एक महत्वाचं नाव आहे. ह्या मंडळाची अशीच उत्तम भरभराट होवो आणि माझ्या सारख्या कलाकाराला प्रोत्साहन देणारे दर्दी रसिक ह्या भूमीत कायम मिळोत हीच सदिच्छा.

शब्द असू दे हातामध्ये काठी म्हणुनी वाट आंधळी प्रवास खडतर बोलू काही,
चला दोस्तहो आयुष्यावर बोलू काही!

मुलाखत व शब्दांकन: कल्पना नेकलीकर

DRAPER & KRAMER MORTGAGE CORP.

DRAPER & KRAMER · ONE HUNDRED TWENTY-FIVE YEARS · 125th Trusted Since 1893

Gyan Srivastava

Residential Mortgage Lending

- Home Purchase and Refinance Loan Specialist
- Lender Credit Available to Offset Closing Costs
- Cash-out Refinancing Options Available
- Fixed/Jumbo/Adjustable-Rate Mortgages (ARMs)
- No PMI Program
- In-House Underwriting and Closing
- Investment Properties/Second Homes
- Home Equity Lines of Credit (HELOCs)
- FHA/VA/Interest Only
- Quick Turn Times

Contact me for a low rate quote and a mortgage consultation!

Mobile: 630-670-1645
Office: 630-268-5447
gyan.srivastava@dkmortgage.com
www.dkmortgage.com/gyan

701 E. 22nd Street, Suite 125 • Lombard, IL 60148

MORTGAGE EXECUTIVE 50 BEST COMPANIES TO WORK FOR
BBB A+
98% Customer Satisfaction
TOP 100 MORTGAGE COMPANIES In America

EQUAL HOUSING LENDER

Gyan Srivastava (IL:031.0027115 NMLS:287055) is an agent of Draper and Kramer Mortgage Corp. (IL:MB.0004263 NMLS:2551) is an agent of Draper and Kramer Mortgage Corp. (NMLS:2551) an Illinois Residential Mortgage Licensee located at 1431 Opus Place, Suite 200, Downers Grove, IL 60515, 630-376-2100. IL: Illinois Residential Mortgage Licensee No. MB.0004263 - Licensed by the Department of Financial and Professional Regulation, Mortgage Banking Division, 100 West Randolph, 9th Floor, Chicago, IL 60601, (888) 473-4858. 02970-01 03/2018

Best Compliments

Contact us for all your Real Estate needs!

Buying, Selling and Investing!

In all suburbs and Chicago downtown area.

We offer a special discount and quality service at every step!

Detailed comparative market analysis to buy or sell your property:

- Primary Home
- Investment properties
- Multi-family homes
- Rental properties
- Commercial properties

We help with home staging, and the supporting network of Licensed Inspectors, Attorneys, Mortgage Brokers, & Handyman.

Call us for a free market evaluation of your property!

Sangeeta Chavan
Real Estate Broker
630-728-4871
Sangeeta_chavan@yahoo.com

Hemant Chavan
Real Estate Broker
630-660-6231
hxchavan@yahoo.com

Perfect Properties Inc.
2712 Forgue Dr, #118,
Naperville, IL 60564

बृहन्मंगल प्रभातीचे सूर्य (वर्ष १९८१-१९८५)

गंगेसम पवित्र महाराष्ट्राच्या संस्कृतीचा मंगल कलश आपल्या मस्तकावर ठेऊन भारतातून सप्तसागरापार अमेरिकेत आलेल्या भगीरथांनी सर्वप्रथम शिकागोनगरीचीच निवड करावी हे केवढे महत्भाग्य आम्हांला लाभले आहे! या पूर्वसूरींनी आपल्या प्रियदर्शिनी 'पवननगरीला' (Windy City) खऱ्या अर्थाने 'पावननगरी' केले आहे ! १९६९ ते २०१९ या प्रदीर्घ प्रवासात आपल्या 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'चे स्वरूप प्रचंड पालटले आहे. एखाद्या कमळाच्या कळीने कशी आपली एकेक पाकळी हळुवार उलगडत जावीं, आणि अशी प्रत्येक पाकळी उलगडत असतांना तिच्या अंतरीचा सुगंध दशदिशांत निरंतर दरवळत रहावा असेच काहीसे मंडळाच्या बाबतीत झालें आहे.

'महाराष्ट्र मंडळ शिकागो'ला मोठे करणाऱ्या अनंत हातांच्या सन्मानार्थ, 'सुवर्णस्मृती' ह्या स्मरणिकेकरिता मला '१९८१ ते १९८५ मधील महाराष्ट्र मंडळाच्या पाच अध्यक्षांच्या 'उत्सवमूर्ती' म्हणून मुलाखती घेण्याचे महत्भाग्य लाभले. ह्या मुलाखतींद्वारें मंडळाचे दिग्दर्शन करणाऱ्या तत्कालीन अध्यक्षांना, मंडळाला वृद्धिंगत करणाऱ्या व मंडळाच्या इप्सित उद्दिष्टांना आपलें ध्येय बनवणाऱ्या 'स्मृत-विस्मृत' अश्या सततोत्साही कार्यकारिणीला आणि त्यांनी केलेल्या अचाट कार्याला व लोकसेवेला त्रिवार वंदन!

महाराष्ट्र मंडळ शिकागोचे १९८१ ते १९८५ मधील अध्यक्ष:

सतीश जोशी
१९८१ अध्यक्ष

अनुपमा धारकर
१९८२ अध्यक्षा



कै. रमेश चिटणीस
१९८३ अध्यक्ष

प्रभा वैद्य
१९८४ अध्यक्षा

नारायण अथणीकर
१९८५ अध्यक्ष

"१९८१ ते १९८५" हा पाच वर्षांचा कालखंड आपल्या 'पावननगरीतून' कसा वाहत गेला असेल? विशेषतः १९८१ मध्ये शिकागोच्याच मातीतून उगवलेल्या एका संकल्पनेतून सर्व ठिकाणच्या महाराष्ट्र मंडळांची एक तेजस्वी शृंखलाच निर्माण झाली, म्हणजेच शिकागोकरांच्या दृष्टीने भूषणास्पद अशी बृहन्महाराष्ट्र मंडळाची स्थापना. नुकतंच तारुण्यात पदार्पण केलेलं म्हणजेच १२ वर्षे वयाचं महाराष्ट्र मंडळ शिकागो, हे इतर शहरांतील बाळसं धरत असलेल्या आपल्या 'बंधु मंडळां'चे प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे दिग्दर्शन करत होते. असा तो अत्यंत महत्त्वपूर्ण काळ होता, जो नवीन आव्हाने व त्यांत दडवलेल्या नूतन संधी घेऊन आला होता. आव्हानांना पाहताच कोणता मराठीवीर आपली तलवार म्यान करेल? आव्हानांना आपल्या छातीवर झेलून यशश्री खेचून आणणारे "आम्हीं तो 'श्रीशिवछत्रपतींचे शिष्य आहों!"

भावपूर्ण श्रद्धांजली - १९८३ मधील मंडळाचे अध्यक्ष रमेश चिटणीस, हे २०१२ साली सूर्यमंडळ भेदून गेले, त्यांच्या मागे निरंतर खंबीरपणे उभी असणारी त्यांची पत्नी सुलभा चिटणीस यांचे देखील त्यापूर्वीच काही वर्षांपूर्वी देहावसान झाले होते. कै. चिटणीस पती-पत्नी यांच्या निधनाने अत्यंत कर्तृत्ववान व लोकप्रिय जोडप्याला महाराष्ट्र मंडळ शिकागो मुकले आहे. त्यांच्या पश्चात शशांक व शेखर हे दोन्ही सुपुत्र व त्यांचे परिवार आहेत. सध्या ही मंडळी कॅलिफोर्नियात स्थायिक असली तरीही शिकागोशी त्यांचे सांस्कृतिक अनुबंध अजूनही दृढ आहेत. शशांक व शेखर त्यांच्या आठवणींतून वडिलांच्या मंडळातील कार्याबाबत सांगतात की कै. चिटणीस यांचे मराठी भाषा व संस्कृती यांच्यावर विलक्षण प्रेम होते. महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती व परंपरा यांचे संवर्धन करण्यासाठी ते सदैव झटत होते. तोच वारसा आजीव जोपासून, आपल्या पुढील पिढ्यांना तो मिळावा म्हणून ते विशेष प्रयत्नशील होते. त्यांचा सहवास लाभलेले मंडळातील जुने सभासद अजूनही त्यांची आठवण काढत असतात. मंडळाच्या कार्यातील त्यांचे मौलिक योगदान व त्यांच्या सुखद स्मृतीस मंडळाचे विनम्र अभिवादन !



कै. सुलभा व कै. रमेश चिटणीस

जैसें जीर्ण वस्त्र सांडिजे । मग नूतन वेढिजे । तैसें देहांतरातें स्वीकारिजे । चैतन्यनाथें ॥

(ज्ञानेश्वरी २-१४४)

तत्कालीन कार्यकारिणीचे स्वरूप - वर्षाच्या निर्वाचित अध्यक्षांची मुख्य कार्यकारिणी ही आजच्या प्रमाणेच अध्यक्ष/क्षा, उपाध्यक्ष, उपाध्यक्षा, सचिव आणि कोशाध्यक्ष यांच्या नेतृत्वाने चालत असे. ह्या पदाधिकाऱ्यांसह इतर अनेक मंडळी देखील विविध उपक्रमांचे नेतृत्व करत असत. अर्थातच, सर्वांची मिळून अशी त्या वर्षाची ‘बृहत्कार्यकारिणी’ बनत असे. पदांचे अधिकार व त्यांसह आलेले शिष्टाचार ह्यांपेक्षा परस्पर स्नेहभाव, ममत्व व मंडळाच्या कल्याणार्थ ध्येयासक्ती, हे निश्चितच मंडळाच्या तत्कालीन कार्यकारिणीचे आत्मिक स्वरूप होते!

सतीश जोशी यांनी प्रतिपादन केले की, १९८१ च्या कार्यकारिणीमध्ये नीला व अशोक लेले, बाळ, शरद परांजपे, सीताराम दांगट, मेधा केळकर, लीना घारपुरे, स्वाती पोतदार, वसंत पांडव, अनुपमा धारकर, विजू मोराणकर, जयश्री जोशी, रीता व अरुण काळुस्कर, नंदिनी कुरणे, मीनल व अजित ताम्हणे, प्रभा व अविनाश तळवलकर व संजय हुपरीकर ह्या पदाधिकारी व इतर मंडळींसोबत विश्वस्त म्हणून प्रमोद चेंबुरकर, मोहिनी जोशी व सुधाकर मोराणकर यांनी काम पहिले होते. ऐंशीच्या दशकांत मंडळाशी संलग्न असणाऱ्यांमध्ये कुटुंबांची संख्या म्हणावी तेवढी फार नव्हती, त्या मानाने विद्यार्थी म्हणून शिकागोमधील महाविद्यालयांत शिकायला आलेल्या ऐन विशींतल्या मंडळींची संख्या पुष्कळ होती. पुढे काही वर्षांनी मात्र ही परिस्थिती बदलली आणि ‘आयटी’ मधील मंडळी अगदी ‘ऐटीत’ शिकागो किंवा एकूणच अमेरिकेत रहायला येऊ लागले, त्यामुळे कार्यक्रम, नाटके ह्यांची लोकप्रियता व मागणीही जोर धरू लागली. आणि त्यानंतर मात्र मंडळ मोठे होऊ लागले ...

अनुपमा धारकर सांगतात की, १९८२ च्या कार्यकारिणीत विश्वास गाडगीळ, नीला व अशोक लेले, लीना घारपुरे, मनोहर लेले, अलका गाडगीळ, स्वाती वाळंबे, वंदना गर्दे, सुलभा व रमेश चिटणीस, नंदिनी कुरणे, अनुरूपा व अजय धारकर, हेमलता लिमये, वृंदा पांडव, रेखा बोरकर, प्रिया व नारायण अथणीकर ह्या पदाधिकारी व इतर मंडळींसोबत विश्वस्त म्हणून सतीश जोशी, प्रमोद चेंबुरकर व मोहिनी जोशी यांनी काम पाहिले होते.

प्रभा वैद्य यांनी दिलेल्या माहितीनुसार, रमेश चिटणीस अध्यक्ष असतांना १९८३ च्या कार्यकारिणीत, नयना व पद्माकर पाटणकर, सुलभा चिटणीस, प्रभा वैद्य, प्रमोद चेंबुरकर, डॉ. केळकर, श्री. कुंचूर, नीला व अशोक लेले, जयश्री हुपरीकर, जयसिंग गोगले, प्रिया व नारायण अथणीकर, हेमा व अशोक शेंडे, सुनीता व श्याम शेठ, रीता व अरुण काळुस्कर, अरुण लोंढे, सुधाकर मोराणकर ह्या पदाधिकारी व इतर मंडळींसोबत अनुपमा धारकर व सतीश जोशी हे विश्वस्त म्हणून होते.

प्रभा वैद्य सांगतात की १९८४ च्या कार्यकारिणीत प्रिया व नारायण अथणीकर, नीला व अशोक लेले, मृणाल व प्रमोद चेंबुरकर, मीनल ताम्हणे, अलका व आशुतोष रिसवडकर, वैजयंती डुणुंग, सौ. व श्री. खांडेकर, नितीन रेवरेकर, नयना व पद्माकर पाटणकर, रीता व अरुण काळुस्कर, विष्णु वैद्य, अरुण लोंढे, नारायण प्रचंड, सुधाकर मोराणकर, मोहिनी व चंद्रशेखर जोशी, सुलभा चिटणीस, जयश्री व सतीश विटकर, कुमुद व नारायण करंदीकर, नीरजा व श्याम केतकर, हेमा व अशोक शेंडे, सुनीता व श्याम शेठ, ह्या पदाधिकारी व इतर मंडळींसोबत रमेश चिटणीस, अनुपमा धारकर, व सतीश जोशी हे विश्वस्त म्हणून होते.

नारायण अथणीकर यांनी प्रतिपादन केले की, १९८५ मधील कार्यकारणीमध्ये नीला व अशोक लेले, सुमित्रा दास, प्रिया अथणीकर, मीनल व अजित ताम्हणे, आशुतोष रिसवडकर, मृणाल व प्रमोद चेंबुरकर, सुधाकर मोराणकर, रीता व अरुण काळुस्कर, मीना यलवगी ह्या पदाधिकारी व इतर मंडळींसोबत विश्वस्त म्हणून दत्तात्रेय मणेरीकर, नारायण प्रचंड, प्रफुल्ल डुणुंग यांनी काम पहिले होते. त्याच बरोबर मंडळाने नवीन परंपरा सुरू करून युवा सभासद म्हणून अजित वैद्य यांनाही कार्यकारिणीमध्ये समाविष्ट करून घेतले होते.

कार्यक्रम-आयोजन - प्रभा वैद्य खुलासा करतात की, मंडळाच्या परंपरेने साजरे केले जाणारे चार प्रधान कार्यक्रम, म्हणजे अर्थातच - मकर संक्रांत, गुढीपाडवा, गणेशोत्सव आणि दिवाळी हे तेंव्हाही आतासारखेच साजरे केले जायचे. दर उन्हाळ्यात मंडळाच्या सहलीचं शिकागोकरांना विशेष आकर्षण असे. त्याशिवाय, स्थानिक मंदिरे, भारतातून आगंतुक मान्यवरांच्या भेटी, भारतीय व अमेरिकन संस्थांच्या आमंत्रणावरून, समाजोपयोगी, लहान मुलांचे व इतर अशा अनेक लहान कार्यक्रमांचे नियोजन मंडळ वर्षभर करत असे.

सतीश जोशी व अनुपमा धारकर ह्यांनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या दृष्टीने पाहता - १९८१ ते १९८५ मध्ये जवळपास सगळेच कार्यक्रम हे स्कोकीच्या व्हिलेज कम्युनिटी सेंटरमध्ये - डॉ. शंकरराव हुपरीकर आणि डॉ. प्रमोद चेंबुरकर ह्यांच्या मदतीने अत्यंत किरकोळ तिकीटदर आकारून आयोजित केले जायचे. त्याच बरोबर काही कार्यक्रम हे नाईल्समध्ये देखील झाले होते.

आर्थिक जमा-खर्चाच्या दृष्टीने पाहता, मकर संक्रांत आणि गुढीपाडवा, ह्या दोन कार्यक्रमांत होणारी तूट सांभाळण्याचं कार्य प्रत्यक्ष ‘श्रीगजानना’ला गणेशोत्सवात करावे लागत असे. दिवाळीमध्ये एखादे नवीन नाटक आणले असेल तर, भरपूर गर्दी होत असे, नाही तर, वर्षाखेरीस जमा-खर्च एकमेकांना ‘शून्यात’ भेटत असत. त्या काळात ‘RSVP’ हा प्रकार फारसा प्रचलित नसल्याने, कार्यक्रमांचे नियोजन करणे हे सर्वात कठीण काम होते, कारण उपस्थितांची संख्या ही संक्रांत आणि गुढीपाडव्याच्या वेळी ५०-६० च्या घरांतून ९०-१०० च्या घरांत अशी कुठेही धावत-पळत असे. हे कमी होते म्हणून की काय, शिकागोचे ‘सुप्रसिद्ध’ हवामान देखील ‘मी’ म्हणत त्यात स्वतःची अशी अनमोल भर घालतच होते! यावर एकमेव उपाय म्हणजे पूर्वसूरींनी पुरवलेले मागील वर्षांतील ठराविक कार्यक्रमांना उपस्थितांच्या संख्येचे अंदाज. व ते अंदाज चुकले तर कार्यकर्त्यांना आयत्यावेळी तयारी काय ती करावी लागे!

नारायण अथणीकर आवर्जून सांगतात की गणेशोत्सव हा वर्षातील 'महत्तम' कार्यक्रम असे, ३००-४०० उपस्थिती ही त्या काळाच्या मानाने प्रचंडच म्हटली पाहिजे. अनेक मंडळी तर पार इंडियाना, विस्कॉन्सिन आदीं राज्यांतून दुरून प्रवास करून उपस्थिती लावत असत. भारतीय किराणा मालाची दुकाने वगैरे त्या काळात फारशी नसल्याने भाज्या, धान्ये ही सर्व सामग्री कार्यकर्त्यांना अनेक ठिकाणांहून शोधून आणावी लागत असे.

१९८१ मध्ये सुप्रसिद्ध गायिका प्रभा अत्रेंचा गायनाचा कार्यक्रम विशेष गाजला होता.

अनुपमा धारकर यांनी पुरवलेल्या माहितीनुसार, १९८२ मध्ये तर मंडळाने व्हिला पार्कमधील 'लमार' या चित्रपटगृहांत आयोजित केलेल्या भव्य "चित्रपट महोत्सवाला" उदंड प्रतिसाद लाभला होता. महाराष्ट्रातून विख्यात दिग्दर्शक जब्बार पटेल हे प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. विशेष अतिथी म्हणून लोकप्रिय अभिनेते राजा गोसावी व सुप्रसिद्ध अभिनेत्री ललिता पवार हेही लाभले होते व ते जयश्री व सतीश जोशी ह्यांच्या घरी उतरले होते. अनुपमा आनंदाने एक गोष्ट आवर्जून नमूद करतात की, मंडळाने 'हेमा शेंडे' या शिकागोमधील एका उत्कृष्ट गायिकेला मंडळासाठी गायनाच्या कार्यक्रमाची संधी देऊन एक नवी परंपरा सुरू करून दिली. त्यांचा कार्यक्रम तर यशस्वी झालाच होता परंतु, कौतुकाची गोष्ट म्हणजे, यांमागील त्यांची भूमिका ही अर्थातच मंडळ स्थापनेतील प्रमुख उद्दिष्ट - 'स्थानिक मराठी लोकांच्या कलेचे सृजन व संवर्धन करणे' ह्याच्या पूर्तीचे प्रत्यक्ष प्रमाण होते. त्या म्हणाल्या की, १९८२ मध्ये - अनुरूपा धारकर, अनिता देऊसकर, वंदना पटवर्धन, स्मिता धबडगाव व अनुपमा धारकर यांनी मंडळाच्या कार्यक्रमात "मंगळागौरीच्या गाण्यावर" एक सुंदर नृत्य सादर केलं होतं. मंडळाच्या व्यासपीठावर 'पहिल्यांदाच' अशा प्रकारचं समूह-नृत्य सादर झाल्याने त्यांचं प्रचंड कौतुक झालं होतं. त्यानंतर असे नृत्याचे कार्यक्रम नित्याचे होऊ लागले आणि एक नूतन परंपरा सुरू झाली जिचे प्रतिबिंब आजही मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमांत पहायला मिळते.

१९८३ मध्ये कै. रमेश चिटणीस यांचे जिवलग मित्र व सुप्रसिद्ध गायक सुधीर फडके यांचा 'गीत-रामायणाचा संगीत सोहळा' अत्यंत गाजला होता. ह्या कार्यक्रमाचे सुधीर फडके यांनी मित्रप्रेमापोटीं काहीही मानधन स्वीकारले नव्हते. त्याशिवाय, प्रख्यात गायिका श्रुती सडोलीकर ह्यांच्या गायनाच्या कार्यक्रमाने शिकागोकर अगदी मंत्रमुग्ध झाले होते. सुरेश खरे लिखित 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक देखील प्रचंड गाजले होते.

पुढे १९८४ मध्ये, १० वर्षे वयाच्या 'आनंद भाटे (गंधर्व) यांनी "जोहार मायबाप" ह्या संत चोखामेळा यांच्या सुप्रसिद्ध अभंगाने शिकागोकरांना अक्षरशः वेड लावले होते. त्यांचा हा अमेरिकेतील पहिलाच कार्यक्रम होता. आनंद भाटे तेंव्हा प्रभा व विष्णु वैद्य यांच्या घरी सपरिवार उतरले होते, त्यांच्या मुलांसोबत भरपूर खेळले होते अशी आठवणही प्रभा वैद्य वात्सल्याने सांगतात. त्याशिवाय, उत्तरा केळकर, यशवंत देव, अलका देव मारुलकर, ह्या ख्यातनाम कलाकारांचे संगीत सोहळे देखील मंडळाने आयोजित केले होते. १९८४ मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या पुढाकाराने, महाराष्ट्र मंडळ शिकागोने यजमानपद घेऊन 'पहिले मराठी अधिवेशन' देखील शिकागोमध्येच आयोजित केले होते. ह्या अधिवेशनाच्या निमित्ताने मराठी लोकांच्या कलावस्तूंचे प्रदर्शन, विविध विषयांवर परिसंवाद व सांस्कृतिक कार्यक्रम केलेले होतेच, परंतु, त्याबरोबरच महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रातील उद्योग मालाचे प्रदर्शनही भरवले गेले होते.

१९८५ मध्ये, सुविख्यात गायिका आशा खाडिलकर, प्रभा बक्षी व गायक अरुण दाते यांच्या गायनांच्या कार्यक्रमांना उदंड प्रतिसाद मिळाला होता. डेट्रॉइटच्या महाराष्ट्र मंडळाचं 'माझ्या बायकोचा नवरा' हे उत्कृष्ट नाटकही अत्यंत लोकप्रिय झालं होतं. त्याच बरोबर, मुलांकरिता करमणुकीचे कार्यक्रम व फॅन्सी ड्रेस स्पर्धा देखील आयोजित केली होती. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे 'द फेडरेशन ऑफ इंडिया (FIA) आयोजित शिकागोच्या 'म्युझियम ऑफ सायन्स अँड इंडस्ट्री' मधील कार्यक्रमात मंडळातर्फे 'महाराष्ट्राचे सण' व 'बारा बलुतेदार' ह्या दोन सांस्कृतिक विषयांवर सादर केलेल्या प्रयोगांची लोकांनी अत्यंत प्रशंसा केली होती, व ते प्रयोग पुन्हा एकदा सादर करण्याची विनंती केली होती. त्याप्रमाणे ते पुन्हा एकदा सादर केलेही होते. त्यांचं संयोजन मोहिनी जोशी यांनी केले होते.

१७ ऑगस्ट १९८५ रोजी, FIA ने आयोजित केलेल्या 'इंडिया डे परेड' मध्ये मिशिगन ॲव्हेन्युवर 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'च्या वतीने "मराठा साम्राज्य - १७वे शतक" असा प्रदर्शनरथ नेला होता. शिवरायांच्या रूपात - 'विवेक नारायण प्रचंड' व मंडळातील अनेक युवा कार्यकर्ते यांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला होता. ह्या परेडचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तेंव्हा मराठी लेझीमच्या निनादाने व तालबद्ध नृत्याने अवघा मिशिगन ॲव्हेन्यु दुमदुमला होता. 'लेझीम नृत्याचा' हा प्रयोग अमेरिका प्रथमच अनुभवत होती. त्यानंतर महाराष्ट्र मंडळ शिकागोने सुरू केलेली लेझीमची ही गौरवशाली परंपरा अमेरिकेतील इतरही अनेक मंडळांनी स्वीकारली व पुढे जाऊन वृद्धिंगतही केली, जिला आजही उदंड प्रतिसाद मिळतो आहे. त्याशिवाय, मंडळाने महाराष्ट्र फौंडेशन या समाजसेवी संस्थेकरिता सढळ हस्ते देणगी दिली होती. तसेच, सुप्रसिद्ध अभिनेत्री स्मिता पाटील यांच्या मातोश्री - विद्या पाटील यांच्या विनंतीवरून भारतातील हजारों गरीब बालकांच्या भावी जीवनाचा पाया भक्कम करणाऱ्या व त्यांच्या बालशिक्षण कार्याची दाखल घेऊन 'संजीवनी महिला मीलन' ह्या प्रकल्पाला सभासदांकडून मिळालेल्या दिलदार देणग्या व गणपतीसमोर वाहिलेल्यांपैकी काही रक्कम असे मिळून $१००१ ची देणगी पाठवली व आपली समाजाप्रतीं असलेली कर्तव्यपरायणता सिद्ध केली. त्या वर्षीच्या कार्यक्रमांचा मुकुटमणी ठरलेले मंडळाने युनिव्हर्सिटी ऑफ

शिकागोच्या कॅंपसमध्ये आयोजित केलेले “घाशीराम कोतवाल” हे नाटक तर प्रचंड गाजले होते. नाटकातील तब्बल ७० हून अधिक असलेली कलाकार मंडळी कुणाकडे राहणार ह्या बाबतीत कार्यकर्त्यांमधील चढाओढ पाहून समितीने चक्क “लॉटरी” काढली होती. ह्या सर्वांचा उत्साह किती दांडगा होता, ह्याचे हे अगदी यथार्थ उदाहरण आहे.

शिकागोचे ‘नटसम्राट’, डॉ. शंकरराव हुपरीकर यांनी २५ वर्षांहून अधिक काळ केलेल्या नाट्यसेवेतील पुढील तीन नाटकांनी शिकागोकरांना मोहिनी घातली - ‘हिमालयाची सावली’ (१९८२), ‘मंतरलेली चैत्रवेल’ (१९८३) आणि ‘गाठ आहे माझ्याशी’ (१९८४).

भोजन-नियोजन - त्या काळांत, सध्याच्या तुलनेत पाहता, अक्षरशः तोंडात बोट घालायला लावणारी कौतुकाश्चर्याची गोष्ट म्हणजे कार्यक्रमांच्या नियोजनात कार्यकारिणीतील गृहिणींनी स्वहस्ते बनवलेले जेवण! उपस्थितांची अतर्क्य संख्या, एकच खाद्यपदार्थ बनवण्याच्या विविध पाककृती जाणणाऱ्या अनेक पाकनिष्णात, आणि काही पदार्थ आपापल्या घरी बनवून आणणें तर काही गरम असतांनाच खाल्ले जाणारे पदार्थ कार्यक्रमाच्या स्थळीं गाडीतून वाहून नेणें, हे केवढे अचाट कार्य आहे! जेवणात कोणते पदार्थ करायचे आहेत, हे आजच्या प्रमाणेच मंडळाची त्या वर्षीची ‘उपाध्यक्षा’ पाहत असे. आणि त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे ते कुणी, कसे व किती बनवायचे हेही त्यांना पहावे लागत असे. पदार्थांची चव एकसंध राहावी म्हणून सर्वांना एकच पाककृती पुरवण्यात येत असे. ‘आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।’ ... या न्यायाने हे अनेकींनी बनवलेल्या पदार्थांचे अंतिमतः एका पात्रांत मिश्रण केले जात असे. सारांश, मंडळाला ह्या स्त्रीवर्गाने अचाट कार्ये यशस्वीपणे पूर्ण करून अनेकदा अक्षरशः तारलं आहे, याबद्दल कोणाचेच दुमत नसावे.

अनुपमा धारकर त्यांची एक आठवण सांगतात की एका कार्यक्रमासाठी त्यांनी आणि त्यांच्या परिवाराने रात्रभर जागून सुमारे १२०० पुऱ्या तळल्या होत्या. अश्याच प्रकारे कार्यकारिणीतील इतर अन्नपूर्णांनी अनेक खाद्यपदार्थ बनवून कार्यक्रम खऱ्या अर्थाने ‘रुचकर’ केला होता. परंतु, ह्या वेळखाऊ परंपरांची दखल घेऊन त्यांनी एका कार्यक्रमाला “संगम” नावाच्या केटरिंग सर्व्हिसेस कडून जेवण मागवले होते. परंपरेतील बदल अनेकांना लगेचच नाही पण कालांतराने रुचला होता कारण, ह्या प्रकारे गृहिणींचे कष्ट आणि वेळ दोन्हीही वाचले होते व वाचलेल्या वेळाचा सदुपयोग त्यांनी मंडळाच्या इतर महत्त्वाच्या विधायक कार्यात योगदान देऊन केला.

रचना - मंडळाच्या अनेक कार्यांमध्ये दुसरे एक अत्यंत जिकीरीचे पण तेवढेच महत्त्वाचे असे कार्य म्हणजे ‘रचना’. मंडळाचे मुखपत्र म्हणा, आपल्या व्यवसाय व सेवांची जाहिरात करण्याचे प्रभावी माध्यम म्हणा, आपले हितगुज मांडायचे, व्यक्त व्हायचे, मुक्त व्हायचे, ज्ञानात भर घालण्याचे, आणि आपली सुंदर कलाकृती सादर करायचे हक्काचे व्यासपीठच म्हणा. थोडक्यात, शिकागोकरांचे एकमेकांशी संवाद साधण्याचे माध्यम म्हणून, व अगदी आपल्या सर्वांच्या मनोरंजनाचे साधन म्हणूनही, दरवर्षी ‘रचना’चे मकर संक्रांत, गुढीपाडवा, गणेशोत्सव व दिवाळी असे चार अंक गेली ५० वर्षे प्रकाशित केले जात आहेत. १९८१ ते १९८५ च्या दृष्टीने पाहता ‘हस्तलिखित’ रचना वाचण्याची मजाच काही और होती! परंतु, ‘रचना’च्या प्रत्येक अंकाकरिता जाहिराती व विविध लेख, कथा, कविता वगैरे साहित्य मिळवणे, मंडळाची कार्यक्रम पत्रिका तयार करणे, त्याचे हस्तलिखित तयार करणे, सुंदर मुखपृष्ठ निर्माण करणे, अशी सगळी जुळवाजुळव करून त्या अंकाची आकर्षक मांडणी करणे. मोत्यासारखे हस्ताक्षर लाभलेल्या एखाद्या कार्यकर्त्याकडून त्याची ‘मुख्यप्रत’ तयार करवून घेणे. ह्या मुख्यप्रतीच्या सुमारे ३५०-४०० प्रतींचे मुद्रण करवून, त्याच्या पुस्तिका तयार करून, त्या स्टेपल करणे व त्यावर पोस्टाचे तिकीट लावून, त्या मंडळाच्या तत्कालीन बृहत्शिकागो परिसरातील सर्व ज्ञात मराठी लोकांना कार्यक्रमापूर्वी पोस्टाने घरपोच पाठवणे. कार्यक्रमांना उपस्थिती जरी १०० लोकांची लाभली तरीही ‘रचना’चा अंक सुमारे ४०० लोकांना घरपोच पाठवला जात असे. हे सर्व करण्यासाठी खर्च पुष्कळ होत असे, वेळही भरपूर जात असे, मनुष्यबळही पुष्कळ लागत असे, पण हे करत असतांना सर्वजण एकत्र आल्याने, एक प्रकारचे आनंदी वातावरण निर्माण होत असे. म्हणूनच, कदाचित स्थानिक मराठी भाषिकांनी ‘रचना’वर गेली ५० वर्षे भरपूर प्रेम केले आहे, अशा प्रकारें ‘रचना’ हे त्रैमासिक शिकागोकरांचे हृदय-स्पंदन म्हणून सेवेंत आहे.

मराठी भाषा संवर्धन - त्यावेळी औपचारिक मराठी शाळेची स्थापना झाली नव्हती परंतु, जया हुपरीकर, नारायण करंदीकर इत्यादी ह्या मंडळींनी मुलांना मराठीचे प्राथमिक शिक्षण दिले, त्यांच्याकडून विविध कविता, अथर्वशीर्ष, श्रीरामरक्षा इत्यादी स्तोत्रे वगैरे पाठ करवून घेऊन त्यांच्यावर उत्तम संस्कार केले. ही मुले आता मोठी होऊन विविध क्षेत्रांत यशस्वी झाली आहेत, जेंव्हा ही मुले एकमेकांना भेटतात तेंव्हा ह्यांचे संभाषण मराठीतूनच होते हे एक आश्चर्यच आहे!

मंडळाच्या उज्ज्वल भविष्याकरिता संदेश - मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी अति-व्यावसायिकरण, अंतर्गत गटबाजी, परस्पर स्पर्धा, ईर्ष्या, आत्मकेंद्रित मोह इत्यादी व्यक्तिगत वा सामाजिक दोषांना टाळून, सर्वांनी मंडळ स्थापनेमागील संस्थापकांचे उन्नत ध्येय प्रयत्नपूर्वक जाणून घ्यावें. सर्वार्थाने लोककल्याणाचे उदात्त असे ध्येय उराशी बाळगून मंडळाच्या अश्वमेधाचा हा अश्व चहूबाजूंनी हरप्रकारें रक्षावा. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा ध्वज निरंतर फडकत ठेवावा. समर्थ श्रीरामदास स्वामींचा पुढील संदेश अक्षरशः आपल्यां हृदयांवर कोरून घ्यावां:

आहे तितुके जतन करावें | पुढे आणिक मेळवावें | महाराष्ट्रराज्य करावें | जिकडे तिकडे ||

अपूर्ण स्वप्न - सर्वच अध्यक्ष मंडळींनी एकच स्वप्न पाहिलं की जे गेली ५० वर्षे अपूर्ण राहिलं आहे - ते म्हणजे मंडळाची स्वत:ची अशी 'वास्तू' असावी. ज्यामध्ये मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या नित्य सभा होतील, लहान-मोठे कार्यक्रमही होतील. मराठीजनांच्या कल्याणार्थ अनेक उपक्रम ह्या वास्तूमध्ये राबवता येतील. मराठी शाळेला किंवा तिच्या शाखांना स्वत:ची हक्काची अशी इमारत लाभेल. आम्हांला विश्वास आहे की भविष्यातील मराठीवीर हे अपूर्ण स्वप्न निश्चितच पूर्णत्वास नेतील, त्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

१७ ऑगस्ट १९८५, FIA आयोजित 'इंडिया डे परेड' मध्ये मिशिगन ॲव्हेन्युवर 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'च्या वतीने "मराठा साम्राज्य - १७वे शतक" असा प्रदर्शनरथ नेला होता त्याचे क्षणचित्र. शिवरायांच्या रूपात - विवेक नारायण प्रचंड आणि मंडळातील अनेक युवा कार्यकर्ते.

अभिनेत्री ललिता पवार यांच्या सोबत जयश्री जोशी व कन्या, १९८२ शिकागो चित्रपट महोत्सव

बृहन्महाराष्ट्र मंडळ संस्थापक: जया हुपरीकर, विष्णु वैद्य व शरद गोडबोले, १९८१

अभिनेते राजा गोसावी यांच्या सोबत जयश्री जोशी व कन्या, १९८२ शिकागो चित्रपट महोत्सव

मुलाखतकाराची विज्ञापना - सुमारे ३५ ते ४० वर्षांपूर्वीचा काळ ह्या 'उत्सवमूर्तीं'नी आपल्या हृदयांतून खोदून काढून, आमच्या विनंतीला मान देऊन, आपले तेजस्वी कार्य प्रस्तुत 'सुवर्णस्मृती'द्वारें उत्कटपणे लोकार्पण केले आहे, ते करत असतांना त्यांच्या स्मृतीच्या मर्यादा त्यांनी खेचायचा प्रयत्नही थोर केला आहे, मुलाखतीं व्यतिरिक्त, त्या काळांतील क्षणचित्रे, कागदपत्रे, रचनाचे अंक हे जितके साहित्य ह्या लेखनाकरिता उपलब्ध होऊ शकले होते, त्यानुसार ही मुलाखत यथाशक्ति शब्दांकित करण्याचा यत्न केला आहे. अज्ञानातून एखाद्या महत्त्वाच्या कार्याची दखल अथवा एखाद्या व्यक्तीचा नामोल्लेख राहून गेला असण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसे झाले असेल तर संबंधित मान्यवरांनी मोठ्या मनाने लेकरांस क्षमा करावीं.

तरी न्यून ते पुरतें । अधिक तें सरतें । करूनि घेयावें हें तुमतें । विनवितु असे ॥

बहुत काय लिहिणें? आमुचे अगत्य असों द्यावें. जाणिजें.

राजते लेखनावधी.

मुलाखत व शब्दांकन: चेतन रेगे

Greetings from....	CONGRATULATIONS!!
Gopal Sharma, CPA GDS Tax and Accounting Services Contact us for free second opinion and tax strategies Phone: 8479099832 3804 Grassmere Rd, Naperville, IL 60564 (by appointment only)	MAHARASHTRA MANDAL CHICAGO ON 50 GLORIOUS YEARS Best wishes for the next 50!! Vivek, Savita, Mrinal & Milind Joglekar



एका प्रशांतची गोष्ट

प्रश्न - प्रशांत, सर्वप्रथम २०१९ च्या लोकमत महाराष्ट्रीयन पुरस्काराबद्दल हार्दिक अभिनंदन! काय वाटतं या पुरस्काराबद्दल?

प्रशांत - खरं सांगू का, कुठलाही पुरस्कार हा आपण जे काम करतो त्याला दाद किंवा त्याची नोंद घेण्यासाठी असतो. लोकमतचा हा पुरस्कार मोठाच आहे. परंतु मला सगळेच पुरस्कार हे महत्त्वाचे वाटतात. त्यांचं कौतुक, अप्रूप तर आहेच पण एक जबाबदारीची जाणीवही हे पुरस्कार करून देतात. मस्त तर वाटतंच पण आपल्याला अजूनही नीट काम करायचे आहे, याचीही भावना त्यामागे असते.

प्रश्न - प्रत्येक कलाकाराचा काही स्थळांशी, शहरांशी विशेष ऋणानुबंध जुळतो. प्रशांत तुझे आणि आमच्या शिकागोचे तसेच आहे. तुला तुझी पहिली शिकागो भेट आठवतेय का? शिकागोचे पहिले 'इम्प्रेशन' काय होते?

प्रशांत - कसं होतं मी तुला सांगतो, अमेरिकेत आणि युरोप, मिडल ईस्ट मध्ये थोडा फरक पडतो. लंडन किंवा दुबईचे रसिक जितक्या पटकन भारतात येऊन नाटके बघू शकतात तसं अमेरिकेच्या बाबतीत घडत नाही. मला आठवतंय त्याप्रमाणे आमची पहिली ट्रिप १९९८ साली घडली. पहिले बहुधा बोस्टनला आलो होतो. तिथून शिकागोला! अप्रतिम प्रतिसाद आणि उत्तम नेटवर्किंग ही शिकागोची मला वैशिष्ट्ये जाणवली. शिकागोची बरीच मंडळी आता छान ओळखीची झाली आहेत. रसिकांचं खूप प्रेम मिळालं, त्यामुळे शिकागो हे मला खूप जवळचं शहर वाटतं.

प्रश्न - तुझ्या पहिल्या परफॉर्मन्स नंतर तुझ्या शिकागो भेटींचा सिलसिला सुरूच आहे. 'सुयोग'च्या नाट्य महोत्सवांतदेखील तू आला होतास. भारतातून नाटकं घेऊन येताना काय काय आव्हाने, अडचणी असतात? शिकागोच्या बाबतीत काही आठवणी?

प्रशांत - खरं सांगू का - कुठलेही नाटक घेऊन यायचे म्हणजे "तीन पत्ती" चा खेळ असतो. विशेषतः अमेरिकेच्या बाबतीत जर Improper Visa Documentation असेल तर तिथेच दांडी गुल होते. त्यामुळे शक्य तितके आधी प्लॅनिंग करावे लागते. आता या नाटकाच्या बाबतीत म्हणशील तर ही आमची युके-अमेरिका-कॅनडा अशी टूर होती. शोज मार्च पासून सुरू झाले पण आमचे व्हिसा डिसेंबरात झाले होते. त्यातून आमच्या ग्रूप मधल्या चार जणांचे कॅनडा व्हिसा रिजेक्ट झाले होते. पण आमच्याकडे ब्रीदिंग स्पेस होती. त्यामुळे आधीपासून प्लॅनिंग करावे लागते. नेपथ्य हेही आव्हान असतं. आमचे टेक्निकल कॉल्स होतात. आमची नेपथ्य टीम त्या त्या शहराच्या नेपथ्य स्वयंसेवकांबरोबर काम करते. शिकागोच्या नेपथ्य टीमचे खरेच कौतुक करावेसे वाटते. हे काही त्यांचे रुटीन काम नाही त्यामुळे ते जितके मेहेनत घेतात तितकीच मेहेनत आम्ही करायला हवी याची आम्हाला सतत जाणीव असते.

प्रश्न - तू आता इतकी वर्षं नाटके घेऊन येतोयस. स्वतः निर्मिती, दिग्दर्शनात शिरावं असं वाटतं का?

प्रशांत - निर्माता मी आहेच. दिग्दर्शन हा मात्र पूर्ण वेळ व्यवसाय आहे. एक गोष्ट मान्य केली की "Nobody is Perfect!" तर टीममध्ये काम करणं सोपं होऊन जातं. निर्माता, दिग्दर्शक, कलाकार, लेखक सर्वच! शेवटी तुमच्या २०-२२ जणांच्या टीममध्ये एकमेकांच्या चुका झाकत किती उत्तम प्रयोग देऊ शकता त्यावर नाटकाचं यश अवलंबून असतं. दिग्दर्शकाला या सर्व बाजू सांभाळायला लागतात. नाटक नाट्यगृहात पोहोचायच्या आधी ६-८ महिने दिग्दर्शक फुल टाईम यात बिझी असतो. 'एका लग्नाची गोष्ट' या नाटकाचं उदाहरण द्यायचं झालं तर हे मूळचं गुजराथी नाटक होतं. आमचं पहिलं वाचन झालं नोव्हेंबर २०१७, आणि नाटक आलं, १७ नोव्हेंबर २०१८ला! तरी या नाटकाचा लेखक आणि दिग्दर्शक एकच होता. पण दिग्दर्शकाला खूप इन्व्हॉल्व्ह व्हावं लागतं, तद्दन व्यावसायिक नाटक असेल तर 'मार्केट'मध्ये काय चाललंय, प्रेक्षकांना काय आवडतंय याचंही भान ठेवायला लागतं. त्यामुळे हा फुल टाईम जॉब आहे.

प्रश्न - अमेरिकेला, शिकागोला तू इतकी वर्षे येतो आहेस. काही फरक जाणवतोय का? चांगला? वाईट?

प्रशांत - मला वाटतं नवीन टीमसमोर नेहेमी नवीन चॅलेंजेस् असतात. पूर्वी आम्ही जेव्हा नाट्यमहोत्सव करायचो, तेव्हा बस घेऊन अक्खा सेट घेऊन फिरत असू. आता असे होत नाही. रुटीन वर्क मधून वेळ काढून नाटकासाठी तुमच्या शहरामधले स्वयंसेवक आम्हाला

सेट उपलब्ध करून देतात. हा वेगळा चॅलेंज आहे. आम्हालाही वेगवेगळे सेट बघायचा अनुभव मिळतो. शिकागोचा अनुभव छानच आहे. उत्तम व्यवस्था आणि रसिक आम्हाला शिकागोत नेहेमी लाभतात.

प्रश्न - सध्याच्या ट्विटर, फेसबुकच्या जमान्यात विनोदाचे विशेषतः नाटकातील विनोदाचे स्वरूप बदललेय असे वाटते का? बदलले नसेल तर का नाही बदलले?

प्रशांत - याचे दोन-तीन पदर आहेत बरं का रे! - मगाशी मी म्हटलं त्याप्रमाणे कलाकारांनी एकमेकांच्या चुका झाकत प्रयोग करायचा असतो. दुसरी गोष्ट म्हणजे - कॅरॅक्टर एस्टॅब्लिशमेंट - 'गेला माधव कुणीकडे' या नाटकात सुरुवातीची २० मिनिटं कुठल्याच प्रकारचा लाफ्टर यायचा नाही. एकदा नाटकाचा विषय प्रेक्षकांमध्ये सेट झाला, की पुढचे दोन-अडीच तास धमाल यायची. आज तसे होत नाही. कॅरॅक्टर एस्टॅब्लिश व्हायला जेवढा वेळ द्यायला हवा तो पेशन्स कलाकार आणि प्रेक्षक दोघांत कमी झालाय असं मला वाटतं. त्यामुळे एंट्रीलाच लाफ्टर घ्यायचा असेल तर अंगविक्षेप सुरू होतात. काही लेखकही आजकाल कधी कधी मग सिरियल्सचे एपिसोड्स लिहावेत तसे लिहीत जातात. म्हणून चांगला दिग्दर्शक महत्वाचा आहे. आपल्याला नाटक करायचंय की एपिसोड, हे ठरवले पाहिजे.

प्रश्न - विनोदासाठी टायमिंग फार महत्त्वाचे आहे. तुझे टायमिंग हे जवळपास 'गोल्ड स्टँडर्ड' समजले जाते. हे जात्याच आहे की यासाठी काही विशेष सराव करतोस?

प्रशांत - (हसत) नाही रे... सरावाशिवाय काहीच होऊ शकत नाही. कसं असतं, घरातल्या गृहिणीला स्वयंपाकाचा सराव असतो म्हणून दरवेळी मोजमाप न करता फक्त पाच बोटांनी अंदाज घेऊन ती पदार्थांना सुंदर चव आणून दाखवते. हा सरावाचाच भाग आहे. मी अजूनही खूप मेहेनत घेतो. या नाटकासाठी मी ४५ दिवस मेहेनत घेतलीये. तुम्ही किती नाटकं करता त्यापेक्षा नाटकाचे किती प्रयोग करता हे महत्त्वाचे आहे.

दुसरं असं की जो उत्तम 'रिऍक्टर' आहे तो उत्तम 'ऍक्टर' होऊ शकतो. समोरच्याने बरोबर रेस्पॉन्सच दिला नाही तर विनोद वाया जाऊ शकतो. म्हणूनच आधी म्हटल्याप्रमाणे एकमेकांना सांभाळून, एकमेकांच्या चुका झाकत करायचा हा खेळ आहे.

प्रश्न- शिकागोमधल्या कलाकारांना तुझ्याबरोबर काम करायला खूप आवडेल. अशी संधी मिळेल का? तुझ्या निव्वळ गाण्याचा कार्यक्रमही ऐकायला आवडेल आम्हाला!

प्रशांत - अरे नक्कीच आवडेल. मी पूर्वीदेखील सिडनी ऑस्ट्रेलियामध्ये तिथल्या लोकल कलाकारांबरोबर काम केलं होतं. ॲमस्टरडॅमला केलं आहे. त्यामुळे नक्कीच! हा खरे तर माझ्यासाठी चॅलेंज असतो कारण कमी वेळात मला तिथल्या स्थानिक कलाकारांबरोबर टायमिंग जुळवणं ही अवघड गोष्ट असते.

गाण्याबद्दल म्हणशील तर १९७८ ते १९८२ या काळात मी जेव्हा सुरुवात केली तेव्हा मला गायकच व्हायचं होतं. १९८३ ला माझा मार्ग बदलला तो आतापर्यंत! मुळात ३५ वर्षे कलाकाराची कारकीर्द असणं हेही चांगलेच आहे. आता तू बघशील तर आपल्याकडे डॉ. लागू, निळू फुले, अशोक सराफ यांच्याही कारकिर्दी मोठ्याच आहेत पण निव्वळ अभिनयावर या कारकिर्दी घडल्यात. माझ्याकडे थोडं गाण्याचं अंग असल्यामुळे मला तो ऍडिशनल बेनिफिट मिळाला.

गाण्याचा कार्यक्रम करायचा म्हणशील तर खूप तयारी लागते कारण तोंडाच्या अगदी जवळ माईक असतो त्यामुळे लहानशी चूकही पटकन पकडली जाते. त्यामुळे भरपूर तयारी करूनच उतरावे लागेल; नाहीतर जे चालले आहे ते करेक्ट चाललंय.

शेवटचा प्रश्न - शिकागो महाराष्ट्र मंडळाला ५० वर्षे पूर्ण होतायत. त्यानिमित्ताने तुझ्या शुभेच्छा शिकागोकरांना ऐकायला, वाचायला खूप आवडतील.

प्रशांत - शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या पहिल्या अध्यक्षांपासून ते आताच्या अध्यक्षांपर्यंत सर्वांना मी मनापासून नमस्कार करतो. कारण कुठलंही मंडळ चालवायचं यासाठी जी धडाडी आणि पेशन्स लागतो तो या सर्व अध्यक्षांनी दाखवला आहे. त्यामुळे तुम्ही या अध्यक्षांचाही छान सत्कार करावात असं मला वाटतं. शिकागोकरांना माझ्या खूप खूप शुभेच्छा!

मुलाखत व शब्दांकन: प्रसन्न जोगळेकर

builtCMS
Changing Web Perceptions

VERANDAH

EXPERIENCE A REAL SENSE OF COMMUNITY

WELCOME TO VERANDAH

A master-planned retirement destination offering the best of Indian & American lifestyles • Beautifully designed Townhomes & Condominiums for convenient maintenance-free living • A huge Clubhouse with vegetarian dining, fitness, wellness to keep the residents active & engaged • On-site Medical Facilities for friendly services without leaving the community

Make an Appointment to See our Model Home & Clubhouse

312 952 1802 | www.VerandahRetirementCommunity.com
900 W Irving Park Rd Hanover Park IL

महाराष्ट्र मंडळ शिकागोचा १९८६ ते १९९०चा प्रवास

१९८६ मध्ये महाराष्ट्र मंडळ शिकागोला उणीपुरी १७ वर्षे झाली होती. शिकागोला येणाऱ्या नवीन मराठी माणसांचे सहर्ष स्वागत करत मंडळ हळूहळू मोठं होत होतं. ८६ साली आदल्या वर्षी उपाध्यक्ष असलेल्या अशोक लेलेंनी अध्यक्ष व्हायचे ठरविले नि आपणहून अनेकजण त्यांच्या कार्यकारणीत काम करण्यास सरसावले. अरुण काळुस्करांनी खजिनदारपद तर लीना घारपुरे ह्यांनी सचिवपद सांभाळले. पाच मुख्य पदे, पाच उपपदे नि इतर १० जण मिळून कार्यकारिणी आखली गेली. १९८७ साली महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या संस्थापक सभासदांपैकी एक असलेले अशोक बेंद्रे ह्यांनी मंडळाची धुरा उचलली. त्यावर्षी उपाध्यक्षा होत्या विजू मोराणकर. १९८८ साली रीता काळुस्कर अध्यक्षा झाल्या. त्या वर्षी सचिवपद सांभाळले अरुण काळुस्कर ह्यांनी तर खजिनदार होते आशुतोष रिसवडकर. जयश्री जोशी नि धनंजय चाफळकर होते उपाध्यक्ष आणि सतीश जोशी, ताम्हणे आणि लेले कुटुंबीयांनी कार्यकारिणीत भाग घेतला. १९८९ साली हनुमंत देशमुखांनी अध्यक्षपद स्वीकारले. तेंव्हा उपाध्यक्ष होते शामकांत शेठ तर उमा दिघे होत्या खजिनदार. १९९० साली शामकांत शेठ ह्यांनी अध्यक्षपद भूषविले. त्यावर्षी उपाध्यक्ष होते प्रल्हाद पाटील नि नमिता वेदक तर प्रभाकर काणे होते सचिव. हे सगळेच अध्यक्ष होण्याआधी महाराष्ट्र मंडळात कुठल्या ना कुठल्या पदावर वा समितीचा भाग बनून मंडळाशी जोडले गेले होते. अनिता व शरद गोडबोले, प्रभाताई नि विष्णू वैद्य, शीला व नारायण प्रचंड, हेमा शेंडे, सुनील व अरविंद कुलकर्णी, अनय राजापूरकर, प्रभा व अविनाश तळवलकर, सुनंदा कामत, वीर दोशी, जया हुपरीकर ह्या आणि अशा अनेकांचे ह्या पाचही वर्षी महाराष्ट्र मंडळाला सक्रीय सहकार्य लाभले. त्या काळी गणपती मूर्ती बनवायचे गोपाळ प्रचंडकाका, तर पूजा सांगायचे नाना करंदीकरकाका. सगळ्यांचाच एकमेव हेतू म्हणजे आपलं महाराष्ट्र मंडळ वाढवायचं, इथे परदेशातही आपली मराठी संस्कृती, परंपरा टिकवायची, जोपासायची नि आपल्या पुढच्या पिढीला हा सांस्कृतिक वारसा जतन करायला प्रोत्साहित करायचे. त्याकाळी अध्यक्षपदासाठी निवडणूक वगैरे होत नसत तर स्वतः नाव देऊन वा बऱ्याच वेळेला कोणाच्यातरी नामनिर्देशाने अध्यक्ष निवडले जायचे आणि मित्रमंडळी कार्यकारिणीत काम करायला आवडीने तयार व्हायची.

अध्यक्षांच्या बरोबरीने त्यांचा पुरा घरपरिवार त्या त्या वर्षी मंडळाच्या कामाला सक्रीय हातभार लावायचा. घरातली मुले छोटी असली तरी वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घ्यायची. सर्वात जास्त सहभाग असायचा तो अध्यक्षांच्या सौभाग्यवती म्हणजे ज्यांना हल्ली आम्ही गमतीत 'फर्स्ट लेडी' म्हणतो ह्यांचा आणि जेव्हा महिला अध्यक्षा होत्या तेव्हा त्यांच्या मिस्टरांचा. त्याकाळी समारंभांना आजच्यासारखी बाहेरून जेवणखाण मागवायची सोय नसल्याने समितीतल्या बायका एकत्र येऊन सगळे पदार्थ घरी बनवायच्या. एव्हढ्या सगळ्यांचे जेवण बनवायचे म्हणजे नुसते साहित्य गोळा करणेच नव्हे तर त्या त्या पाककृती लिहून देणे, त्या गटागटाने एकत्र जमून बनविणे, सगळे नियोजन करणे हे सगळे सौभाग्यवती अध्यक्षा आवडीने सांभाळायच्या. ह्या सगळ्यांची साथ फक्त भोजन नियोजनापर्यंतच मर्यादित नव्हती तर इतर अनेक बाबतीतही त्यांनी हिरीरीने भाग घेतला. ८६ साली अशोक लेलेना अशी उत्तम साथ दिली त्यांच्या पत्नी नीला लेले ह्यांनी. नीलाताईंनी मंडळात तीन चारदा खजिनदारपद सांभाळले आहे. बरेचदा त्याकाळी कार्यक्रमांना लागणाऱ्या सुट्या पैशांची सोय बँकेत असल्याने त्याच करायच्या. ८७ साली सीमा बेंद्रेंनी अशोक बेंद्रेंना तर ८९ साली मधुमती देशमुखांनी हनुमंतरावांना समर्थ साथ दिली. १९९० साली शाम शेठ ह्यांच्या बरोबरीने सुनिता शेठ ह्यांनी सारी जाबाबदारी उचलली. ह्या पाचही वर्षात काही कार्यक्रमांचे अपवाद वगळता साधारणतः १५० ते २०० लोकांची उपस्थिती असायची. त्यातल्या त्यात गणपतीच्या कार्यक्रमाला सर्वाधिक तर संक्रांतीला जेमतेम ५०- ६० प्रेक्षक म्हणजे भरपूर लोकं आली असे म्हटले जायचे. तेव्हा मंडळाच्या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांना $३, सभासदांना $५ ते $७ तर इतरांना $७ ते $१० असे तिकिट असायचे, ज्यात चहा, कॉफी, जेवण व सांस्कृतिक कार्यक्रम असे सगळे काही समाविष्ट असायचे. आजच्या सारखे ई-मेल ब्लास्ट वगैरे काहीही तंत्रज्ञान नसल्याने सभासदांना फोन करून निमंत्रण दिले जायचे. हनुमंत देशमुख काका तर स्वतः जातीने प्रत्येकाला फोन करून निमंत्रण द्यायचे. लोकं कधी हो म्हणून यायची नाहीत तर कधी ऐनवेळेला भरपूर यायची त्यामुळे जेवणाच्या नियोजनाचा अंदाज बांधणे कठीण जायचे.

अशोक लेलेंच्या कार्यकाळात लक्षणीय कार्यक्रम झाला तो म्हणजे तब्बल ३९ कलाकारांचा ताफा असलेलं भारतातून प्रथमच आणलं गेलेलं 'घाशीराम कोतवाल' हे नाटक. शिकागोच्या म्युझियम ऑफ सायन्स अँड इंडस्ट्री येथे भारतीय दूतावासाच्या समन्वयाने हे नाटक आयोजित करण्यात आले होते. नाटकाला जवळपास १००० प्रेक्षक अगदी स्थानिक अमेरिकन्स तसेच आसपासच्या शहरातील मराठी प्रेक्षकांनी आवर्जून उपस्थिती लावली होती. एअर इंडियाने एवढ्या कलाकारांच्या तिकिटाची जबाबदारी घेतल्याने नि हॉलचे भाडे नसल्याने

त्या काळी जवळपास $९००० च्या घसघशीत रकमेने त्यावर्षीच्या कार्यकारिणीने मंडळाच्या गंगाजळीत भर टाकली. १९८७ साली नेहमीच्या गुढीपाडवा, गणपती, दिवाळी ह्या सणांना स्थानिक कलाकारांचे नाटक तसेच मुलांचे नाचगाणी नि वाद्यवृंदाचे कार्यक्रम झालेच; पण सगळ्यात लक्षात राहिली ती १५ ऑगस्टची परेड नि मंडळाने त्यासाठी तयार केलेला देखावा ज्यात मुलांनी शिवाजी महाराज व महाराष्ट्रातील काही प्रसिध्द व्यक्ती दाखविल्या होत्या. त्याच्या पुढच्या वर्षी संक्रांतीला शिकागोस्थित प्रसिध्द गायिका लीलाताई जोशी ह्यांच्या गाण्याचा प्रेक्षकांनी आस्वाद घेतला तर गणपतीला न्यू जर्सीच्या आठल्ये ह्यांचा गायनाचा कार्यक्रम झाला. बहुतेक सर्व कार्यक्रम त्याकाळी स्कोकीच्या कम्युनिटी हॉलमध्येच व्हायचे. त्यावर्षीचा उल्लेखनीय कार्यक्रम म्हणजे इंडिया असोसिएशन आणि भारतीय दूतावास यांच्या समवेत आयोजित केलेले महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. शरद पवारजी ह्यांचे व्याख्यान. महाराष्ट्रातील उद्योगाच्या संधी व गुंतवणुकीसाठीचे आवाहन करण्यासाठी झालेल्या ह्या कार्यक्रमाचा आपल्या सभासदांनी लाभ घेतला. त्यावर्षी युवक समितीच्या अजित वैद्य नि संजय हुप्रीकर ह्यांनी युवक, युवतींसाठी एक खास कार्यक्रम आयोजित केला होता. युवकांनी युवकांसाठी केलेला हा कार्यक्रम नवीन पिढीला मंडळामध्ये सक्रीय भाग घेण्यास प्रेरित करून गेला. नेहमीच्या कार्यक्रमांव्यतिरिक्त 'म्युझियम ऑफ सायन्स अँड इंडस्ट्री'मध्ये एका भारतीय सांस्कृतिक कार्यक्रमात मंडळाने भाऊबीज, नागपंचमी वगैरे 'आपले सण' सादर करून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्वही केले. १९८९ साली रोहिणी भाटे ह्यांचा कार्यक्रम मंडळाने आयोजित केला होता. इतर कार्यक्रमात त्याकाळी घरच्या घरी मराठीचे वर्ग घेणाऱ्या डॉ. लड्डू ह्यांच्या विद्यार्थ्यांचा कार्यक्रम तसेच शंकरराव हुप्रीकरांचे स्थानिक कलाकारांचे नाटकही सादर करण्यात आले होते. १९९० साली गणपतीच्या कार्यक्रमासाठी भारतातून खास कलाकार बोलावून 'एका गाढवाची कहाणी' हा रंगनाथ कुलकर्णी ह्यांचा एकपात्री प्रयोग झाला. त्याला जवळजवळ ५०० प्रेक्षकांनी उपस्थिती लावली होती. तसेच श्रीधर स्वामींचा रेणुकामातेवर कार्यक्रम शेठकाकांच्या घरी आयोजित केला गेला होता. ह्याच साली मंडळाने सर्वप्रथम वार्षिक सभासदत्व देणे सुरू केले. तसेच बाहेरून जेवण मागवण्यास नि कोजागिरीच्या कार्यक्रमात गरबा नि दांडिया खेळण्यास ह्याच वर्षी सुरवात झाली.

अशोक लेले
१९८६ अध्यक्ष



अशोक बेंद्रे
१९८७ अध्यक्ष

रीता काळुस्कर
१९८८ अध्यक्षा



हनुमंत देशमुख
१९८९ अध्यक्ष

शामकांत शेठ
१९९० अध्यक्ष

ह्या सगळ्या कार्यक्रमांना छोट्या मुलांसाठी वेगळी अशी काही सोय कधी करावी लागली नाही. मुले नेहमी आपल्या पालकांबरोबर बसून मुख्य कार्यक्रम बघायची. मुलांचे स्वतःचे असे सांस्कृतिक कार्यक्रमही व्हायचे. त्याकाळी मंडळ स्वतःची अशी मराठी शाळा चालवत नव्हते. पण शेखर जोशी, डॉ. लड्डू आपापल्या घरी मराठीचे वर्ग घ्यायचे. 'रचना' हे आपले त्रैमासिक हाताने लिहिले जायचे. पिवळ्या वा गुलाबी रंगाच्या कागदावर त्याच्या प्रति काढून एका पानाची मध्ये घडी घालून स्टेपल करून नि त्यावर नाव पत्ता लिहून पोस्टाचे तिकीट लावले जायचे. हे सर्व वेळेत करून पोस्टात टाकायचे काम त्या त्या वेळच्या सचिवांचे असायचे.

ह्या पाचही वर्षांच्या अध्यक्षांशी, त्यांच्या जोडीदारांशी झालेल्या गप्पागोष्टीतून त्या वेळच्या गमतीजमती ऐकून आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना खूप प्रेरणा मिळाली. त्यांच्या सगळ्यांच्या आशीर्वादानेच महाराष्ट्र मंडळ शिकागोचा हा इवलासा वेलू आता गेलाय गगनावरी नि शामकांत शेठ ह्यांच्याच शब्दांत सांगायचे तर १९६९ साली लावलेल्या ह्या बीजाचा आता वटवृक्ष झालाय नि त्याच्या पारंब्या जमिनीत पाळंमुळं रोवून हा वृक्ष वाढतोय; तो असाच फोफावू दे.

तर अशोक नि नीला लेले, स्व. अशोक बेंद्रे ह्यांच्या पत्नी सीमाताई बेंद्रे, रीता काळुस्कर, स्व. हनुमंत देशमुख ह्यांच्या पत्नी मधुमती देशमुख आणि शाम शेठ नि सुनीता शेठ ह्यांनी सर्वांनीच 'असेच सर्वांनी मिळून मिसळून एकदिलाने काम करून हे आपले मंडळाचे कुटुंब यापुढेही असेच सुखाने नांदो' अशा सदिच्छा मंडळाच्या सुवर्ण जयंतीच्या महोत्सवानिमित्त सर्वांना दिल्या.

मुलाखत व शब्दांकन: वर्षा राहुल विसाळ

"With best compliments" from

Avinash and Nutan Vaidya,

Riverwoods

PATEL BROTHERS®
"Celebrating Our Food....Our Culture"
PATEL® BROTHERS

Let's play !
Video Platform for the Millennial Enterprise
kPoint
Smart videos. Simplified.
www.kpoint.com • email: info@kpoint.com • +1 630 655 890

मोज - डॉ. सलील कुलकर्णी मुलाखत

शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त संयोजकांच्या विनंतीला मान देऊन मुलाखतीसाठी आपण वेळ दिलात याबद्दल प्रारंभी, आपले मनःपूर्वक आभार. तसेच सध्या बहुचर्चित असलेल्या वेडिंग चा शिनेमा या चित्रपट निर्मितीबद्दल आपले हार्दिक अभिनंदन!

प्रश्न १. या चित्रपटाच्या अनुषंगाने मला विचारावेसे वाटते की संगीत क्षेत्रातील आपली रुळलेली पायवाट सोडून चित्रपट निर्मितीच्या या नव्या क्षेत्राकडे आपण कसे काय झेपावलात?

खरं पाहिलं तर चित्रपट क्षेत्र हे संगीत क्षेत्रापासून दूरचे नाही. या क्षेत्रांची जवळीक जास्त आहे. पंचवीस वर्षे संगीत क्षेत्रात कार्यरत असल्याने माझ्या दृष्टीने चित्रपट निर्मिती, ही पुढची पायरी होती. या क्षेत्रात उतरताना मला कोणतीच अडचण आली नाही. कोणतेही काम मी अगदी मनापासून करतो. त्यासाठी चांगला भरपूर होमवर्क ही करतो. त्यामुळे माझा पहिला सिनेमा असूनही तो नवख्या दिग्दर्शकाचा भासत नाही.

प्रश्न २. संगीतकार किंवा दिग्दर्शक व्हायचे, हे तुम्ही लहानपणापासूनच ठरवलं होतं का?

छे! आपण काय करायचं, हे मी कधीच ठरवत नाही. ते नियतीवरच सोपवतो. मी ओपन माईण्ड ठेवतो. हेच करायचे आहे, असंच झालं पाहिजे, असे मी आधीपासून ठरवत नाही. मित्रमंडळी चेष्टा करतात की, “ काय करायचं आहे हे, तुझं अजून ठरत नाही ना!” या मंडळींच्या शेरेबाजीकडे दुर्लक्ष करून, मला जे करायला आवडतं, जे करण्यात मला मजा-मौज वाटते ते कार्य मी करतो.

प्रश्न ३. तुमच्या संगीत क्षेत्रातील प्रवासाची सुरुवात कशी झाली?

ज्या शहरात आपण राहतो त्या शहराचे आणि ज्या वास्तूत आपण निवास करतो, त्या वास्तूचे संस्कार आणि अभिरुची वारसाहक्काने आपल्याला प्राप्त होते. घरच्या संस्कारांमुळे मी अगदी बालपणी पेटी वाजवायला शिकलो. वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षी, मी पुणे आकाशवाणी केंद्रावर जयोस्तुते हे गीत पेटीवर वाजवले. अभिषेकीबुवा, भीमसेन जोशी यांच्या मैफिली मी पुण्यात ऐकल्या. मायकल जॅक्सनच्या कॉन्सर्टसाठी मी मुंबईला गेलो. त्याचप्रमाणे ब्राह्यन ॲडॅम्स यांच्या कॉन्सर्टला पुण्यात मी हजेरी लावली. जगजीतसिंग यांच्या मैफिलीलाही माझी उपस्थिती होती. मैफिलींना जाण्याचा छंदच लागला म्हणा ना! ज्या कलावंतांचे लहानपण हे धडपडीत जाते त्यांची कलाकृती वेगळी आणि ज्या कलावंतांचे बालपण सुखात जाते त्यांची कलाकृती ही वेगळी असते. मी सहा वर्षांचा असताना माझे पितृछत्र हरपले. त्यांच्या अनुपस्थितीत आईनेच मला घडवले. आईबरोबर सायकलच्या बॅक् सीटवर बसून मी गायनाच्या वर्गाला जात असे.

प्रश्न ४. तुमच्या गाण्याच्या कार्यक्रमांमधील संस्मणीय अशी एखादी आठवण?

मराठी भाषेत सर्वात जास्त बालगीते देणारा संगीतकार मी आहे.लोकांनाही माझी गाणी आवडतात. माझा आवाज आपलासा वाटतो. एकदा माझा गाण्याचा कार्यक्रम चालू असताना प्रेक्षकांमधून एक चिमुकली व्यासपीठावर आली. ती थेट येऊन माझ्या मांडीवर बसली. बालगीते संपताच ती उठून निघून गेली. हा मला मिळालेला न दिसणारा पुरस्कारच आहे असे मला वाटते.

प्रश्न ५. मराठीच्या प्राध्यापकांनादेखील हेवा वाटावा असे भाषाप्रभुत्व व गोडवा तुमच्या वक्तृत्वात आहे. तर या संबंधात काय सांगाल?

संस्कार हे एकमात्र त्याचे उत्तर आहे. माझ्यावर, घरी उत्तम साहित्याचे आणि उत्कृष्ट संगीताचे संस्कार घडले. अवघड आणि बोजड शब्दांपेक्षा, मला साधे आणि सरळ सोपे शब्द आवडतात. शब्दांची सहजता, साधेपणा माझ्या मनाला भुरळ पाडतो.‘ विद्वत्ता ही बाळगायची असते ती दाखवायची नसते‘ असं मला वाटते. यावर एकच हशा पिकला हे वेगळे सांगायलाच नको.

‘क्षण अमृताचे’ याबद्दल जर बोलायचं झाल्यास मला ते स्वप्नवतच वाटते. ‘आपल्या चालीवर’ लतादीदी गायल्या आहेत यावर विश्वासच बसत नाही. असे मंत्रमुग्ध करणारे, ते स्वर आणि त्या स्वरांवरील माझे भक्तियुक्त प्रेम अन्य कोणत्याही गायकाच्या स्वरांना लाभणार नाही, एवढेच मी ठामपणे सांगू इच्छितो.

प्रश्न ६. ‘मैत्र जीवाचे’ आणि ‘क्षण अमृताचे’ या कार्यक्रमाबद्दल काय सांगाल?

‘मैत्र जीवाचे’ हा कार्यक्रम मी पंडित हृदयनाथ मंगेशकरांबरोबर करीत असे. पंडित हृदयनाथ मंगेशकर यांसारख्या महान कलावंतांबरोबर कार्यक्रम करण्याची संधी मिळणे हे मी परमभाग्य समजतो. या कार्यक्रमाच्या दरम्यान, एकदा एक गमतीदार प्रसंग घडून आला.

निवेदकांनी माझी ओळख एक ज्येष्ठ संगीतकार म्हणून करून दिली. मी त्यांना म्हटले ,"अहो ज्येष्ठ संगीतकार म्हणून तुम्ही मला संबोधित असाल तर मग पंडितजींना काय म्हणणार?" निवेदकांची अडचण पाहून पंडितजी म्हणाले, प्राचीन संगीतकार मंगेशकर असे त्यांना म्हणावे लागणार!!

प्रश्न ७. आपल्या शिकागोभेटींविषयी आपण काही सांगा.

स्वामी विवेकानंदांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या शिकागो नगरीला चार वेळा येण्याचा योग आला. माझी बालमैत्रीण सौ. अर्चना जोशी-परांजपे हिच्याकडील माझा झालेला पाहुणचार आणि माझे सन्मित्र श्री नितीन जोशी यांशी झालेली भेट ह्या दोन्ही गोष्टी उल्लेखनीय आहेत. शिकागोत झालेल्या 'आयुष्यावर बोलू काही' आणि 'मैत्र जीवाचे' ह्या मैफिलींच्या सुखद स्मृती आजही माझ्या स्मरणात आहेत. पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या साथीत झालेल्या 'मैत्र जीवाचे' ह्या मैफिलीच्या यशस्वी आयोजनाचे श्रेय श्री.पंकज अकोलकर व सौ. सुचेता अकोलकर ह्या दांपत्याला दिले पाहिजे. ह्या मैफिलींच्या वेळी उपस्थित रसिक श्रोत्यांनी जी उत्स्फूर्त दाद दिली, त्यावरून हा कार्यक्रम पुणे-मुंबईत चालू आहे, की शिकागोत, असा संभ्रम माझ्या मनात निर्माण झाला. शिकागोवासियांची ही रसिकता निश्चितच प्रशंसनीय आहे.

परदेशातही आपली मराठी मंडळी भेटली, की निश्चितच बरे वाटते. त्यावेळी 'आयुष्यावर बोलू काही' हा आमचा कार्यक्रम होता. प्रेक्षकांनी या कार्यक्रमाला मनापासून दाद दिली, त्याबद्दल शिकागोतील रसिक प्रेक्षकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. या वर्षी शिकागो महाराष्ट्र मंडळाने पन्नास वर्षे पूर्ण केली, त्याबद्दल आजी, माजी संस्था-आयोजकांचे, आणि सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन!

संगीत, गायन, वादन, लेखन, शिक्षक, संगीत-दिग्दर्शन, तसेच अनेक मनोरंजक कार्यक्रमांचे सादरीकरण करणारे आणि आता दिग्दर्शन क्षेत्रात सुध्दा झळकणारे डॉक्टर सलील कुलकर्णी यांचे व्यक्तिमत्व आदरयुक्त कौतुकास नि:संशय पात्र असेच आहे. त्यांना उत्तरोत्तर उत्कर्षासाठी, अनेक उत्तम शुभेच्छा!

मुलाखत व शब्दांकन: अर्चना भिडे

"Best Wishes From
Sanika, Sarika, Vaishali and Sunil Dev"

मी, महाराष्ट्र मंडळ शिकागो (वर्ष १९९१-१९९५)

मी आहे महाराष्ट्र मंडळ शिकागो,
मी आहे तुमच्या करमणुकीचं स्थान!
माझ्या वयाला झाली पन्नास वर्ष,
कारण तुम्हीच दिला तो मान!!!

नमस्कार! मी तुमचं आपलं शिकागोचं महाराष्ट्र मंडळ. ह्या वर्षी माझ्या वयाला पन्नास वर्ष पूर्ण झाली. तुमच्या सगळ्यांच्या प्रेमानी आणि थोरामोठयांच्या आशिर्वादानी हा दिवस मला दिसला. म्हणूनच आज तुमच्यासमोर माझं मनोगत मांडायचा विचार केला. हे माझं सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे म्हणून तुम्हीपण सगळे खूप खूष आहात, उत्साहानी हे वर्ष साजरं करायला सज्ज झाला आहात. मला पण हे वर्ष तुमच्याबरोबर आनंदात घालवायचं आहे आणि म्हणूनच थोडं मागे जाऊन जुन्या आठवणींमध्ये रममाण व्हायचं डोक्यात आलं आहे.

काळ १९९१-१९९५, माझ्या विशीतला. म्हणजे माझी स्थापना होऊन २१-२२ वर्षांचा काळ लोटला होता. हळू हळू जीवनाला स्थिरता येऊ लागली होती. माझ्या ह्या वयात माझी काळजी घेणारे होते, उमा दिघे, प्रल्हाद पाटील, सुभाष देवधर, शरद गोडबोले आणि प्रकाश खेडकर. ह्या पाची जणांनी अध्यक्ष असताना माझी खूप काळजी घेतली. ह्यांनी अध्यक्ष होण्याआधी मंडळाच्या कार्यकारिणीवर वेगवेगळी कामं केली होती. माझी स्थापना करण्यामागचा संस्थापकांचा जो उद्देश होता, तो ह्या सगळ्यांनी लक्षात ठेवला होताच कारण सगळया मराठी जनतेला, आपण लांब देशात आलो आहोत त्यामुळे आपल्या नवीन ओळखी व्हायला हव्यात, जुन्या ओळखींना उजाळा मिळावा, वेगवेगळी नाटकं, शिकागो आणि शिकागो बाहेरच्या कलाकारांचे कार्यक्रम बघायला मिळावेत, आपल्या लहान मुलांना काहीतरी सादर करण्याची संधी मिळावी अशी इच्छा असते. तर त्याच इच्छेची पूर्तता करणे हाच ह्या सगळ्यांचा उद्देश होता. आता मी माझ्या विशीतल्या गोष्टी सांगणार म्हणजे माझ्या ह्या प्रिय अध्यक्षांची मनोगतं सांगणार, त्यात त्यांना आलेले छान अनुभव, आलेल्या अडचणीं ह्या सगळ्यांचा पण उल्लेख येणार आहे. अहो, ह्या सगळ्यांशी त्यावेळच्या गप्पा मारताना इतकी मजा आली की काही विचारू नका. ही सगळी मंडळी गप्पा मारताना भूतकाळात हरवून जातात आणि जुन्या आठवणी पुन्हा ताज्या होतात.

मग सुरवात करूया १९९१पासून. त्यावेळच्या माझ्या अध्यक्षा होत्या उमाताई दिघे. अध्यक्ष होण्याआधीच्या वर्षी त्यांनी मंडळात काम केलं असल्यामुळे त्यांना कामाच्या व्यापाची जाणीव होतीच. पण अध्यक्ष झाल्यानंतर येणारी जबाबदारी कशी पेलवेल ह्याची थोडी काळजी पण वाटत होती. पण उमाताईंना निर्णय घेण्यासाठी डॉ. देशमुख ह्यांनी खूप प्रोत्साहन दिलं आणि त्यांनी ही जबाबदारी पेलण्याचं ठरवलं. त्यावेळची कार्यकारिणी- समिती लहान, फक्त पाच पदाधिकारी आणि सहा सहाय्यक सभासद, त्यामुळे त्यांच्या मीटिंग्स ह्या प्रत्यक्ष भेटूनच व्हायच्या. अहो, त्यावेळी तुमचे आताचे हे कॉन्फरन्स कॉल वगैरे प्रकार नव्हतेच ना? कमिटीच काम तसं सोपं होतं. मंडळ लहान असल्यामुळे बजेटहि लहानच होतं. त्यावेळी भारतातून करमणुकीचे कार्यक्रम आणणं परवडण्यासारखं नव्हतं. त्यामुळे त्यांचा व्हिसा वगैरे करण्यासाठी ज्या अडचणी आज येतात, त्या येण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. पण ह्याचा अर्थ असा नाही हं, की आमच्याकडे बाहेरचे कार्यक्रमच होत नव्हते. तर असाच एक अविस्मरणीय कार्यक्रम झाला कविवर्य मंगेश पाडगांवकर ह्यांचा, निमित्त होतं कोजागिरीचं! आता कोजागिरी म्हणजे ऑक्टोबर/नोव्हेंबरचा महिना! आणि तेही शिकागोमध्ये! मग काय विचारता! त्यादिवशीही शिकागोच्या हवामानाच्या अंगात आलं होतं. पहिला स्नोफॉल, निसरडे रस्ते! ह्या सगळ्याचा सामना करत कविवर्यांना कार्यक्रमाच्या ठिकाणी आणलं गेलं, आणि रसिकांनी एका अतिशय उच्च दर्जाच्या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. ह्यासगळ्यामधे रसिकांची उपस्तिथी मात्र खूपच कमी होती, त्यामुळे कविवर्यांचं मनासारखं स्वागत करता न आल्याची खंत उमाताईंना वाटत राहिली. पण त्यांच्याकडून मिळालेली, त्यांनी स्वतः लिहिलेल्या पत्राची छानशी भेट उमाताईंना खूपच मोलाची वाटते आणि ती आजही त्यांनी अतिशय जपून ठेवली आहे. आणखीन एक अशीच मोलाची आठवण त्यांच्याकडे आहे आणि ती म्हणजे बाबूजींची. सुधीर फडके तेव्हां सावरकर चित्रपटासाठी निधी उभा करण्यासाठी आले होते, तेव्हां त्यांचा कार्यक्रम ठेवला होता. नेमका त्याच दिवशी बाबूजींचा आवाज बसला होता. ते उमाताईंकडे जेवायला आले असताना उमाताईंनी त्यांना मध आणि लिंबू घालून गरम पाणी घरी आणि स्टेजवर नेण्यासाठी दिलं, आणि बाबुजींसारखी मोठी व्यक्ती, पण ह्या गोष्टीचा उल्लेख करायला ते विसरले नाहीत. असेच आणखीनही कलाकार त्यांना भेटले, त्यांच्याशी गप्पा मारण्याची संधी त्यांना मिळाली. उमाताई म्हणतात, की अध्यक्ष असताना आलेले हे अनुभव माझ्यासाठी आयुष्यभराची पुंजी आहेत. उमाताईंनी त्यांच्या कारकिर्दीत एक वेगळाच प्रयोग केला आणि तो म्हणजे पाडव्याच्या कार्यक्रमाच्या दिवशी त्यांनी इतर भाषक मंडळांना त्यांचे कार्यक्रम सादर करण्याची विनंती

केली आणि गुजराथी, बंगाली मंडळांनी त्यांच्या परंपरेतले नाच सादर केले. अहो, तुमच्याबरोबरच मलाही वेगळं काहीतरी बघायला मिळालं आणि त्या मंडळांच्या अध्यक्षांचं भाषणही ऐकायला मिळालं. ह्या अशा कार्यक्रमांमुळेच तर आपली इतरांची ओळख होते ना? तसाच आणखीन एक आगळावेगळा कार्यक्रम त्यांनी घडवून आणला. महाराष्ट्र फौंडेशनला मदत करण्यासाठी, १ मे च्या महाराष्ट्र दिनाचं औचित्य साधून, त्यांनी मीना नेरुरकर ह्यांचा "माझे माहेर पंढरी" हा कार्यक्रम ठरवला. २९ कलाकारांचा हा कार्यक्रम लोकांनी अक्षरशः डोक्यावर घेतला.

साल १९९२! उमाताईंकडून आता धुरा आली होती प्रल्हादकाका पाटील ह्यांच्याकडे. उमाताईंबरोबर त्यांनी उपाध्यक्ष म्हणून काम केलंच होतं. त्यामुळे ही जबाबदारी घेण्याची त्यांना मंडळाच्या विश्वस्त समितीने (ट्रस्टीजनी) विनंती केली, त्यांनी ती मान्य केली आणि आपल्या साथीदारांना घेऊन आपल्या कामाला सुरवात केली. हळूहळू माझाही पसारा वाढायला लागला होता (अर्थात चांगल्या अर्थी). बृहन्महाराष्ट मंडळाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र फौंडेशन ह्यांच्याकडून भारतातल्या कलाकारांचे कार्यक्रम पाठवले जाऊ लागले. त्यांच्या व्हिसाची सोयपण तेच करत होते. प्रल्हाद काकांच्या कारकिर्दीत रामदास पाध्ये, श्रीराम लागू, सुधीर फडके, अनुराधा मराठे आणि इतर बऱ्याच कलाकारांनी आपल्या कलेनं शिकागो रसिकांचं मनोरंजन केलं. प्रल्हाद काकांनी बऱ्याच गोष्टी पहिल्यांदाच घडवून आणल्या! पहिल्यांदाच रचना हे आपलं मासिकं सर्वांना मोफत पाठवलं. पहिल्यांदाच रचनाचा विशेष असा दिवाळी अंक छापला गेला, पहिल्यांदाच महाराष्ट्र मंडळाचा लोगो (प्रतीक-चिन्ह) तयार करण्यात आला ह्याचं वर्षी पहिल्यांदाच कार्यक्रमाच्यावेळी बाहेरून जेवण मागवण्यात आलं. पहिल्यांदाच पुढच्या २-३ वर्षांसाठी अध्यक्षीय उमेदवारांची नावं ठरवण्यात आली होती. अशा अनेक नवीन गोष्टींची सुरवात, बऱ्याच लोकांची नेहमी झालेली मदत, ह्यामुळे हेपण वर्ष छान पार पडलं!





उमा दिघे	प्रल्हाद पाटील	सुभाष देवधर	शरद गोडबोले	प्रकाश खेडकर
१९९१ अध्यक्षा	१९९२ अध्यक्ष	१९९३ अध्यक्ष	१९९४ अध्यक्ष	१९९५ अध्यक्ष

१९९२च्या कार्यकारिणीवर सुभाषकाका देवधर हे उपाध्यक्ष होते आणि त्यामुळे ते १९९३मध्ये अध्यक्ष झाले ह्यात नवल काहीच नाही. आधीच्या वर्षाचा अनुभव आणि इतर सभासदांचं सहाय्य ह्यामुळे सुभाषकाकांची सेना सज्ज झाली होती. हळूहळू भारतातून कलाकार येण्याचं प्रमाण वाढायला लागलं होतं. पण ही सगळी मंडळी स्वतःच्या व्हिजिटर व्हिसाची काळजी घ्यायचे, त्यामुळे त्याकरता अमेरिकन कॉन्सुलेटशी तसा कधी संपर्क आला नाही. पण १९९३ मध्ये लातूर मध्ये झालेल्या भूकंपानंतर कॉन्सुलेट मधल्या लोकांनी महाराष्ट्र मंडळातल्या कुठल्या सभासदांचे कुटुंबीय लातूरमध्ये आहेत का, ह्याची आवर्जून चौकशी केली होती. १९९३ मध्ये आलेल्या कलाकारांमध्ये अरुण दाते, आशा खाडिलकर ह्यांचे गाण्याचे कार्यक्रम आणि दिलीप प्रभावळकर आणि ग्रुपचा, 'हसवा फसवी' हा प्रयोग ह्यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. (दिलीप प्रभावळकर आणि ग्रुप हे काकांकडे राहिले होते). ह्याच काळात ब्रिज क्लब आणि आजी-आजोबा मंडळ असे अभिनव कार्यक्रम काकांनी सुरू केले. ह्यावर्षीच मंडळात चार नाटकं सादर झाली, दोन शिकागोची, एक डेट्रॉईटचं आणि एक न्यूयॉर्कचं. आणखीन एक वेगळीच गोष्ट १९९३ मध्ये घडली आणि ती म्हणजे मंडळाच्या इतिहासात पहिल्यांदाच मंडळाच्या पुढच्या वर्षीच्या पदांसाठी रीतसर निवडणुका झाल्या. मी तुम्हाला म्हटलं होत ना, की विस्तार आता वाढत चालला होता म्हणून! बाहेरून जेवण आणण्याची पध्दत ह्या वर्षी अर्ध्या कार्यक्रमांसाठी चालू राहिली. 'रचना'चा अंक पाठवण्यासाठी मराठी लोकांचा आकडा आता ५००च्या वर गेला होता. बाल्टिमोर मधील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला बऱ्याच शिकागोवासियांनी हजेरी लावली होती. एकूणच काय तर वर्ष मस्त गेलं. आणि पुढच्या वर्षीचे वेध लागले.

१९९४! माझी पंचविशी! रौप्यमहोत्सवी वर्ष! ह्यावर्षीचे अध्यक्ष कै. शरद गोडबोले. मला त्यांच्याशी न बोलता आल्याची खंत आहे पण अनिताकाकू गोडबोले ह्यांनी मला आवश्यक ती माहिती दिली ह्याचं समाधानही आहे. ह्या कार्यक्रमासाठी आपल्याला प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ. वसंत गोवारीकर आणि पत्रकार श्रीयुत माधव गडकरी हे वक्ते म्हणून लाभले होते. हृदयनाथ मंगेशकर ह्यांचा कार्यक्रम आणि न्यूजर्सीच्या कलाकारांचं संगीत नाटक! ह्या सगळ्याचा साधारणपणे ३५०हुन अधिक लोकांनी आनंद घेतला. मिशिगन ॲव्हेनुवर झालेल्या १५ ऑगस्टच्या परेडमध्ये पण महाराष्ट्र मंडळ सहभागी झालं होतं. आणि अशा सगळ्या धामधुमीत माझी पंचविशी पूर्ण झाली.

आता आलं १९९५! माझी जबाबदारी उचलली होती प्रकाशकाका खेडकर ह्यांनी. आपलं समाजावरचं प्रेम आणि मराठीचा वारसा पुढे चालवण्याची तीव्र इच्छा ह्याच कारणांमुळे त्यांनी हे आव्हान स्वीकारलं होतं. माझी स्थापना होऊन बरीच वर्ष झाली होती. पाडवा,

संक्रांत, गणपती, दिवाळी हे कार्यक्रम दरवर्षी प्रमाणेच चालू होते. वेगळी गोष्ट म्हणजे सगळ्या कार्यक्रमांना त्यावर्षीचे कॉन्सुलेट जनरल ह्यांना आमंत्रण दिल जायचं. इतर वर्षांप्रमाणेच लोकांना कार्यक्रमाचं बोलावणं करण्यासाठी फोन केले जायचे (ई-मेल पाठवण्याची पध्दत अजून सुरू झाली नव्हती). दिवाळी म्हणजे अथ पासून इति लहान मुलांचा कार्यक्रम ही परंपरा तशीच पुढे चालू राहिली. 'रचना'चं काम, मराठी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या मंडळींनी चालूच ठेवलं. एकंदर काय सगळं एकदम मस्त चाललं होतं. आणि झटक्यासरशी ही पाच वर्ष संपून गेली.

अहो, मला अजून खूप काही लिहायचंय. ह्याकाळातली अध्यक्षांनी मला इतक्या भरभरून आठवणी सांगितल्या आहेत ना, की काही विचारू नका. ह्या मनोगतात कितीतरी लोकांचे उल्लेख करायचे आहेत. कारण ह्या सगळ्यांशिवाय माझं अस्तित्व असणं कदापि शक्य नाही. माझ्या ह्या पाच वर्षांच्या काळात मला बहरायला मदत केलेल्या लोकांमध्ये काही नावं आहेत... नमिता वेदक, ऋता देसाई, डॉ. देशमुख, श्याम सेठ, राजीव गोखले, विद्या चाफळकर, रेखा देवधर, नीला जोशी, प्रभाकर काणे, किशोर कुडाळकर, देवयानी पांडव, जया हुपरीकर, नमिता वेदक, अंजली पाटील, वंदना पटवर्धन, मधुरा चितळे, माधुरी देशमुख, शंकरराव हुपरीकर, वीर दोशी, अजित गांधी, विलास सावरगावकर, सुरेश पांडव, कल्याण पांडव, सुनीता सेठ, आशा खरवडकर, भास्कर केंकरे, नरेंद्र दिघे, जयश्री जोशी, मीनल ताम्हणे, सुभाष बकाणे, विनिता चंद्र, सुरेश तलाठी, उत्पल दिघे, सुरुची गडकरी आणि अजून खूप सारे!

ह्या पाच वर्षात माझ्यासाठी झटलेल्या सगळ्यांचे मनापासून आभार! जर माझ्याकडून लिहिण्यात काही चूक झाली असेल, कोणाचं नाव लिहायचं राहून गेलं असेल, तर आपलंच मंडळ म्हणून मला माफ करा. माझ्यावर तुम्ही जे उदंड प्रेम केलंत त्याबद्दल खूप खूप धन्यवाद आणि असंच प्रेम करत रहाल अशी आशा.

कळावे, लोभ आहेच तो वाढावा ही विनंती,
आपलं ऋणी,
महाराष्ट्र मंडळ शिकागो

मुलाखत व शब्दांकन: रश्मी चाफेकर

SK & MB
DESIGN INC.

JIGAR'S
KITCHEN
Your Food... Your Taste... Your Way...

Your Neighbor Your Realtor

Please contact me for any real estate buy-sell-rent needs in Chicagoland and suburban area. Will be more than happy to help you!

Archana Paranjape

Cell : (630)-854-9137

Email: arch@daprileproperties.com

महाराष्ट्र मंडळ शिकागोची पन्नाशी

१९९४च्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यानंतर "इवलेसे रोप लावियले द्वारी, त्याचा वेलु गेला गगनावेरी" असा महाराष्ट्र मंडळाच्या उत्कर्षाचा आलेख उंचावत गेला. "पेड़ उतनाही बड़ा होता है, जितना वह ज़मींके नीचे गड़ा होता है । ह्याची प्रचिती वर्षानुवर्षे येत राहिली. मंडळाच्या संस्थापकांच्या सुरुवातीला खरंतर माफक अपेक्षा होत्या पण त्यांना कदाचित भविष्यातल्या ह्या भरभराटीची कल्पनाही नसेल अशा पातळीवर मंडळाची प्रगती झाली. तरीही ह्याचं श्रेय मंडळाच्या संस्थापकांना आणि सुरुवातीपासून आजपर्यंत मंडळाला "आपलं" मानणाऱ्या शिकागोतल्या मराठी समाजाला जातं. ॐ सह नाववतु। ह्या उपनिषदातल्या प्रार्थनेत लिहिल्याप्रमाणे सह वीर्यं करवावहै। आणि मा विद्विषावहै। (एकत्र कार्य करूया आणि ते सुध्दा कोणाबद्दलही द्वेष भावना न ठेवता!) हे दोन मंत्र इथल्या समाजाने आजवर मनापासून जोपासले आहेत.

१९९४ ते २०१९ ह्या पंचवीस वर्षांच्या कार्याचा आढावा घेताना आज अनेक गतस्मृती जाग्या झाल्या आहेत. प्रतिवर्षी मंडळाचे अध्यक्षपद भूषवणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखती ह्या अंकात इतरत्र तुम्ही वाचणारच आहात. त्यांतून त्यांच्या कारकिर्दीत झालेल्या कार्यक्रमांचा उल्लेख आहे परंतु त्यांपैकी काही कार्यक्रम हे मला महत्वपूर्ण वाटतात कारण त्यामधून मंडळाच्या प्रगतीचा आलेख निश्चितच उंचावत गेला. १९९६ मध्ये श्री. राजीव गोखले ह्यांच्या अध्यक्षतेखाली घडलेले दोन प्रमुख कार्यक्रम म्हणजे श्री. शंकरराव हुपरीकर ह्यांच्या नाटकांचा रौप्यमहोत्सवी सोहळा आणि दिवाळीच्या वेळी सादर झालेला मंडळाचा पहिलाच "मेगा स्टार" कार्यक्रम! नाट्यतपस्वी शंकररावांचा शिकागोतला नाट्यप्रवास १९७१ साली सुरू झाला. खरंतर शिकागोची नाट्यपरंपरा अमेरिकेतली अग्रणी स्वरूपाची घटना आहे. म्हणूनच त्यावर्षी मंडळाने श्री. शंकररावांच्या गौरवार्थ एक विशेषांक प्रकाशित केला. "अजुन यौवनात मी" असं म्हणत त्यानंतरसुध्दा अनेक वर्षे त्यांनी अमेरिकेतील मराठी रंगभूमी जागती आणि गाजती ठेवली. शिकागोची ही नाट्यपरंपरा अखंडित आणि समृध्द ठेवण्याचं कार्य मग श्री. श्रीधर जोशी ह्यांनी हाती घेतलं ते आजतागायत अबाधित आहे. त्याचबरोबर सौ. अनुपमा धारकर आणि श्री. मिलिंद पानट ह्यांनीदेखील नाट्य दिग्दर्शनाची जबाबदारी घेऊन हातभार लावला आहे.

ह्यानंतरची विशेष उल्लेखनीय घटना म्हणजे १९९८ साली श्री. विलास सावरगांवकर ह्यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेला "सुयोग" निर्मित पहिला नाट्यमहोत्सव! नाट्यवेड्या शिकागोच्या रसिकांसाठी नाट्यपर्वणीच! भारतातल्या मराठी रंगभूमीवरचे सुमारे १५ हून अधिक तारे-तारका चार यशस्वी आणि लोकप्रिय नाटके सादर करण्यासाठी शिकागोला आले आणि दोन दिवसांच्या ह्या सोहळ्यात प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन झाले. सुयोगचे निर्माते कै. सुधीर भट आणि श्री. गोपाळ अलगेरी तर शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या प्रेमातच पडले. नाट्यमहोत्सवांचा हा सिलसिला मग दर दोन वर्षांनी सुरूच राहिला आणि अनेक कलाकार संयोजकांचे मित्र झाले. शिकागो हे भारतातल्या नाट्य कलावंतांचं आवडतं गाव झालं. नाट्यमहोत्सवाचा एक विशेष फायदा कार्यकारिणीच्या सदस्यांना झाला आणि तो म्हणजे इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या ह्या कार्यक्रमात शिस्तबध्द संयोजन म्हणजे काय आणि त्यासाठी किती वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करावं लागतं ह्याचा अनुभव त्या सर्वांना मिळाला. २०११ साली शिकागोला संपन्न झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाचं बीज ह्या नाट्यमहोत्सवांनी रोवलं असं म्हंटलं तर गैर ठरणार नाही. नाट्यमहोत्सव हे आर्थिकदृष्टया यशस्वी झाल्याने मंडळाचे पुढचे कार्यक्रम जास्त मोठ्या प्रमाणावर होऊ लागले आणि प्रेक्षकांचा प्रतिसाददेखील उत्तरोत्तर वाढत गेला.

२००७ मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात शिकागोतल्या कलाकारांना शुभारंभाच्या कार्यक्रमात सहभागी होण्याचं आमंत्रण आलं होतं आणि त्या निमित्ताने शिकागोमधले बरेच लोक सिऍटलला गेले होते. अधिवेशनाची भव्यता पाहून आपणही असं काही करू शकतो का? असा विचार काहीजणांच्या मनात आला पण तो तिथेच थांबला असं वाटत असतांनाच २००९ सालचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. सुजीत वैद्य "आपण २०११ साली बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन शिकागोत करूया का?" असा प्रस्ताव घेऊन आले, तेंव्हा कोणालाच कल्पना नव्हती की आपण सर्वजण मिळून एका मोठ्या कार्याला सामोरे जात आहोत. पुढची दोन वर्षे हा एक अत्यंत आनंददायी अनुभव शिकागोमधल्या सुमारे २०० स्वयंसेवकांनी उपभोगला. सगळ्यांनी एकजुटीने काम करून संपन्न केलेलं २०११ सालचं बृहन्महाराष्ट्र मंडळाचं अधिवेशन हा एक अविस्मरणीय अनुभव होता. मी ह्या अधिवेशनाचा प्रमुख संयोजक होतो. माझे सहसंयोजक श्री. पंकज अकोलकर, सौ. सुचेता अकोलकर, श्री. सुजीत वैद्य आणि सर्व समिती प्रमुखांच्या बहुमोल साहाय्याने आम्ही हे अधिवेशन सुफळ-संपूर्ण केलं ह्याचा सार्थ अभिमान प्रत्येक स्वयंसेवकाला आहे. अनेक नव्या ओळखी, जुळलेले स्नेहबंध आणि आयुष्यभरासाठी झालेले मित्र-मैत्रिणी हे केवळ अधिवेशनामुळेच साध्य झालं. सर्वार्थाने यशस्वी झालेलं हे अधिवेशन शिकागोकरांच्या मनात कायम एक सुखद स्मृती बनून राहिलंय.

अधिवेशनाच्या शुभारंभाला शिकागोच्या सुमारे ८० कलाकारांनी सादर केलेला नृत्य नाट्याचा कार्यक्रम अनेकांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारा आणि अतिशय दर्जेदार झाला. भारतातून खास आलेला जगप्रसिद्ध "मराठी बाणा" हा ९० हून अधिक कलाकारांचा आविष्कार तर "न भूतो न भविष्यती" योग्यतेचा होता. अधिवेशनानंतर एकंदरच लोकांचा उत्साह वाढला आणि त्याच बरोबर उपस्थिती आणि कार्यक्रमांचा दर्जा वाढण्यास मदत झाली.

मंडळाच्या ह्या सर्व प्रगतीतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे २०१४ साली बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या साहाय्याने सुरु झालेले "शिकागो मराठी विद्या मंदिर" सौ. विद्या जोशी ह्यांच्या पुढाकाराने शिकागोत दोन केंद्रांवर मराठी भाषा आणि संस्कृतीचं शिक्षण देणारी ही संस्था ही मंडळाच्या आजवरच्या यशातली एक विशेष घटना मानायला हवी कारण पुढच्या पिढीने आपलं "मराठीपण" जपणं हे आपल्या सर्वांसाठी आवश्यक आहे. मराठी शाळेच्या कार्याची सविस्तर माहिती देणारा लेख ह्या अंकात तुम्हाला वाचायला मिळणारच आहे. पुढच्या पिढीचा हा उत्स्फूर्त सहभाग पाहून शिकागो मंडळाचं भवितव्य उज्ज्वल आहे ह्याची खात्री पटते.

शेवटी आणखी एका उपक्रमाचा उल्लेख केल्याशिवाय हा इतिहास पूर्णत्वाला जाणार नाही आणि तो म्हणजे महाराष्ट्र मंडळ शिकागोनी सादर केलेला "माऊली' हा संत ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारित केलेला कार्यक्रम. २०११ च्या अधिवेशनाने प्रेरित होऊन २०१७ च्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात सादर झालेला हा कार्यक्रम अमेरिकेत अनेक ठिकाणी नंतर प्रदर्शित केला गेला आणि आबालवृध्दांच्या सहभागाने एक अप्रतिम कलाकृती निर्माण झाली. श्री. रवी जोशी आणि सौ. कल्पना निमकर ह्यांचं कसदार लेखन, सौ. अनुपमा धारकर ह्यांचं अप्रतिम दिग्दर्शन आणि सर्व नेपथ्यकार आणि नृत्यदिग्दर्शकांचं बहुमोल योगदान लाभलेला हा कार्यक्रम चिरस्मरणीय ठरला.

आज मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात सिंहावलोकन करताना मन अभिमानाने भरून येतं पण तरीही असं वाटतं, की शिकागोच्या मराठी समाजाला अजूनही खूप काही करण्यासारखं आहे. मिर्ज़ा ग़ालिब सांगून गेले आहेत, “हज़ारों ख़्वाहिशें ऐसी की हर ख़्वाहिश पे दम निकले, बहुत निकले मेरे अरमान, लेकिन फिर भी कम निकले|” त्याच प्रमाणे आपल्याला अजून नवी क्षितिजे गाठायची आहेत. ५० वर्षांच्या ह्या कालखंडात आपल्या समाजाने लक्षणीय प्रगती केली आहे हे नि:संशय आहे. पण शायर इक़्बाल लिखित "सितारोंसे आगे जहाँ और भी है…” ह्या उक्तीप्रमाणे केवळ आपलं सांस्कृतिक जीवन समृध्द करण्याचं ध्येय न ठेवता आपल्या सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेऊन मंडळानी ह्यापुढे कार्यरत व्हावं ही सदिच्छा व्यक्त करून हे सोनेरी पान आजवर आपल्या मंडळासाठी तन-मन-धन अर्पण करणाऱ्या शिकागोच्या समस्त मराठी समाजाला अर्पण करताना मला अपरिमित आनंद होत आहे.

शब्दांकन: नितीन जोशी

कृष्णा
डायनिंग
By Wadeshwar

“With Best Compliments” from
Tanvi, Harshada and Sameer. Naperville, IL

कणेकरी शुभेच्छा

प्रश्न - नमस्कार कणेकर काका! शिकागो महाराष्ट्र मंडळाला यापूर्वी एक-दोन वेळा तुमचे कार्यक्रम आयोजित करायची संधी लाभली आहे. शिकागोबद्दलच्या काय आठवणी सांगाल?

कणेकर - मी शिकागो फारच एन्जॉय केलेय. शिकागोमध्ये मला तुझ्यासारखेच खूप मित्र भेटलेत. काय आहे, मी जनरली स्टेज वर आलो, की ऑडियन्सच्या 'सेन्स ऑफ ह्युमर'चा अंदाज घेण्यासाठी एखादा किस्सा, एखादे वाक्य सांगतो आणि त्याच्या प्रतिसादावर पुढचा कार्यक्रम कसा सादर करायचा याचा मला अंदाज येतो; आणि हा अंदाज कधीही चुकलेला नाहीये आजवर! शिकागोची आठवण सांगायची म्हणजे माझ्या पहिल्या प्रयोगावेळेस मला स्टेजवर काही लाकडं आणून ठेवलेली दिसली. दुसऱ्या कार्यक्रमासाठी आणली असावीत कदाचित! लाकडांकडे पाहून मी म्हटलं - "आधीच लाकडं आणलीत?" आणि एकदम मोठा हास्याचा स्फोट झाला. मला इतकं रिलीव्हड वाटलं. आपला आणि प्रेक्षकांचा काहीही रॅपो नसतानादेखील प्रेक्षकांनी इतकी छान दाद दिली. ह्युमर तर आहेच पण मराठीचीही पूर्ण जाण शिकागोमध्ये जाणवली. काय होतं, उत्तम रिस्पॉन्स असेल तर तुम्हीही रिलॅक्सड होता. त्यामुळे पुढचा कार्यक्रम उत्तम झाला. नंतर नितीन जोशी वगैरे मंडळींनी अजून एक शो केला. दोन्ही वेळेस पॅक्ड ऑडिटोरिअम होतं.

प्रश्न - तुम्ही इतका मोठा काळ स्टॅन्ड अप कॉमेडी किंवा एकपात्री प्रयोग करत आहात. कालानुरूप या माध्यमात काही बदल जाणवतो का? या कलाप्रकारात तुमचे कुणी आदर्श होते का?

कणेकर - एकपात्री आणि स्टॅन्ड अप कॉमेडी मध्ये थोडा फरक आहे. तू 'पुलं'चं बघशील तर 'बटाट्याची चाळ', 'असा मी असा मी' यांची एक स्टोरी होती. त्यात ते त्या त्या पात्रांचा अभिनयही करत. माझ्या बाबतीत म्हणशील तर मी असं काहीही करत नाही. मी कुठलाही अभिनय करत नाही. मी फक्त बोलतो. फक्त बोलताना एकमेकांना सगळं जोडून घेऊन बोलतो हे माझं वेगळेपण आहे.

आदर्श म्हणशील तर नाही! मला चुकूनही कधी कधी कुणाकडून काही घ्यावं असं वाटलं नाही. मला जसं वाटलं तसं मी लिहीत गेलो. सुदैवाने लोकांना ते आवडतही गेलं.

प्रश्न - कणेकर काका, तुम्ही कित्येक रोल्स मधून रसिकांसमोर आला आहात. लेखक, पत्रकारिता, स्तंभलेखन, एकपात्री, स्टॅन्ड अप कॉमेडी. या सर्व रोल्समध्ये तुमचा आवडता रोल कुठला? कुठलं काम मनापासून आवडतं?

कणेकर - लेखन. मी १९६४ सालापासून लेखन करतोय रे! हा प्रश्न यापूर्वीदेखील मला विचारला जायचा पण गंमत म्हणजे मला याचं उत्तर नेमकं सांगता यायचं नाही. पण झालं असं की एकदा माझी ओळख " हे एकपात्री करतात आणि शिवाय लेखनही" अशी करून दिली गेली तेव्हा मी खुर्चीतून एकदम उसळलो आणि म्हटलं, "अहो तसं नाही! मी आधी लेखक आहे आणि मग एकपात्री वगरे!" तेव्हा मला स्वतःला याची जाणीव झाली. हाडाचा लेखक आहे मी! लेखन हेच माझं पहिलं प्रेम! आता माझं लेटेस्ट पुस्तक येतंय - चर्पटपंजरी!

प्रश्न - शिकागो महाराष्ट्र मंडळाला या वर्षी ५० वर्षे पूर्ण होताहेत. त्यानिमित्त तुमच्या शुभेच्छा शिकागोच्या रसिकांना वाचायला नक्कीच आवडतील.

कणेकर - असेच नवनवीन उपक्रम चालू ठेवा. मराठी वृध्दिंगत करा. तुम्ही मराठी पुस्तकं शिकागोच्या लायब्ररीजमधून उपलब्ध करून देताहात त्याचंदेखील कौतुक. माझ्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा! धन्यवाद!

मुलाखत व शब्दांकन: प्रसन्न जोगळेकर

"Best wishes for next 50 years and many more
Best compliments" from Ogales, Chicago Illinois

"With Best Compliments to Maharashtra Mandal of Chicago for serving our community for 50 wonderful years"

Asavari, Saahil, Siddharth and Nikhil Javeri

"Best Wishes" from
Medini and Sanjeev Joshi

SA INSURANCE

YOUR HEALTH•YOUR LIFE•YOUR CHOICE

SHYAM ANTURKAR

847-721-7039 • SANTURKAR09@GMAIL.COM

Medicare (Supplement, Part C, Part D), Medicaid (Dual)

Vision, Dental, Hearing

Under 65 Healthcare Plans

ACA (Obamacare), Hospital Indemnity, Critical Illness, Short Term & Long Term Disability

Proudly Representing Major Insurance Carriers

Call for Your State Specific Plans

Shamkant P. Sheth, D.D.S.

Cass Dental Care
7702 Cass Ave., Ste. 210
Darien, IL 60561

(630) 810-0444
Fax: (630) 810-0745

Niket S. Sheth, D.D.S.

Cass Dental Care
7702 Cass Ave., Ste. 210
Darien, IL 60561

(630) 810-0444
Fax: (630) 810-0745

RESTORATIVE AND IMPLANT
DENTISTRY OF BAYSIDE

Sameet S. Sheth, DDS, FACP

38-39 BELL BLVD, SUITE 250
BAYSIDE, NY 11361

PHONE (718) 428-7474
FAX (718) 428-0448
BAYSIDESSSMILE@GMAIL.COM

PROSTHODONTISTS
SCHWEITZER &
SCHWEITZER, PC
ESTABLISHED 1918

SAMEET S. SHETH, D.D.S., F.A.C.P.
DIPLOMATE AMERICAN BOARD OF
PROSTHODONTICS
ESTHETIC, RESTORATIVE AND IMPLANT DENTISTRY

133 EAST 58TH STREET, SUITE 803
NEW YORK, NY 10022
www.schweitzerdental.com

TEL 212-759-4060
FAX 646-735-1843
info@schweitzerdental.com

‘महाराष्ट्र मंडळ शिकागो’च्या कार्यक्रमांचा प्रवास...

८०च्या दशकातील - नाटक

२०१८ - शिकागो मराठी शाळा प्रस्तुत - “शिवचरित्रगाथा”

१९८२ - मुलांची नाटुकली

२०१७ - शिकागो मराठी शाळा प्रस्तुत - “पसायदान”

१९८५ - भारतीय स्वातंत्र्य दिन

१९८५ - लेझीम

नाटक - घरोघरीची बोंब

१९९४ - भारतीय स्वातंत्र्य दिन

२०१७ - संत ज्ञानेश्वरांच्या चरित्रावर आधारित नृत्य-नाटिका - “माऊली”

'रचना'चा प्रवास...









Panshikar™
TASTEAURANT
Girgaon | Vile Parle | Bandra
Email: panshikarfoods@gmail.com
Website: www.panshikarfoods.com

पत्रास कारण की...(वर्ष १९९६-२०००)

॥ श्री ॥

प्रिय मायमराठीस आणि तीर्थरूप महाराष्ट्र यांस
शि. सा. न. वि. वि.

पत्र लिहिण्यास कारण की, आता मी, महाराष्ट्र मंडळ शिकागो, तुमची कन्यका ५० वर्षांची झाले. तुमच्या आशीर्वादाने आणि संस्कारांमुळेच मी इथवर पोहोचले आहे. त्या निमित्ताने गत आयुष्यातील अनेक आठवणींना उजाळा मिळाला. कागदी पत्र लिहिण्याची कला आजकाल लुप्त झाले नी त्याची जागा इ-पत्राने घेतली आहे. त्यामुळेच हा पत्रप्रपंच! असो.

१९९६ साली राजीव गोखले, त्यांच्या पत्नी सुनंदा गोखले, सुपुत्र संकेत आणि सुयश यांनी सहकुटुंब अध्यक्ष म्हणून तर विलास सावरगांवकर, हेमा पाटील यांनी उपाध्यक्ष होऊन तसेच खजिनदार डॉ. सुरेश तलाठी, नी सचिव मंगेश करंदीकर या सर्वांनी माझी उत्तम काळजी घेतली. त्यांना साथसंगत लाभली, मनोज भट, रेखा देवधर, नमिता वेदक, प्रल्हाद पाटील, सुरेश पांडव, प्रकाश टोके, वीर दोशी या सर्व मित्रमंडळींची!

मला आठवतंय. त्यावर्षी "मराठी सजली बहुरंगाने" नावाचा महाराष्ट्राची संस्कृती दर्शवणारा संगीत, नाट्य, नृत्य, गायन यांनी नटलेला कार्यक्रम आबालवृध्दांनी जोमात सादर केला होता. स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन द्यायचे असे ठरवलेच होते मुळी! विद्या चाफळकर या त्या कार्यक्रमाच्या दिग्दर्शिका होत्या, नी रश्मी चाफेकर, अजय चित्रे त्यातील मुख्य कलाकार. 'लिबर्टीव्हिल हायस्कूल'मध्ये ६५० लोकांच्या उपस्थितीत ३ तास रंगला होता हा जल्लोष!

त्याच वर्षी श्री. शंकरराव हुपरीकर यांच्या शिकागोतील नाट्यसेवेला २५ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने सत्कार सोहळा आयोजित केला होता. "अश्रुंची झाली फुले" हे दमदार नाटक सादर केले होते. रजत महोत्सवाच्या निमित्ताने 'रचना' या त्रैमासिकाची विशेष आवृत्तीदेखील काढली होती. आता 'रचना'चा अंक टंकलिखित करुन छापला जाउ लागला होता. हे सर्व काम श्री. नारायण करंदीकर अतिशय आस्थेने करत होते. स्मरणिका प्रकाशनामार्फत $१३००० अशी वर्गणी पण जमवली होती. याच काळात शिकागोस्थित मराठी समाजसेवक, शास्त्रज्ञ, कलाकार यांचा सत्कारदेखील केला होता. अरे हो सांगायचे राहिलेच बघा! सहलीमध्ये सर्वांचा प्रिय खेळ क्रिकेटचा समावेश केला होता. आजीआजोबांच्या २-३ वेळां भेटीगाठी घडवून आणल्या होत्या. नेहमीप्रमाणे शिकागोच्या गृहिणींनी आपल्या पाककौशल्याने संक्रातीला सुग्रास भोजन खाऊ घातले होते. उर्वरित कार्यक्रमांना मात्र त्यांना थोडा मोकळा वेळ मिळून कार्यक्रमाचा आस्वाद घेता यावा म्हणून बाहेरूनच भोजन आणण्याची व्यवस्था केली होती. मंडळामध्ये RSVP प्रकार अस्तित्वात नसल्याने अंदाजाने जेवणाची सोय करावी लागली प्रत्येक कार्यक्रमाला! स्थानिक गायकांना प्रोत्साहन देण्यासाठी बेसमेंटमध्ये गायन कार्यक्रम आयोजित केले होते. प्रथम गायन सभा शोभन मयंकर यांच्या तळघरामध्ये संपन्न झाली. संक्रांत, गुढीपाडवा, सहल, गणेशउत्सव, दिवाळी, दिंडी असे अनेक सणवार, कार्यक्रम करत शिकागो आणि त्याच्या उपनगरांमधील २५० हून अधिक मराठी कुटुंबांनी माझी व्यवस्थित काळजी घेतली.

१९९७ सालामध्ये अध्यक्ष डॉ. सुरेश तलाठी यांनी पत्नी स्नेहिता आणि मुले अभिजित, अद्वैत, भाचा धीरज गांधी यांच्यासह, उपाध्यक्ष म्हणून विलास सावरगावकर व मधुमती देशमुख, सचिव शिल्पा करंदीकर व अंजली पाटील, खजिनदार प्रकाश टोके यांनी माझी उत्तम बडदास्त ठेवली होती. त्यांना साथसंगत लाभली ऊर्मिला देशपांडे, अच्युत देशपांडे, मंगेश करंदीकर, उदय देव, मुग्धा देव, शशांक चिटणीस, नारायण करंदीकर, प्रभाकर काणे व डॉ. हणमंत देशमुख या मित्रमंडळींची!

शशांक चिटणीसने तर दिवाळीला १० फूट उंच नी ५ ते ६ फूट रुंद आकाश-कंदील बनवला होता. तसेच पितामह भारत देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्त चित्ररथ सजवला होता. डेव्हॉन ॲव्यॅन्यु वरच्या त्या मिरवणुकीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमिका वठवली होती मिलिंद पानट यांनी, तर सर्व लहान मुले झाली होती मावळे! सर्व स्त्रिया नऊवारी परिधान करुन हातात बाबा आमटे, पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या तसबिरी घेऊन बसल्या होत्या. संक्रांतीला आपलेच जुनेजाणते कलाकार सुभाष नाडकर्णी, शैला खेडकर, मंगल गडकरी, श्याम अमलाडी यांनी संगीताचा कार्यक्रम सादर केला. सर्वांच्या आवडीच्या ४०० गुळपोळ्या स्नेहिता तलाठी आणि देशमुख काकू यांनी प्रेमाने बनवून खाऊ घातल्या. तसेच त्यांनी इतर सुगरणींच्या मदतीने मोदक, पुरणपोळ्या हेही पदार्थ वर्षभरात बनवले होते. नारायणराव करंदीकर आणि मंगेश करंदीकर यांच्या साहाय्याने प्रकाशित 'रचना'चे अंक होतेच जोडीला! त्यावर्षी Consulate General Of India प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. लहान मुलांसाठी खास अशी सामान्य-ज्ञान विषयाची स्पर्धा आयोजित केली होती. त्याबद्दलची माहिती सर्व इच्छुकांना 'रचना'मधून वेळेवर कळवली होती. गुढीपाडव्याला फिलाडेल्फिया वरून संगीताचा

कार्यक्रम करायला संगीता नेरुरकर आल्या होत्या नी त्यांना तबल्यावर आपल्याच मंडळातील अरविंद देवभक्त यांनी साथ दिली. याच वर्षी पंडित हृदयनाथ मंगेशकर यांचा 'भावसरगम' सगळ्यांनी अनुभवला; तोही प्रथितयश कलाकार शरद तळवलकर आणि एअर मार्शल चिटणीस यांच्या सोबत!

डॉ. श्याम शेठ यांच्या घराच्या तळघरात "मी सावित्रीबाई फुले बोलतेय" हा एकपात्री प्रयोग प्रसिध्द कलाकार सुलभा देशपांडे यांनी सादर केला. "महाभारतातला दुर्योधन" विषयावर राम शेवाळकर यांचे भाषण, "पृथ्वीचं प्रेमगीत" नावाची डॉ. मीना नेरुरकर यांनी सादर केलेली संगीतिका, "४ दिवस प्रेमाचे" नाटकाचा प्रशांत दामले, सविता प्रभुणे, कविता लाड, अरुण नलावडे अभिनीत आणि सुधीर भट, गोपाळ अलगेरी निर्मित नाटक-दौरा अशा अनेक उत्तमोत्तम कार्यक्रमांची रेलचेल असलेले हे वर्ष!

त्या वर्षी कलाकार, प्रमुख पाहुणे आणि मंडळाच्या कार्यकारिणी सदस्यांना स्मृतिचिन्ह स्वरुप चांदीच्या Keychain भेट दिल्या. त्याही "महाराष्ट्र मंडळ शिकागो - Key to your Culture" या संदेशासह!

राजीव गोखले	**सुरेश तलाठी**	**विलास सावरगावकर**	**मिलिंद जोगळेकर**	**मिलिंद पानट**
१९९६ अध्यक्ष	१९९७ अध्यक्ष	१९९८ अध्यक्ष	१९९९ अध्यक्ष	२००० अध्यक्ष

१९९८ साली धडाडीचा कार्यकर्ता विलास सावरगावकरच्या अध्यक्षतेखाली पत्नी शुभदा, उपाध्यक्ष मिलिंद पानट व पुष्पा प्रचंड यांनी तसेच सचिव अविनाश पटवर्धन, खजिनदार शिरीश नाडकर्णी या सर्वांनी नितीन जोशी यांच्या साहाय्याने माझी उत्तम काळजी घेतली. मंडळाच्या इतिहासातील पहिलाच नाट्यमहोत्सव ६५० लोकांच्या उपस्थितीत धुमधडाक्यात साजरा झाला. हुपरीकर, गोडबोले, वैद्य या मातबर व्यक्तींनी नाट्यमहोत्सवात हातभार लावला. नाटकांची तिकिटे हाताने लिहून लोकांना पोस्टाच्या मदतीने पोचती केली. तब्बल $४५००० एवढा भला मोठा निधी गोळा झाला होता. "व्यक्ती आणि वल्ली", "मोरूची मावशी", "सुंदर मी होणार" अशी एकाहून एक सरस नाटके सादर झाली. तीदेखील नव्यानेच उघडलेल्या 'बार्टलेट हायस्कूल'मध्ये! शुभदा सावरगावकर हिने प्रेक्षागृहातील आसनांचा नकाशा स्वतः हाताने बनवला, नी लोकांना सीट नंबरही दिले. दीपप्रज्वलन अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या त्या वेळेच्या अध्यक्ष भक्ती बर्वे यांच्या हस्ते केले होते. 'स्टेट बँक ऑफ इंडिया'चे तत्कालीन अध्यक्ष पटवर्धन आणि शिकागोतील आपल्या दांगट काकांचे भाऊ जे महाराष्ट्राचे विद्यमान आमदार होते, ते दोघेही उद्घाटन सोहळ्यास उपस्थित होते. मंडळात प्रथमच लहान मुलांना सांभाळायला 'बेबी सिटर'ची व्यवस्था केली होती. गुढीपाडव्याला श्रीकांत मोघे यांचा कार्यक्रम, दिवाळीला डॉ. क्षमा वैद्य यांचे संगीत-नाटक या काही ठळक आठवणी! क्षमा ताई स्वतः ऑर्गन घेऊन आल्या होत्या. तत्कालीन उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे साहेब व हर्षवर्धन पाटील आले होते. न्यू जर्सी मधून किशोर रानडे, किरण जोगळेकर बहारदार संगीताचा कार्यक्रम घेऊन आले होते. 'रचना' त्रैमासिकामार्फत लोकांना कार्यक्रमाची माहिती मिळत असे. या वर्षी भोजन व्यवस्था पटेल, सुखाडिया यांच्या मार्फत केली. तीही $ ३ ते ४ या अत्यल्प दरात! शिकागो मधील 'Children's Museum' जवळील स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी विलास सावरगावकर मंडळाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहिले होते.

त्या वर्षीचे बोधवाक्य होते - "मराठी तितुका मेळवावा! एकमेका साह्य करु". वर्षभरात कार्यकर्त्यांची कुटुंबे काम करता करता इतकी जवळ आली की, ते जिव्हाळ्याचे संबंध आजही टिकून आहेत!

मार्गात आलेल्या अडीअडचणींवर मात करत मी इथवर पोहोचले होते. १९९९ साली मला माझे पुढचे भवितव्य अंधुक दिसत असतानाच अध्यक्षपदाची धुरा मिलिंद जोगळेकरच्या खांद्यावर दिली गेली आणि त्यानेही पत्नी मृणाल, मुले सविता व विवेक यांच्यासह, उपाध्यक्ष सतीश जोशी व नंदिनी दाते, सचिव नीला लेले, खजिनदार सुनंदा गोखले या सर्वांच्या साथीने लीलया पेलली. अर्थातच त्यांना साथ होती नितीन जोशी, डॉ. चंद्रशेखर व मोहिनी जोशी, नीला देशमुख, शिल्पा ठोसर,शिरीष दर्शने या मित्रमंडळींची!

आत्तापर्यंत मंडळाच्या सभासद संख्येमध्ये १००-१२० कुटुंबाची भर पडली होती. वर्षभर आपले नेहमीचेच संक्रांत, गुढीपाडवा, गणपती, दिवाळी असे मुख्य सण अतिशय उत्साहाने साजरे केले. संक्रांतीचा कार्यक्रम आर्य समाज मंदिरामध्ये साजरा केला. "Bottoms

Up" नावाचे इंग्लिश व हिंदी भाषेतलं नाटक भरत दाभोळकर, गोपाळ अलगेरी, तनाज करीम घेऊन आले होते. गणपतीला प्रभाकर कारेकर यांचा कार्यक्रम होता. जोडीला आपल्याच शिकागो मधील शंकरराव हुपरीकर यांचे नाटक होतेच! १५ ऑगस्टच्या 'Consulate Of India'च्या कार्यक्रमात १२ जणांनी लेझीम सादर केले होते.

प्रत्येक कार्यक्रमाच्या आधी २ आठवडे मंडळाच्या कार्यकारिणीची बैठक घेऊन सविस्तर आराखडा ठरवला जायचा. तसेच कार्यक्रम संपला की, श्रमपरिहाराचा कार्यक्रम असायचाच. कार्यक्रमांची माहिती फोनद्वारे सदस्यांना कळवली जायची. आपल्या सर्वांचे आवडते 'रचना' त्रैमासिक या वर्षी अनेक कारणांनी स्मरणीय झाले. त्यातले एक कारण म्हणजे त्यात लिहिलेल्या सूचना - प्रत्येकाने आपापली ताटली जेवण झाल्यावर उचलावी!

कुंटे काका मदत करायचे अध्यक्षीय लिहायला. जयश्री विटकर यांच्या 'ट्रॅव्हल एजन्सी'ची जाहिरात प्रत्येक अंकामध्ये होती. भोजनाची व्यवस्थाही गृहिणी स्वहस्ते बनवून करायच्या. एकदा एका शाळेमध्ये जेवण बनवायचे सामान आणले होते. परंतु 'बर्नर'ची सोय नव्हती तर चक्क 'वॉर्मर'लावून अलुमिनिमच्या 'फॉईल ट्रे'मध्ये २ तासात जेवण बनवले होते! आहात कुठे! त्यावेळी RSVPची सोय नसल्याने अंदाजानेच जेवणाची व्यवस्था करावी लागत होती. अशा प्रकारे वर्ष सुरळीत पार पडले, नी मी Y2K चे स्वागत करायला सज्ज झाले.

२००० साली अध्यक्ष मिलिंद पानट यांनी पत्नी वृषाली, मुले मैथिली व मिहीर यांच्यासह, उपाध्यक्ष नितीन जोशी, सचिव मोहिनी जोशी, खजिनदार नीला लेले यांनी उत्तम काळजी घेतली माझी! शिरीष दर्शने तर प्रत्येक कार्यक्रमाला स्वखर्चाने चहा, कॉफीची व्यवस्था बघत होता. मला सांभाळायचे शिवधनुष्य पेलायला ही मंडळी कंबर कसून कामाला लागली होती. पूर्ण वर्षभराची $८० एवढी वर्गणी भरून मंडळाचे सदस्यत्व अनेक जणांनी घेतले. संक्रांतीला स्थानिक कलाकारांच्या कार्यक्रमाला साधारण १२५ च्या आसपास लोकांची उपस्थिती होती. तर तोच आकडा दिवाळीला ४०० पर्यंत पोहोचला होता. गुढीपाडव्याला संजीव अभ्यंकर यांचे शास्त्रीय गायन रंगले होते. मंडळाच्या कारकिर्दीमधला दुसरा नाट्यमहोत्सव साजरा केला. सुयोग निर्मित "एकदा पाहावं करुन", "शुssकुठे बोलायचे नाही", "श्री तशी सौ" ही नाटके सादर झाली. भोजन-व्यवस्था 'पटेल ब्रदर्स'च्या "अन्नपूर्णा"ने केली होती. RSVP इ पत्राने करण्यास याच काळात सुरुवात केली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मंडळाची प्रगती साधायची असा मार्ग अवलंबला होता. 'रचना'ची जमवाजमव करताना सगळे कार्यकर्ते एकत्र येत. तेव्हा जी काय धमाल उडायची की, शब्दच अपुरे पडतील! साधारण अंकाच्या ३०० प्रती छापाव्या लागायच्या. 'रचना'मध्ये जाहिरात करायचा दर होता, $७५! नेहमीप्रमाणे डॉ. सांबारे यांनी जाहिरात देऊन मदत केली. सालाबादप्रमाणे संक्रांत, गुढीपाडवा, गणपती, दिवाळी, सहल, '१५ ऑगस्ट'निमित्त चित्ररथ हे सर्व कार्यक्रम उत्साहाने साजरे केले. त्याची माहिती सदस्यांना 'रचना'मार्फत कळवलीच पण 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'ची वेबसाईट पुरेपूर वापरली. याच काळात संगीतकार अशोक पत्की, वंदना गुप्ते, विजय केंकरे, प्रशांत दामले, भारती आचरेकर अशा कितीतरी प्रथितयश कलाकारांनी आपली कला शिकागोच्या या पावन भूमीत सादर केली. एक मजेशीर किस्सा आठवतोय तो असा की, वंदना गुप्ते यांनी स्वतः चिकन बनवून २५ लोकांना खाऊ घातले होते.लहान मुलांना 'डिस्ने'चे चित्रपट दाखवून किंवा चित्रकला काढायला देऊन मनोरंजन केले.

आयुष्यातील महत्वाचे एक एक टप्पे पार करत मी आता पन्नाशीला आले. बरे, वाईट अनुभव घेऊन तावून, सुलाखून निघाले, नी हे बावनकशी सोने अजून झळाळून उठले. दिवसेंदिवस माझ्या कर्मभूमीत अमेरिकेत आलेल्या मराठी बांधवांच्या सहवासात मी फुलत आहे, बहरत आहे. माझे पुढे काय होणार, ही चिंता आता मला नाही. माझ्या पुढच्या प्रवासात तुमचे अनंत आशीर्वाद पाठीशी असू द्या.

कळावे, लोभ असावा.

तुमचीच,

म. म. शि. (महाराष्ट्र मंडळ शिकागो)

लेखन प्रपंच - **उल्का नगरकर**

ता. क. अनवधाने काही आठवणी शब्दांत मांडायच्या राहून गेल्या. पण त्या आजही मनांत साठवल्या आहेत.

"Best wishes to MMC for 50th year celebration"

In loving memory of "Sunny"

From - Ulka, Ashish, Savni, Saloni

& Happy Nagarkar

दिलीप प्रभावळकर यांच्याशी हितगुज

मराठी चित्रपट, नाटक नि साहित्यिक जगतातील एक उत्तुंग व हरहुन्नरी व्यक्तिमत्व म्हणजे दिलीप प्रभावळकर. महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या सुवर्ण महोत्सवाच्या स्मरणिकेनिमित्त त्यांच्याशी गप्पा मारण्याचा योग नुकताच आला. त्यांचा महाराष्ट्र मंडळ शिकागोशी खूप जुना ऋणानुबंध आहे. त्यांच्या गेल्या ३५ ते ४० वर्षांच्या कलाजगतातील प्रवासात, आम्हां शिकागोकरांना ७ ते ८ वेळा त्यांच्या कलाविष्कारांचा आस्वाद घेण्याचे भाग्य लाभले आहे. दिलीपकाकांनी बायोफिसिक्समधून पदव्युक्तर पदवी व भाभा अणुशक्ती संशोधन केंद्रामधून डिप्लोमा घेतल्यानंतर काही वर्षे फार्मास्युटिकल कंपनीत काम केले. त्या काळात त्यांनी प्रायोगिक रंगभूमी आणि बालनाटकांमध्ये अनेक कामे केली. १९९१ नंतर मात्र त्यांनी मराठी रंगभूमीला पूर्ण वेळ देण्याचे ठरविले. त्याच दरम्यान १९९३ साली अमेरिकेतल्या पहिल्या व्यावसायिक नाटकांच्या दौऱ्यामध्ये त्यांनी आपल्या 'हसवाफसवी' नाटकाचे जवळ जवळ १५-१६ प्रयोग करून इथल्या रसिकांची मने जिंकून घेतली. त्यातल्या सर्वात जास्त लक्षात राहिलेल्या तीन प्रयोगांपैकी एक प्रयोग म्हणजे शिकागोतला. प्रेक्षकांची भरभरून दाद व पुण्यामुंबई सारखी प्रयोगाला झालेली तुडुंब गर्दी, यामुळे दिलीपकाकांचा तो दौरा संस्मरणीय ठरला, इथल्या रसिक प्रेक्षकांसाठी तसेच त्यांच्यासाठीही. त्यावेळची एक गमतीशीर आठवण म्हणजे ह्या नाटकातले हेमू अधिकारी, सुषमा सावरकर व ते स्वतः हे प्रमुख कलाकार सोडले तर बाकीचे सहकलाकार एअर इंडियाचे होते. त्यांना प्रवासाची मिळणारी सवलत नि उपलब्धी इथल्या दौऱ्याला पूरक बनली. परंतु दोन/अडीच महिन्यांच्या ह्या दौऱ्यात सहकलाकारांची एक बॅच जाऊन दुसरे बदली सहकलाकार येण्यात थोडा वेळ गेल्याने इथल्या स्थानिक कलाकारांनी तात्काळ मदत केली. सुभाष केळकरांनी इथल्या प्रयोगाला संगीत सांभाळले. ह्या अमेरिकेच्या पहिल्या दौऱ्याने दिलीपकाकांच्या परदेशी नाट्यप्रवासाचा नारळ फुटला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यानंतर त्यांनी आपल्या वैविध्यपूर्ण नाट्यप्रयोगांनी देशोदेशींच्या प्रेक्षकांच्या मनांवर राज्य केले.

बऱ्याच बालनाटकांमधून भूमिका केल्यावर 'लोभ नसावा ही विनंती' ह्या नाटकाद्वारे सुरू झालेला त्यांचा नाट्यप्रवास अजूनही अविरत चालू आहे. 'वासूची सासू', 'चूकभूल दयावी घ्यावी', 'संध्याछाया', 'एक झुंज वाऱ्याशी', 'अलबत्या गलबत्या', 'आरण्यक' ह्या सारख्या अनेक नाटकांतील त्यांच्या भूमिका गाजल्या आहेत. मराठी रंगभूमीवर त्यांचे फार मोठे योगदान आहे. तीन वेगवेगळ्या माध्यमांतील महत्वाचे राष्ट्रीय पुरस्कार त्यांना लाभले आहेत. 'बोक्या सातबंडे' ह्या पुस्तकासाठी राष्ट्रीय साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार, 'लगे रहो मुन्नाभाई' मधील महात्मा गांधीजींच्या भूमिकेसाठी फिल्म पुरस्कार, आणि मराठी रंगभूमीवरील उल्लेखनीय योगदानासाठीचा संगीत नाटक अकादमीच्या राष्ट्रीय पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले गेले आहे.

दिलीपकाकांचे कार्यक्षेत्र फक्त मराठी रंगभूमीपर्यंतच मर्यादित नसून त्यांनी विविध माध्यमांतून आपला कलाविष्कार चोखंदळ प्रेक्षकांसमोर सादर केला आहे. दूरदर्शनच्या विविध वाहिन्यांवरून त्यांच्या अनेक मालिका प्रसारित झाल्या आहेत. त्यांनी सत्तरीच्या दशकात दूरदर्शनवर साकारलेला चिमणराव तर त्याकाळी प्रत्येक मराठी घरातला एक सदस्य झाला होता. तसेच 'श्रीयुत गंगाधर टिपरे'मधील आबा अगदी सगळ्यांचे आजोबा झाले होते.

मराठी रंगभूमीवर काम करता करता त्यांनी मराठी नि हिंदी चित्रपट सृष्टीतही गेले ३५ ते ४० वर्षे आपला ठसा उमटवलेला आहे त्यांच्या 'चौकट राजा' ह्या चित्रपटातील मतिमंद मुलाच्या भूमिकेने ऑटिझम सारख्या ज्वलंत समस्येवर प्रेक्षकांना खोलवर विचार करणे भाग पाडले. त्यांच्या मते ॲक्टर म्हणून केलेल्या अशा काही कॅरॅक्टरचा माणूस म्हणून तुमच्यावर परिणाम होतो आणि माणुसकीच्या ह्या ओलाव्याचा तुम्हाला कुठलेही कॅरॅक्टर करताना उपयोग होतो. हाच माणुसकीचा ओलावा ते आपल्या सामाजिक कार्यातूनही जपून आहेत. 'पुणे ब्लाइंड मेन असोसिएशन'साठी ते ऑडिओ पुस्तके बनवायला मदत करतात. तसेच 'कामायनी' संस्थेसारख्या मतिमंद मुलांच्या काही शाळांनाही ते जमेल तसा हातभार लावतात. 'एक डाव भुताचा', 'झपाटलेला', 'नारबाची वाडी आणि इतर अनेक चित्रपटांतील एका पेक्षा एक सरस नि दर्जेदार विविधांगी व विविधढंगी भूमिकांनी त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत अढळ स्थान मिळवले आहे. केवळ देहबोलीनेसुध्दा विनोद फुलवणारा त्यांच्यासारखा कलाकार अगदी आगळावेगळाच. अतिशय अभ्यासपूर्वक प्रत्येक भूमिकेशी समरस होऊन रसिकांसमोर उत्तमोत्तम कलाकृती सादर करण्यात ते नेहमीच यशस्वी ठरले आहेत. मराठी बरोबरच हिंदी चित्रपटसृष्टीतही त्यांनी अनेक चित्रपट सादर केले आहेत.

रंगभूमी, दूरदर्शन, मराठी हिंदी चित्रपटसृष्टी ह्यात इतके व्यस्त असूनही त्यांच्यातला साहित्यिक, लेखक त्यांनी जोपासला आहे. त्यांची आत्तापर्यंत २७-२८ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांना अनेक साहित्यिक पुरस्कारही लाभले आहेत. त्यांच्यातला लेखक

संपादकांना दिसल्यामुळे त्यांचे एवढे लिखाण होत गेले असे ते म्हणतात. गंमत म्हणजे त्यांच्या वृत्तपत्रातील स्तंभलेखनाचीही काही पुस्तके झाली नि नाटकही. ते स्वतः नट असल्याने त्यांच्या लिखाणात दृश्यप्रभाव जाणवतो नि ते लिहिताना जणू ते स्वतः त्या भूमिका जगत असतात. त्यांच्या लहान मुलांसाठीच्या 'बोक्या सातबंडे' ह्या पुस्तकमालिकेने आमच्यासारख्या अनेकांचे बालपण साहसपूर्ण केले आहे. मजा म्हणजे ह्याच पुस्तकावर आधारित एक बालनाटक २०१४ मध्ये त्यांच्याच उपस्थितीत आमच्या शिकागोवासी बालकलाकारांना सुचेता चितगोपीकर ह्यांच्या दिग्दर्शनाखाली सादर करण्याचे भाग्य लाभले होते. इथे जन्मलेल्या मुलांनी इतक्या स्पष्ट मराठीतून स्वतः आनंद घेत घेत त्यांचे नाटक उत्तमपणे सादर केले, की त्याबद्दल दिलीपकाकांनी मुलांचे खूप कौतुक करून प्रोत्साहन दिले.



१९९३ च्या 'हसवाफसवी'च्या यशस्वी प्रयोगानंतर ते सुधीर भटांबरोबर ९५ सालीसुध्दा 'चूक भूल द्यावी घ्यावी' ह्या नाटकासाठी शिकागोला आले. २००१ साली त्यांनी 'नांदा सौख्य भरे' हे नाटक शिकागोला सादर केले. त्यानंतर त्यांना २००२ मध्ये सुधीर भटांसोबतच चार नाटकांच्या संचापैकी 'नातीगोती' हे गंभीर ढाच्याचे नाटक सादर करण्याचा योग आला. ह्या नाट्यमहोत्सवासाठी भारतातून जवळजवळ २१-२२ कलाकारांचा ताफा आला होता. नातीगोतीमध्ये अतुल परचुरे, स्वाती चिटणीस नि मोहन जोशी ह्यांच्या समवेत त्यांनी साकारलेली मतिमंद मुलाच्या वडिलांची भूमिका रसिकांची खास दाद मिळवून गेली. ह्या दौऱ्यात त्यांचे आदरातिथ्य शिकागोवासी दिघे काकाकाकूंनी केले.

२००४ मध्ये त्यांनी एका आगळ्यावेगळ्या नाट्यप्रयोगासाठी अमेरिकेत आगमन केले. ते होते न्यू जर्सीस्थित डॉ. प्रकाश लोथे ह्यांनी लिहिलेले 'वाटचाल' हे नाटक. अमेरिकेत नव्याने आलेल्या जोडप्याचे इथल्या परिस्थितीशी नि संस्कृतीशी जुळवून घेताना झालेल्या तारांबळीचे विनोदी चित्रण दर्शविणारे अमेरिकेतच लिहिलेले, इथेच बसवलेले नि फक्त अमेरिकेतच प्रयोग झालेले ते अभिनव नाटक त्यांनी विजय केंकरे व इला भाटे ह्यांच्या समवेत सादर केले.

२००५ साली त्यांनी विजय केंकरे दिग्दर्शित 'आप्पा आणि बाप्पा' हे नाटक विक्रम गोखलेंबरोबर सादर केले. त्यांनतर २०१२ साली डॉ. चंद्रशेखर फणसळकर लिखित नि विजय केंकरे दिग्दर्शित 'वाह गुरु' या नाटकाच्या निमित्ताने त्यांचे शिकागोला परत येणे झाले. ह्या एकाच नाट्यप्रयोगाला लेखक डॉ. फणसळकर आपल्या व्यस्त व्यवसायातूनही वेळ काढून उपस्थित राहू शकले हा उत्तम योग जुळून आला होता. त्यांचे सगळ्यांचे आदरातिथ्य विद्या व रवी जोशी ह्यांनी केले. त्या वेळची गंमत म्हणजे दिलीपकाका योगा करतात हे कळल्यावर शिकागोस्थित योगप्रशिक्षक अनुपमा बुझरुक ह्यांनी सुचविलेल्या काही योगमुद्रा नि योगदिनचर्या काकांनी इथल्या मुक्कामात आवडीने केल्या नि त्या वेळच्या अनेक आठवणी त्यांनी गप्पांच्या ओघात आवर्जून सांगितल्या. नंतर २०१४ साली ते 'चिमणराव ते गांधी' हा त्यांचा एकपात्री नाट्यप्रयोग घेऊन आले. त्यावेळेस त्या वर्षीचे 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'चे अध्यक्ष केदार नि अनिता नवकल यांनी त्यांचे आदरातिथ्य केले.

दिलीपकाकांचे शिकागोशी असलेले हे प्रेमाचे नाते असेच वर्षानुवर्षे दृढ होत गेलेले आहे. दर वेळेला शिकागोवासीयांनी दिलेली दाद नि उत्तम प्रतिसाद ह्यांनी ते अधिकच वृध्दिंगत झाले आहे. दिलीपकाकांना आपले शिकागो शहर, इथले सुनियोजित आर्किटेक्चर, आपल्या संस्कृतीशी नाते जपणारी मराठी माणसे खूप आवडतात. सजगपणे उत्साहाने सण साजरे करणारे आपले शिकागो महाराष्ट्र मंडळ हे आपल्या देशाशी, मातीशी नि माणसांशी जोडणारा एक पूल वाटतो असे ते कौतुकाने म्हणतात. इथे वाढलेल्या मुलामुलींचा ह्या वाढत्या परिवाराला असाच उदंड प्रतिसाद मिळो, असेच उत्तमोत्तम उपक्रम अधिक जोमाने चालू राहोत आणि महाराष्ट्र मंडळ शिकागो अशीच उत्तरोत्तर प्रगती करत राहो, अशा सदिच्छा दिलीपकाकांनी सुवर्ण महोत्सवानिमित्त व्यक्त केल्या आहेत.

मुलाखत व शब्दांकन: वर्षा राहुल विसाळ

"Congratulation Maharashtra Mandal Chicago for 50 Successful years and Best Wishes for Next 50 Prosperous years"

Ojas, Inder And Amol Patil

महाराष्ट्र मंडळ शिकागो वर्ष २००१-२००५ या कालखंडातील अध्यक्षांशी संवाद

स्वयंसेवकांवर आधारित सामाजिक संस्थेचे कार्य म्हणजे कार्यकारिणीचे नेतृत्व व प्रत्येक सहकाऱ्याचे कर्तृत्व याची गोळाबेरीज असते. महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या सन २००१-२००५ कालखंडातील अध्यक्षांशी मी काही ई-प्रश्नोत्तरातून संवाद साधला; आणि त्यातून शब्दबध्द झाले, महाराष्ट्र मंडळ शिकागोविषयक काही मौलिक क्षण, काही सुवर्णस्मृतीकण!

२००१ साली महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या (मंडळाच्या) अध्यक्षपदावर असलेल्या **ऊर्मिला दाते** सांगतात, "मी मंडळाच्या अध्यक्षपदावर काम करीन, असे मला अजिबात वाटले नव्हते. मात्र परदेशात मराठी समुदायाला एकत्र आणणाऱ्या या मंडळाचे आपण बरेच देणे लागतो, याची जाणीव होती." अमेरिकेमधे आल्यावर दोन आठवड्यातच मंडळाच्या कार्यक्रमाच्या वेळी त्यांनी त्यांचा भेळीचा स्टॉल टाकला होता. आणि त्यादिवसापासून त्यांना मंडळात अनेक मित्रमैत्रिणी आणि मानसिक आधार मिळाला. सुरुवातीला या देशात जम बसवतांना त्यांना अतिशय अवघड परिस्थितीतून जावे लागल्याने, महाराष्ट्र मंडळाच्या कामात मदत करण्यास सवडच नव्हती. काही काळानंतर त्यांनी त्यांचे ग्रोसरी स्टोअर आणि रेस्टॉरन्टचा व्यवसाय बंद केला. साधारण १९९७च्या सुमारास त्या पुन्हा नोकरी करू लागल्यावर शनिवार, रविवार जरा मोकळा वेळ मिळू लागला, व मग त्यांनी मंडळाच्या कार्यकारिणीवर काम करायचे ठरवले.

१९९९ आणि २००० अशी सलग दोन वर्षे ऊर्मिला दाते यांनी महिला उपाध्यक्ष पदावर कामाचा अनुभव घेतल्यावर २००१मधे अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली. त्यांच्या समवेत श्री प्रकाश टोके व सौ. अनुपमा खेर उपाध्यक्ष, अंजली पाटील - कोषाध्यक्ष, सतीश दिवेकर सचिव, विलास सावरगावकर, मिलिंद जोगळेकर, मिलिंद पानट हे तिघे विश्वस्त समितीवर आणि अनेकजण विस्तारित समितीवर व स्वयंसेवक म्हणून साथीला होते. त्यावर्षी नेहमीच्या पाच कार्यक्रमांव्यतिरिक्त अजून सात कार्यक्रम झाले. संक्रातीच्या कार्यक्रमांस स्थानिक गायकांच्या, वाद्यवृंदांच्या प्रतिभेस वाव दिला गेला. बँक्वेट हॉलमधे त्यावर्षी 'तू तिथे मी' हा मराठी चित्रपट प्रदर्शित केला व त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. २००१च्या कार्यकारिणीने मंडळाच्या पूर्वीच्या सर्व अध्यक्षांनाही व्यासपीठावर आमंत्रित करून त्यांचा सत्कार केला होता.

त्या काळात फार कमी लोक संगणक वापरत. RSVP देणाऱ्यांचे प्रमाण अगदीच कमी होते. त्यामुळे कार्यकारिणीला अंदाजाने भोजनाची व्यवस्था करावी लागे. मंडळाची आर्थिक परिस्थितीही बेताचीच, त्यामुळे कार्यकारिणीचे सदस्य आणि स्वयंसेवकच कार्यक्रमांस उपस्थित राहणाऱ्यांसाठी जेवण बनवत असत. अशोक आणि नीला लेले, विवेक मोडक, वीर दोशी, अंजली पाटील आणि अजून बरेच मित्रमैत्रिणी (नाव राहिल्यास क्षमस्व) आणि 'सखी' गटाचीही ऊर्मिला दातेंना या कामात खूप मदत झाली. "त्यामुळेच मी महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या २००१वर्षाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी व्यवस्थित रीतीने सांभाळू शकले", असंही ऊर्मिला दाते आवर्जून सांगतात.

हाती घेतलेले काम उत्तमरीतीने पार पाडण्याचा दृढनिश्चय ही यशाची पहिली पायरी आणि निश्चय तडीस नेणे ही कर्तृत्वाची मोजदाद असते. याचेच उदाहरण- महाराष्ट्र मंडळ शिकागोचे १९९८ सालापासून कार्यकारिणी सभासद, २००० साली उपाध्यक्ष, **२००२ सालचे अध्यक्ष** आणि आजवर मंडळामधे कार्यरत - **नितीन जोशी.** त्यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीत अविनाश पटवर्धन व मोहिनी जोशी- उपाध्यक्ष, नीला लेले- खजिनदार, सतीश दिवेकर- सचिव, जयश्री जोशी, विवेक मोडक, शिरीष कीर्तने, सुनील ठोसर, शशिकांत करमरकर, समीर सावंत हे समिती सदस्य होते. याशिवाय, सुधाकर मोराणकर, मीनल ताम्हणे, आमोद देशपांडे, आशिष सोमण, अविनाश तळवलकर, उदय नाडकर्णी, केदार नावकल, मृणाल जोगळेकर, वृषाली पानट, वृंदा करमरकर, विजय देशपांडे विस्तारित समितीवर आणि मिलिंद जोगळेकर, मिलिंद पानट, ऊर्मिला दाते विश्वस्त म्हणून कार्यरत होते. मंडळाशी संलग्न आठवणीत डोकावत नितीन जोशी सांगतात -

"१९८६चा फेब्रुवारी महिना, मला अमेरिकेत येऊन फक्त काही महिने झाले होते. दिवसभर नोकरीच्या शोधात आणि पदरी पडणाऱ्या निराशेत दिवस जात होते. त्याच वेळी श्री. शंकरराव हुपरीकरांची ओळख झाली आणि त्यांनी नाटकात काम करशील का? असं विचारलं. 'दुरितांचे तिमिर जावो' हे ते नाटक. स्वतः शंकरराव, अनुपमा धारकर, अशोक शेंडे, अविनाश पटवर्धन, विजय जेरे अशी मातब्बर आणि अनुभवी मंडळी नाटकात होती, आणि इथूनच माझं महाराष्ट्र मंडळ शिकागोशी नातं जुळलं, आणि आजवर ते कायम आहे. मायदेशातले उबदार मायेचे पाश सोडून शिकागोतल्या कडाक्याच्या थंडीत आल्यावर मंडळाच्या रूपाने मला इथे अनेक स्नेही व जिवलग मित्र लाभले. माझी मधली काही वर्षे कामानिमित्त शिकागोबाहेर गेली, तरी १९९४ साली मंडळाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात मी इथे परतलो आणि ते ऋणानुबंध पुन्हा जुळले."

२००२ साली नितीन जोशींच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत कार्यक्रमांचा शुभारंभ श्री. विजय पारगांवकर ह्यांच्या 'शाम-ए-ग़ज़ल' ह्या आगळ्यावेगळ्या ग़ज़ल गायनाच्या कार्यक्रमाने झाला. गुढीपाडव्याला 'लपंडाव' हा विनोदी चित्रपट आणि नंतर जून महिन्यात 'सुयोग' निर्मित भव्य नाट्यमहोत्सव! दिलीप प्रभावळकर, रीमा लागू, प्रशांत दामले, सुनील बर्वे, संजय मोने, शुभांगी गोखले, राजन भिसे, अतुल परचुरे, मंगेश कदम, श्याम पोंक्षे असं दिग्गज कलावंतांचं लखलखणारं तारांगणच जणू रंगभूमीवर अवतरलं होतं. 'हीच तर प्रेमाची गंमत आहे', 'माझं घर', 'नातीगोती' आणि 'प्रियतमा' ही चार उत्कृष्ट नाटकं सादर केली गेली. ५०० हून अधिक प्रेक्षकांनी आपल्या भरघोस प्रतिसादाने हा नाट्यमहोत्सव गाजवला. ऑगस्टमधे जागतिक कीर्तीचे शब्दभ्रमकार रामदास पाध्ये आणि अपर्णा पाध्ये ह्यांचा सुप्रसिध्द बोलक्या बाहुल्यांचा कार्यक्रम झाला. गणेशोत्सवात सुप्रसिध्द गायिका सौ. वीणा सहस्रबध्दे ह्यांच्या शास्त्रीय आणि उपशास्त्रीय गायनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले. दिवाळीचा कार्यक्रम गाजला तो पं. शिवकुमार शर्मा ह्यांचे शिष्य डॉ. धनंजय दैठणकर ह्यांच्या संतूर वादनाने आणि सौ. स्वाती दैठणकर ह्यांच्या नृत्याच्या सादरीकरणाने. वाद्यसंगीताचा हा कार्यक्रम महाराष्ट्र मंडळात प्रथमच सादर झाला. अजून एक महत्त्वाचे म्हणजे, १९९९ सालापासून मंडळाची कायम स्वरूपाची ठेव एकत्रित करण्याचे कार्य श्री. मिलिंद जोगळेकर व श्री. वीर दोशी ह्यांच्या सहकार्याने २००२ साली पूर्ण झाले.

नितीन जोशी म्हणतात, " -'राहों की ज़हमतों का तुम्हें क्या सबूत दूँ, मंज़िल मिली तो पाओंमें छाले नहीं रहे|' या उर्दू शेरामध्ये म्हंटल्याप्रमाणे, मंडळाचे काम करताना आलेल्या अडचणी कार्यक्रम यशस्वी झाल्यावर विस्मृतीत जातात. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या जोडीला मंडळाने सामाजिक उपक्रम भविष्यात हाती घ्यावे अशी माझी विनंती आहे. मंडळाच्या यापुढील भरभराटीला माझ्या हार्दिक शुभेच्छा!" ...

विवेक श्रीकृष्ण मोडक १९९६ सालापासून 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'च्या कार्यक्रमांना सहकुटुंब सहपरिवार उपस्थित असतात. इ.स. १९९८, २००१,२००२ ह्यावर्षी ते मंडळाच्या कार्यकारिणीवर सदस्य आणि २००३ साली अध्यक्ष होते. आपल्या ह्या कारकिर्दीबद्दल विवेक मोडक सांगतात, "कार्यक्रमाआधीच्या, नंतरच्या, प्रवेशद्वारापासून ते व्यासपीठावरील आणि पडद्यामागील सगळया जबाबदाऱ्या हाताळल्या. मंडळाच्या आर्थिक बाबींमधे सहभाग नसला तरी निरीक्षणातून कल्पना आली होती. त्याकाळी सर्व वर्षांत नाटयमहोत्सवाला खूप व मंडळाच्या अन्य कार्यक्रमांना कमी उपस्थिती असे. नाटयमहोत्सवाच्या भरगोस उपस्थितीमधून होणाऱ्या उत्पन्नातून मंडळाचा इतर खर्च सहज होई, हे इतरांप्रमाणे मलासुध्दा जाणवले. २००३ साली- नाटयमहोत्सव न होणाऱ्या वर्षी मंडळाचे कार्यक्रम तोट्यात न जाऊ देण्याच्या जिद्दीने मी अध्यक्षपद स्वीकारले." त्यांच्यासह कार्यकारिणीमधे मराठी समाजाचे प्रतिबिंब दाखविणाऱ्या विविध वयोगटाच्या आणि व्यावसायिक अर्हतेच्या २२ कुटंबांतील २५ व्यक्तींचा समावेश होता. या कार्यकारिणीच्या कामकाजाची प्रमुख वैशिष्ट्ये:

- कार्यक्रमापूर्वी ३ आठवडे टपालाद्वारे सदस्यांकडे 'रचना' वार्तापत्राचे वितरण
- उपस्थिती वाढण्यासाठी कार्यक्रमापूर्वी प्रत्येक सदस्याशी नियमित दूरध्वनीसंपर्क
- नाट्यमहोत्सवाच्या उत्पन्नाविना वा प्रायोजक पुरस्कृत उत्पन्नाविना संपूर्णतः वर्षभरातील मंडळाच्या कार्यक्रम शुल्काच्या उत्पन्नावरच कार्यक्रमांचा खर्च करून वर्ष-अखेर मंडळाच्या गंगाजळीत भर
- खंडित झालेली वार्षिक आयकर-विवरणपत्र सादरीकरणाची कार्यवाही व्यावसायिक लेखापरीक्षक श्रीयुत भास्करराव केंकरे ह्यांच्या मार्फत पूर्ववत करून, दरवर्षी नियमित राहण्यायोग्य दीर्घकालीन कार्यप्रणाली कार्यान्वित

त्या वर्षी लायब्ररी ऑफ काँग्रेसचे ग्रंथपाल डॉक्टर ॲलन थॅचर ह्यांच्या विनंतीनुसार त्यांनी 'रचना'चा प्रत्येक अंक लायब्ररी ऑफ काँग्रेसमधे टपालाने रवाना केला. संक्रांतीनिमित्त कार्यक्रमांस उपस्थितांना सहभागी करून घेणाऱ्या 'अंताक्षरी' व 'शब्दवेध' ह्या कार्यक्रमाने २००३ वर्षाची सुरवात झाली. सादरीकरणात प्रचंड फरक असलेले पंडित जितेंद्र अभिषेकींचे दोन शिष्य- कुमार सुनील मुंगी व त्यावेळी उदयोन्मुख असलेला अलिकडेच राष्ट्रपती-पदक-विजेता महेश काळे- ह्या गायकांनी श्रवणीय मैफिलीने गुढीपाडव्याचा व गणेशोत्सवाचा कार्यक्रम रंगविला. मे महिन्यात नाटकाचे आयोजन केले होते. अनेक वर्षांनंतर शिकागो रंगमंचावर पुनरागमन करून गुणी अभिनेत्री अनुपमा धारकर यांनी त्यांच्या सहकलाकारांसोबत नाटककार योगेश सोमण लिखित, श्रीधर जोशी दिग्दर्शित 'केस नंबर ९९' ह्या रहस्यमय नाट्यकृतीने रसिकांना मुग्ध केले. १२० ते १२५ आबालवृध्द जून महिन्यातील सहलीला आले आणि त्यानिमित्ताने, विविध खेळांसोबत क्रिकेटमधेही रंगले. जुलै महिन्यात बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या न्यूयॉर्क येथील अधिवेशनानंतर 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'मधे रसिक प्रेक्षक सुरेखा पुणेकर यांनी सादर केलेल्या बैठकीच्या लावणीधारित नृत्यमैफिलीने खुष झाले. दिवाळी निमित्त शिकागोस्थित पन्नासाहून अधिक मराठी आबालवृध्दांसह गायन, वादन, नर्तन, एकपात्री नाट्यप्रवेश, एकपात्री विनोदप्रहसन, वाद्यवृंद, क्रिडा-प्रात्यक्षिके इत्यादी विविधगुणदर्शी मनोरंजनात्मक फराळाने कार्यक्रम रंगला. २००३ साली मंडळातर्फे अमेरिकेतील आयोवा सेनेटर स्वाती दांडेकर, तत्कालीन भारतीय अवजड उद्योग केंद्र-मंत्री अनंत गीते, निवृत्त भारतीय गुप्तहेर बी. रमण या महत्वाच्या व्यक्तींचे सत्कार करण्यात आले.

विवेक मोडक ह्यांच्या मनांत ह्या सर्व कार्यक्रमांच्या अनेक हृद्य आठवणी आहेत. कलाकार, उपस्थित रसिक, महाराष्ट्र मंडळ, कार्यकारिणीतील सहकारी या सर्वांचे ते मनोमन ऋणी आहेत. ह्यापुढे, मराठी देशांतरितांची घटती संख्या, शिकागोपासून दीर्घ परिसरात वास्तव्य करणारे मराठीजन- ह्या कारणांमुळे मराठी मंडळांत उपस्थिती घटू नये ह्या करिता विशेष परिश्रम भविष्यात घ्यावे लागतील असे त्यांना वाटते. ...

असं म्हणतात, की सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात सांघिक काम (टीमवर्क) करत असताना आपोआपच मित्रवर्तुळ विस्तारित होतं आणि आयुष्य अधिक समृध्द होतं. महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या कार्यकारिणीवर सदस्य आणि २००४ साली अध्यक्षपदाची धुरा यशस्वीरीतीने सांभाळलेल्या नंदिनी दिलीप विश्वासराव यांचे अनुभवही अगदी असेच आहेत.

नंदिनी दिलीप विश्वासराव मूळच्या मुंबईकर, पार्ल्याच्या! दिलीप विश्वासराव यांच्या पीएचडी शिक्षणासाठी दिलीप आणि नंदिनी अमेरिकेत प्रथम सेंट पॉल (मिनेसोटा) येथे आले. मग नोकरी व्यवसायाच्या कारणाने सिनसिनाटी (ओहायो) अशी मजल, दरमजल करत हे दांपत्य शिकागोत स्थिरावले. नंदिनी विश्वासराव सांगतात, "मी शिकागोत आले तेव्हा वयाची पंचेचाळिशी उलटून गेली होती. मुले मोठी होऊन घराबाहेर पडलेली, त्यामुळे घरटे रिकामे! अशां प्रौढ वयात नवीन मित्रमैत्रिणी गोळा करणे महाकठिण काम! कुणी तरी सुचवले, की महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या कार्यकारिणीवर जा, भरपूर ओळखी होतील. मग आम्ही मंडळाच्या समितीत शिरलो, आणि तब्बल आठ वर्षे तिथेच रमलो. समिती सदस्य, उपाध्यक्ष अशा पदांवरून काम करता करता, २००४ साली मी मंडळाची अध्यक्ष व पुढे पाच वर्षे विश्वस्त म्हणून काम केले." त्यांच्या कार्यकारिणीत महिला उपाध्यक्ष- पद्मिनी दिवेकर (बाल-कार्यक्रमांच्या प्रमुख), उपाध्यक्ष- उदय गुप्ते, खजिनदार- सुचेता अकोलकर, सचिव- सतीश दिवेकर आणि श्रीधर पोतदार, प्रकाश अंतुरकर, लक्ष्मीनारायण महिसेकर व श्याम अंतुरकर सदस्य होते. याशिवाय, १४ सहाय्यक सदस्य, ३ विश्वस्त आणि पडद्यामागून मदत करणारी अगणित माणसे होती.

२००४ सालच्या कार्यकारिणीने प्रत्येक कार्यक्रमात काहीतरी नाविन्य आणण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक कार्यक्रमात पहिला एक तास मुलांचा कार्यक्रम असायचा. त्यानिमित्ताने त्यांचे आईवडील आणि जवळची मित्रमंडळीदेखील हजर राहत. संक्रातीच्या कार्यक्रमास मुलांचा ऑर्केस्ट्रा, गाण्यांची स्पर्धा आयोजित केली होती. त्यात ब्लूमिंग्टन (इलिनॉय) येथील मराठी मंडळींनीसुध्दा भाग घेतला होता. गुढीपाडव्यानिमित्त कार्यक्रमात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावर आधारित चित्रपट दाखवला. विशेष म्हणजे, मुलांनीदेखील हा चित्रपट औत्सुक्याने पाहिला. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर RSVPचा पायंडा पाडला आणि लोकांनीही त्यांस साथ दिली. वार्षिक सहलीला 'फूड तिकिट्स' दिल्यामुळे शेवटपर्यंत सर्वांना सोयीनुसार खाद्यपदार्थांचा आनंद घेता आला. गणेशोत्सवाच्या कार्यक्रमात विवाहित पाच जोडप्यांनी श्री गजाननाची पूजा केली. मुलांनी सादर केलेली एकांकिका आणि तबला जुगलबंदीचा कार्यक्रम खूपच रंगला. कोजागरी पोर्णिमेच्या कार्यक्रमात लहान, मोठे सर्वजण आवडीने भाग घेतात. आपण मराठी असलो, तरी प्रथम भारतीय आहोत, याची जाणीव लहान मुलांना करून देण्यासाठी गुजराती दांडिया, मराठी मंगळागौर, बंगाली नृत्य (बंगाली ऑर्ग द्वारा) आणि विशेष आमंत्रणावरून युनिव्हर्सिटीतील विद्यार्थ्यांचा पंजाबी भांगडासुध्दा त्यावर्षी सादर केला. दिवाळीला प्रथेनुसार स्थानिक कलाकारांच्या 'मी लाडाची मैना तुमची' ह्या विनोदी लोकनाट्याने मजा औरच आली.

त्यावर्षी भारतातील, 'सुयोग' नाट्यसंस्थेची 'मित्र', आणि 'नकळत सारे घडले' ही दोन गाजलेली नाटके झाली. त्यामधे श्रीराम लागू, फय्याज, विक्रम गोखले, स्वाती चिटणीस व अनिकेत विश्वासराव (नंदिनी विश्वासराव यांचा नातू) सहभागी होते. शिरीष कणेकरांचा 'कणेकरी'- एकपात्री प्रयोग, अविनाश धर्माधिकारी यांच्याशी गप्पागोष्टी, आणि विशेष म्हणजे, न्यू जर्सी येथे स्थायिक डॉ. प्रकाश लोथे लिखित परंतु भारतातील कलाकार दिलीप प्रभावळकर आणि ईला भाटे या कलाकारांनी सादर केलेले 'वाटचाल' हे नाटक लोकांना पहायला मिळाले. बरेच वर्षे खंडित पडलेल्या, शिकागोतील दिवाण ॲवन्यूवरील १५ ऑगस्टच्या भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या परेडला त्यावर्षापासून पुन्हा सुरुवात झाली. मनोरंजनाबरोबर सामाजिक जाणीवेने कर्करोग रुग्णांसाठी उपयुक्त असे, बोन मॅरो ड्राइव्ह'चेही वर्षातून दोन वेळा आयोजन केले होते. २००४चे 'रचना'चे अंकही खास होते. एक हृद्य आठवण - "सर्व अंकांच्या मुखपृष्ठावरील चित्रे, सजावट पद्मजा ब्रह्मे हिने केली, तिचे स्वत:चे एकीकडे कॅन्सरचे उपचार चालू असतांना! तिचे हे शेवटचे समाजकार्य, अर्थातच वाखाणण्याजोगे आहे."

आपल्या कार्यकारिणीस आलेल्या काही समस्या, मंडळाची सध्याची परिस्थिती यासंबंधी नंदिनी विश्वासराव सांगतात- "तेव्हा मंडळाकडे अतिशय मर्यादित आर्थिक पाठबळ असल्याने चांगले कार्यक्रम व त्याबरोबर चांगलं जेवण देणं म्हणजे तारेवरची कसरत होती. पण हौशी समितीच्या सदस्यांनी घरगुती श्रीखंड, 'न्यू जर्सी'तून मागवलेल्या पुरणपोळ्या अशा अनेक स्वादिष्ट पदार्थांची सोय केली. सुदैवाने आता मंडळाच्या आर्थिक समस्या सुटल्याने, नवीन कार्यकारिणी अनेक चांगले कार्यक्रम आणू शकते. त्यामुळे मंडळाच्या उपक्रमांना उपस्थितीही वाढली आहे, मराठी शाळेला स्थानिक शासनाची मान्यता मिळाली, हे कौतुकास्पद आहे. त्यामुळे नवीन पिढीची वाटचाल

योग्य दिशेने होत आहे, ह्याची खात्री पटली. फक्त त्याचे व्यापारीकरण होऊ नये, एव्हढीच विनंती! नवीन पिढीने अशीच उत्तरोत्तर प्रगती करून महाराष्ट्र मंडळ शिकागोला अधिकाधिक नावारूपाला आणावे ही सदिच्छा!" ...

२००५ साली मंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा लक्ष्मीकांत (लक्ष) दळवी यांनी सांभाळली. ते आणि त्यांचे कुटुंबीय १९९२ साली भारतातून शिकागोत स्थलांतरित झाले. शिकागोत महाराष्ट्र मंडळ असल्याने त्यांना एकप्रकारे दिलासाचा मिळाला. मराठी कुटुंबांशी ओळखी होऊ लागल्या. मित्रमंडळी मिळाली. दळवी कुटुंबीयांची मंडळाच्या कार्यक्रमांना अनेक वर्षे उपस्थिती होतीच. मग २००५मधे लक्ष दळवींनी महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यांच्या कार्यकारिणीवर प्रवीण माने आणि शिल्पा ठोसर- उपाध्यक्ष, सुचेता अकोलकर- कोषाध्यक्ष, संदीप बाग- सचिव, श्रीधर पोतदार, आनंद थत्ते हे समिती सदस्य आणि विस्तारित समितीवर मदतीला अनेक स्वयंसेवकही होते. मंडळाच्या कार्यक्रमांसंबंधी, व्यवस्थापनाविषयी त्यांच्या मनांत काही कल्पना होत्या. सहकाऱ्यांच्या मदतीने त्या दिशेने अनेक आव्हानांना त्यांना सामोरे जाता आले.

त्या वर्षी मुलांचा सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने मकरसंक्रातीच्या कार्यक्रमाला लहान मुलांची अंताक्षरी आयोजित केली होती. अमेरिकेतील मराठी कलाकारांना संधी देण्याच्या दृष्टीने, गुढीपाडव्याला न्यू जर्सीतील संगीत कलाकारांचा आणि गणेशोत्सवानिमित्त ब्लूमिंग्टन (इलिनॉय) मधील कलाकारांचा 'सप्तरंग' कार्यक्रम, तसेच दरवर्षीप्रमाणे उन्हाळी सहल, कोजागरीनिमित्त रासगरबा/दांडिया व दिवाळीचा कार्यक्रम उत्साहाने पार पडला. २००५ मध्ये भारतातून 'सुयोग' नाट्यसंस्थेचीही दोन नाटके मंडळामधे झाली. दळवी सांगतात, "भारतातून आणलेल्या अशा मोठ्या कलाकारांच्या कार्यक्रमांसाठी खूप अगोदरपासून तयारी करावी लागते. परंतु मंडळामधे अशा कार्यक्रमांचे व्यवस्थापन करताना आमच्या समितीला कामाचा आनंदही मिळाला. सुयोग नाट्यसंस्थेच्या निमित्ताने, सुधीर भट, रीमा लागू, दिलीप प्रभावळकर, विक्रम गोखले राजन भिसे, असे मोठे कलाकार भेटले. काही वेळां अशा बड्या कलाकारांची आपल्या शहरातील वास्तव्यात व्यवस्था करताना, त्यांना खुष ठेवताना कसरत करावी लागते. याबद्दल अधिक सांगणे नलगे! परंतु मुख्य म्हणजे, उत्तम ध्वनिसंयोजना असलेल्या एल्जिनमधील व्यावसायिक नाट्यगृहात प्रथमच 'सुयोग'ची नाटके ठेवली होती. कलाकारांनीही या नाट्यगृहास पसंतीची पावती दिली. आणि ह्या नाट्यमहोत्सवास ५००+ लोकांची उपस्थिती लाभली. ह्यातच आमच्या कामाचे सार्थक झाले. अर्थात मोठ्या प्रमाणावर कुठलेही सामाजिक कार्य करताना क्वचित काही समस्या उद्भवतात. आज मागे वळून पाहताना, अशाप्रसंगी काही कृतींबद्दल मला पश्चातापही होतो आणि जरा वेगळ्या प्रकारे काही गोष्टी हाताळता आल्या असत्या, असेही वाटते. या अनुभवातून पुढच्या खेपेसाठी हा धडा मिळाला, असे म्हणावेसे वाटते."



नंदिनी (ऊर्मिला) दाते
२००१ अध्यक्षा

नितीन जोशी
२००२ अध्यक्ष

विवेक मोडक
२००३ अध्यक्ष

नंदिनी विश्वासराव
२००४ अध्यक्षा

लक्ष्मीकांत दळवी
२००५ अध्यक्ष

महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या पुढील वाटचालीबद्दल दळवी पुढील विचार मांडतात- "शिकागोत नव्याने स्थायिक होणारी तरुण पिढी मंडळाकडे आकर्षित होणे, त्यांना नेतृत्वाची संधी देणे महत्त्वाचे आहे. कारण ही नवी पिढीच मंडळांची 'फ्लॅगशिप' पुढे नेणार आहे. शिकागो परिसरात आपल्या मराठी मंडळाच्या कार्याविषयी जागरुकता अधिक वाढवायला हवी. वेळेचे काटेकोर नियोजन आणि पालन व्हावे, अन्यथा उत्सवाचा विरस होतो. खाद्यपदार्थ आणि भोजनव्यवस्था हादेखील संस्कृतीचाच एक भाग असतो. 'अन्न हे पूर्ण ब्रह्म', आणि 'अन्नदाता सुखी भव' हे वाक्प्रचार आपल्या परिचयाचे आहेत. तेव्हा मंडळाच्या कार्यक्रमाबरोबर जेवणाचे शुल्क आकारत असताना, उत्तम, रुचकर व शक्यतो 'बफे' पध्दतीचे जेवण असणेदेखील महत्त्वाचे! कार्यकारिणीवर आणि कार्यक्रमांमधेही काही अमराठी लोकांचा सहभाग असावा. स्थानिक अमेरिकन लोकांना आवडतील, समजतील असे काही निवडक कार्यक्रमही आयोजित करावेत." ...

*एकंदरित, खंबीर नेतृत्व, उत्साही सहकारी आणि **कालानुरूप** प्रकल्प... झाले बहु, यापुढेही होवोत बहु... आणि त्यायोगे, 'महाराष्ट्र मंडळ शिकागो' संस्थेची उत्कर्षपूर्ण वाटचाल चालू राहो!*

मुलाखत व शब्दांकन: विनता कुलकर्णी

मुलाखतकार संझगिरी

मी आणि द्वारकानाथ लहान असल्यापासून संझगिरी कुटुंबाची आणि आमची मैत्री होती. दादा आणि अहिल्याताई यांचा मुलगा पप्पू अशी त्याची ओळख. कधीमधी त्यांच्या घरी गेले तर हा नेहमी बाहेर क्रिकेट खेळताना दिसायचा. त्यावेळी किती ओळख असली तरी मुलांशी बोलायची पध्दतच नव्हती. त्यामुळे खरं म्हणजे मी त्याच्याशी कधी बोललेच नव्हते. त्यानंतर इकडे अमेरिकेत येऊन बरीच वर्षे गेली. इंटरनेट आल्यावर मला लोकसत्ता वाचायला खूप आवडू लागले. त्यात एक मजेशीर लेख वाचला. कशावर होता आठवत नाही. पण लेखकाच्या नावाने माझं मन वेधून घेतलं. द्वारकानाथ हे पप्पूचं नावं असं आठवत होतं. म्हणून घरी फोन करून विचारलं तेव्हा कळलं, की हा तोच. नंतर त्याचे लेख वाचत राहिले. तो शिकागोत आल्यावर आमची खूप वर्षांनी भेट झाली. तोपर्यंत तो प्रतिथयश लेखक झाला होता, क्रिकेट समीक्षक झाला होता आणि सिनेमा क्षेत्रातही नावाजला होता. साहजिकच हा लहानपणीचा पप्पू मोठेपणी फारच काही बनला होता. अर्थात माझा त्याला पहिला प्रश्न हाच होता.

प्रश्न: हे सर्व करायला तू केव्हा सुरवात केलीस?

इंजिनीअरिंगच्या पहिल्या वर्षात शिकत असताना मी लिहायला सुरवात केली. लहान लहान मासिकात अधूनमधून लिहायला लागलो. आपण लहान असताना टीव्ही नव्हता. त्यामुळे बाहेर खेळायचं, नाहीतर वाचायचं. शाळेत असताना माझं मराठी मुळीच चांगलं नव्हतं. आमच्या देव बाईना खरच वाटलं नसतं, की मी मराठीत लिहितो.

प्रश्न: तू तर इंग्रजी माध्यमात शिकत होतास ना?

सातवीपर्यंत मराठी माध्यम, नंतर इंग्रजी माध्यम. पण higher मराठी विषय घेतला होता. त्यामुळे लहानपणी 'चांदोबा', 'नवनीत', 'अमृत' या मासिकांचं वाचन खूप केलं होतं. एकदा 'अमृत'साठी लेख लिहून १ रुपया आणि 'अमृत'चा अंकही मिळवला होता. VJTI मध्ये शिकत असताना बाकीचे छंद पण चालू होते. मी तिथल्या मासिकाचा संपादक होतो.

शिवाजीपार्कला राहत असल्याचा एक मोठा फायदा होता, की विजय मांजरेकर, अजित वाडेकर, संदीप पाटील, सुभाष गुप्ते आणि दादर T.T.ला सुनील गावस्कर, माधव मंत्री, दिलीप वेंगसरकर असे क्रिकेटमधले दिग्गज, सी. रामचंद्र, वसंत देसाई, नंदा वगैरे सिनेमातील लोक. पु. ल. देशपांडे, बाळ ठाकरे, आचार्य अत्रे, सावरकर, अशी किती नावं घेऊ? शिवाजी पार्कात या लोकांच क्रिकेट पाहत होतो. त्यामुळे क्रिकेटमध्ये गोडी आली. तिथे होणाऱ्या सभा, अमर हिंद मंडळातील वसंत व्याख्यान माला यात खूप भाषणे ऐकली. त्याचाही परिणाम माझ्या लिखाणावर झाला. घरून तर 'राजा शिवाजी', 'रामराज्य' सारखे सिनेमा दाखवले जायचे. पण 'रसरंग' मासिक वाचून सिनेमात रस आला. सिनेसंगीताची आवड निर्माण झाली. कॉलेजमध्ये गेल्यावर सिनेमा बघायला लागलो. मग देव आनंद, दिलीप कुमार, शम्मी कपूर हे आयुष्यात आले आणि कायमचे डोक्यात जाऊन बसले. इतके बसले, की आता कार्यक्रम करताना तरुणपणी वाचलेल्या गोष्टी परत परत बघाव्याच लागत नाहीत. हिंदी सिनेमा आणि सिनेसंगीत याची प्रचंड आवड निर्माण झाली. इतिहास मला शाळेपासून आवडायचा. समाजकारण, राजकारण हे नंतर आलं.

प्रश्न: तुझं एकूण लिखाण किती झालं?

एकूण २८ पुस्तकं लिहिली. 'तानापिहिनिपाजा', 'फाळणीच्या देशात', 'चिरंजीव सचिन', 'तिरकटधा' ही काही नावे. त्यात क्रिकेटची फार कमी आहेत. लहान असतांना काहीच फिरलो नव्हतो, पण क्रिकेटमुळे खूप फिरलो; खूप वेगवेगळे देश पाहिले. आफ्रिका, पाकिस्तान, वेस्ट इंडीज, श्रीलंका, युरोप, अमेरिका वगैरे. "केल्याने देशाटन, पंडित मैत्री सभेत संचार" हे माझ्या बाबतीत अगदी खरं झालं. त्यामुळे प्रवासवर्णनाची पुस्तकं खूप आहेत. उरलेली सिनेमावर आहेत, सिनेसंगीतावर आहेत. पहिल्यांदा क्रिकेटमध्ये माझं नाव झालं. मग हळूहळू बाकीच्या विषयांवर लिहू लागलो. माझा अनुभव असा, की एकदा नाव झालं, की दुसरं लिखाणही लोक वाचतात. पण इंजिनीअरिंग मला खूप आवडतं, त्यामुळे मी ते सोडलं नाही. 'Chief engineer of water project' म्हणून निवृत्त झालो. BMC (बृहन्मुंबई मुन्सिपल कॉर्पोरेशन) मध्ये काम करत असल्याने सुविधा खूप मिळाल्या. त्यामुळे हे सर्व करू शकलो.

प्रश्न: शिकागोचा अनुभव काय? पहिल्यांदा इकडे केव्हा आलास?

२०१२ मध्ये मी पहिल्यांदा शिकागोमध्ये आलो. शिकागो मधल्या गुंडगिरीबद्दल माहीत होतं. त्यामुळे शिकागोबद्दल वेगळं कुतूहल होतं डॉ. निलेश मेहता माझ्यासारखाच क्रिकेट प्रेमी. त्याची माझी दोस्ती झाली. त्याच्याकडे मी पहिल्यांदा आलो. तिथे कार्यक्रम केला. निलेशने शिकागो दाखवलं. लेक शोअर ड्राईव्हवर, सीअर्स टॉवरवर फिरलो. खूप आवडलं. Magnificent Mile - Michigan Ave., Millennium Park, Bean (The Cloud Gate Sculpture) सगळ्याची मजा घेतली. त्यानंतर महाराष्ट्र मंडळ शिकागो'च्या दिवाळीच्या कार्यक्रमासाठी 'मधुबाला ते माधुरी' हा कार्यक्रम घेऊन आलो २०१३मध्ये. मला इथले लोक खूप आवडले. खूप छान दाद मिळाली. व्यवस्था छान होती. दिवाळीचा कार्यक्रम असल्याने सगळे नटून थटून आले होते.

त्यावेळची एक आठवण द्वारकानाथने आवर्जून सांगितली.
'मधुबाला ते माधुरी'मध्ये वेगवेगळ्या अभिनेत्रींबद्दल बोलताना तो म्हणाला, की बऱ्याच मराठी नट्या CKP होत्या. हे ऐकून एका बाजूने जोरदार दाद मिळाली. दुसऱ्या बाजूने कोणीतरी म्हणालं, की माधुरी दीक्षित ब्राह्मण आहे. तेव्हा तो म्हणाला की "सौंदर्याला जात नसते, जातीला सौंदर्य असते."

एकंदरीत द्वारकानाथला शिकागो आवडलं. त्यानंतरच्या भेटीत तो आमच्याकडे राहिला. त्या गप्पा घरोब्याच्या होत्या. पण विद्या जोशी आणि उल्का नगरकरच्या आदरातिथ्याचाही त्याने आवर्जून उल्लेख केला. शिकागोमध्ये केव्हाही परत यायला तो तयार आहे. आता येताना बायकोसह ये असं आमंत्रण देऊन मी आमच्या गप्पा संपवल्या.

मुलाखत व शब्दांकन: रेखा देवधर

MMC ला सुवर्ण महोत्सवाच्या अनेक शुभेच्छा

भूषण आणि स्वाती लाखे

मंडळाची गरुडभरारी (वर्ष २००६-२०१०)

'महाराष्ट्र मंडळ शिकागो'च्या दृष्टीने २००६ ते २०१० हा काळ खूपच महत्वाचा होता. बऱ्याच चांगल्या-वाईट घडामोडी ह्याच पाच वर्षात झाल्या. त्या कोणत्या आणि कोलमडायला आलेले हे मंडळ पुन्हा कसे उभे राहिले ते वाचूया, ह्या पाच वर्षातील जे अध्यक्ष होते त्यांच्याच शब्दात.

२००५ मध्ये लक्ष्मीकांत दळवी अध्यक्ष होता आणि बहुतेकांना वाटत होते, की त्याच्याच टीम मधून कुणीतरी पुढे येईल आणि २००६चा मंडळाचा कारभार सांभाळेल. पण जेव्हा मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा (जनरल बॉडी मीटिंग झाली) तेव्हा तसे काही झाले नाही. त्याची टीम काय, कुणीच पुढे येत नव्हते. इतक्या मेहेनतीने उभारलेल्या ह्या वटवृक्षाला पुढे नेण्यासाठी २००६च्या अध्यक्षपदाची जवाबदारी घ्यायला मी तयार झालो. सगळयांनी पाठिंबाच दिला. २००६च्या आधी, दोन/तीन वेळा मंडळाच्या कमिटीवर काम केलेले होते. पिट्स्बर्ग, एडमंटन, टोरांटो अशा ठिकाणी मंडळात काम केल्यामुळे अनुभव पण होता, की काय करावे लागेल. मी २००१ मध्ये शिकागोला आलो. मंडळात तेव्हापासून येत होतोच. मला एक गोष्ट लक्षात आली होती, ती म्हणजे खूप जास्त प्रमाणात गटबाजी तयार झाली होती. त्यामुळे काय व्हायचं, की लोक आपल्या जवळच्या/ओळखीच्या सोबत बसायचे. कुठेतरी एकमेकांमधला संवाद हरवत होता असे वाटत होते मला. शिवाय असे माझ्या लक्षात आले होते, की काही लोक फक्त ठराविक कार्यक्रमालाच येतात, म्हणजे फक्त गणपतीला किंवा पाडव्याला. बाकीच्या कार्यक्रमांना त्यांची उपस्थिती नसतेच. त्यामुळे ह्या दोन गोष्टींना समोर ठेवून मराठी समाजाला एकत्र कसं आणता येईल आणि त्यांना ऊर्जित कसं आपण करू शकतो ह्या दृष्टीने २००६मध्ये प्रयत्न करायचे ठरवले. मला नक्की अगदी आकडेवारी नाही सांगता येणार पण काही प्रमाणात यश मिळालं, असं मला वाटतं. नंतरची काही वर्षं ह्याच प्रयत्नात गेली असावीत कारण ह्याच प्रयत्नांमुळे २००९मध्ये सगळ्यांनी ठरवून बृहन्महाराष्ट्र मंडळाचं पुढचं होणारं अधिवेशन (२०११ साल) हे शिकागोत व्हावे ह्यासाठी प्रयत्न केले. वर्षभरात कामाचे काही नियम आखले गेले. आर्थिक बाजू तर सांभाळायची होतीच पण त्याच बरोबर प्रत्येक कार्यक्रमानंतर काय चांगले झाले, काय चुकले आणि काय चांगले करू शकतो ह्याचा आढावा घेऊन लिहिण्याचं ठरलं आणि अंमलात आणून हा अहवाल २००७ च्या टीमला देण्यात आला होता. २००६ मधलं ठळक उदाहरण द्यायचं झालं तर "आसू आणि हसू" नाटक. ७०० आसन-क्षमता असलेलं सभागृह खच्चून भरलेलं. जेव्हा शेवटी आभार-प्रदर्शनाची वेळ आली तेव्हा मी सगळ्या उपस्थित प्रेक्षकांना म्हटलं, की तुम्हाला जर आमचं नियोजन आवडलं असेल तर तुम्हाला जे कुणी कार्यकर्ते दिसत आहेत त्यांना जरूर थांबून सांगा आणि त्यांच्या मेहेनतीची पोच पावती द्या. अजून हुरूप येईल आणि आपण काम केल्याची दखल घेतली जातेय हे बघून त्यांनाही बरं वाटेल. आणि लोकांनी आम्हा सगळ्यांना स्वतः भेटून, फोन करून शाब्बास म्हटलं.

महाराष्ट्र मंडळ आज ५० वर्षाचं झालंय, म्हणजे पर्यायाने ज्यांनी हे स्थापन केले त्यांचे आणि ज्यांनी ह्याला भरभराटीला आणलं त्यांचेही आता वय वाढले आहे. पण वय वाढलं म्हणून मंडळाची ओढ कमी झालेली नाही. त्यामुळे नवीन गोष्टी तर जरूर राबवल्या गेल्याच पाहिजेत पण त्याच बरोबर जुन्याजाणत्या ह्या लोकांसाठी सुध्दा वर्षातून एखादा कार्यक्रम जरूर व्हावा असं मला वाटतं. काही जणांना यायचे असते पण गाडी चालवायची भीती वाटते, त्या दृष्टीने त्यांना नेण्या-आणायची सोय जर मंडळ करू शकले तर त्यांनासुध्दा ह्या कार्यक्रमाचा आनंद घेता येईल.

अजून मला एक प्रकर्षाने वाटतं की, मराठी समाजाची आणि इथे असणाऱ्या कुटुंबाची वीण अजून घट्ट व्हायला हवी. यासाठी एक "सपोर्ट सिस्टीम" निर्माण व्हावी. ज्यात वय वाढत चाललेल्या लोकांचा एक डेटाबेस असावा म्हणजे त्यांची मुलं कुठे आहेत, काय करतात ह्या प्रकारची माहिती एकत्र असावी, म्हणजे समजा कधी काही तातडीचा प्रसंग आला, तर कुणाला संपर्क करायचा असा प्रश्न यायला नको. पुढील वाटचालीसाठी मंडळाला शुभेच्छा आहेतच, आणि आपल्या मराठी समाजाची वीण अजून घट्ट करण्यासाठी प्रयत्न केले जावेत ही सदिच्छा.

श्री. दिलीप थत्ते- अध्यक्ष २००६

मी अमरेश देशपांडे. सध्या बेंगळुरू येथे असतो. २००७ साली महाराष्ट्र मंडळाचा अध्यक्ष म्हणून माझी नेमणूक झाली होती. नेमणूक बरं, निवडणूक नाही. ह्यामागचा किस्सा सुध्दा फारच गमतीशीर आहे. मंडळाचा अध्यक्ष व्हायचं किंवा सहभागी व्हायचं मी आधीपासून ठरवलं नव्हतं. पण २००६ मध्ये मंडळाची तातडीची मीटिंग घेण्यात आली होती. त्यात असं झालं होतं, की पुढच्या वर्षी कोणीही कमिटीत यायला तयार नव्हतं, आपण ज्याला लीडरशिप व्हॅक्युम म्हणतो ना तसं काहीसं. म्हणजे जर कुणी जबाबदारी घेतली नाही तर मंडळ बरखास्त करण्याची वेळ येऊ शकते. मी सहज म्हणून हात वर केला आणि म्हटलं मंडळ सुरळीत चालू ठेवण्यासाठी

काय लागेल आणि जे लागेल ते करण्याची माझी तयारी आहे, जे काही मी करू शकेन ते मी माझ्यावतीने करीन. मला मग विचारण्यात आलं, की मग तू मंडळाचा अध्यक्ष का होत नाहीस, म्हटलं जर मी अध्यक्ष होण्याने तुम्हाला मदत होणार असेल तर ठीक आहे मी अध्यक्ष व्हायला तयार आहे असं म्हणून २००७च्या शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षपदाची जवाबदारी मी स्वीकारली.

त्यावेळेस माझ्या कमिटीत कोण असावं, कोण नसावं ह्याबद्दल माझं काही मत नव्हतं. कुणालाही फारसा ओळखतसुध्दा नव्हतो. त्यामुळे जे व्हॉलेंटीअर म्हणून किंवा कार्यकारिणी सदस्य म्हणून स्वत: हून सहभागी झाले ते सगळे एका उद्देशाने एकत्र आलो आहोत असे समजून पुढे चालायचे ठरवले. एका वर्षाच्या काळात आव्हाने तर भरपूर होती. जे मंडळाचे सदस्य होते किंवा जे प्रायोजक होते त्यांचा मंडळाबद्दलचा विश्वास दृढ कसा करायचा, त्यांची पावले मंडळाकडे कशी परत वळवायची हे सगळ्यात महत्वाचं होते. आज २०१९ मध्ये जे बहरलेलं मंडळ तुम्ही बघताय त्याचा पाया हा तेव्हा हळूहळू परत १९६९ सारखा परत रचायला सुरुवात झाली होती असे मला वाटते. कार्यकारिणी जेव्हा तयार झाली तेव्हा एकमेकांशी बोलून, संवाद साधून, जशी माहिती मिळत गेली, जसे अनुभव शेअर केले तसे ते जोडत गेलो. पैशाची चणचण सुरुवातीला नाही पण वर्षाच्या शेवटी नक्कीच जाणवली. कारण 'रचना' साठी ज्या स्पॉन्सरनी कबूल केले होते त्यांनी त्यांची कमिटमेण्ट पूर्ण केली नाही, पण दुसऱ्या हाताला मेम्बरच्या रजिस्ट्रेशन मधून निधी गोळा झाला आणि पैसे कमी पडतात का असं वाटत असताना सगळे कार्यक्रम अगदी छान पार पडले. २००७च्या सुरुवातीला एकांकिका स्पर्धा केली होती. एवढ्या मोठ्या प्रमाणावर काही करायचा माझा तो पहिलाच अनुभव होता. 'इव्हेंट मॅनेजमेंट'च्या दृष्टीने खूप मोठ्ठा धडा. त्यात मी खूप काही शिकलो. मंडळाला अजून बरेच पुढे जायचे आहे, म्हणून मंडळाचं एखादं कम्युनिटी सेंटर स्वरूपात हक्काचं ठिकाण असावं असं मला वाटतं. जरूर ह्या गोष्टीवर विचार व्हावा. कैक मैल दूर असून आणि मंडळाशी तसा काहीच थेट संबंध नसला तरीही महाराष्ट्र मंडळ म्हटलं, की आजही माझ्या मनात खूप प्रेम, सद्भावना आणि आठवणी येतात, ऋणानुबंध जोडले जातात ते बहुदा हेच असावं. आज मंडळाच्या ५० वर्षांच्या निमित्ताने माझी परत एकदा आठवण काढलीत म्हणून धन्यवाद आणि पुन्हा एकदा मंडळाला माझ्या शुभेच्छा.

अमरेश देशपांडे, अध्यक्ष २००७

दिलीप थत्ते
२००६ अध्यक्ष

अमरेश देशपांडे
२००७ अध्यक्ष

श्याम अंतुरकर
२००८ अध्यक्ष

सुजीत वैद्य
२००९ अध्यक्ष

जयदीप बुझरुक
२०१० अध्यक्ष

मी साधारण १९९५ पासून मंडळाच्या कार्यक्रमांना येत होतो. व्हॉलेंटीअर/कार्यकर्ता म्हणून बरीच वर्ष कामे केली होतीच, त्यामुळे प्रत्येक कमिटीची कामाची पध्दत आणि बारकावे जवळून पाहिले होते. मंडळ चालवायला काय लागतं, ह्याचा अभ्यास माझ्याकडे होता. २००७ साली कोषाध्यक्ष होतो त्यामुळे त्या कमिटीत काम करणाऱ्या नवीन चेहेऱ्यांशी माझी वेव्हलेन्ग्थ चांगली जुळली होती. त्यांचा प्रचंड असा उत्साह आणि माझा अनुभव असे एकत्र आणून २००८च्या अध्यक्षपदाची जबाबदारी मी स्वीकारली. जुन्या, नव्याचा संगम हा महाराष्ट्र मंडळामधला एक महत्वाचा बदल होता. २००८ मध्ये माझ्या टीम समोरचं महत्वाचं उद्दिष्ट म्हणजे प्रत्येक कार्यक्रम वेळेवर सुरू करणं, मंडळाचं आर्थिक बजेट जे ठरवलं आहे, ते जमेल तेवढं पाळणं, नवीन लोकांपर्यंत पोचणं आणि इकडे जे शिकायला येतात त्यांना मंडळाच्या कार्यक्रमात सहभागी करून घेणं. २००८ मधला सगळ्यात लक्षात राहिलेला कार्यक्रम म्हणजे गणपती- उत्सव. बेन्सनविल येथील मानवसेवा देवळात कार्यक्रम करायचं ठरलं होतं. आदल्या देवळात कार्यक्रम करायचं ठरलं होतं. आदल्या रात्रीपासूनच पाऊस थोडा लागला होता, सकाळी मात्र पावसाने चांगलाच जोर धरला. बघता- बघता सगळीकडे पाणी साचलं. रस्ते बंद करण्यात आले. तरीही मंडळाचा कार्यक्रम आहे आणि जायचंच ह्या निर्धाराने टीम मधली मंडळी, तुंबलेल्या पाण्यातून वाट काढत काढत देवळात पोचली. RSVP केलेले येणार का, जेवण घेऊन केटररला येता येईल का, गणपतीची स्थापना होण्याआधीच विसर्जन करावं लागतंय का, असंख्य प्रश्नांनी मला घेरलं होतं. पण केटररही आमच्या सारखाच जिद्दी. एक वाजता पोचला कसाबसा. पाऊस आणि तुंबलेलं पाणी शिकागोकरांच्या उत्साहाला थांबवू शकलं नाही. १० जण तरी येतील का असं वाटत असताना १०० लोकं आली होती. अर्थात जेवणाचे पदार्थ थोडे जास्त झाले, पण गणपतीची आरती मात्र त्या पावसातसुध्दा तेवढ्याच उत्साहात झाली. २०१९ मध्ये मंडळ जे काही उपक्रम राबवतंय त्यांना जेव्हा मी २००८ सोबत मापून बघतो, तेव्हा असं वाटतं, की ह्यातल्या काही गोष्टी माझ्याही डोक्यात होत्या पण पूर्णत्वास नेता नाही

आल्या मला! उदारणार्थ RSVP करतानाच क्रेडिट कार्डने पैसे भरून टाकायचे, म्हणजे मंडळाला होणारा तोटा कमी होईल. पण आता ते होतंय आणि मला त्याचा आनंदच आहे.

२००८ मधील अजून एक महत्वाचा टप्पा म्हणजे ह्या वर्षी पहिल्यांदा रचना मध्ये जाहिराती देण्यासाठी जी पॅकेजेस आहेत आणि स्पॉन्सरशिप जर कोणत्या कार्यक्रमासाठी द्यायची असेल त्याची माहिती सुजित वैद्यच्या मदतीने मंडळाच्या वेबसाईटवर आम्ही पोस्ट करू शकलो. मंडळ लोकांपर्यंत पोचण्याचा हा एक महत्वाचा टप्पा होता असं मला वाटतं. गेल्या १० वर्षात मंडळाची खूपच प्रगती झाली आहे. सोशल मीडियामुळे मंडळाची माहिती लोकांपर्यंत पोचतेय. प्रिंटिंगचा खर्च आणि कागदाचा अपव्यय वाचवून 'रचना' त्रैमासिक सगळ्यांच्या छान अंगवळणी पडलं आहे. मंडळाची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत जावो आणि नवीन-जुन्याचा संगम असाच कायम दिसत राहो.

श्री. श्याम अंतुरकर- अध्यक्ष २००८

२००९ मध्ये मंडळाचा अध्यक्ष झालो पण त्याआधी मी दोन वर्षासाठी कार्यकारी समितीचा भाग होतो. अध्यक्ष होणे पुढचे पाऊल होते. समितीच्या सदस्यांनी महाराष्ट्र मंडळासाठी काही वर्षे एकत्र काम केले होते त्यामुळे समिती एकत्र मिळवणे सोपे होते माझ्यासाठी. सदस्यांना पूर्वीच्या समित्यांवर काम करण्याचा अनुभव आहे. म्हणून "Knowledge Transfer" ही एक मोठी समस्या नव्हती. मुलांसाठी कार्यक्रम आणि नवीन कलाकार आणणे हे २००९चे प्रमुख लक्ष्य होते. आम्ही या दोन्हीवर यशस्वी झालो. गणपतीच्या उत्सवासाठी मुलांचे नाटक. त्या वर्षी "आयुष्यवार बोलू काही" कार्यक्रम शिकागोमध्ये प्रथमच सादर झाला. मंडळाच्या कामाला सुरुवात केली तेव्हा काही त्रुटी लक्षात आल्या होत्या. २००९ चे आमचे जे महत्वाचे उद्दिष्ट होते त्याच बरोबर ह्या त्रुटी काढण्यासाठी सुध्दा काम करणे तेवढेच गरजेचे आहे हे माझ्या कमिटीला पटले. उदाहरण द्यायचं झालं तर 'प्रीपेड आरएसव्हीपी सिस्टीम' तेव्हा तयार नव्हती. यामुळे भोजन आयोजित करणे कठीण व्हायचं. अन माझ्या लक्षात आलं, की यामुळे अन्नाचा अपव्यय सुध्दा खूप होतोय. काही कार्यक्रमांसाठी अन्न वाया गेले. त्यामुळे प्रीपेड प्रोग्रॅम करणे खूपच गरजेचं होते. माझा सगळ्यात लक्षात राहणार अनुभव म्हणजे गरजेची कागदपत्र सांभाळणं आणि ती मिळवणं. आरएसव्हीपी ईमेलद्वारे आणि नोंदणी पुस्तिका मधून केली जात होती. प्रत्येक कार्यक्रमासाठी येणाऱ्या इमेलची नोंद ठेवणं हे खूपच खर्चिक वेळाचं काम होते. त्यामुळे ती सिस्टीम सुध्दा बदलली पाहिजे किंवा आपल्याला ती २००९मध्ये बदलता आली तर उत्तम असे मनात होते. वर्षाचे कार्यक्रम ठरल्याप्रमाणे उत्तम पार पडलेच पण दिवाळीच्या कार्यक्रमाला मात्र धांदल उडाली. दिवाळीच्या कार्यक्रमात तर काही खाद्य पदार्थांची कमतरता होती. रात्री ८ वाजता अधिक मिळविण्यासाठी आमचे स्वयंसेवक स्टोअरमध्ये गेले. अजून एक अनुभव म्हणजे गणपती कार्यक्रमादरम्यान मुलांसाठी नाटक - आवाज प्रणाली (साऊंड सिस्टिम) मध्येच बंद पडली. तज्ञांनी ती दुरुस्त करण्यात ३० मिनिटे वेळ गेला. आणि मुले चिंताग्रस्त झाली. मुलांनी प्रोग्रामसाठी कठोर परिश्रम केले होते. जर तांत्रिक समस्या नसत्या तर मला आणखी चांगल्या प्रोग्रामची खात्री होती. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेवर लक्ष केंद्रित करणे हा मंडळाचा उद्देश आहे. भविष्यातील समित्या या मूळ तत्त्वांवर टिकून राहणे आवश्यक आहे. मंडळाला शिकागोमधील लोकांच्या हृदयात खास स्थान राखणे आवश्यक आहे. महाराष्ट्र मंडळ शिकागोने २०११ मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १५ व्या अधिवेशनाच्या संयोजनाचे अधिकार मिळवले. यासाठी आमच्या समितीने प्रयत्न केले, जेणेकरून शिकागो मंडळाने बृहन्महाराष्ट्र मंडळाकडे अधिवेशनाच्या संयोजनासाठी चांगला प्रस्ताव सादर केला. आणि शिकागोतील ह्या अधिवेशनाची मुहूर्तमेढ २००९ मध्येच रोवली गेली. २०१०पासून महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या कार्यक्रमांसाठी उपस्थित लोक वाढले आहेत. भविष्यातील समित्यांनी हे "पुनर्जागरण" कायम राखले पाहिजे. मंडळाच्या पुढील वाटचालीसाठी माझ्या शुभेच्छा.

सुजीत वैद्य, २००९ अध्यक्ष

२०११ साली शिकागोमध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन करायचे हे २००९ मध्ये जवळ जवळ नक्की झाले होते. २०११ च्या अधिवेशनाचे संयोजन करत असताना २०१० हे वर्षदेखील महत्वाचं होते. त्यामुळे मी आधीपासूनच मंडळाचा अध्यक्ष व्हायचे ठरवले होते. सगळे सद्स्य एकाच भागातले नको ते मनाशी पक्क होते माझ्या. शिकागोच्या उत्तरेकडचे ३ आणि दक्षिणेकडचे ३ असे मिळून २०१० ची कमिटी तयार झाली. कमिटी तयार झाल्यावर सगळ्यात पहिलं काम होतं ते २००९ मधून सगळी माहिती एकत्र करून घ्यायची. त्यासाठी २००९ आणि २०१० अशी एक एकत्र मिटिंग घेतली. काय चुका झाल्या, काय चांगलं राबवलं गेले आणि त्यातून शिकून मंडळासाठी काय करता येईल हा त्यामागचा उद्देश होता. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन असल्याने शिकागो मंडळाला आर्थिकरित्या खंबीर आणि सक्षम करणे, स्थानिक लोकांचा सहभाग वाढवणे आणि मंडळामध्ये १५-२० वयोगटातील मुलांना स्टेज उपलब्ध करून देणे हे उद्देश होते. शिकागो मंडळातच नव्हे तर अमेरिकेतील सगळ्याच मंडळांना भेडसावणारी ही समस्या आहे, की मुलांना पुढे कसं आणायचं आणि त्यांचा सहभाग कसा वाढवायचा. जी मंडळी १९८० ते २००० च्या दशकात इकडे आली त्यातील १% मुलं कदाचित मंडळात ॲक्टिव्ह असतील

पण बहुतेक नाहीच. २००० च्या नंतर जी कुटुंब इकडे स्थलांतरित झाली त्यांना इंटरनेट च्या माध्यमातून मुंबई, पुण्यातील आपल्या मामा, काका आणि आजीआजोबांशी नाळ जोडायला खूप माध्यमे उपलब्ध होती. त्यामुळे त्यांना मंडळात आणायचं कसं; शिवाय १५-१६ वर्षाचे झाले, की छोट्या मुलांसारखं काही ही मुलं नाचणार नाहीत. म्हणून मग ज्याची त्यांना आवड आहे अशा गोष्टींना एकत्र निवडून "तरुणाई" हा तरुणांचा, तरुणांनी आणि तरुणांसाठी केलेला कार्यक्रम. त्यात band, drums, flute, keyboard अशा वाद्यांचा वापर करून सादर केलेली एक अमेरिकन धाटणीची एक संगीत मैफिलच.

शिवाय हा एक वेगळा कार्यक्रम आयोजित केला होता, आणि वाखाणण्याजोगी गोष्ट म्हणजे त्यातून झालेल्या नफ्यामुळे खूप आर्थिक राशी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनासाठी उभी करता आली. दुसरा महत्वाचा कार्यक्रम जो मुद्दाम मला नमूद करावासा वाटतो तो म्हणजे गणेशोत्सवाचा. पूर्णपणे स्थानिक लोकांचा सहभाग असलेला हा कार्यक्रम होता. तिसरा कार्यक्रम म्हणजे एकांकिका स्पर्धा. अमेरिकेतील सगळ्या मराठी मंडळांचा सहभाग, त्यांनी पाठवलेल्या एन्ट्रीज, भारतातून आलेले परीक्षक, शिकागोत उभं केलेलं उत्तम नेपथ्य आणि श्रोत्यांचा भरभरून वाहणारा उत्साह. हा कार्यक्रम सुद्धा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनासाठी जे आर्थिक पाठबळ हवं होतं त्यासाठीचा महत्वाचा बिंदू ठरला. २००९ पर्यंत मंडळाचं वार्षिक आर्थिक बजेट होते $२५००० पण २०१० मध्ये ते वाढवून आम्ही $७५००० पर्यंत नेले. हे सगळे उपक्रम राबवण्यासाठी ह्याचा खूपच उपयोग झाला. वर्ष एकदम उत्तम सरलं. काही गोष्टी केल्या, काही करायच्या राहिल्या. आपल्यातील प्रत्येकालाच मंडळ जवळचं आहे. आपण एकमेकांना तर मदत करतच असतो पण मला वाटतं मराठी समाज सोडून त्याही पलीकडे जाऊन आपण सामाजिक उपक्रमांमध्ये आपला ठसा उमटवला पाहिजे. जेणेकरून लहान आणि मोठ्यांचा सहभाग वाढेल. मराठी शाळा हे अजून एक डोक्यात होते पण काही कारणांनी ते राहून गेले. पण आता तर शाळा उत्तर प्रकारे सुरू आहे ह्याचा मला खूप आनंद आहे. माझा मंडळातील सहभाग खूप एक, दोन किंवा तीन दशकांचा नाही... तरीही नवीन-जुन्या सगळ्यांना एकत्र घेऊन हे आद्य मंडळ असंच प्रगती करत राहो, ही इच्छा आणि त्यासाठी शुभेच्छा.

जयदीप बुझरूक, अध्यक्ष २०१०

मुलाखत व शब्दांकन: कल्पना नेकलीकर

With best compliments from

Ranjana and Rajiv Gokhale

विजय उवाच

आजच्या मराठी नाट्यक्षेत्रातील एक अभ्यासू, विविध रंगांची आणि ढंगांची गेले चाळीस वर्षे सातत्याने दर्जेदार नाटके प्रस्तुत करणारे प्रथितयश दिग्दर्शक म्हणजे विजय केंकरे. तसं बघितले तर जणू रक्तातच नाटक घेऊन जन्माला आलेले असे हे उत्तुंग व्यक्तिमत्व. आजोबा दि. वि. आमोणकर, वडील दामुअण्णा केंकरे, आई ललिता केंकरे, मावशी सुधा करमरकर, आत्या माया गुर्जर, घरात नाटकवाल्यांची जणू मांदियाळीच. घरात एवढे नाटकमय वातावरण असल्याने खरंतर आपण नाटकात काहीही करायचे नाही असे त्यांनी ठरविले होते. पोद्दार कॉमर्स कॉलेजमधून मस्तपैकी चार्टर्ड अकौंटन्ट, कॉस्ट अकौंटन्ट व्हायचे असे त्यांचे निश्चितपणे ठरले होते. पण त्यांचे मित्र विजय गोखले नि अमृत दामले ह्यांच्यामुळे अचानकपणे त्यांच्या नाट्यमुशाफिरीची नाट्यमयरित्या सुरवात झाली. खरंतर त्यांच्या एका चुकीमुळे ती पहिलीवहिली एकांकिका जाम पडली नि परत त्या वाटेला न जाणे उत्तम, असे परत एकदा विजयजींच्या मनात पक्के ठरले. पुढच्याच वर्षी गिरगावातल्या मॉडेल हाऊस ह्या सोसायटीत आत्याच्या घरी राहत असताना त्यांनी तिथल्या गणपतीच्या कार्यक्रमात ‘सौजन्याची ऐशी तैशी’ हे नाटक सादर केले. त्यासाठी त्यांना परीक्षक नि त्यांचे जवळचे मित्र लक्ष्मीकांत बेर्डे ह्यांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट नटाचे पारितोषिक मिळाले. त्यांनी ‘असेच काम करत रहा नि पुरुषोत्तम बेर्डे हे राज्य नाट्यस्पर्धेसाठी नाटक बसवतायत त्यात तू काम करच’ असे प्रोत्साहन दिले. पुरुषोत्तम बेर्डेंच्या ‘देवकी’ ह्या राज्य नाट्यस्पर्धेतील नाटकालाही बक्षीस मिळाले. त्यानंतर विजयजींचा दिग्दर्शनाकडे असलेला कल ओळखून पुरुषोत्तम बेर्डेंनी नानासाहेब फाटकांकडे परस्पर ‘इजा बिजा तिजा’ ह्या एकांकिकेच्या दिग्दर्शनासाठी प्रवेशिका देऊन टाकली नि घरी नाटक असले तरी पुरुषोत्तम बेर्डे हे खऱ्याअर्थी त्यांचे नाट्यप्रवासाचे गुरू ठरले. त्यांचे पहिले मोठे नाटक म्हणजे १९८५ मध्ये ‘आंतर नाट्य’ ह्या संस्थेतर्फे राज्य नाट्यस्पर्धेत सादर केले गेलेले अरुण नाईक ह्यांनी मराठीत भाषांतर केलेले ‘ऑथेल्लो’ हे नाटक. एकदा नाटक दिग्दर्शनाची चटक वा गोडी म्हणा लागल्यावर विजूकाकांचा नाट्यक्षेत्रातील जो प्रवास तेव्हा सुरू झाला तो आजतागायत अविरतपणे सुरू आहे. त्यांचे पहिले दिग्दर्शित व्यावसायिक नाटक ठरले ते म्हणजे ‘ससा आणि कासव’. विजूकाका व्यावसायिक नाटकांत स्थिरावले ते ‘सुयोग’ ह्या नाट्यसंस्थेमुळे. सुधीर भट, गोपाळ गिरी ह्यांच्याशी त्यांच्या असलेल्या घट्ट मैत्रीमुळे त्यांनी तब्बल ४०च्यावर नाटके ‘सुयोग’तर्फे सादर केली. त्यांना त्याअगोदर ‘अंकनाट्य’, ‘आविष्कार’, ‘गोवा हिंदू असोसिएशन’ व ‘सुयोग’ संस्थेसोबत काम करतानाच ‘चंद्रलेखा’ अशा मातब्बर नाट्यसंस्थांबरोबर काम करण्याची संधी लाभली. त्यांना डॉ. लागू, दामू केंकरे, मधुकर तोरडमल, भक्ती बर्वे ह्या आणि अशा अनेक दिग्गज कलाकारांना दिग्दर्शित करण्याचे भाग्य लाभले. खुद्द वडिलांना म्हणजे दामुअण्णा केंकरे ह्यांना दिग्दर्शित करतांना जरी दडपण जाणवले असले तरी त्याची दुसरी चांगली बाजू म्हणजे ह्या दिग्गजांनी भूमिकेबाबतीत विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी विशिष्ट प्रकारे नाटकांचा अभ्यास झाला असे ते सांगतात. तसेच त्यांच्या नाट्यप्रवासाच्या सुरवातीच्या काळात ‘नॅशनल सेंटर फॉर द परफॉर्मिंग आर्टस्’ मध्ये त्यांनी पु. ल. देशपांडे प्रमुख असताना अशोक रानडे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली एक/दिड वर्षे साहित्य संग्रहित करण्याचे काम केले. इतक्या कर्तृत्ववान नि उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या त्या सहवासांत आलेल्या अनुभवांनी माझ्या नाट्यप्रवासाची पायाभरणी उत्तम झाली, असे विजूकाका आवर्जून सांगतात. आपल्या कामासाठी दिग्गजांकडून झालेले मार्गदर्शन आणि त्यांनी केलेली सयुक्तिक समीक्षा ह्यांनी अधिक प्रगल्भ होण्यास हातभार लागला असे विजूकाकांना वाटते. विजूकाकांनी दिग्दर्शनाबरोबरच बऱ्याच नाटकांत व चित्रपटांतही कामे केली आहेत. ते स्वतः उत्तम कलाकार असूनही त्यांचे स्वतःचे आवडीचे क्षेत्र म्हणजे दिग्दर्शन नि फक्त दिग्दर्शन.



१९९८ साली विजूकाका सर्वप्रथम शिकागोला ‘सुयोग’ ह्या नाट्यसंस्थेबरोबर नाट्यमहोत्सवानिमित्त आले. त्या नाट्यमहोत्सवात 'व्यक्ती आणि वल्ली', 'कुठे बोलायचे नाही', 'सुंदर मी होणार' आणि 'मोरूची मावशी' अशी नाटके सादर केली गेली होती. शिकागोच्या ह्या पहिल्या दौऱ्यात विजूकाकांना सर्वप्रथम जाणवला तो इथल्या माणसांचा आपलेपणा नि त्यांच्या वागण्यातला उबदारपणा आणि त्या पुढच्या जवळपास वीस वेळा केलेल्या दौऱ्यांमधून हा जाणवलेला आपलेपणा अजूनच वृध्दिंगत होत गेला. त्यांच्याच भाषेत सांगायचं तर इथले कार्यकर्ते एकदम मस्त आहेत, आस्थापूर्वक सगळी टीम एकत्र काम करत असते, तसेच उत्तम व्यवस्थापन इथे बघायला मिळते. विशेषतः अगदी कुठल्या प्रकारचे सभागृह कुठल्या प्रकारच्या कार्यक्रमांना अनुकूल होईल नि कलाकार नि प्रेक्षक ह्यांना कार्यक्रमाची मनसोक्त मजा कशी जास्तीत जास्त लुटता येईल त्याची मंडळाचे कार्यकर्ते जातीने काळजी घेतात. १९९८ चे महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष विलास सावरगावकर,

समितीतले नितीन जोशी, प्रकाश टोके ह्यांनी केलेले आदरातिथ्य विजूकाकांच्या कायमस्वरूपात स्मरणात राहिलेय. त्या वेळची 'व्यक्ती आणि वल्ली' आणि 'सुंदर मी होणार' ही नाटके इथल्या प्रेक्षकांना खूप आवडली होती असे विजूकाकांनी आवर्जून सांगितले. त्यांच्यामते इथला प्रेक्षक त्यांच्या स्वतःच्या अभिरुचीच्या जवळ जाणारा आहे आणि इतक्या वीस वेळा सादर करण्यात आलेल्या विविध नाटकांसाठी या चोखंदळ प्रेक्षकांनी कायम दाद दिली आहे, अगदी नाटक आवडले नाही तरी आवर्जून इतले प्रेक्षक हक्काने सांगतातही.

त्यानंतर ते २००२ साली 'प्रियतमा' हे नाटक घेऊन आले. प्रशांत दामले, अतुल परचुरे असलेली ती एक संगीतमय प्रेमकथा होती. ह्या नाटकाची एक छान आठवण विजूकाकांनी सांगितली. त्या नाटकात अतुल परचुरे यांना एका वैतागलेल्या नवऱ्याचे अभिव्यक्तीवाचक गाणं सादर करायचे होते, त्यांना आपले हे गाणे प्रेक्षकांना कसे वाटेल असे वाटले होते पण इथल्या प्रेक्षकांनी त्यांच्या गाण्याला इतकी भरभरून उत्तम दाद दिली नि वन्स मोअर दिला, की त्यापुढे त्यांनी ते गाणे पूर्ण दौऱ्यात अगदी ठणकावून गायले. शिकागोतल्या काही कार्यकर्त्यांचा विजूकाकांनी आवर्जून उल्लेख केला जे त्यांच्या कायम स्मरणात राहिलेत. मग ते कसलीही इच्छा न बाळगता कायम मदतीला पुढे धावणारे वीर दोशी असोत वा प्रेमाचे, हक्काचे उत्तम होस्ट रवी आणि विद्या जोशी व आशिष नि उल्का नगरकर असोत. तसेच शंकरराव हुपरीकर, अनुपमा धारकर यांच्यासारखे प्रतिभावान कलाकार, बेसमेंट थिएटर सारखी नाट्यसंस्था, सुहास तांबेसारखे स्वतःची अलग शैली असणारे विद्वान लेखक, श्रीधर जोशी, नितीन जोशी, आनंद थत्ते, समीर सावंत व त्यांची सारी टीम अशा अनेकांनी शिकागोच्या स्थानिक मराठी नाट्यक्षेत्राला इथे वाढवलेले आहे नि जुन्या जाणत्या लोकांना बरोबर घेऊन नवनवीन प्रतिभावंत कार्यकर्ते मंडळ पुढे नेत आहेत, याचे विजूकाकांना कौतुक वाटते. काकांना सर्वात आवडते ती मंडळाची नेपथ्य समिती. गेल्या इतक्या वर्षांपासून नेपथ्य करणारी हि मंडळी कधीच कुठल्याही प्रकारच्या सेटला नाही म्हणत नाहीत नि प्रयत्नपूर्वक शक्कल लढवीत ते काही ना काही युक्त्या करत इथे परदेशातही भारतासारखेच मूळ नाटकाच्या तोडीचे नेपथ्य मर्यादित उपलब्ध असलेल्या साहित्यातून बनवतात. त्याचा छानसा अनुभव विजूकाकांना अलिकडच्या काळात 'तीन पायांची शर्यत' ह्या नाटकाच्या नेपथ्याच्यावेळी आला. ह्याच नाटकाचे संगीतही इथले खंदे कार्यकर्ते आनंद थत्ते ह्यांनी सांभाळले. आपल्या देशापासून दूर असताना आपल्या समुदायातील लोकच आपले नातेवाईक बनतात नि ते आपली पाळंमुळं इथे रोवून जोमाने वाढतात ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे शिकागोच्या मंडळाचे कार्यकर्ते अशा शब्दांत विजूकाका शिकागोच्या महाराष्ट्र मंडळाचे कौतुक करताना थकत नाहीत. ह्या सर्वांमुळेच विजूकाकांचे शिकागोशी इतक्या वर्षांचे ऋणानुबंध दृढ झाले आहेत. अमेरिकेत दौरा ठरला, की पहिले ते शिकागोला नाटकाचा प्रयोग आहे ना याची खात्री करून घेतात. शिकागोतील स्थानिक कलाकार व भारतातील काही कलाकार ह्यांना घेऊन एखादे नाटक दिग्दर्शित करण्याची संधी भविष्यात नक्की येईल अशी विजूकाकानी ह्या निमित्ताने इच्छा व्यक्त केली.

एकंदरीत इथल्या कार्यकर्त्यांचा उत्साह व प्रतिभा पाहता महाराष्ट्र मंडळ शिकागो हे असेच शंभरी व त्यापुढेही घोडदौड उत्तमपणे करत राहील अशी विजूकाकांना खात्री वाटते. इथे आपली नाट्यसंस्कृती रुजवायला, फुलवायला आमच्या नाटककारांकडून जे जे सहकार्य हवे ते आम्ही नक्की देऊ असेही त्यांनी आवर्जून सांगितले. सुवर्ण महोत्सवानिमित्त ह्या सुंदर शहराचे सौंदर्य मनात उतरलेले उत्स्फूर्त, उत्साही कार्यकर्ते, उत्तम प्रेक्षकवर्ग, उत्तम यजमान नि एकूणच सर्वसंपन्न अशी इथली माणसे ह्या सगळ्यांना विजूकाकांनी मनःपूर्वक सदिच्छा दिल्या.

मुलाखत व शब्दांकन: वर्षा राहुल विसाळ



SWAABHI™
Jewellery
inspired by you

वाटचाल (वर्ष २०११-२०१५)

एक अष्टपैलू व्यक्तिमत्व

मुलाखतीसाठी लेखणी हातात घेऊन अतिउत्साहाने मी सरसावले खरे, पण काही क्षणातच मला जाणवले की, माझीच मुलाखत घेतली जात आहे. हया प्रश्नांच्या भडिमाराचा एक फायदा मात्र निश्चित झाला आणि तो म्हणजे मनमोकळेपणे संभाषणाला सुरुवात झाली.

प्रश्न १. आपल्या वैयक्तिक आयुष्याविषयी थोडे सांगा.

मी श्री.मिलिंद पानट, पत्नी सौ. वृषाली, कन्यारत्न मैथिली तर सुपुत्र चि. मिहीर असा आमचा भक्कम चौकोनी सांगाडा आहे.

प्रश्न २. 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'त तुमचे पदार्पण कसे झाले?

'परदेशात स्वकियांबद्दल वाटणारी ओढ' हे मंडळात येण्याचं प्रमुख कारण. १९९४ साली स्वामी विवेकानंदांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या शिकागो नगरीत कामानिमित्त आलो. महाराष्ट्र मंडळाच्या संक्रांतीच्या कार्यक्रमाला हजेरी लावली. कार्यक्रम सुरू होण्यास बराच उशीर होत असल्याने प्रेक्षकवर्गात अस्वस्थता वाढत होती. अडीअडचणीच्या वेळी धावून जाणे हे रक्तात भिनले असल्याने, व्यवस्थापकांची भेट घेऊन व्यासपीठाचा ताबा घेतला. १५-२० मिनिटे लोकांचे मनोरंजन केले आणि शांतता प्रस्थापित केली. १९९४ पासून मी महाराष्ट्र मंडळाशी निगडीत आहे.

प्रश्न ३. १९९४ ते २०१९ हया कालावधीत आपण मंडळाच्या कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडल्या?

१९९८ साली उपाध्यक्ष, १९९९ साली अध्यक्ष. २००० ते २००३ विश्वस्त (ट्रस्टी), २०११ साली अध्यक्ष आणि २०१२ ते २०१४ साली विश्वस्त. बेसमेंट थिएटर या 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'शी निगडीत असलेल्या संस्थेच्या अनेक नाटकांमधून निरनिराळ्या भूमिका पार पाडल्या. आजही मंडळाच्या कोणत्याही कार्यासाठी मी उपलब्ध असतो.

प्रश्न ४. इतका दीर्घकाळ तुम्ही मंडळाची धुरा वाहिली, हे निश्चितच प्रशंसनीय आहे. हया कालखंडातील समाधान देणारी एखादी घटना?

२०११ साली बृहन्महाराष्ट्र मंडळाचे शिकागोला झालेलं अधिवेशन. अधिवेशनाची तयारी तीन वर्षे चालू होती. गव्हर्नरचे प्रशस्तिपत्रक मिळवले होते. आसपासच्या राज्यांतील मंडळांची सकारात्मक पत्रे जोडली होती. संमेलनासाठी आलेल्या पाहुण्यांची उत्तम व्यवस्था ठेवण्यात आली होती. अंदाजे २०० स्वयंसेवक कार्यरत होते. हे कार्यकर्ते नि:स्वार्थ प्रेमाने पाहुण्यांसाठी झटत होते. कष्ट करत होते. उत्कृष्ट आणि वैविध्यपूर्ण भरपेट जेवणाची सर्व पाहुणे स्तुती करीत होते. सर्वांच्या अथक प्रयत्नांमुळे सारे सुरळीतपणे पार पडले आणि संमेलनाची यशस्वी सांगता झाली. आजही लोक भेटले, की त्या संमेलनाचा आवर्जून उल्लेख करतात. त्या गोड स्मृतींना उजाळा देतात. तेव्हा मन समाधानाने, आनंदाने, अभिमानाने भरून येते. एक प्रकारची कृतकृत्यता वाटते.

कुशाग्र बुध्दिमत्ता, नि:स्वार्थ सेवाभाव, उत्कृष्ट अभिनयकौशल्य, महाराष्ट्र मंडळाविषयी अपार आस्था असलेले श्री. मिलिंद पानट म्हणजे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व यात शंकाच नाही.

"मन करारे प्रसन्न सर्व सिध्दींचे कारण"

एक हसतमुख, प्रसन्न, आनंदी, अत्यंत उत्साही असे उमदे व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री नीलेश विळेकर. जेव्हा त्यांना त्यांच्या व्यक्तिगत आयुष्याबद्दल बोलण्याची मी विनंती केली, तेव्हा ते म्हणाले माझ्या कुटुंबात तीन व्यक्ती आहेत. मी स्वतः नीलेश विळेकर, प्रत्येक कार्यात साथ देणारी माझी प्रेमळ अर्धांगिनी सौ. सायली विळेकर, आणि सुपुत्र कुमार रितिक विळेकर असे आमचे त्रिकोणी कुटुंब आहे.

प्रश्न १. अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारताना आपल्या काय भावना होत्या?

सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून काम करण्यात मी खुश होतो. समाधानी होतो. पण चाहत्यांच्या आग्रहामुळे मी अध्यक्षपदाचा स्वीकार केला आणि त्यांच्या सहकार्याने मी ही जबाबदारी प्रयत्नपूर्वक पार पाडली.

प्रश्न २. २०१२ साली आयोजित केलेल्या कार्यक्रमांमधील संस्मरणीय असे कोणते कार्यक्रम झाले होते ?

२०१२ साली श्री. दिलीप प्रभावळकर हे दिग्गज अभिनेते शिकागोला आले होते. आम्ही त्यांचे 'वाह् गुरु' नावाचे नाटक आयोजित केले. त्यामध्ये स्थानिक कलाकारही सहभागी होते. त्यांच्या अभिनयातील पारंगततेला शिकागो नाट्य प्रेमिकांची परत एकदा वाहवा मिळाली. दुसरा संस्मरणीय प्रसंग म्हणजे दिवाळीचा. त्यावर्षी 'मेडोज क्लब'मधे दणक्यात दिवाळी साजरी केली गेली. प्रशांत दामले यांचे

अफलातून विनोदी नाटक आणि 'मेडोज क्लब' मधले अप्रतिम जेवण. दुग्धशर्करा योगच जणू! आजही लोक भेटले की, त्या दिवाळीची आठवण काढतात.

प्रश्न ३. तुमच्या कालावधीत घडलेली एखादी विशेष आणि उल्लेखनीय घटना.

विशेष घटना म्हणजे राष्ट्रपती माननीय श्री.प्रणव मुखर्जी यांची शिकागोमधे घडलेली प्रत्यक्ष भेट. आयुष्यात प्रथमच शासकीय राजकीय थाटामाटाचा अनुभव घेतला.

मिलिंद पानट
२०११ अध्यक्ष

नीलेश विळेकर
२०१२ अध्यक्ष

विद्या जोशी
२०१३ अध्यक्षा



केदार नावकल
२०१४ अध्यक्ष

सुचेता अकोलकर
२०१५ अध्यक्षा

प्रश्न ४. मंडळाचे अध्यक्ष झाल्यानंतर मंडळाच्या कामकाजाच्या पध्दतीत तुम्ही काही बदल केलेत का?

पूर्वी लोक RSVP करत नसत. कार्यक्रमाला किती प्रेक्षक हजेरी लावतील, याचा अंदाज अचूकपणे लावता येत नसे. बरंच अन्न वाया जात असे. आमच्या पिढीवर 'जीवन करी जिवित्वा अन्न हे पूर्णब्रम्ह' असे संस्कार झालेले असल्यामुळे अन्न वाया जातं हयाची मनाला टोचणी लागे. त्याच्या निराकरणार्थ Paid RSVPची प्रथा चालू केली. सौ. सायली विळेकर आणि सौ.विद्या जोशी यांनी त्याकामी खूपच मदत केली. पूर्वी सभासद वर्षभरातल्या सगळ्या कार्यक्रमांसाठी वर्षाच्या सुरुवातीला एकच तिकिट काढत असत, ही पध्दत आम्ही बदलली. प्रत्येक कार्यक्रमासाठी स्वतंत्र तिकिटे द्यायला सुरुवात केली. लोकांचा विश्वास संपादन करून क्रेडिट कार्ड द्वारे पैसे स्वीकारायला २०१२ मधे सुरुवात झाली.

'रचना' हे आपले जिव्हाळ्याचे प्रकाशन आहे त्याची डिजिटल प्रत काढायलादेखील त्याच वर्षी पासून सुरुवात झाली. 'रचना'मधील अध्यक्षीय इंग्रजी आणि मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये या वर्षी दिले गेले. (त्यावर्षीच्या 'रचना'च्या संपादक विनता कुलकर्णी इंग्रजीतील अध्यक्षीय मराठीत अनुवादित करायच्या.) रचनात फोटो छापले. जाहिरातींची संख्या वाढवली.

या सुश्राव्य मुलाखतीची सांगता श्री. नीलेश विळेकरांनी आपल्या 'सुस्वर सप्त सुरांनी 'गिटार-च्या साथीने केली. अशा सुरेख मुलाखतीचा शेवटही तितकाच सुरेल झाला हा मणिकांचन योगच मानला पाहिजे.

'विद्या विनयेन शोभते'

उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षपदी आपण आज विराजमान आहात आणि तेही बिनविरोध निवडीने! शिकागो येथील मराठी भाषकांना ही अत्यानंदाची बाब आहे. सर्वप्रथम आपले हार्दिक अभिनंदन!

प्रश्न १. शिकागो नगरवासीयांना आपल्या वैयक्तिक आयुष्याबद्दल काही सांगाल का?

मी श्री. सुरेश देशपांडे आणि सौ. शैला देशपांडे यांची ज्येष्ठ कन्या. आयुष्यात 'माणसे जोडणे अवघड आणि तोडणे सोपे' हे मला वडिलांनी शिकवलं. माझे पती श्री. रवींद्र जोशी हेदेखील 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'मध्ये २०११ सालापासून सक्रीय आहेत. यंदाच्या आपल्या मंडळाच्या गोल्डन जुबिली सेलिब्रेशनचे ते कन्व्हेनर आहेत. माझ्या दोन्ही कन्या कु. समृध्दी आणि कु. मिहीका ह्यांनीसुध्दा मंडळासाठी वारंवार विविध कामे केली आहेत.

प्रश्न २. तुमचा स्वयंसेविका ते बृहन्महाराष्ट्र मंडळाचे (२०१९-२०२१) अध्यक्षपद, हा जो प्रवास आहे ह्या प्रवासाबद्दल लोकांना कुतूहल आहे. त्यांच्या समाधानार्थ आपल्या उच्च शिखरापर्यंतच्या वाटचालीबद्दल, थोडे सांगता का?

स्वयंसेविका म्हणून मी 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'त प्रवेश केला. हौसेने आणि जबाबदारीने काम केले. २०११साली शिकागोतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात 'नॉर्थ अमेरिकन प्रोग्राम कमिटी'मधे प्रोग्रॅम मॅनेजर म्हणून महत्त्वाची जबाबदारी सांभाळली. नंतर २०१२ मध्ये स्वकष्टाच्या बळावर मी मंडळाची उपाध्यक्ष झाले. २०१३ मध्ये मी मंडळाची अध्यक्ष म्हणजे प्रेसिडेंट म्हणून बिनविरोध निवडले गेले. त्यानंतर २०१४ मध्ये मराठी शाळा सुरू केली. त्याचबरोबर २०१४ ते २०१६ अशी तीन वर्षे 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'ची विश्वस्त/ट्रस्टी म्हणून काम केले. त्यानंतर २०१७ला बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशनासाठी शिकागोची ॲम्बॅसिडर होते. २०१८ आणि २०१९

मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाची सेक्रेटरी म्हणून मी काम केले. आणि आता २०१९ ते २०२१ कालावधीसाठी मी बृहन्महाराष्ट्र मंडळाची अध्यक्ष म्हणून काम सांभाळणार आहे.

प्रश्न ३. २०१३ मध्ये जेव्हा 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'च्या अध्यक्षपदी आपली निवड झाली त्या काळातल्या उल्लेखनीय गोष्टींबद्दल काही सांगू शकाल का?

आम्ही वर्षभर भरगच्च कार्यक्रम आयोजित केले. संक्रांतीला 'सूरप्रवास' हा संगीत-प्रधान कार्यक्रम शिकागोच्या स्थानिक कलावंतांनी साजरा केला. गुढीपाडव्याला संजय उपाध्ये यांचे "मन करा रे प्रसन्न" उत्तम रंगले. तसेच होलिका उत्सव साजरा केला तोही थंडाई चा आस्वाद घेत! सहलीच्या वेळी "लगोरी" खेळाने रंगत आणली. बर्फाचा गोळा, म्हातारीचा कापूस यांची रेलचेल होती. आजीआजोबादेखील संगीतखुर्ची खेळले. मंडळाच्या इतिहासात प्रथमच दहीहंडी साजरी केली. गणेशोत्सवाला सिॲटलवरून आलेले "ती फुलराणी नाटक सादर झाले. तसेच गणरायाची ढोल-ताशाच्या साथीने लेमॉन्टच्या देवळाच्या आवारात मिरवणूक काढली. दिवाळीला आकाशकंदील, रांगोळी या स्पर्धा घेतल्या. द्वारकानाथ संझगिरी यांचा कार्यक्रम, तसेच जादूगार रघुवीर यांचे जादूचे प्रयोग तर आबालवृध्दांना आनंद देऊन गेले. वर्षभर प्रत्येक सणाप्रमाणे गुळपोळी, पुरणपोळी, आंबेडाळ, पन्हे, मोदक, लाडू, चिवडा असे खास मराठी पदार्थ भारतातून आणायची सोय केली.

२०१३ च्या वर्षात प्रत्येक कार्यक्रमाला उपस्थितांना सीट क्रमांक द्यायला सुरुवात केली. त्यामुळे मंडळाचे सभासद पुढच्या सीट मिळण्यासाठी वेळेवर RSVP करू लागले. आलेल्या प्रत्येक सभासदाला हाताला लावायला रंगीत बँड द्यायला सुरुवात केली. त्यामुळे आधी तिकीट काढलेले आणि वेळेवर कार्यक्रमाला आलेले सभासद यांच्यातील फरक ओळखता आल्याने भोजनाची नी आसनांची विनासायास व्यवस्था करता येऊ लागली.

प्रश्न ४. नवीन लोकांना तुम्ही काय संदेश द्याल ?

फॅालो युवर हार्ट! जे तुम्हाला हवे ते मिळवण्यासाठी मनापासून कष्ट करा. आपल्या सकारात्मक कार्याने समाजाचे ऋण फेडा. शुभं भवतु. मराठी भाषकांच्या हृदयसिंहासनावर आपल्या कर्तृत्वाने आणि प्रेमळ व्यक्तिमत्वाने विराजमान असलेल्या या सम्राज्ञीला सादर मानाचा मुजरा!

'मराठी पाऊल पडते पुढे'

पहिल्या भेटीतच लोकांना जिंकून घेणारे, अतिशय प्रसन्न व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री. केदार नावकल. औपचारिकतेची जागा आपलेपणाने केव्हा घेतली आणि गप्पांच्या स्वरूपातल्या प्रश्नावलीला कधी सुरुवात झाली, हे समजलंच नाही.

प्रश्न १. केदार दादा आपल्या व्यक्तिगत आयुष्याबद्दल मराठी भाषकांना काही सांगाल का?

मी केदार आनंदराव नावकल. माझ्या कुटुंबातील व्यक्ती म्हणजे माझी पत्नी सौ. अनिता नावकल आणि चिरंजीव निषाद नावकल. मूळचा मी मुंबई- दादरचा! कर्नाटकातल्या मणिपाल इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयरिंग मधून मी माझं इंजिनीअरिंगचे शिक्षण पूर्ण केले आणि न्यूजर्सीला उच्च शिक्षणासाठी आलो. त्यानंतर नोकरीनिमित्त १९९५ मधे शिकागोला येणं झालं. तेव्हापासून आजतागायत माझे वास्तव्य शिकागो नगरीत आहे.

प्रश्न २. २०१४ साली कोणते विशेष कार्यक्रम केले गेले होते, जे तुमच्या अजूनही स्मरणात आहेत?

भावपूर्ण सुंदर कवितांचा वाचन-महोत्सव, हृदयनाथ मंगेशकर यांचे सुश्राव्य गायन, टेनिस, कॅरम, बॅडमिंटन इत्यादी खेळांच्या स्पर्धा, भारतातल्या आणि अमेरिकेतल्या कलाकारांचे पेंटिंगचे प्रदर्शन, 'फीड माय हंग्री चिल्ड्रेन' साठी केलेले काम; ह्या सर्व कार्यक्रमांना लोकांनी बहुसंख्येने हजेरी लावली होती. प्रत्येक कार्यक्रमाला 'हाउसफुल'चा फलक लावावा लागे. माझ्या अध्यक्षीय कारकिर्दीतली आवर्जून उल्लेख केला पाहिजे अशी घटना म्हणजे शिकागो मराठी शाळेची स्थापना!

प्रश्न ३. सर्व कार्यक्रम इतक्या उत्तमपणे पार पडले, या यशाचं रहस्य काय?

श्रेय द्यायचं झालं तर ते प्रथम 'वक्तशीरपणा' आणि 'आदर्श नियोजन' या दोन्ही गुणांना दिले पाहिजे. प्रत्येक कार्यक्रमासाठी आम्ही कप्तान म्हणून एका व्यक्तीची निवड करत असू. त्या व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली सर्व स्वयंसेवक कार्यरत असत. स्वयंसेवकांचे आम्ही निरनिराळे गट करत असू, प्रत्येक गटप्रमुखाला त्याचे काम नेमून दिलेले असे. काही स्वयंसेवकांच्या गटाला आम्ही शेवटपर्यंत राखीव ठेवत असू. या सगळ्या गोष्टींमुळे कुठल्याही कार्यक्रमात गोंधळ गडबड न होता, तो कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पडत असे.

प्रश्न ४. 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'ने मराठी मंडळींच्या भावी पिढ्यांना उपयुक्त असे काय काम करावे, असं तुम्हाला वाटतं?

आता आपण अमेरिका हा देश आपला मानला आहे. आपण मराठी भाषक जरी अल्पसंख्य असलो तरी, गुणात्मक वाढ करून येथील समाजाशी आपण एकरूप झाले पाहिजे. आपल्या मराठीभाषकांतून राज्यस्तरावर नेतृत्व निर्माण करावे व त्यांनी मराठी भाषकांचे प्रतिनिधित्व करावे असे मला वाटते. येथील धर्मादाय संस्थांना म्हणजे चॅरिटेबल इन्स्टिट्यूटना मदत करावी.

मुलाखतीचे प्रश्न संपले. मनात आले की, श्री केदार नावकल यांचा ब्लड ग्रुप BE POSITIVE असावा अन्यथा असे सकारात्मक व्यक्तिमत्व निर्माण होणे शक्य नाही! क्रीडाक्षेत्र, चित्रकला, नाट्यकला, संगीतकला या सगळ्यांची उत्तम जाण असणारे व्यक्तिमत्व अध्यक्ष म्हणून 'महाराष्ट्र मंड्ळ शिकागो'ला लाभले हेते; हे महाराष्ट्र मंडळाचे सौभाग्य !

'सुहास्यवदना'

सौ. सुचेता अकोलकर यांना मुलाखतीनिमित्त काय प्रश्न विचारावेत, याची मनात जुळवाजुळव करीत असताना, त्यांच्या अत्यंत गोड व लाघवी संवादकौशल्यामुळे, औपचारिकतेचे मळभ क्षणार्धात विरले आणि त्याची जागा प्रसन्न मोकळेपणाने घेतली. ह्या संवादातून मला प्रतीत झालेले जिव्हाळ्याचे प्रेमळ व्यक्तिमत्त्व, ते असे.

प्रश्न १. स्वत:विषयी थोडं सांगा...

माझा जन्म एकत्र कुटुंबात झाला. लग्नही एकत्र कुटुंबात झाले. लहानपणापासूनच सर्वांशी मिळून मिसळून वागण्याची सवय होती. माझ्यावर प्रभाव टाकणाऱ्या तीन व्यक्ती म्हणजे माझे पती 'श्री.पंकज अकोलकर', माझी आई, 'श्रीमती जयश्री कोटस्थाने' आणि माझ्या सासूबाई 'श्रीमती नीला अकोलकर'. माझी दोन्ही मुले श्री. नील अकोलकर आणि सौ. राधिका ह्यांनीही वेळोवेळी महाराष्ट्र मंडळात उत्साहाने काम केले आहे.

प्रश्न २. २०१५ साली तुमच्या अध्यक्षपदाच्या कालखंडात घडलेल्या उल्लेखनीय घटना कोणत्या?

सर्वात महत्वाचं म्हणजे 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'च्या कार्यक्रमात मराठी शाळेला हक्काचा वेळ उपलब्ध करून दिला गेला. त्यामुळे शाळेच्या विद्यार्थ्यांना आपल्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचे प्रकटीकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले व पालकांचा सहभागही वृद्धिंगत झाला. त्यावर्षी 'स्त्री'शक्ती या विषयावर आधारित कार्यक्रम केले गेले.

दीर्घकाळ स्मरणात राहतील असे अजून तीन संगीताचे कार्यक्रम झाले. श्री. राहुल देशपांडे यांचे सुश्राव्य शास्त्रीय संगीत, श्री सलील कुलकर्णी व श्री संदीप खरे यांचा 'आयुष्यावर बोलू काही' आणि अमेरिकेतल्या कलाकारांचा वाद्यवृंद. अमेरिकेतील विविध कलाकारांचा 'उभ्या उभ्या विनोद' हया कार्यक्रमानेदेखील त्या वर्षी मनोरंजनात मोलाची भर टाकली. त्या वर्षीचे वेगळेपण म्हणजे, नेपरव्हिल आणि डीवॉन ह्या दोन्ही ठिकाणी महाराष्ट्र मंडळाचे फ्लोट्स काढले गेले. लहान मुलांकडून बेबी-सिटींग मध्ये अनेक ब्लँकेट तयार करून घेण्यात आली आणि ती सगळी ब्लँकेट्स रुग्णालयाला भेट म्हणून देण्यात आली. तसेच 'रचना'चे प्रकाशन केवळ डिजिटल न ठेवता ज्येष्ठ नागरिकांसाठी काही प्रती छापून घेतल्या.

प्रश्न ३. मराठी भाषकांच्या भावी पिढ्यांना आपण काय संदेश द्याल?

आयुष्यात वारंवार अडचणी उद्भवतात. संकटे येत राहतात. हसत-मुखाने संकटांना सामोरे जा. मी स्वतः विविध अडचणीच्या परिस्थितीत हसायला शिकले आणि त्याचेच अनुकरण तुम्हीदेखील करा. अल्पशा यशाने हुरळून जाऊन गर्व करू नका. 'विद्या विनयेन शोभते' याचे स्मरण ठेवा. लोकांच्यात वसत असलेल्या चांगुलपणाला आवाहन करा. सर्वांना बरोबर घेऊन यश संपादन करा. उत्कृष्ट आणि आदर्श आचरणाने आपल्या समाजाचे नेतृत्व करा.

सौ सुचेताताईंचे व्यवहारिक कौशल्य, 'उक्ती आणि कृती'चा जीवनातील अपूर्व संगम, त्यांच्या सान्निध्यात आलेल्या सर्वांना समाधान लाभावे, म्हणून चालू असलेली अविश्रांत धडपड आणि तीदेखील मोठ्या आनंदाने!
हे सारं कौतुकास्पद आहे, अभिनंदनीय आहे.

मुलाखत व शब्दांकन: अर्चना भिडे
संक्षिप्तीकरण - उल्का नगरकर

॥ शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी ॥



'महाराष्ट्र मंडळ शिकागो' - स्थापना ते सुवर्ण महोत्सव अर्थात १९६९ ते २०१९ अशी अर्धशतकी वाटचाल करताना मंडळाने असंख्य उत्तमोत्तम कार्यक्रम सादर करण्याकरिता साहित्य-कला अशा क्षेत्रांतील दिग्गज कलाकारांना महाराष्ट्रातून शिकागोमध्ये आमंत्रित केलेले आहे. मंडळाने आयोजिलेल्या कार्यक्रमांना यशस्वी करण्यात ह्या कलाकार मंडळींचा वाटा खरंच सिंहाचा आहे. मंडळाचा गौरवशाली इतिहास ह्या कलाकारांच्या आठवणींतून उलगडण्यासाठी माझे महत्भाग्य म्हणून 'सुवर्णस्मृती'करिता 'मराठी व हिंदी - नाट्य, चित्रपट व दूरचित्रवाणी मालिका' या सर्वच क्षेत्रांतील एक अत्यंत यशस्वी व्यक्तिमत्त्व आणि आपल्या प्रत्येक भेटीत शिकागोचा रंगमंच अक्षरशः गाजवणाऱ्या 'सौ. वंदना शिरीष गुप्ते' यांची मुलाखत घेण्याची सुवर्णसंधी मला प्राप्त झाली.

पद्मश्री कै. माणिक वर्मा ह्यांना लाभलेला साक्षात देवी शारदेचा कंठ महाराष्ट्राला गेली कित्येक दशके सुपरिचित आहे. माणिकबाईंच्या अभिजात कलेचा वारसा पुढे चालवणाऱ्या त्यांच्या चार यशस्विनी कन्यारत्नांपैकी एक म्हणजे ज्येष्ठ मराठी अभिनेत्री सौ. वंदना गुप्ते, पूर्वाश्रमीच्या वंदना अमर वर्मा. माणिकबाईंचा हा परिवार म्हणजे संत तुकाराम महाराजांच्या "शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।।" ह्या सुप्रसिद्ध अभंगाचे प्रत्यक्ष प्रमाण आहे असे म्हटले तर ते अतिशयोक्त ठरू नये. खरे पाहता, हिंदुस्थानी रागदारीचे सुसंस्कार घेऊन वंदनाताईंनी कलेच्या क्षेत्रात पदार्पण केले, तेंव्हा त्यांना त्यांच्या कोकीलस्वरामुळे एका नाटकात अभिनयाची संधी मिळाली. ती त्यांनी उत्साहात घेतली देखील. मातोश्रींचा त्यांना मंत्र हाच होता की *"जे करशील, ते तुझ्यापरीने सर्वोत्तमच होईल ते कर, खळखळत्या पाण्यासारखी सतत वाहत रहा, यशाच्या कुठल्याही शिखरावर विसाव्यासाठी थांबूही नकोस"!* तो मंत्र वंदनाताईंनी, १२,००० हून अधिक नाटकांचे प्रयोग, शेकडो टीव्ही मालिका, चित्रपट यशस्वी करून, आजही हृदयांत तसाच जपला आहे; किंबहुना, त्यांच्या तब्बल ५० वर्षांच्या अभिनयाच्या क्षेत्रातील यशश्रीचं तेच रहस्य आहे! ... वंदनाताईंच्या मनात मंडळाविषयी उत्कट प्रेम आहे. आपली भाषा, कला, आणि संस्कृती ह्यांना मस्तकावर धारण करणाऱ्या शिकागोच्या सततोत्साही मराठी माणसाविषयी त्यांना वाटणारे कौतुक हे त्यांच्याशी झालेल्या दिलखुलास गप्पांमध्ये क्षणोक्षणीं जाणवत होते ... मी हे अनुभवताना अत्यंत भावविभोर झालो होतो हे सांगणे नलगे -

जैसें शारदीचिये चंद्रकळे । माजि अमृतकण कोंवळे । ते वेंचिती मनें मवाळें । चकोरतलगें ॥
तियापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा । अतिहळुवारपण चित्ता । आणूनियां ॥ - ज्ञानेश्वरी भावार्थदीपिका

चेतन: "महाराष्ट्र मंडळ शिकागो" ही उत्तर अमेरिकेतील महाराष्ट्र मंडळांमध्ये 'आद्य संस्था' - यंदाच्या वर्षी ५०व्या वर्षांत पदार्पण करते आहे. मंडळाच्या ह्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आपल्याला काय वाटतं?

वंदनाताई: आपल्या मातृभूमीपासून मराठी माणूस जेंव्हा दूर जातो तेंव्हा आपल्या मातृभाषेशी आणि मातीशी असलेली आपली नाळ त्याला अजिबात तुटू द्यायची नसते, किंबहुना ती तुटू नये म्हणून तो सतत प्रयत्नशील राहिलेला आहे. अमेरिकेसारख्या विस्तीर्ण देशांत ५० वर्षांपूर्वी काहीही मदत उपलब्ध नसताना, फारशी काही साधने उपलब्ध नसताना, जी काही धडपड इकडे तुम्हां मंडळींनी केली आहे, त्याचे खरंच कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. अक्षरशः 'शून्यातून' सगळं विश्व तुम्हां मंडळींनी एकमेकांच्या मदतीने उभं केलं आहे! मंडळात आपल्या गौरवशाली परंपरा, सणवार, उत्सव हे अगदी शास्त्रशुद्ध पद्धतीनं, मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. अगदी कित्येक कार्यक्रम तर, हल्ली भारतातही तेवढ्या उत्साहात साजरे केले जात नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. आत्ताची पिढीच नव्हे तर आपल्या पुढील पिढ्यांसाठी देखील ही आपल्या महान संस्कृतीची गंगा अशीच पुढे वाहत राहील, याची मंडळाने घेतलेली काळजी अगदी ठळकपणे दिसून येते. हे कार्य, मंडळ गेली ५० वर्षे एकत्र येऊन, सर्वांची मोट बांधून करते आहे, ही खरंच कौतुकाची गोष्ट आहे.
आणखी एक महत्त्वाचं निरीक्षण म्हणजे - भारतातून अमेरिकेत आलेल्या सुरुवातीच्या पिढ्यांमध्ये विशेषतः लहान मुलांना मराठी भाषा शिकवणं हे अत्यंत जिकिरीचं होतं, पण हळूहळू नंतरच्या पिढ्यांनी मात्र आपली भाषा आणि संस्कृती इकडे नुसती आणलीच नाही, तर ती जीवापाड जपली देखील.

"इवलेंसें रोप लावियलें द्वारी । तयाचा वेलु गेला गगनावेरीं ॥"

अमेरिकेत राहून अस्खलित मराठी बोलणारी लहान मुलं पाहिल्यावर खरंच मला नवल वाटते, तुम्हीं लोक हे सगळं करता त्याबद्दल तुम्हांला Hats off! मायभू पासून सातासमुद्रापार दूर, तरीही तिला नित्य आपल्या हृदयांत जपणारा एकसंध असा 'महापरिवार' म्हणजेच 'महाराष्ट्र मंडळ'! फारंच छान - तुम्हां सर्व मंडळींना 'सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

चेतन: आपण अभिनय क्षेत्रात गेली अनेक दशके यशस्वी आहांत, 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'ने जपलेल्या 'नाट्य' परंपरेबद्दल तुम्हांला काय वाटतं? आपण अनेकदा मंडळाच्या कार्यक्रमांमध्ये नाटकेही सादर केली आहेत, त्याबद्दल काही सांगू शकाल का?

वंदनाताई: नाट्य परंपरेच्या बाबतीत सांगायचं झालं तर - मराठी माणसांना एकत्र आणणारे धागे म्हणून ज्या काही गोष्टी आहेत, त्यांत पहिलं म्हणजे 'खाणे' आणि दुसरं म्हणजे 'नाटक'! त्यापैकी नाटक हे खाण्यालाही बरेचदा सरस ठरतं ! असा माझा अनुभव! मराठी माणसाचे नाटकावर जीवापाड प्रेम आहेच. आणि त्या नाटकावरील प्रेमापोटी आपण एकत्र जमतो, त्याच्या जोडीला अनेक कार्यक्रम देखील आयोजित करतो. अमेरिकेतील मराठी भाषिकांच्या दृष्टीने पाहता 'शिकागो' म्हणजे तर अमेरिकेतील 'नाट्यपंढरी' ! तुम्हीं मंडळी, गेली अनेक वर्षे विविध दर्जेदार नाटके सादर करत आहांत आणि त्या सोबत कविता, गायन, नृत्य, नाट्य-वाचन वगैरे असे अनेक कार्यक्रम देखील करत आहांत. हे फक्त आणि फक्त आपल्या संस्कृतीवर प्रेम आणि मनात दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तरंच शक्य आहे. जुन्या परंपरा जपत असताना नव्या परंपरा हळुवारपणे निर्माण करणं आणि त्या ५० वर्षे टिकवणं, हे करताना सर्वांना एकत्र जोडून त्यांची सांस्कृतिक मोट बांधणं ... हे सारंच अद्भुत आहे, अभिमान वाटावा असेच आहे!

आम्हीं 'सुयोग' निर्मिती सोबत १९९८ मध्ये मंडळासाठी 'शूऽऽ कुठं बोलायचं नाही' व 'सुंदर मी होणार' ही दोन नाटके घेऊन आलो होतो. आणि पुढे २००० मध्ये मंडळाने आयोजित केलेल्या भव्य नाट्य महोत्सवासाठी 'श्री तशी सौ' हे नाटक घेऊन आलो होतो. ह्या सर्वच प्रयोगांना शिकागोकरांनी अक्षरशः डोक्यावर घेतले होते. खूपच धमाल आली होती! अमेरिकेतील महाराष्ट्र मंडळांनी विशेषतः शिकागोने ही नाट्यपरंपरा जपली तर आहेच पण विकसित देखील केली आहे. नेपथ्य, प्रकाश-योजना, ध्वनी, वेशभूषा आणि सजावट वगैरे अशी नाटकाच्या दृष्टीने अत्यावश्यक विविध अंगांची तयारी मंडळच आम्हांला अनेकदा करून देत आलं आहे. भारतातील कार्यक्रमांप्रमाणे आता अमेरिकेतही नाटकांना उदंड प्रेक्षक लाभतो आहे, आणि त्यांतील कित्येक दर्दी दादही देतात! हे चित्र फारच उत्साहवर्धक आहे!

चेतन: 'महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या आपल्या अनेक भेटींमधील एखादी गोड अशी आपली आठवण सांगू शकाल का ?

वंदनाताई: एखादी नाही तर, अनेक गोड आठवणी आहेत! १९९८ मध्ये शिकागोला आम्हीं आलो होतो, तो कार्यक्रम हा १६ जुलै रोजी होता आणि गंमत म्हणजे त्याच दिवशी माझा वाढदिवस देखील असतो ... हे मंडळातील विलास सावरगावकर, सुनीता व प्रकाश टोके, मिलिंद पानट, सुरेश तलाठी, नितीन जोशी, वीर दोशी, पुष्पा प्रचंड, अविनाश पटवर्धन, श्रीकांत नाडकर्णी, मकरंद करंदीकर, हेमलता पाटील आणि इतरही अनेक कार्यकर्त्यांना कळताच, 'प्रयोग' झाल्यानंतर त्यांनी सपरिवार येऊन, माझ्यासाठी केक आणला होता! माझा मुलगा - अभिजीत, तेंव्हा इंडियानामध्ये शिकायला आलेला होता, तो देखील तेंव्हा मला भेटायला आला होता. आणि आम्हीं सर्वांनी मोठी पार्टी केली होती. सुनिता टोकेंच्या मातोश्रींनी तर चक्क मला 'ओवाळलं' होतं ! तेंव्हा भारती आणि राणी देखील माझ्या सोबत होत्या. आम्हीं तिघीं बहिणीं त्यावेळी टोके यांच्या घरी राहिलो होतो. दुसऱ्या दिवशी टोके परिवारासोबत शिकागो दर्शन देखील करून आलो. तुमचे शिकागो शहर म्हणजे स्थापत्यकलेचं एक आश्चर्यच आहे! मंडळातला प्रत्येक माणूस आम्हांला खूपच मनापासून जपत होता, आमची काळजी घेत होता. आदरातिथ्य करणारे सगळेच स्वयंसेवक आमच्याशी अत्यंत आपुलकीने वागत होते ही गोष्ट आम्हांला अत्यंत भावली होती!

१९९८ मध्ये शिकागो मधील कार्यक्रम संपल्यावर आमचा पुढील कार्यक्रम आमचा 'लंडनमध्ये' होता, विमानतळावर टोके कुटंब सोडायला आले होते, पण अचानक आम्हांला व्हिसा मिळण्यात अडचणी आल्या आणि लंडनचा प्रवासच आम्हांला रद्द करावा लागला. तेंव्हा, आम्हीं टोकेंच्या घरी परत आलो ... आल्यावर, सुनीता वहिनींनी घरीच पटकन जेवण बनवलं होतं. मला अजूनही आठवतंय - मी त्यांना म्हणाले होते, "देखण्या वहिनींच्या हातचं पिठलं-भात खायला खूप मजा आली !" टोके कुटुंब कित्येक वर्षे त्यानंतरही संपर्कात होतं. अजूनही बरीच मंडळी संपर्कात आहेत. माझा एक 'ती' नावाचा कार्यक्रम होता - मुलीच्या जन्मापासून तिचा आजी होण्यापर्यंतचा प्रवास अशी नृत्य-नाट्य-संगीतिका! त्याबद्दल नितीन जोशींशी 'ती'-करिता सोबत काम करण्याबद्दल माझं बोलणंही झालं होतं आणि अनेक ठिकाणी 'ती'चे यशस्वी प्रयोग देखील झाले होते. आणखी म्हणजे - माझी जवळची दादरची मैत्रीण, अनुपमा धारकर. तीही शिकागोमध्येच राहते, तिचीही मध्यंतरी भेट झाली होती.

आणखी एक गंमत सांगायची झाली तर, कित्येक वर्षे झाली तरी आजही मला शिकागोतील मित्रमंडळी भेटल्यावर, एका गोष्टीचं वर्णन ते अजूनही तेवढंच रसभरीत करतात, ती म्हणजे - २००० मध्ये आम्हीं आलो होतो तेंव्हा ह्या सर्वांच्याकरिता फक्त २ तासांत 'चिकन करी, पाव आणि भात' असा स्वयंपाक मी स्वतः केला होता ... खरं तर हॉटेलमधील इलेक्ट्रिक शेगडी आणि भांडे तेवढेच आयत्या वेळीं उपलब्ध झाले होते. पण बेत अगदी फक्कड झाला होता! खवय्ये म्हणून तेंव्हा मंडळातले अनेक कार्यकर्ते आणि आमच्या नाटकातील

कलाकार मंडळी वगैरे अशा सुमारे २५ जणांनी अक्षरशः मिटक्या मारत जेवण केले ! नंतर, सुयोगमधील सर्व कलाकार मंडळी आणि शिकागोकर मंडळी असे सर्वजण एकत्र बसून छान मैफल जमली होती. मीही त्यांत माझ्या आईचे अत्यंत आवडीचे गाणे गायले होते - "घननीळा लडिवाळा, झुलवु नको हिंदोळा! ..."

हा मंडळाने जपलेला ऋणानुबंध असाच नित्य सुगंधित राहावा हीच 'श्रीं'च्या चरणीं प्रार्थना ! मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त खूप खूप अभिनंदन व पुढील हीरक महोत्सवाच्या वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा ! कळावें लोभ असावा !

मुलाखत व शब्दांकन: चेतन रेगे

ज्येष्ठ अभिनेत्री - सौ. वंदना शिरीष गुप्ते

श्री. दिलीप प्रभावळकर, सौ. वंदना गुप्ते यांच्यासोबत श्री. प्रकाश टोके

श्री. प्रकाश टोके यांच्या संग्रहातील
कै. माणिक वर्मा यांच्या स्वाक्षरीचा ठेवा

१९९८ - "सुंदर मी होणार"ची जाहिरात



२००० - "श्री तशी सौ"ची जाहिरात

Best wishes from
Prakash and Sunita Toke

Best wishes from
Anupama and Dilip Dharkar

सिंहावलोकन (वर्ष २०१६-२०१९)

"You make a living by what you get. You make a life by what you give." विन्स्टन चर्चिल यांच्या ह्या शब्दांनी प्रेरित होऊन जेव्हा मी शिकागोच्या महाराष्ट्र मंडळात काम करायचं ठरवलं, तेव्हा ती संधी मला मिळाली, दोन हजार सोळा ह्या वर्षीचे अध्यक्ष, श्री. संदीप गाडगीळ, यांच्या टीमपासून.

संदीपना लहानपणापासूनच इतरांना मदत करण्याची आवड! त्यात २०११ च्या BMM मध्ये भरपूर काम करून, नंतर निलेश विळेकर आणि विद्या जोशी यांच्या बरोबर काम केल्यानंतर, २०१६ मध्ये संदीपनी अध्यक्षपदाचं शिवधनुष्य उचलायचं ठरवलं. काही कमी-जास्त झालं तर दोष स्वतःचा पण कौतुक झालं तर क्रेडिट मात्र टीमला द्यायचं, हा मंत्र त्यांनी पुरेपूर पाळला.

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते, तशी, वैशाली गाडगीळ, संदीपबरोबर हिरीरीने तर होतीच, पण त्याबरोबरच त्यांच्याबरोबर होती, त्यांची संपूर्ण टीम. मुख्य टीममध्ये संदीपबरोबर होते शिल्पा नाईक, अधिश्री पंचपोर, संजय मराठे आणि सुनील देव. त्या वर्षी संदीपचे ध्येय होतं ते म्हणजे त्यांना शिकागोच्या सर्व भागातून टीम मेम्बर्सचा सहभाग हवा होता.

त्या वर्षी, प्रशांत दामलेंच्या नाटकाला जवळपास साडे सातशे श्रोते आले होते, इतक्या लोकांना एकत्र आणणं, आणि त्यांचं जेवण-खाण, पूर्ण दिवसाचा प्रोग्रॅम पार पाडणं, हे फक्त टीममुळेच शक्य होतं, ही संदीप यांची भावना किती सुखकर आहे. प्रत्येक प्रोग्रॅम नंतर संदीप, प्रत्येक टीम मेम्बरला स्वतः फोन करून त्यांचे आभार मानायचे, त्याचं मला स्वतःला ही खूप कौतुक वाटायचं. व याच खपणाऱ्या टीमसाठी आपण मोठ्या प्रमाणावर प्रशांतबरोबर 'Meet and Greet ' करू शकलो नाही, याची खंतही ते व्यक्त करतात.

त्या वर्षीच्या दोन आठवणीं पैकी एक म्हणजे महाराष्ट्र मंडळच्या गणेश उत्सवामध्ये, गणपतीबरोबर गौरीही बसवण्याची प्रथा सुरु केली व दुसरी आठवण म्हणजे MMC चा दिवाळीचा फराळ हा चक्क टीममधल्या अन्नपूर्णांनी केला होता! ज्या वेळी आपण घरचा फराळ सुद्धा, बाहेरून विकत आणतो तेव्हा मंडळाच्या सभासदांना मस्त भारतातल्या सारख्या फराळाची चव मिळावी म्हणून स्वाती पवार, वैशाली देव, शिल्पा नाईक, अधिश्री पंचपोर, वैशाली गाडगीळ, शुभांगी सुमंत आणि अनुपमा भट यांनी कंबर कसून तो बनवला आणि सर्वांची वाहवा मिळवली.

या वर्षी कामं करता करता ही टीम इतकी जवळ आली की त्या सर्व जणांचं एक मस्त कुटुंबच बनलं आणि आज चार वर्षांनंतरसुध्दा ते नातं सर्वांनी तसंच जपलंय, हे संदीप अभिमानाने सांगतात.

२०१६ ला महाराष्ट्र मंडळात काम करायचा इतका छान अनुभव आल्यावर, रवी जोशींनी, २०१७ च्या टीम मध्ये यायला विचारल्यावर मी नाही म्हणणं शक्यच नव्हतं आणि त्याजोडीला मला जे भावलं ते म्हणजे २०१७ चं ब्रीद वाक्य 'मनी आमुच्या माय मराठीची ओढ, देऊ तयाला समाजकार्याची जोड'!



काळाची गरज ओळखून, आजचं महाराष्ट्र मंडळ आपण अजून मोठं कसं करावं, अजून स्वयंसेवक कसे आणावेत, चाकोरीबाहेर पडून त्याचा विस्तार कसा करावा, संस्कृतीजतनाला समाजसेवेची जोड कशी द्यावी या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी २०१७ वर्षाची सुरवात केली.

हे सर्व करायचं तर त्यासाठी पाहिजे शक्तिमान टीम आणि MMC तील मित्रपरिवारासारखी टीम मिळाली की सर्व नक्की जुळून येतं हे ते अभिमानाने सांगतात. इतर अनेक स्वयंसेवकांबरोबरच, त्यांच्या मुख्य टीममध्ये होते आशिष नगरकर, मृणाल जोगळेकर, सुनील देव आणि शिल्पा नाईक. या सर्वांमुळेच वर्षभरात तब्बल सतरा कार्यक्रम (दर तीन आठवड्याला एक कार्यक्रम) शिकागोकरांना देणं त्यांना शक्य झालं. मग तो महेश काळेंचा कार्यक्रम असो की राहुल देशपांडेंचा की अगदी Valentine Day Celebration! मोठ्या प्रमाणावरचे कार्यक्रम यशस्वी करताना, कधी कलाकारांनाबरोबर कठोरसुध्दा व्हावं लागतं, तर कधी त्यांना प्रेमाने समजावून द्यावं लागतं, हा व्यवस्थापनाचा मंत्र ते सांगतात.

जेव्हा रवी या कार्याची धुरा पुढे नेत होते तेव्हा घरची पूर्ण टीमसुध्दा त्यांच्याबरोबर होती. यात पुढचा विचार करणाऱ्या, त्यांच्या पत्नी विद्या, UIUC वरून प्रत्येक कार्यक्रमाला येऊन पडेल ते काम करणारी त्यांची मोठी मुलगी समृध्दी, MMC च्या Kids ग्रुपमध्ये नेहमीच भाग घेणारी मिहिका तर होतेच पण भारतातून येणारे त्यांचे आई-बाबा सुध्दा मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमात मदतीला तयार होते. रवीच्या आईंनी, इंडिया डे परेडमध्ये दाखवलेली लेझीमची पावलं तर विसरणं अशक्यच.

या प्रवासात आपलं महाराष्ट्र मंडळ, अमेरिकेत राजकीयदृष्ट्या विचारात घेतलं जायला हवं, आपली ताकद फक्त आपल्या मंडळापुरती न रहाता, त्याचा विस्तार व्हायला पाहिजे, हे त्यांचं स्वप्न आहे. २०१७ मध्ये आपण या दृष्टीने खूप काही करू शकलो नसलो तरी येत्या काही वर्षात ते ध्येय गाठायचा त्यांचा मानसच त्यांच्या विशाल स्वप्नांची आणि उत्तुंग विचारांची साक्ष देतो. तर अशा या कार्याची जबाबदारी त्यांनी आशिष नगरकरांना दिली ती शिकागोकरांच्या प्रेमाला सलाम करूनच!

२०१८ च्या वर्षाची सुरवात आशिष नगरकरांनी केली ती 'Two Zero One Eight MMC, our mantra is Be Healthy!' या मंजुळ स्वरांनी! फक्त टीमनेच नाही तर सर्वांच्या आवडत्या सनीने सुद्धा त्या व्हिडिओत आपला ठसा उमटवला आणि 'सर्वे संतु निरामया' चा गजर संपूर्ण वर्ष गाजला!

२०१३ मध्ये कोषाध्यक्ष, २०१७ मध्ये उपाध्यक्ष आणि इतर वर्षी MMC टीममध्ये काम करून आशिष नगरकरांनी २०१८ त अध्यक्ष व्हायचं ठरवलं ते काहीतरी वेगळं करून दाखवण्यासाठीच! दर वर्षी कार्यक्रम होतात, जेवणं घातली जातात पण आपण हे सारं अजून चांगलं आणि वैविध्यपूर्ण कसं करू शकतो हा विचार कायम त्यांच्या मनात होता. ते करताना आधीच्या वर्षांच्या अनुभवाचा मात्र ते आवर्जून उल्लेख करतात. त्या अनुभवामुळेच अध्यक्षपदाची धुरा यशस्वीरीत्या सांभाळता आली हे ते अभिमानाने नमूद करतात.

शिकागोमध्ये येणाऱ्या नवीन मराठीजनांना, महाराष्ट्र मंडळात कसं सामावून घेता येईल, व्हिसामुळे काही वर्षांसाठीच इथे राहणाऱ्या लोकांना, आपल्या मराठी संस्कृतीचा भाग कसं बनवता येईल, हा विचार तर त्यांच्या मनात होताच, पण त्याचबरोबर आपण आपल्या तब्येतीकडेसुध्दा लक्ष द्यायला हवं आणि मनाबरोबर शरीरही सुदृढ ठेवायला हवं, या विचारांनी त्यांनी 'बागकाम', 'योगा' अशी विविध शिबिरं वर्षभर घेतली आणि लोकांची वाहवा मिळवली.

त्यांच्या सोबतीला समीर सावंत, संदीप बाग, वर्षा विसाळ आणि वैशाली राजे तर होतेच पण इतर स्वयंसेवकांबरोबर, त्यांनी 'Kids representatives', 'Youth representatives' आणि 'Senior representatives' स्वयंसेवक आवर्जून आणले.

नवीन काही करायचा मंत्र तर त्यांनी वेगवेगळ्या प्रकारांनी राबवला, मग ती लेझीम किंवा नृत्याची टीम असो की खास शिकागोकरांसाठी, मुंबईहून खास आणलेले उकडीचे मोदक असोत, प्रत्येक कार्यक्रमाला Facebook Live करून न येऊ शकलेल्या प्रेक्षकवर्गाला, कार्यक्रमाची झलक देणं असो, Online program checkin/ MMC Twitter/ 'MMC कट्टा' Whatsapp group of 125 members आणि Instagram accounts बनवणं असो, की भारतीय स्वातंत्र्यदिन साजरा करताना ढोलताशाच्या टीमसाठी खास Float आणणं असो. हे सारं करताना ज्या स्वयंसेवक आणि प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया मिळतात त्यानेच मन भरून पावतं हे ते कौतुकाने सांगतात. दिवाळीला 'सूरपहाट' सारख्या कार्यक्रमाने तर त्या वर्षाची मजा अजून वाढवली!

हे सर्व कार्य, सावनी, सलोनी, सनी, आई, बाबा आणि उल्का यांच्या पाठिंबा आणि सहभागामुळेच झालं हे ते अभिमानाने सांगतात. उल्काने पन्नास स्वयंसेवकांच्या टीमला, संपूर्ण वर्षभर एकत्र तर ठेवलंच पण त्याचबरोबर नृत्य आणि लेझीम टीमला भरपूर संधीसुध्दा उपलब्ध करून दिल्या. अजून १-२ शिबिरं घ्यायला हवी होती, दिवाळीला अजून प्रेक्षकवर्ग यायला हवा होता, आधीच्या मंडळाने ज्या काही उपयुक्त गोष्टी केल्या आहेत त्या पुढच्या टीमने पुन्हा नव्याने करण्यापेक्षा आहेत तसा त्यांचा वारसा चालवायला हवा, अशा काही अपुऱ्या इच्छाच त्यांना अजून काम करायला प्रेरणा देतात.

तर असं हे विविधतेने नटलेलं वर्ष 'ओ MMC वा वा MMC' याच्या चालीवर कसं संपलं हे कळलंच नाही आणि मग सुरू झाला २०१९ चा 'मायबोली My मराठी' चा जागर, वैशाली राजेंच्या अध्यक्षतेखाली! आधी सिनसिनाटी आणि नंतर शिकागो अशा दोन्ही मंडळात सक्रिय कार्यकर्त्या असलेल्या वैशालींनी MMC च्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचं अध्यक्षपद स्वीकारायचं ठरवलं ते त्यांच्या 'मराठी' वरील प्रेमानेच!

'लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी' या सुरेश भटांच्या पंक्ती, इथे अमेरिकेत वाढत असलेल्या पुढच्या मराठी पिढीपर्यंत कशा पोचवायच्या या विचारानेच त्यांनी २०१९ च्या वर्षाचा श्रीगणेशा केला. मायबोलीबरोबरच, आधीच्या पिढ्यांच्या आठवणींना उजाळा कसा द्यायचा आणि पुढच्या पिढ्यांना आठवणींचं गाठोडं बांधायला कशी संधी द्यायची हा त्यांचा focus आहे.

या वर्षीच्या गुढीपाडव्याला 'एका लग्नाची पुढची गोष्ट'' या नाटकाला विक्रमी अशी ९०० जणांनी हजेरी लावली होती. खास स्त्रीवर्गासाठी त्यांनी 'Throwball' ची टीम सुरू केली, आणि समस्त मैत्रिणींना त्यांच्या शाळेची कमी भासू दिली नाही. तरुण पिढीबरोबरचा sleepover असो की ज्या प्रेक्षकवर्गाला दिसण्याचा किंवा ऐकण्याचा त्रास आहे त्यांना योग्य त्या जागा सभागृहात देणं असो, ते सर्व करताना त्यांना मनापासून बरं वाटतं. या छोट्या छोट्या गोष्टीच आयुष्यात महत्वाच्या असतात यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. आणि म्हणूनच जेव्हा कोणी आजोबा, काका किंवा मावशी हातात हात घेऊन केलेल्या कामाचं कौतुक करतात तेव्हा त्यांचा उर भरून येतो आणि मनाला अजून चांगलं काही करण्याची उभारी मिळते. या सुवर्णमहोत्सवी वर्षी, 'मागोवा' सारख्या कार्यक्रमातून शिकागोतील नररत्ने शोधून सर्वांसमोर आणण्याचा त्यांचा मानस कौतुकास्पद आहे.

या सर्व यशाचं श्रेय मात्र त्या देतात त्यांच्या संपूर्ण टीमला! तनुजा पोतदार, अमित रोग्ये, मंदार पित्रे आणि निलेश मालपेकर या मुख्य कार्यकारिणीबरोबरच त्यांनी तब्बल ७० जणांची टीम एकत्र ठेवली आहे. एकमेकांकडून शिकतच सर्वांनी एकत्र पुढे जायचं आणि मंडळाला पुढे न्यायचं हा त्यांचा मंत्र आहे आणि 'टीमची एकजूट' हा त्यांचा ध्यास आहे. एकमेकांवरच्या विश्वासानेच हे शक्य होत आहे हे त्या अभिमानाने सांगतात. या वाटचालीत, त्यांचे कुटुंब- संदीप, सायली, शिबानी यांचं प्रोत्साहन आणि सहभाग लक्षणीय आहे. फक्त वैशालींनीच नाही तर संपूर्ण कुटुंबानेच या वर्षी MMC ला प्राध्यान्य दिलं आहे.

त्यांच्या मंडळावरील प्रेमाबद्दल या काही ओळी!

महाराष्ट्र मंडळ शिकागोचं
तुमचं, आमचं, आपल्या साऱ्यांचं!
या वर्षी गाठतंय वयाची पन्नाशी
'मायबोली My मराठी' वरील प्रेमाने
नक्की गाठो वयाची शंभरी!

मुलाखत व शब्दांकन: रत्नांगी निलेश मालपेकर

"Proud to be part of MMC celebrating 50th Golden Jubilee year. "

Best wishes from Narasimha, Deepa & Aryan Kamath and Sawant family.

Good luck and best wishes to Aryan and Aditi. May Ganapati Bappa bless you in your life.

शिकागो मराठी शाळा

सर्वद्रव्येषु विद्यैव द्रव्यमाहुरनुत्तमम् । अहार्यत्वादनर्घ्यत्वादक्षयत्वाच्च सर्वदा ॥

अर्थ - सर्व द्रव्यांत विद्यारूपी द्रव्य सर्वोत्तम आहे कारण विद्यारूपी द्रव्याला हरवू शकत नाही, त्याचे मोल होऊ शकत नाही आणि त्याचा नाश होऊ शकत नाही.

वरील सुभाषितात म्हटल्याप्रमाणे विद्या हे सर्वोत्तम द्रव्य आहे, त्याचा कधीही व्यय होऊ शकत नाही कारण ज्ञान जितके द्यावे तितके ते वाढते. त्याला वयाची मर्यादा नाही, आयुष्यात आपण काही न काही शिकतच असतो. मुलं तर एखाद्या रोपट्यासारखी असतात, त्यांना आपण ज्ञानरूपी खतपाणी देऊन त्यांचं एका समृध्द अशा वृक्षात रूपांतर करू शकतो. शिकागो मराठी शाळेने गेली पाच वर्षे हाच वसा मोठ्या अभिमानाने घेतला आणि जोपासला. अमेरिकेतील मराठी मुलांना आपल्या मातृभाषेची ओळख व्हावी, मातृभाषेत संवाद साधता यावा यासाठी शिकागो मराठी शाळा विशेष प्रयत्न करते.

शाळेची थोडीशी पूर्वपीठिका म्हणजे पूर्वी शिकागोमध्ये लेमॉण्ट मंदिरात मराठी शाळेचे वर्ग चालायचे. अश्विनीताई मोडक आणि उषाताई महिसेकर हे वर्ग चालवायच्या. २०१४ मध्ये तत्कालिन बृहन्महाराष्ट्र मंडळ अध्यक्ष श्री. नितीन जोशी आणि महाराष्ट्र मंडळ शिकागो अध्यक्ष श्री. केदार नावकल ह्यांनी ही कल्पना मांडली. मी ही जबाबदारी स्वीकारायची तयारी दर्शविली व माझी शाळा संचालक म्हणून नेमणूक झाली. सुरुवातीपासूनच सर्वच सहकार्यांनी मोलाचा हातभार लावला. बघताबघता सुमारे ६० स्वयंसेवक तयार झाले. बालक, पालक आणि शिक्षक यांनी प्रत्येकाने आपापली भूमिका अगदी चोख बजावली. एक छोटासा उपक्रम म्हणून सुरू केलेल्या शिकागो मराठी शाळेत आज १३४ विद्यार्थी शिकत आहेत, शाळेच्या दोन शाखा शॉमबर्ग आणि नेपरव्हिल येथे कार्यरत आहेत. बालवाडी ते पाचवी वर्ग या दोन्ही शाखांत भरवले जातात. गेली पाच वर्षे चालणाऱ्या या कर्मयज्ञाला या वर्षी विशेष यश मिळालं, ते म्हणजे मराठी भाषेला "फॉरेन लँग्वेजचा दर्जा"! 'स्टीव्हन्सन हायस्कूल'मध्ये आता आपल्या पाल्यांना आपण मराठी परीक्षा देऊन त्याचे क्रेडिट मिळवून देऊ शकतो.

शालेय वर्ष हे सप्टेंबर ते मे महिन्यापर्यंत असते. दर वर्षाच्या शेवटी बाहेरच्या असंलग्न परीक्षकांच्या देखरेखीखाली मुलांच्या परीक्षा होतात. हे पेपर बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या परीक्षकांमार्फत तपासले जातात आणि गुणवत्ता निकाल शाळेच्या संकेतस्थळातर्फे मुलांच्या पालकांना पाठवला जातो. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थांना भारतीय विद्यापीठाचे प्रशस्तिपत्रक देण्यात येते.

चांगले मौखिक आणि लेखी मराठी, कामाचा उत्साह, आणि आपल्या कामाशी असलेला प्रामाणिकपणा असला, की या मराठी शाळेत शिक्षक होता येते. पालकांचा उत्साह हा तर आमच्या शाळेचा पाया आहे.

प्रत्येकालाच आपलं पाल्य हे यशस्वी व्हावं असं वाटत असतं. आणि शाळा हे एक माध्यम आहे, अगदी निमित्तमात्र म्हणा ना! शाळेत जरी दोन तास अभ्यास शिकवला जात असला, तरी पालक त्यांच्या गृहपाठाला मदत आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी करून घेतात.

गेल्या दोन वर्षांपासून मराठी शाळा आणि महाराष्ट्र मंडळ याच्या नात्याची वीण अधिकच घट्ट झाली आहे. महाराष्ट्र मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमांत मराठी शाळेसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. मंडळाच्या कार्यक्रमात शिकागो मराठी शाळेच्या मुलांनी आत्तापर्यंत, शिवाजी महाराजांच्या जीवनावरील चार प्रसंग, पोवाडा, राज्याभिषेक असे नानाविध आविष्कार सादर केले आहेत.

शाळेतर्फे नैमित्तिक स्तोत्रे, श्लोक यावरही कार्यक्रम सादर झाले आहेत. शाळेच्या इतर उपक्रमात, ढोल ताशा पथक, मराठी वाचनालय हे प्रामुख्याने नमूद करण्यायोग्य आहेत.

आपली मराठी संस्कृती जपत आपल्या पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे कार्य महाराष्ट्र मंडळाच्या मार्फत आपण सर्वजणच करत आहोत. मराठी शाळा ह्या कार्यात थेट सहभागी आहे.

हा कर्मयज्ञ अखंड चालू राहण्यासाठी, पायाभूत रचना घडवत; नवीन पिढीकडे नवीन नेतृत्वाकडे शाळा सोपवण्याचा माझा प्रयत्न असेल. तसेच, या वर्षी मिळालेलं स्टीवन्सन उच्च माध्यमिक शाळेच्या
प्रमाणपत्रानुसार, हा उपक्रम इतर उच्च माध्यमिक शाळांत राबविण्याचं उद्दिष्ट आम्ही ठेवले आहे.

केवळ शैक्षणिक दृष्ट्याच नाही तर सांस्कृतिक कार्यक्रमातही मराठी शाळेने आपला ठसा उमटवला आहे. शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या विविध कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन, शिवराज्याभिषेक तसेच हिरकणीची कथा, आग्र्याहून सुटका सारख्या भव्य नाट्यरचना सादर केल्या आहेत.

महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या संक्रांतीच्या सोहळ्यात श्री रवी जोशी रचित पोवाडा मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केला. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या जुलै २०१९ मध्ये डॅलस येथे होणाऱ्या सोहळ्यात हा पोवाडा बृहन्महाराष्ट्र मंडळ शाळांतर्फे रसिकांसाठी सादर केला गेला.

मराठी शाळेला मिळालेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल आणि भक्कम पाठिंब्याबद्दल आपले आभार. परंतु आम्ही यावरच न थांबता आमचा नवा उपक्रम आपल्यासाठी घेऊन आलोय. मराठी ग्रंथालय. ही संकल्पना आपल्या सर्वांसाठी आपल्या संस्कृतीच्या निकट घेऊन जाणारी आहे. इंग्रजी पुस्तके तर आपण वाचतोच पण आपलं मन ओढ घेत असतं ते आपल्या भाषेतल्या साहित्याकडे. हाच विचार घेऊन आम्ही शिकागोतल्या मराठीजनांना आवाहन केले आणि त्याला आपण सर्वांनी जबरदस्त प्रतिसाद दिला. आज '95th Naperville Library' मध्ये दोनशे मराठी पुस्तके उपलब्ध आहेत. आणि या पुढेही आणखी पुस्तके उपलब्ध करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

गेल्या पाच वर्षात आपण आम्हाला जो पाठिंबा दिला आहे त्याबद्दल मी आपली आभारी आहे. या नंतरही आपले आशीर्वाद आणि शुभेच्छा आमच्या पाठीशी लाभोत ही सदिच्छा व्यक्त करते.

आपली नम्र,
विद्या जोशी
शिकागो मराठी शाळा संचालिका

With best compliments to Maharashtra Mandal Chicago

Midwest Women OB/GYNE, Ltd.

SHAMITA BANSORE, M.D. F.A.C.O.G

MEDHA S. AMIN, M.D. F.A.C.O.G

RAMYA NARAYANAN, M.D. F.A.C.O.G

Address:
3825 Highland Ave, Tower 1 Suite 2F
Downers Grove, Illinois 60515

Practice Philosophy:
Dedicated to compassionate listening and being in partnership with each patient, by actively involving them in decisions that affect their health and well-being.

For further information and appointments
Please call: **630-852-3762**
Or visit our website: www.mwwbgyn.com

PAMPER YOURSELF

at

YOGITA'S SALON

FOR APPOINTMENTS PLEASE CALL/ TEXT/ WHATSAPP

YOGITA LANDGE

(LICENSED COSMETOLOGIST)

630-217-9322

Address

2472 Wentworth Lane, Aurora 60502

BECAUSE YOU NEED TIME FOR YOURSELF

शिकागोची नाट्यपरंपरा

त्या किणकिणत्या घंटेचा आवाज झाला आणि नाट्यगृहात अंधार होऊ लागला; तशी प्रेक्षकांतील कुजबुजदेखील दिव्यांचा प्रकाशाप्रमाणे जरा मंदावली. 'तिसरी घंटा झाली वाटते' असे कोणीतरी कुजबुजले आणि माझे मन अचानक सुमारे अर्धशतक मागे गेले. म्हणजे बघा, कोणालाही स्वतःच्या जन्माची आठवण असणे अवघडंच नाही? पण मला मात्र तो प्रसंग अगदी कालच घडल्यासारखा लक्षात आहे! तसे म्हंटले तर १९६९ साली शिकागो शहरात काही व्यक्तींनी एकत्र येऊन 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'ची स्थापना केली आणि दोनच वर्षात तिथे नुकतेच आलेल्या डॉ. शंकरराव हुपरीकरांनी 'प्रेमा तुझा रंग कसा' हे नाटक स्थानिक कलाकारांना घेऊन बसवले आणि तो प्रयोग खूप गाजला. त्या प्रयोगावर खुश होऊन श्री अरुण टेंबे यांनी त्या काळी ५० डॉलर्सचा चेक हुपरीकरांना बक्षीस दिला होता! तेव्हाच माझा जन्म झाला. अहो, मीच ती शिकागोची नाट्यपरंपरा!

पाणिग्रहण

अशोक व हेमा शेंडे, अनुपमा धारकर, अनिता गोडबोले, प्रमोद चेम्बुरकर अशा कलाकारांच्या साथीने साकारलेली मग 'हिमालयाची सावली', 'सूर्याची पिल्ले', 'मंतरलेली चैत्रवेल', 'वऱ्हाडी माणसं' अशी नाटकं शिकागोतच नव्हे तर उत्तर अमेरिकेत व कॅनडातही गाजली, पारितोषिक विजेती ठरली. 'नटसम्राट' मधले उतार वयात असहाय्य स्थितीतही जग पाहणारे नटवर्य बेलवलकर, 'अश्रूंची झाली फुले' मधले मुलाच्या दुर्व्यसनाने विव्हळ झालेले प्रोफेसर किंवा 'दुरितांचे तिमिर जावो' मधले मेव्हण्यावर जरब दाखवून सत्तासंपत्ती उपभोगणारे पंत असे हुपरीकरांच्या अभिनयाने अनेक पैलू रसिकांची वाहवा घेऊन गेले.

मूळ रचना पारंपरिक पध्दतीने प्रेक्षकांसमोर सादर करीत हुपरीकरांनी माझ्या पंचविशी-तिशी'पर्यंत नाट्यरसिकांना अशा अनेक मेजवान्या दिल्या. माझ्या संगोपनातील डॉ. हुपरीकरांचा कार्यभाग एवढा दैदिप्यमान आहे, की २०१० साली विश्व नाट्य संमेलनात नाट्य परिषदेने त्यांना अमेरिकेतील मराठी नाट्य परंपरेचा जनक म्हणून पुरस्कार देऊन गौरविले होते!

प्रेमा तुझा रंग कसा

डॉ. शंकरराव हुपरीकर अतिशय धडाडीचे, हरहुन्नरी व अभिनयकुशल. त्यांच्या मेहेनतीला तोडच नाही. त्या काळात महाराष्ट्रात गाजलेली तीन अंकी नाटके साता समुद्रापार हुबेहूब साकारणे हे काही सोपे काम नव्हते. विविध नवोदित लोकांना घेऊन त्यांनी पुढच्या काही वर्षांमध्ये मंडळासाठी 'बदाम राणी चौकट गुलाम', 'तुझे आहे तुजपाशी', 'काचेचा चंद्र', 'तरुण तुर्क म्हातारे अर्क' अशी अनेक वैविध्यपूर्ण नाटके बसवली. या माझ्या बालपणाच्या वर्षांमध्ये माझे लाड करणाऱ्या त्यांच्या पत्नी जयश्री तितक्याच उत्साही. नाटकात भूमिका तर करायच्याच, पण सर्व तालमींना कलाकारांच्या दुखल्या खुपल्याची देखभाल आणि खाण्यापिण्याची सरबराईदेखील तितक्याच उत्साहाने असायची.

नाट्यरसिकांपुढे माझे वाढदिवस असे धूमधडाक्याने साजरे होत असताना मराठी मायभूमीपासून हजारो मैल दूर आता मी इथे रुजले होते. व्यावसायिक सिने व नाट्य सृष्टीतील अनुभव गाठीशी असलेल्या अनुपमा धारकर आणि हौशी, गुणी कलाकार मिलिंद पानट, नितीन जोशी, श्रीधर जोशी यांना डॉ. हुपरीकरांची संगत व मार्गदर्शन लाभले होते. ह्या मंडळींनी १९९० ते २००० च्या दशकात आपला थोडा वेगळा ठसा उमटवायला सुरवात केली होती. आणि जुन्या नव्याचा मेळ घालीत अनुपमाने 'विच्छा माझी पुरी करा', 'सौजन्याची ऐशी तैशी' आणि 'दीपस्तंभ' अशी नाटके दिग्दर्शित करून रसिकांची मने जिंकली, तर 'डबल गेम', 'घर तिघांचे हवे', 'सविता दामोदर

परांजपे' अशी जरा वेगळ्या धाटणीची नाटके श्रीधर जोशीने प्रेक्षकांसमोर आणली. या काळात 'विच्छा माझी पुरी करा' मधून सुरेश पांडव सारख्या नवोदित कलाकारापासून ते 'वऱ्हाडी माणसे' मधून सुनील मुंडले सारख्या अनुभवी कलाकारापर्यंत अनेकांनी शिकागोच्या रंगमंचावर पदार्पण केले.

या दशकात शिकागोने हुपरीकरांची नाटके आणि या नवीन मंडळींची नाटके दोन्ही अनुभवली. हुपरीकर 'पाणिग्रहण' सारखी नाटके पारंपरिक पध्दतीने संपूर्ण नाटक त्यांच्या आवाजात ध्वनिमुद्रित करायचे, आणि कलाकारांच्या सोबत ते बसवायचे. जर कोणा कलाकाराला नाटकातील संवाद (डायलॉग) लक्षात राहत नसतील तर त्यांच्यासाठी प्रॉम्प्टरदेखील असायचा. नवीन दिग्दर्शकांची पध्दत जरा वेगळी होती, 'अश्रूंची झाली फुले' सारखे वसंत कानेटकरांचे अवघड नाटकदेखील पूर्ण कळल्यावर ते पाठ करून मगच प्रॅक्टिस करण्याची त्यांची पध्दत होती, आणि तरीही ऐनवेळी थोडेफार बदल करण्याची कलाकारांना मुभा होती. तुम्हाला सांगते, अशी मुभा असल्यावर कधीकधी मजेदार प्रसंगही घडायचे! 'अश्रूंची झाली फुले' नाटकात एक वाक्य होते: "लाल्या... काय होतंय बाळ?" पण त्याऐवजी ते नाटकात "लाल्या, काय ... होतंय बाळ?" असे म्हटले गेले. आणि लाल्याला काय झालंय, विचारण्याऐवजी लाल्याला बाळ होतंय का असा त्याचा अर्थ झाला! त्याने प्रेक्षकात एकच हशा पिकला; आणि संवादफेकीत शब्दावर कुठे आणि कसा भर द्यायचा याचा धडाच कलाकारांना मिळाला.

१९९४ साली 'मराठी विश्व न्यू जर्सी' मंडळाने आयोजित एकांकिका स्पर्धेत 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'तर्फे श्रीधर जोशी दिग्दर्शित 'तुमचे आमचे गाणे' या एकांकिकेला सर्वोत्कृष्ट एकांकिकेचे पारितोषिक मिळाले. श्रीधरने सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक पटकावले, आणि सुनील मुंडलेने सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक घेऊन शिकागोला तिहेरी मुकुट मिळवून दिला. माझ्या या नव्या अवताराची ही जोरदार नांदी होती!

असे ऐकिवात आहे, की २००२ मध्ये रत्नाकर मतकरी शिकागोला आले होते, आणि लीना घारपुरे यांच्या घरी बेसमेंट मध्ये नितीन जोशी, सुनील मुंडले, सुहास तांबे, विनय खळदकर, श्रीधर जोशी अशा मंडळींच्या गप्पा चालू होत्या. शिकागोने आपल्या स्थानिक कलाकारांना वाव देण्यासाठी नाट्यसृष्टीसाठी असे काही करायला पाहिजे की लोकांच्या बेसमेंटमध्येही प्रयोग करता येतील, असे मतकरी म्हणाले, आणि 'बेसमेंट थिएटर'च्या स्थापनेची बीजे रोवली गेली. त्यातून प्रत्यक्ष रोपटे उगवायला सुमारे पाच वर्षांचा काळ गेला. २००७ मध्ये संजय सावकूर दिग्दर्शित 'चि सौ कां चंपा गोवेकर' आणि मिलिंद पानट दिग्दर्शित 'मद्राशाने केला मराठी भ्रतार' या एकांकिका घेऊन 'बेसमेंट थिएटर' ने शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या माध्यमातून जोरदार पदार्पण केले.

शिकागो परिसरात स्थायिक झालेले सुनील मुंडले, संजय सावकूर, कल्पना नेकलीकर, मंगल गडकरी अशा हरहुन्नरी कलाकारांनी आपल्या अभिनयनाने आता रसिकांना जिंकले होते. प्रथितयश तीन अंकी नाटक बसवून सादर करण्यापेक्षा नाट्यक्षेत्रातील सर्व बाबी आत्मसात करणे, त्यातील विविध पैलू लोकांच्या समोर आणणे ही उद्दिष्टे घेऊन 'बेसमेंट थिएटर'ने अनुपमा धारकर दिग्दर्शित 'करायला गेलो एक', नितीन करंदीकर लिखित 'पडल्यावर प्रेमात', द. मा. मिरासदारांचे वगनाट्य 'मी लाडाची मैना तुमची', सुनील मुंडलेच्या 'सॅट जॉशी' कथेचे सुहास तांबेंनी केलेले नाट्य रूपांतर, विविध पारंपरिक नाट्य-नृत्य रचनांनी शिवरायांची 'पालखी' अशा विविध रचना प्रेक्षकांच्या समोर आणल्या. २०१०मध्ये श्रीधर जोशी लिखित 'बूमरँग' ह्या उत्तर अमेरिकेत लिहिल्या गेलेल्या पहिल्या दोन अंकी गद्य थरारनाट्याचा शुभारंभी प्रयोग न्यूजर्सी येथे आयोजित मराठी विश्व नाट्य संमेलनात गाजला. 'कुणीतरी आहे तिथे' मधली मधुरा साने व केतन राईलकर यांच्या अफलातून भूमिका, निखिल झवेरी, विद्या जोशी व वर्षा विसाळ यांचे आगळे वेगळे 'सुपारी.कॉम', विनय खळदकरच्या संगीत रचना, संजय सावकूरची ध्वनी-योजना व सुहास गोसावीची प्रकाश-योजना, अशा अनेक मंडळींनी आपल्या कलागुणांनी या नाट्यपरंपरेला वृध्दिंगत केले. रामदास थत्ते, अमित रोगे, समीर सावंत, रवी जोशी, आशिष नगरकर, धनंजय काळे, राहुल थत्ते व चिन्मय ढवळे यांनी बनवलेल्या नाटकांच्या सेटसाठी इथेच नव्हे तर गावोगावी वाहवा मिळाली आहे - नुकत्याच झालेल्या 'माऊली' नाटकातील ज्ञानेश्वरांनी चालवलेली भिंत नुसत्या शिकागोतील नव्हे तर इतर अनेक शहरांतील प्रेक्षकांची मने जिंकून गेली!

माझ्या शिरपेचातील अजून काही रत्ने म्हणजे इथल्या कलाकारांनी बसवलेली नाटके एवढी सुंदर आणि दर्जेदार असतात, की त्यांना बाहेरगावची आमंत्रणे दरवर्षी हमखास येतात. फ्लोरिडा ते सियाटल आणि टोरोंटो ते सॅन फ्रान्सिस्को असे सगळीकडे इथल्या नाटकांचे यशस्वी प्रयोग झाले आहेत आणि त्यामुळे माझी ख्याती उत्तर अमेरिकेत सर्वदूर पसरली आहे! शिकागोच्या नाट्यप्रेमी मंडळींपैकी नितीन करंदीकर आयोवाला, जयंत भोपटकर सियाटलमध्ये आणि अजय चित्रे कॅलिफोर्नियाच्या बे एरियामध्ये जाऊन माझ्या वटवृक्षाच्या पारंब्यातून नवे वृक्ष जोपासत आहेत. याशिवाय त्या सर्व मंडळींना इथे बोलावून शिकागो महाराष्ट्र मंडळाने २००७ व २०१० साली बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे संपूर्ण उत्तर अमेरिकेतील अनेक मंडळांचा सहभाग असलेल्या एकांकिका स्पर्धांचे उत्तम रीतीने आयोजन केले,

आणि स्थानिक कलाकारांच्या नाट्यप्रयोगांतून बाहेरगावच्या शेकडो मंडळींना माझ्या या परंपरेत सामावून घेत इथल्या कर्तृत्वाची झलक दिली.

पाणिग्रहण

मला अभिमानाने सांगावेसे वाटते, की माझी जोपासना करणाऱ्या सर्व कलाकारांना माझा अतिशय आदर आहे. कोणी कोणती भूमिका करायची, कशी करायची, कोणाला कमी/जास्त डायलॉग मिळाले का, कोण नवखा आणि कोण प्रतिथयश आहे, असे वादविवाद इथे होत नाहीत. नाटक हे सगळ्यांनी एकमेकांना सांभाळून एकमेकांच्या चुका झाकत एकत्र करायचा प्रयोग असतो, असे इथे सगळे मानतात. एकांकिका आणि तीन अंकी नाटकांच्या सोबतीने नाट्यवाचन, संगीत-नाट्य, नृत्य, गायन, काव्यवाचन अशा विविधरंगी प्रयोगांमधून ध्वनियोजना, नेपथ्य, संगीतरचना, चित्रकारिता, अशा अनेक कलागुणांना 'बेसमेंट थिएटर'च्या माध्यमातून वाव व प्रोत्साहन मिळाले आहे. कुणाल सावकूरच्या 'शादी.मॉम' पासून ते मराठी शाळेतर्फे 'शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक' पर्यंत बालगोपाळांचा सहभाग उत्साहवर्धक आहे, आणि या नव्या पिढीनेही आता आपला ठसा उमटवायला सुरवात केली आहे.

पडदा उघडण्याच्या आवाजाने भानावर आले - अहो हा अर्धशतकी प्रवास तुम्हाला खडतर आणि लांबलचक वाटत असेल पण मला ही वर्षे अगदी झटकन गेली असेच वाटते. या प्रवासात अनेक मान्यवरांचा उल्लेख राहून गेला असेल तर तो केवळ वेळेच्या आणि जागेच्या अभावी! अजून अनेक आठवणी आहेत, पण त्या सगळ्याच सांगत बसले तर हा 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'चा सुवर्ण महोत्सवाचा कार्यक्रम कधी बघणार? पण हो, माझे अवघे अर्धाशे वयमान ऐकून कोणाला वाटेल आता वार्धक्य जवळ आले. पण माझ्याकडे बघता कोणीही म्हणेल, वर्षागणिक हिचे तारुण्य पहा कसे अजूनच खुलले आहे! अहो, चिरतारुण्याचा वर मला मिळाला आहे का नाही हे काळच सांगेल, पण मी आहे सर्वतोपरी दुमदुमणारी शिकागोची नाट्यपरंपरा, आणि गीतकार राजा बढे यांच्या शब्दात, आहे अजुनी यौवनात मी!

पालखी प्रयोगातले सदस्य

शब्दांकन: अभिजित रायरीकर

राम व उमा केळकर यांच्या तर्फे महाराष्ट्र मंडळ शिकागोला सुवर्ण महोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा

Best wishes from Anupama & Manoj Bhat and family

Proud to support

Maharashtra Mandal Chicago

Microprint

microprint.com 1294 Lakeview Dr., Romeoville, IL 60446 630.969.1710

पोवाडा- गाथा: 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'च्या अर्धशतकपूर्तीची

आधीं वंदू श्री शारदारमणां ।
श्री छत्रपती शिवरायांच्या स्मरणां ।
फडकवु भगवा ध्वज उंच दिमाखात ।
वाजवू ढोलताशा जल्लोषात ॥ जी जी...जी र जी...

संत पंत तंतांचे आम्ही ऋणी ।
केला महाराष्ट्र कीर्तिमंत त्यांनी ।
विस्तारले बघा मराठीचे क्षितिज ।
सप्तसमुद्रापार अहा तिचे तेज ॥ जी जी...जी र जी...

ऐका ऐका सानथोर मंडळी ।
शिकागो मंडळाची कथा आगळी ।
सन एकोणीसशे सत्तरचा काळ ।
परदेशी मराठी माणूस विरळ ॥
अमेरिका-देशीं, मिडवेस्ट-प्रदेशीं ।
मिशिगन सरोवराच्या किनाऱ्याशी ।
दहा कुटुंबे जमली शिकागोत ।
महाराष्ट्र मंडळ केले संस्थापित ॥ जी जी ..जी र जी

मराठी अस्मितेचे लाविले रोप ।
तयाचा महावृक्ष बहरला अमाप ।
नाट्य गायन नृत्यास येईं बहर ।
उत्साहें करती मराठी सणवार ॥
अन् शिकागो त्रयींच्या कल्पनेस फळ ।
साकारले बृहन्महाराष्ट्र मंडळ ।
जोपासली आपुलकीने संस्कृती ।
उत्तर अमेरिकेत पसरली कीर्ती ॥ जी जी..जी र जी

कलोपासक रसिक स्वयंसेवकांस ।
महाराष्ट्राच्या परंपरेची आस ।
मराठी भाषा संस्कृतीचा ठेवा ।
देतीं नव्या पिढींस हा ज्ञानमेवा ॥ जी जी..जी र जी

मंडळाच्या अर्धशतकाचे मर्म ।
परदेशीं जपला महाराष्ट्रधर्म ।
होवो शतकपूर्ती प्रगतीपथाने ।
अन् संस्कृती संवर्धन जोमाने ॥

विनता कुलकर्णी

सुवर्ण महोत्सव कार्यकर्ते

GJC 2019 Core Team

समीर सावंत, वैशाली राजे, रत्नांगी मालपेकर, आशिष नगरकर, रवी जोशी, मृणाल जोगळेकर

MMC 2019 Core Team

मंदार पित्रे, तनुजा पोतदार, अमित रोग्ये, वैशाली राजे, निलेश मालपेकर

Advisory Team

नितीन जोशी, मिलिंद पानट, पंकज अकोलकर, मिलिंद जोगळेकर

Finance Team

मंदार पित्रे, आशिष नगरकर

Programming Team

रवी जोशी, विद्या जोशी, कल्पना निमकर, संजीव कुलकर्णी, सदानंद जोशी, सौरभ नेकलीकर , रत्नांगी मालपेकर, निलेश मालपेकर, नीरज श्रीखंडे, अमित रोग्ये, केतन राईलकर, सारा बोंगाळे, अविनाश यार्दी, केदार नवकल, शिल्पा वैद्य, प्राची जुन्नरकर, सुनील देव, अपर्णा टल्लू, राहुल थत्ते, चिन्मय ढवळे

Registration Team

संदीप बाग, अशोक लेले, भारती प्रभु-वेलणकर, प्रियांका पारेख, सारा समीर बोंगाळे, सायली विळेकर, वर्षा बाग, प्रज्ञा जोगळेकर, विद्या जोशी, विकास भालेराव

Food Team

कविता मुंडले, तनुजा पोतदार, नीला लेले, अदिती अडावदकर, भारती प्रभु-वेलणकर, अनुपमा भट, स्वाती पवार, कल्पना नेकलीकर, प्रज्ञा जोगळेकर, वैशाली राजे, श्रुती तेंडुलकर-रोग्ये, सुपर्णा थत्ते, लीना वैद्य, प्रिया पाटणकर, स्मृती देशपांडे-बेडगकर, शीतल देशपांडे, रत्नांगी मालपेकर, मृणाल जोगळेकर, पंकज अकोलकर, अमोल पाटील, अभिजित थोरात, मनोज भट, शुक्ला क्षीरसागर-जोशी

Fundraising Team

विद्या जोशी, मंदार पित्रे, अमोल पाटील, निखिल जव्हेरी, मुग्धा देव, उल्का नगरकर, भारती प्रभु-वेलणकर, प्रकाश टोके, वैशाली राजे, पंकज अकोलकर, प्रसाद अडावदकर, संदीप गाडगीळ, समीर सावंत, आशिष नगरकर

Marketing Team

सुजीत कुळकर्णी, प्रसाद अडावदकर, संदीप गाडगीळ, चेतन रेगे, शलाका पालकर-रेगे

Suvarnasmruti Smaranika Team

रश्मी चाफेकर, विनता कुलकर्णी, विद्या जोशी, उल्का नगरकर, शलाका पालकर-रेगे, कल्पना नेकलीकर, राधा गोडांबे, वर्षा विसाळ, अर्चना भिडे, अनिरुद्ध भिडे, रवी जोशी, आशिष नगरकर, चेतन रेगे, नितीन जोशी, मिलिंद वेलणकर, प्रसन्न जोगळेकर, अभिजीत रायरीकर, जया हुपरीकर, रेखा देवधर, अमोल पाटील, रत्नांगी मालपेकर

Exhibition

केदार नावकल, पंकज अकोलकर, सुचेता अकोलकर, श्याम अंतुरकर, नारायण अथणीकर, प्रसाद अथणीकर, प्रिया अथणीकर, अनिरुद्ध भिडे, अर्चना भिडे, संदीप गाडगीळ, मंगला गडकरी, चंद्रशेखर जोशी, मोहिनी जोशी, रवी जोशी, विद्या जोशी, नरसिंह कामत, रत्नांगी मालपेकर, उल्का नगरकर, आशिष नगरकर, प्रियांका पारेख, राहुल थत्ते

Communication

रवी जोशी, चेतन रेगे, मिलिंद वेलणकर, जुईली वाळिंबे, रुणाली पाटील

Overall facility

शिरीष जोशी, जयदीप बुझरूक, मिलिंद दिघे, विवेक मगर, चैतन्य आगाशे, प्रसाद अथणीकर,
राधा गोडांबे, अविनाश यार्दी, संदीप नाचणे, श्रीकांत प्रभु

Stage

अमित रोग्ये, रामदास थत्ते, राहुल थत्ते, समीर सावंत, धनंजय काळे, आशिष नगरकर, चिन्मय ढवळे, समीर बोंगाळे,
नीरज श्रीखंडे, रवी जोशी, सौरभ नेकलीकर, संजीव कुलकर्णी, सदानंद जोशी

Decoration

हर्षदा सावंत, अनघा देशपांडे, दीपा भिमनवार, दीपाली काळे, कश्मिरा मगर, प्रज्ञा गाडगीळ-सुलाखे, राधा गोडांबे,
शिप्रा अथणीकर, शुक्ला जोशी, स्वाती रायरीकर, स्वाती औटी, टीना ढवळे, वेदश्री नाईक, वृंदा मोरे,
अधिश्री पंचपोर, विद्या जोशी, रत्नांगी मालपेकर

Hospitality and Transportation

रवी बामणे, वैभव शृंगारपुरे, गिरीश पाटणकर, पंकज अकोलकर, अमोल पाटील, जयंत ओगले,
वीर दोशी, अशोक लेले, नीला लेले, अनिकेत सावंत

Photography Team

हेमंत चव्हाण, मंदार जोगळेकर, सुनील देव, सजो नाईक, गिरीश पाटणकर, रत्नांगी मालपेकर, निलेश मालपेकर, मृणाल जोगळेकर, रवी जोशी, विद्या जोशी, अर्चना भिडे, उल्का नगरकर, अंबरीश भागवत, अविनाश यार्दी, सदानंद जोशी, संगीता चव्हाण, प्रसाद अथणीकर, सुभाष मंत्री

Kids and Youth

अनुपमा बुझरूक, सुचेता अकोलकर, विद्या जोशी, प्राची भागवत, अधिश्री पंचपोर, वर्षा विसाळ, प्रिया तेलवेकर, अपूर्वा श्रीखंडे, सुलक्षणा कुलकर्णी, दिपा कामत, श्रुती कुळकर्णी, सोनाली डहाळकर, स्वाती बाणखेले, दिपाली चौधरी, स्वाती राऊत

Kids Team

रिध्दी भागवत, ईशा राऊत ,स्वरा श्रॉफ, तन्मय पंचपोर, सयुज चौधरी, अजय राऊत, अनुषा थत्ते, मिहिका जोशी, हर्ष मिश्रीकोटकर, श्रीवल्लभ दामले, आर्यन रोग्ये, अनिकेत जोगळेकर, तेजस विसाळ, राजस विसाळ, अनिश खोत, अयुश खोत

Chicago Marathi Shala

मागील पाच वर्षांचे नेपरव्हिलमधील मराठी शाळेचे शिक्षक, शिक्षिका व स्वयंसेवक

विद्या जोशी	मंदार जोगळेकर	श्रुती रोग्ये	अश्विनी मोडक	मधुमिता चांडगे
मनीषा रहाटडकर	सुनयना जाधव	वैदेही देशपांडे	तेजसी अडावतकर	प्रांशु अडावतकर
सोनाली राऊत	संजय राऊत	केतकी देशपांडे	शिल्पा चौबळ	निलेश जोशी
रूपाली नाईक	कोमल पित्रे	भारती प्रभू	माधुरी गद्रे	जुईली वाळिंबे
रूपाली दिघे	सायली जोशी	अनुराधा कुलकर्णी	वृषाली सोनावणे	प्रीती ऊंडाळे
योगिता मेहंदळे	आरती औरंगे	उत्पल शासणे	शिल्पा नाईक	

मागील पाच वर्षांचे शॉम्बर्ग येथील मराठी शाळेचे शिक्षक, शिक्षिका, स्वयंसेवक

संज्योत बोरकर	अपूर्वा श्रीखंडे	प्रिया तेलवेकर	सुलक्षणा कुलकर्णी	योगेश गायकर
विद्या कदम	अर्चना भिडे	सोनाली डहाळकर	शलाका पालकर-रेगे	सोनल आगाशे
श्रुती कुळकर्णी	चेतन रेगे	अदिती अडावतकर	ओंकार लेले	शीतल देशपांडे
कल्पना नेकलीकर	तेजस्विनी जोशी	वर्षा विसाळ	प्राची भागवत	श्रुती लेले
वैशाली सोनपाटकी	मानसी जोशी	स्मिता बेन्नुर	हेमा साखरधांडे	आदिश्री पंचपोर
अनुराधा राजाध्यक्ष	पल्लवी पंचपोर	शलाका गंडभिर		

मागील पाच वर्षांचे मराठी शाळेचे स्वयंसेवक विद्यार्थी

अनीश खोत	आयुष खोत	अनुष्का श्रीपाल	अनिकेत जोगळेकर
श्रीवल्लभ दामले	सुमिल वाघमारे	यश तेलंग	

Lezim Team

प्रसाद अथणीकर, चिन्मय ढवळे, रत्नांगी मालपेकर, विद्या जोशी, योगीता लांडगे, वेदश्री नाईक, प्रसाद नाईक, शिल्पा आचार्य, अनिकेत सावंत, दिपाली चौधरी, सुचेता आकोलकर, प्रज्ञा जोगळेकर, शुक्ला क्षीरसागर जोशी, प्रज्ञा गाडगीळ सुलाखे,

Dhol Tasha Team

अंबरीश भागवत, प्राची भागवत, रत्नांगी मालपेकर, निलेश मालपेकर, राहुल थत्ते, कल्पना नेकलीकर, सुप्रिया गायकर, योगेश गायकर, अमोघ भुस्कुटे, अपर्णा पाटील, अपूर्वा श्रीखंडे, नीरज श्रीखंडे, संजीव कुळकर्णी, सदानंद जोशी, मंदार पित्रे, कोमल पित्रे, चैतन्य आगाशे, अभिजित थोरात, अजय राऊत, श्रीदत्त राऊत, विद्या जोशी

Dance Team

प्रियांका पारेख, महिका पारेख, अनुषा थत्ते, मिहिका जोशी, आर्यांना डिसिल्वा, नेहा तेलंग, स्वाती रायरीकर, सुचित्रा श्रीखंडे, प्रज्ञा जोगळेकर, मानसी थत्ते, निष्का तांबे, अनघा तांबे, श्रद्धा गवाणकर, केतकी देशपांडे, प्रिया पाटणकर, शुभदा कुलकर्णी, स्नेहा चाफळकर, अमृता गुप्ते, वैदेही कुलकर्णी, मनिषा आठल्ये, शिवानी मराठे, पद्मिनी देसाई, दीपा कामत सावंत, चिन्मय ढवळे, अभिषेक गावसाने, शेफाली काकोडकर, सारा समीर बोंगाळे, कविता शैलेकरी, धरती डोंगरे, टिना कांदे-ढवळे

Gift Bag Team

विद्या जोशी, अमोल पाटील, श्रुती तेंडुलकर-रोग्ये, नीला लेले, वृषाली पानट, रत्नांगी मालपेकर, वल्लरी शशिकांत भोपटकर

Audio, Video and Lights team

सुहास गोसावी, सौरभ नेकलीकर, अभिजीत रायरीकर, राहुल थत्ते, श्रीधर जोशी, मिलिंद पानट, केतन राईलकर, अमित रोगे, समीर सावंत, धनंजय काळे, संजीव कुलकर्णी, सुचेता अकोलकर, आनंद थत्ते, रवी जोशी, संजय सावकूर, वीरेंद्र माने

आजीव सदस्य

Abad, Suresh & Surekha	Gokhale, Sudhir & Jyoti	Nath, Shanta
Adavadkar, Prasad & Aditi	Gupte, Anil & Aparna	Nayak, Ashok & Smita
Ajmere, Kumudini	Gupte, Uday & Veena	Neklikar, Saurabh & Kalpana
Akolkar, Pankaj & Sucheta	Hazaray, Sunil	Nimkar, Kalpana & Sandeep
Ambergaokar, Suresh & Rajashree	Hirway, Sumesh	Panat, Milind & Vrushali
Andurkar, Shridhar & Nileema	Huprikar, Shankar & Jayashree	Pandav, Vasant & Vrunda
Anturkar, Shyam & Pratibha	Joglekar, Milind & Mrunal	Parulekar, Pradnya & Satish
Athanikar, Narayan & Priya	Joshi, Chandrashekhar & Mohini	Patankar, Padmakar & Nayana
Barve, Vishwas & Manjiree	Joshi, Dhananjay & Bansi	Patil, Anjali
Bendre, Seema	Joshi, Niteen & Manasi	Patil, Annasaheb & Shubhangi
Bhide, Parag & Madhura	Joshi, Sanjeev & Medini	Patil, Prahlad & Hemlata
Bias, Ram & Kiran	Joshi, Satish & Jayashree	Patwardhan, Avinash & Vandana
Chande, Manohar & Sujata	Joshi, Shridhar & Supriya	Phatak, Uday & Shalini
Choksi, Umesh & Vasu	Joshi, Suhas & Neela	Pitre, Mandar & Komal
Choudhari, Sanjesh & Deepali	Kabre, Dilip & Nileema	Prachand, Gopal & Pushpa
Dabadghav, Ram & Smita	Kale, Alka	Prachand, Narayan
Dabholkar, Harsha & Aruna	Kale, Dhanajay & Deepali	Pradhan, Ranjit & Ujwala
Dandekar, Kartik & Varsha	Kale, Narendra & Nanda	Raje, Sandeep & Vaishali
Dangat, Geetaram & Manda	Kalokhe, Pradeep & Urmi	Rajpurkar, Anay
Das, Arup & Sumitra	Kaluskar, Rita	Ranade, Vasant & Meghana
Date, Urmila	Kamat, Manohar & Sunanda	Rangnekar, Milind & Pooja
Dawande, Manjusha	Kane, Prabhakar & Swati	Rathore, Meena & Ramesh
Deobhakta, Arvind & Anila	Karande, Vishwanath & Swaroop	Riswadkar, Ashutosh & Alka
Deodhar, Subhash & Rekha	Karmarkar, Vrunda & Shashi	Sambare, Dutta & Varsha
Deshmukh, Madhumati	Kelkar, Manish & Anuradha	Sane, Anjali
Deshmukh, Sudhakar & Neela	Kelkar, Sudhir & Medha	Shende, Ashok & Hema
Deshpande, Achyut & Laxmi	Khedkar, Nandakishore & Shubhangi	Sheth, Shyamkant & Sunita
Deshpande, Manisha & Vijay	Khedkar, Prakash & Shaila	Talathi, Suresh & Snehita
Deshpande, Prashant & Jyotsna	Kudalkar, Kishor & Meena	Talwalkar, Avinash & Prabha
Deshpande, Sharad & Padmaja	Kulkarni, Anuja & Gururaj	Talwalkar, Uday
Dewoolkar, Mandar & Anagha	Kulkarni, Madhukar & Sadhana	Tamhane, Ajit & Meenal
Dharkar, Dilip & Anupama	Lagvankar, Ashok & Alka	Tembe, Vrishali
Dighe, Narendra & Uma	Lele, Ashok & Neela	Thanedar, Shri & Shashi
Fuldeore, Nitin & Rupali	Mahisekar, Laxminarayan	Thatte, Dileep & Naina
Gade, Rajeev & Nita	Manerikar, Sunanda	Toke, Prakash & Sunita
Gaitonde, Shantaram & Tara	Mantri, Subhash & Bhavana	Trier, Jack & Anjali Nargolkar
Gaitonde, Sunil	Mayenkar, Krishna & Shobhana	Vade, Aruna & Suresh
Gandhi, Ajit & Nanda	Modak, Vivek & Ashwini	Vaidya, Avinash & Nutan
Gandhi, Kiran & Seema	Moghe, Sachin & Smita	Vaidya, Prabha
Gavankar, Gaurav & Shraddha	Morankar, Sudhakar & Vijaya	Vaishampayan, Vivek & Manjiri
Ghode, Anil & Saroj	Mundle, Suneel & Kavita	Vedak, Chandragupta & Nameeta
Ghogale, Anuradha	Nadkarni, Subhash & Manda	Vitkar, Jayashree
Godbole, Aneeta	Nadkarni, Uday & Manda	
Gokhale, Rajiv & Sunanda	Nagle, Vishwanath & Pushpa	

MAHARASHTRA MANDAL CHICAGO
50
1969
2019
सुवर्ण महोत्सव
Golden Jubilee Celebration
October 11 to 13, 2019
Hemmens cultural Center, Elgin IL
RUBARU
with
Subodh Bhave
www.mahamandalchica
Hemmens Cultural Center,
सूरप्रवास २
सदारकर्ते - महाराष्ट्र मंडळ शिकागो
अश्वमेध
निर्मिती: बेसमेंट थिएटर, शिकागो
लेखक: रत्नाकर मतकरी
दिग्दर्शक: श्रीधर जोशी
रामदास थत्ते, अमित रोग्ये
प्रकाश: सुहास गोसावी
सुनील मुंडले, मधुरा साने, सौरभ नेकलीकर, तेजस्विनी इनामदार, संजय सावकुर,
बुझरुक, चैतन्य तांबे, निखिल जवेरी, अभिषेक गावसाने, रामदास थत्ते, विदया जोशी
पुन्हा
सही रे सही
हार्मोनियम या अष्टपैलू वाद्याची नानाविध उपयुक्तता, रंगतदारपणे
व मनोरंजक पद्धतीने उलगडून दाखवणारा एक अभिनव कार्यक्रम..!
निर्मित
जादूची पेटी
सादरकर्ते :
आदित्य ओक आणि सत्यजित प्रभू
MMC
गौरव
श्री. अविनाश
धर्माधिकारी
रामायण
अवघे अर्धाशे वयमान, शिकागो महामंडळ श्रीमान | मराठी मनांचा सन्मान, सप्तसागरापार भगव्याचा अभिमान ||
RSVP at www.mahamandalchicago.org

महाराष्ट्र मंडळ शिकागो' सुवर्ण महोत्सव २०१९ कार्यकर्ते

SAVE BIG$$$

Great Rates & No Closing cost Options

Wide variety of mortgage products with great service and support

FREE Consultation

Knowledgeable and Responsive

Ashok Lakshmanan
Mortgage Broker
NMLS#238977

1 We compare wholesale mortgage rates from multiple banks and lenders

2 No monthly M.I. Mortgage options upto 97% loan to value

3 We work with multiple banks and lenders to get more loan options.

PMSInc

Professional Mortgage Solutions, Inc.

(An Illinois Residential Mortgage Licensee) NMLS#237990

1776 Legacy Circle, Ste#107 • Naperville, IL 60563
Off: 630.717.3600 • Fax: 630.717.3601

Call: 630.205.8676

KEY TO INNOVATIVE MORTGAGE

HMSI
MORTGAGE SPECIALISTS

LICENSED IN TEXAS AND ILLINOIS

ANIL LOOMBA
630.745.9640

IL NMLS# 203169 - TX NMLS# 1858110

ANIL@HMSILOANS.COM

Proudly Serving the Community for Over 20 Years!

HOME MORTGAGE SOLUTIONS, INC.
6825 HOBSON VALLEY DRIVE
- WOODRIDGE, ILLINOIS -